

ग्रंथकर्ते
समर्थभक्त मोहनीराज उपाख्य
बाबा सागडे

# मोहनीराज—नमन

असे ग्राम नेवासे, प्रवरा तीरी हे
तिथें मोहनीराज तो नांदताहे
जिथें स्फुरली ज्ञानेश्वरी ज्ञानीयांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥१॥

अशा पुण्य क्षेत्रीं असें जन्म झाला
बहू हर्ष तो होई, माता पित्याला ।
सद्वर्तनें तोषवीले तयांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥२॥

म्हणोनी तुम्हां नाम हे मोहनीराज
तुम्हां लाभले सद्गुरु भाऊराज
असे केशरी मारुती साक्षी यांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥३॥

स्वयंस्फुर्तीने येउनी भाग्य नगरी
तुम्हीं पातला शारदा मंदिरी
त्वरें मिळविलें ज्ञान कीर्ती यशासी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥४॥

मनी ठेऊनी कर्तव्य जाण
केलें त्वरे आप्त स्वकीया सुजाण ।
जसें सद्गुरु दाविती सत्पथासी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥५॥

परमार्थ हा साधीयेला प्रपंची
कधी ना ढळें शांतीही हो मनाची ।
न स्पर्शू शके हो अहंता जयांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥६॥

सदा रंगली वृत्ति ही राम नामी
असे आवडी कीर्तनी नित्यनेमी
बहू सुस्वरें आळविती राघवांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥७॥

भरे रोमरोमांत हा दासबोध
जनां सांगती प्रवचनी अर्थबोध
असे लागली आवडी सज्जनांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥८॥

तुम्ही सागडे वंशी हो ज्ञानदीप
असती तुम्हां चारी मुक्तिसमीप
वाशीष्ठ गोत्री उद्धरीलें कुळासी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥९॥

तुम्हां आठवीता मनी, कंठ दाटे
असे आमुचे काय प्रारब्ध खोटें
धरा पोटी येऊनीया बालकांसी
नमस्कार साष्टांग हा सद्‌गुरूसी ॥१०॥

असे शारदा देवीही ज्ञान दानी
तशीं देवी त्रीपूरा चिन्मयानंद खाणी
कृपे सद्‌गुरूच्या प्राप्ती झाली तुम्हांसी
नमस्कार हा मोहनीराज यांसी ॥११॥

---

# प्रकाशकाचे मनोगत

आमचे वडील तीर्थरूप कै. मोहनीराजपंत उपाख्य बाबासाहेब सागडे यांनी लिहिलेला "श्रीदत्त भार्गव संवाद, त्रिपुरारहस्य ज्ञानखंड" ग्रंथ वाचकांना देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. मूळ संस्कृत ग्रंथातील श्लोकांचा मराठी आर्यात बाबांनी सुरस व प्रासादिक अनुवाद केला आहे. आज दासनवमीच्या शुभ पर्वावर हा ग्रंथ प्रकाशित व्हावा हा आम्ही अपूर्व योग मानतो.

गेली ३६ वर्षे ती. बाबांची ही रचना हस्तलिखित स्वरूपात आमच्याजवळ होती. आमचे आप्त, प्रेमळ हितचिंतक व भाविक यांनी ग्रंथ प्रकाशित करण्याची इच्छा अनेकदा व्यक्त केली. आज ती आकांक्षा पूर्ण होत असल्याचा आम्हाला निरतिशय आनंद व समाधान आहे. ग्रंथ प्रकाशित करण्याची प्रेरणा चंद्रपूरचे आदरणीय श्री. हरिभाऊ धनकर गुरुजी यांची आहे. शिरपूर पेपर मील कागद-नगर येथील श्रद्धावान अधिकाऱ्यांनी किमान किंमतीत कागद नागपूरला उपलब्ध करून दिला, त्यामुळे प्रकाशनकार्यास वेगाने प्रारंभ करता आला.

ग्रंथ प्रकाशनात प्रा. मदन धनकर व श्री. रामाचार्य यांनी बहुमोल सहाय्य केले. सर्वश्री रामराव वझलवार वकील, मधुकरराव आचार्य, भास्करराव उदगीरकर, अ‍ॅड्. मनोहरराव वझलवार यांनी वेळोवेळी खूप मदत केली. ग्रंथ प्रकाशनात सर्वात मोठे बळ देणारी मदत निवृत्त प्राचार्य हरिभाऊ तेलंग, अमरावती यांनी करून आमचा उत्साह वाढविला.

ग्रंथ प्रकाशनाबाबत सर्वश्री एकनाथराव धोकटे, देविदासराव अष्टपुत्रे, मधुकरराव आचार्य व मी मिळून केलेल्या आवाहनास उत्तम प्रतिसाद मिळाला हे कृतज्ञतापूर्वक नमूद करू इच्छितो. नारायण मुद्रणालय नागपूरचे चालक श्री. मधुसूदन व श्री. श्रीकृष्ण या बनहट्टीबंधूंनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहोत. श्री. चंदू पाठक यांनी मुखपृष्ठ काढून दिले. छायाचित्रे आशा फोटो स्टुडियो, चंद्रपूरचे श्री. भालचंद्र ऊर्फ बापू मोगरे यांनी तत्परतेने दिली यासाठी त्यांचे विशेष आभार मानतो. मधुकर आर्टस्, नागपूर यांनी छायाचित्र छपाई कमी वेळात करून दिली. डॉ. सुहास धर्मट्टी व श्री. मोहन धनकर यांचेही सहकार्य उल्लेखनीय आहे. हस्तेपरहस्ते अनेकांनी प्रकाशनपूर्व केलेल्या अर्थ-सहाय्याबद्दल आम्ही विशेष कृतज्ञ आहोत.

नागपूर विद्यापीठ मराठी विभागातील प्राध्यापक व सुप्रसिद्ध संशोधक डॉ. मधुकर रामदास जोशी यांनी आमच्या विनंतीस मान देऊन प्रस्तावना लिहून दिली यासाठी आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत.

**नागोराव सागडे**

# ग्रंथकर्ते मोहनीराजपंत उपाख्य बाबा सागडे

॥ श्रीराम समर्थ ॥

**सदा स्वरूपानुसंधान । हे मुख्य साधूचे लक्षण ।**
**जनी असोन आपण । जनावेगळा ॥ दासबोध ८-९-९**

प. पू. ती. कै. मोहनीराजपंत सागडे उपाख्य बाबांची आठवण येताच दासबोधातील वरील ओवी मनात सतत निनादत राहते. कारण त्यांचा व्यासंग व अभ्यास यानुसार ही ओवी त्यांनी किती आत्मसात केली होती याची कल्पना त्यांच्याजवळ असणाऱ्यांना आहे. त्यांनी "श्रीदत्त भार्गव संवाद, त्रिपुरारहस्य : ज्ञानखंड" या संस्कृत ग्रंथाचे मराठी आर्या छंदात रूपांतर केले. ग्रंथ प्रकाशनाचे निमित्ताने पितृसेवेदाखल ग्रंथ व ग्रंथकर्त्याचा परिचय देत आहे. हा परिचय लिहिताना अंतःकरण भरून आले आहे.

आम्ही सर्वजण त्यांना बाबा म्हणत असू. शिवाय या नावात एकप्रकारचा प्रेमळपणा असल्यामुळे यापुढे बाबा असा उल्लेख करूनच मी आपल्याशी बोलत आहे.

ती. बाबांच्या वडिलांचे नाव संभाजी व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. घराण्याचे नाव सागडे. मूळचे गाव राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर. आमचे दादा म्हणजे आजोबा मास्तर होते. ते नेवासे गावी असताना बाबांचा जन्म शके १८०५ सुभानुनाम संवत्सर आश्विन शु. ११ रोजी झाला. त्यांना दोन बंधु होते. मोठे नरहरपंत व लहान किशाभाऊ एक बहीण होती. बाबांचा विवाह त्यावेळच्या रूढींनुसार वयाच्या १४ व्या वर्षी श्री. बळवंतराव अष्टपुत्रे यांची कन्या अन्नपूर्णाबाईशी झाला.

ती. बाबांचे मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण कर्जत मुक्कामी झाले. पुढे मिडलस्कूलचे शिक्षण उदगीर व मॅट्रिकपर्यंतचे बीदरला झाले. मद्रास विद्यापीठाची 'फर्स्ट एक्झामिनेशन इन आर्टस्' ते १९०३ साली उत्तीर्ण झाले, यावेळी शिकवण्या करून त्यांनी हैद्राबाद येथे शिक्षण पूर्ण केले.

शिक्षक म्हणून १९०७ साली बीदरला त्यांनी आपल्या जीवनास प्रारंभ केला. पुढे नांदेड, लातूर, निर्मल आदी ठिकाणी काम केल्यानंतर १९२३ साली ते आसिफाबाद (सध्या जि. आदिलाबाद–आंध्र प्रदेश) येथे नाझर म्हणजे उप शाळा निरीक्षकाचे जागेवर आले. यावेळी त्यांनी येथे घर बांधले व थोडी जमीनही

घेतली. आदिलाबाद जिल्ह्यात नाझर म्हणून काम केल्यामुळे इकडच्या भागात त्यांना नाझरसाहेब या नावाने लोक ओळखत. सिरसिका येथे ५ वर्षे ते मुख्याध्यापक होते. निवृत्तीपूर्वी आसिफाबादच्या पूर्व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून ते आले व १९३७ साली तेथेच ते नोकरीतून निवृत्त झाले. त्यानंतरही घरी खाजगी रीतीने मुलांना ते शिकवीत असत.

१९४५ साली ते चंद्रपूरला आले व न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये त्यांनी १९४८ पर्यंत काम केले. त्यानंतर काही काळ वडिल मुलाजवळ हैद्राबादला तर काही दिवस आसिफाबादला हरीचिंतनात काढला. शेवटी मार्गशीर्ष व. १ शके १८७३ (दि. १४ डिसेंबर १९५१) रोजी रात्री १०-३० वाजता गुरुस्मरण करीत स्वस्वरूपी विलीन होऊन त्यांनी देह सोडला.

ती. बाबांनी समर्थांच्या उपदेशानुसार प्रपंच व परमार्थ साधला. यात आमची आई ती. अन्नपूर्णाबाई हिचाही वाटा आहे. घरातील वातावरण त्यांनी अनुकूल ठेवल्यामुळे हे साधू शकले. पुढे १९६३ साली आईला देवाज्ञा झाली. उभयतांच्या पश्चात आम्ही ५ मुली – सौ. बन्साबाई, दुर्गाबाई, वेणुबाई, वत्सलाबाई व पद्माबाई व दोन मुलगे नागोराव व नारायण त्यांच्या प्रेमळ आठवणी व कृपाप्रसादावर सुखाने काळ कंठीत आहोत.

ती. बाबांचा ओढा तरुण वयापासूनच परमार्थाकडे होता. २० व्या वर्षीच गुरुवर्य भाऊराज महाराजांनी हैद्राबादी केशरी हनुमान मंदिरात त्यांना उपदेश दिला. त्यांचे कीर्तन भक्तिरसाने ओथंबलेले असायचे. हैद्राबादी भगवद्भक्त भटजीबापूच्या मठातही ते कीर्तन करीत असत. श्रीसमर्थ रामदास स्वामींचा दासबोध हा बाबांचा उपास्य ग्रंथ होता. श्री दासनवमीस दासबोधाने सप्ताह वाचन करून ते दासनवमी साजरी करीत असत. तो प्रघात त्यांच्या कृपेने आजही चालू आहे. शिवाय ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, योगवासिष्ठ, वाक्यवृत्ती व वेदेश्वरी हे त्यांचे आवडते ग्रंथ होते. रामायण, महाभारत व श्रीमद भगवद्गीता या ग्रंथाचाही त्यांचा अभ्यास होता. या सर्व ग्रंथांना ते दासबोधातून वाहत असत. श्रीसमर्थ रामदासांच्या उपदेशानुसार लेखन व वाचन यांचा त्यांनी सतत छंद धरला. त्यांनी दासबोधावर टिपणे तयार केलीत.

बीदरला असताना त्यांनी भजनी मंडळ तयार केले. दर एकादशीस आळीपाळीने एकेकाचे कीर्तन होत असे. निवृत्तीनंतर आसिफाबादला दररोज प्रवचन व भजन व्हायचे शिवाय प्रासंगिक कीर्तन ते वेगळेच. चंद्रपूरच्या मुक्कामात राम मंदिरात (श्री नानाजी महाराज त्रिपूरवार यांचे) अधिक काळ वास्तव्य होते. तेथेच दररोज प्रवचन व कधीकधी कीर्तनही करीत. पू. ती. स्व. हरिभाऊ धनकर यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध तेथेच आला. उपभयतांची तासनतास परमार्थ चर्चा चाले. वेदान्तविषय समजावून देण्याच्या बाबांच्या शैलीने पू. धनकर गुरुजी

प्रभावित झालेत. "वेदान्तासारखा सूक्ष्म, कठीण व अनुभवगम्य विषय सोपा करून सांगावा तो सागडे बाबांनीच" असे धनकर गुरुजी नेहमी म्हणतात. बाबासारखा अध्यात्म विषयाचा शिक्षक दुर्मिळ असल्याची ग्वाही आजही ते देतात. बाबाकडून इतर ग्रंथाबरोबर त्रिपुरारहस्य ग्रंथ धनकर गुरुजींनी ऐकला. तेव्हापासून ग्रंथ प्रकाशनाची बलवत्तर इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. आज त्यांच्याच प्रेरणेने ग्रंथ प्रकाशित होत आहे.

श्री त्रिपुरारहस्य अथवा श्रीदत्त भार्गव संवाद ह्या ग्रंथात श्रीगुरु दत्त आणि श्री भार्गवराम (परशुराम) यांच्यात झालेला आध्यात्मिक संवाद हारितायन मुनींनी नारदाला ऐकविला आहे. श्रीगुरु दत्ताकडून श्री त्रिपुरादेवीचे महात्म्य आणि उपासना पद्धती जाणून घेऊन परशुरामांनी १२ वर्षे महेंद्र पर्वतावर तपश्चरणपूर्वक उपासना केली. त्यावेळी त्यांच्या मनात जगाच्या स्वरूपाविषयी व व्यवहाराविषयी तसेच लोकांच्या सुखविषयक कल्पना यासंबंधी काही शंका निर्माण झाल्या म्हणून परत गंधमादन पर्वतावर येऊन त्या श्री दत्तगुरुसमोर व्यक्त केल्या. तेव्हा श्रीगुरुंनी कृपावंत होऊन अनेक दृष्टांतांच्या सहाय्याने सविस्तर विवेचन करून सर्व शंकांचे निरसन केले आहे. साधारणपणे असे विवेचन क्लिष्ट असते, अशा समजुतीने वाचकांचा त्याकडे कमी कल असतो. परंतु या ग्रंथात श्रीगुरुंनी हा सदुपदेश रोचक कथांच्या मधुर अनुपानातून सामान्य वाचकांच्या गळी उतरविला आहे. अशा कथांपैकी एक सुंदर कथा म्हणजे हेमचुडाल राजपुत्र आणि त्यांची पत्नी हेमलेखा यांचा संवाद होय. हा संवाद इतका मनोरंजक व उदबोधक आहे की त्यामुळे त्या नगरीतील सर्वच लोकांना आत्मबोध झाला व त्या नगरीचे नांव विद्यानगरी झाले.

हा मूळ ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. या ग्रंथाच्या सर्वांगीण सौंदर्याने मोहित होऊन बाबांनी केवळ परोपकार बुद्धीने ३६ वर्षांपूर्वीच त्याचा सुलभ मराठी आर्या वृत्तात अनुवाद केला. अतिशय कष्टाने व सद्भावाने सिद्ध झालेला हा ग्रंथ आज वाचकांच्या हाती येत आहे हे पाहून आम्हाला धन्यता वाटते. या सदग्रंथाचे वाचन व मनन भावभक्तीने करून वाचकांनी त्याचा खरा लाभ घ्यावा अशी नम्र विनंती आहे.

**नारायण सागडे**

# प्रस्तावना

श्री मोहनीराज उर्फ बाबामहाराज सागडे हे एक श्रेष्ठ अधिकारसंपन्न महापुरुष होते. ते स्वत: श्री समर्थांचे भक्त असून दासबोध त्यांना वेदतुल्य होता. बाबामहाराज सागडे यांचे बरेचसे आयुष्य उद्गीर, विदर, नांदेड, निर्मल, लातूर, आसिफाबाद व हैद्राबाद भागात गेले. काही काळ ते चंद्रपूरला होते. बाबामहाराजांना हैद्राबादला मुक्काम असताना त्यांना गुरुवर्य भाऊमहाराजांचा अनुग्रह झाला. हे भाऊमहाराज हैद्राबादकडील, प्रख्यात रामदासी व समर्थभक्त श्रीयोगीराज महाराजांच्या परंपरेतील होते. आपल्या गुरुपरंपरेतील शांभवी ब्रह्मविद्या जशी निवृत्तीनाथांनी श्री ज्ञानदेवाला प्रदत्त केली तशीच भाऊमहाराजांनी देखील बाबामहाराजांना दिली. तेव्हापासून ते कीर्तन करू लागले. त्यांची अनेक कीर्तने हैद्राबादच्या भटजीबापूच्या मठात झाली. दासबोधाचे पारायण व दासनवमीचा उत्सव बाबामहाराज करीत असत. शिवाय ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, योगवासिष्ठ, वाक्यवृत्ती व वेदेश्वरी या प्रासादिक ग्रंथाचे वाचन करीत. दासबोध हा तर त्यांचा जीवलग सखा होता. किंबहुना दासबोधातील कित्येक ओव्या बाबामहाराजांच्या रूपाने प्रगट झालेल्या होत्या. दासबोधात समर्थ स्वत: म्हणतात त्याप्रमाणे, "भक्तांचेनि साभिमाने। कृपा केली दाशरथीने। समर्थकृपेची वचने । तो हा दासबोध". बाबामहाराज सागडेंची वचने असत. अशाप्रकारे दाशरथीची कृपा व समर्थ वचनांचा प्रत्यय बाबामहाराजांना गुरुपरंपरेतून प्राप्त झाल्यामुळे बाबा महाराजांच्या वाणीमधून त्रिपुरा जगदंबा प्रादुर्भूत झाली व त्रिपुरारहस्याचे संपूर्ण ज्ञानकांड उजाळून निघाले.

त्रिपुरारहस्य हा त्रिपुराविद्येचा प्रमाण ग्रंथ आहे. यामध्ये श्रीदत्तभार्गवसंवाद आहे. भगवान श्रीदत्तात्रेयगुरुंनी त्रिपुराभगवतीचे परमरहस्य प्रथमत: परशुरामाला सांगितले. दत्तात्रेयाकडून त्रिपुरादेवीचे महात्म्य व उपासना जाणून घेऊन परशुरामांनी महेंद्रपर्वतावर तप व देवीची पूजा केली. तेथून ही परमपावन विद्या हारितायन नारद संवादद्वारा प्रगट झाली. हा सर्वच संवाद संस्कृत भाषेत असून त्रिपुरारहस्य नावाने तो विख्यात आहे. या ग्रंथाचे ज्ञान, उपासना व कर्म असे तीन भाग आहेत. त्यापैकी ज्ञानकांडाचा भाग उपलब्ध असून त्याचे बावीस अध्याय आहेत. या ग्रंथावर तंजावरकडील उमानंदनाथांनी ग्रंथरचना केली आहे. त्रिपुरासुंदरीची पूजा व आराधना शंकराचार्य परंपरेत आहे. शिवाय नवनाथ हे त्रिपुराविद्येचे उपासक आहेत. किंबहुना त्रिपुरादेवीची पूजा व आराधना सर्वच ठिकाणी आहे. देवी भागवतामध्येही त्रिपुरेचे पूजाविधान आहे. त्रिपुरा व तिच्या दशमहाविद्या हा उपासनाविधी परममंगल व देवी

दत्तात्रेय स्वरूपाचे यथार्थ प्रगटन करणारे दर्शन आहे. त्रिपुरा ही साक्षात दत्तात्रेयरूप आहे. तशीच ती नानाविध रूपाने प्रगट वा आविर्भूतही होत असते. रेणुका, सीता, द्रौपदी, अनुसूया ह्या त्रिपुरारूपच असून त्रिपुराविद्येमुळे नवनाथादि शिवशक्तीचे रूप प्रत्ययाला येते. ह्या त्रिपुराविद्येचे प्रथम प्रगटन त्रेतायुगात श्रीदत्तात्रेयांनी केले. त्यामधून दत्तभार्गव संवाद निर्माण झाला. त्रिपुरेचे रहस्य दत्तात्रेयांनी परशुरामाला सांगितले. त्यावर परशुरामाची सूत्रे प्रसिद्ध झाली व देवीपूजनाचा मंगलप्रवाह भक्तांना पावन करीत दशदिशांना वाहू लागला.

मूळ त्रिपुरारहस्य संस्कृत भाषेत आहे. याचा सारांश दत्तभार्गव संवाद रूपाने पूर्वी मराठीत प्रगट झाला होता. परंतु मूळ संस्कृत श्लोकाचा श्लोकशः अनुवाद मराठीत आर्यावृत्तात बाबामहाराज सागडे यांच्या ग्रंथाद्वारा आज प्रथमच प्रसिद्ध होत आहे. त्रिपुरारहस्याचे माहात्म्य लक्षात घेता प्रस्तुत अनुवादाने मराठी वाङ्मय क्षेत्रातच नव्हे तर परमार्थक्षेत्रात मोठी भर घातली आहे. त्रिपुराविद्या सर्व विद्यांची मातृजननी असून शिवाय ती प्रकाशरूप आहे. तेव्हा मूळ आशयाला यत्किंचितही धक्का न लागता तो जशाच्या तसा मराठीत आणणे व सुबोध रूपात मांडणे ही मोठीच बाब आहे. मूळ विषयाशी तादात्म्य असल्याशिवाय त्रिपुरारहस्याचा अनुवाद अन्य कोणालाही करणे शक्य नाही. परंतु भगवतीची कृपा व सद्गुरुंचा आशीर्वाद ह्यामुळे बाबामहाराजांनी यत्किंचितही कोर ढळू न देता आपला अनुवाद केला आहे. उदा. ब्रह्माविष्णुमहेशासह सर्व ऋषीजनांनी भगवतीचे ध्यान केले. तेव्हा जगदंबा प्रादुर्भूत होते, या प्रसंगाचा रसाळ व प्रासादिक अनुवाद बाबामहाराजांच्या वाणीतूनच ऐकण्यात मौज आहे.

भगवती त्रिपुरा स्तवनाच्या या आर्या वाचताक्षणी कोणालाही आर्यापती मोरोपंतांची आठवण व्हावी, एवढ्या त्या आर्या प्रभावी व प्रत्ययकारक आहेत. मोरोपंतांच्या पाऊलावर पाऊल टाकून अनेकांनी आर्यापर रचना केल्या परंतु त्रिपुरारहस्यासारखा संपूर्ण ग्रंथच अनुवादरूपाने आर्यावृत्तात सादर करण्याची विलक्षण कामगिरी बाबामहाराजांशिवाय अन्य कोणीही पूर्वी केली नव्हती. मूळ ग्रंथातील भाव व आशय जशाचा तसा मराठीत सादर करून बाबामहाराजांनी आपली व आपल्या बरोबर आपल्या समस्त गुरुकुलाची नेमकी ओळख परमार्थप्रेमीजनाला करून दिली. त्यांचा हा ग्रंथ म्हणजे भाविकाचे श्रीमंत माहेर व त्रिपुरा जगदंबेचा विलास आहे.

नागपूर, चैत्र कृष्ण चतुर्थी शके १९१० **मधुकर रामदास जोशी**

६-४-८८

॥ त्रिपुरारहस्य ज्ञानखंड ॥

# ॥ श्रीदत्त भार्गव संवाद ॥

## अध्याय १

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीगुरुभ्योनमः ।। श्रीत्रिपुरांबायैनमः ।।

श्रीत्रिपुरादेवि जगत्कारण, चिन्मयी सदानंदी
स्वादर्शी भासवी जी चित्र जगच्चित्र तीच मी वंदी ।।१।।
ब्रह्मसुता हरितायन बोले तू ऐकिले कि अवधान
देउन देविमहात्म्या परसाधन जें मुमुक्षुला श्रवण ।।२।।
आतां तुज मी कथितों अद्‌भुत जें ज्ञानखंड अतिदिव्य
ऐकति जे नरभावें कधि न पुन्हा त्यांसि होय शोकभय ।।३।।
आहेत पंथ वैदिक वैष्णवही शैव शाक्त पाशुपत
विज्ञानादि विचारुनि निश्चित हा भाग नेमिला विहित ।।४।।
गुरुदत्त कथी हें कीं भृगुपुत्राज्ञान थोर अनुपम्य
हें ज्ञान जसें सहजें न दुजें कीं ग्राह्य होय मतिगम्य ।।५।।
अनुभूति तसी युक्ती स्वीकारी निरुपणीं व इतिहास
दृष्टांतयुक्त सांगुनि केलें हें गम्य अल्पमति ज्यास ।।६।।
जरि कोणा ऐकुनि हें न कळेचि स्वस्वरूप पाषाण
दुर्दैवी समजा तो होइ न त्या ज्ञान बोधु शिव जाण ।।७।।
तो भाग नारदा ! तुज कथितों या ज्ञान खंडरूपेंची
परिमिज गमत अलौकिक संतांचें चरित थक्क मम वाची ।।८।।
नवल कि तूं देवर्षी इच्छि करूं माझिया मुखें श्रवण
हा थोर अनुग्रह तव, मानी मी सहज होय साधुगुण ।।९।।
इच्छा तव तोषवि, मज जेवी घ्राणेंद्र कस्तुरीं तोखे
एवं त्रिपुरावैभव माहात्म्य हि, रामगुरुमुखें ऐके ।।१०।।
शुभहेतु शुद्ध हृदयचि, सर्वजना राम राम ऐकून
भक्तिरसलीन होई क्षण, कांहीं स्थीर तूष्णि होऊन ।।११।।

वृत्त्योत्थानीं तदुपरि, मोदभरे अश्रु दाटले नेत्रीं
रोमांचयुक्त काया, स्वानंदें पूर्ण, तुष्टतागात्रीं ॥१२॥
हर्ष न मावे हृदयीं, बाह्यनिघे रोमकूप भेदून
येई भानावरि जैं, नमन करी गुरुस, जवळि येऊन ॥१३॥
कंठ भरे आनंदें, बाहेर निघेन स्पष्ट उच्चार
कष्टें बोले गुरुवर !, झालों मी धन्य आज साचार ॥१४॥
साक्षात् शिवरूपी हा दत्तगुरु, सदय होय संतुष्ट
तुच्छचि मजला गमतें, ब्रह्मपदहि त्याहुनी नसे श्रेष्ठ ॥१५॥
गुरुवर संतुष्ट तरी होतो, जीवासि आप्त यमनेमें
भाग्योदय किति माझा, पाहे मज गुरु महेश्वर प्रेमें ॥१६॥
भवदानुग्रह योगें मानी, मी, प्राप्त जाहलें प्राप्य
करुनि कृपा ऐकविलें मजला, कीं अखिल देविमाहात्म्य ॥१७॥
ममचित्तीं वांछा हे, सेवावी त्रिपुर सुंदरी श्रेष्ठ
करुनि दया मज सांगा, औपासन पद्धती तिची स्पष्ट ॥१८॥
सुश्रद्धा भक्त्यान्वित रामाचे योग्य चित्त देखियलें
यास्तव उपासनेला पात्र असे पूर्ण गुरुमनीं आले ॥१९॥
त्रिपुरोपास्तीस्तव शुभ दीक्षा त्रिपुरेचि त्यास अर्पियली
प्रेमळ हृदय म्हणूनी उपासना रीति त्यास बाणविली ॥२०॥
दीक्षा सर्व श्रेष्ठासि देउनि त्या ज्ञानदा गुरुस्वांगे
पूजनविधी मंत्रासन अखिल क्रम भावना सहित सांगे ॥२१॥
कमल रसातें सेवुनि तृप्त जसा होय मानसी भृंग
गुरुमुख पीयुष लाभें झाला संतृप्तहृष्ट सर्वांग ॥२२॥
गुरुने सांगितला क्रम घेउनि लक्षांत आचरायास
एकांतीं यत गेला गुर्वाज्ञें तो महेंद्र शिखरास ॥२३॥
जातांच तिथें निर्मी पर्णकुटी शुभ अती सुखदरम्य
आल्हाद मना होई अवलंबी मग उपासना कार्य ॥२४॥
त्रिपुरामूर्ति ध्यानीं पूजाजप नित्यनेम चालवित
टळला न क्रम त्याचा द्वादश वर्षांतरीं करी सतत ॥२५॥

चित्तीं प्रेम उपासनिं राही अतिशय म्हणूनि हीं बारा
वर्षें अल्पावधि गणि स्वस्थपणीं एकदां करि विचारा ।।२६।।
मागें संवर्त मुनी भेटे तें एक गोष्ट म्यां पुसिली
सांगे परिमज कळली कांहि न अद्यापि ती तशिच उरली ।।२७।।
मध्यें विस्मृति झाली पूर्णपणें आज गोष्ट आठवली
पुसतां पूर्वीं गुरुतें त्यांनी त्रिपुरा कथाच वर्णियली ।।२८।।
गुरुकथनीं न निघे जें पूर्वी संवर्त बोलिला होता
सृष्टि निरूपण वेळी केलीं मी ध्वनित गोष्ट गुरुनाथा ।।२९।।
आख्यान कटकृदाचें कथिले हा विषय टाळिला गुरुजी
अप्रस्तुत यास्तव तो नकळे संवर्तभाव मज अजूनी ।।३०।।
भार्गव विचार करिलो जगताचें वस्तुतां स्वरूप काय
किमपि न कळतें मजला अवडंबर विश्वबीज तें काय ।।३१।।
विश्वाची गति न कळे, जाइ कुठें शेवटीं कुठें स्थीर
शाश्वत कांहि न दिसतें जगिं, अस्थिरता क्षणोक्षणीच चिर ।।३२।।
परिनुमजे कैसा हा भासे व्यवहार अचल नित्याचा
मजला कोठें न गमे चित्र जगीं लेश त्या विचाराचा ।।३३।।
अवलोकितां जनांचे व्यवहार गमे विचित्र मज सारे वाटे
वागति ते जणु, जाती अंधसवे अंधपूर्ण अविचारें ।।३४।।
स्वात्मनिरीक्षण करिनच कोणीही वागती विमूढपणें
प्रत्यंतर मी यासी बालपणींचे प्रसंग मी नेणे ।।३५।।
वर्तन पद्धति वेगळि जेव्हां होतें कुमारपण अंगीं
तरुणपणीं दुसरी कीं सध्या व्यवहार होय नवरंगीं ।।३६।।
परि या सर्व रीतीनें नगमे कीं प्राप्त काय मज झालें
मानव उद्योग करी जगतीं, फळ वांछुनी सदा सगळे ।।३७।।
खपुनि सदा व्यवहारीं कोणाला, प्राप्त होय काय फळ
कोण सुखी झालासे न कळेचि, असार भासतें सकळ ।।३८।।
बोलति लोक मिळालें, उद्योगा फळ, परी न मी मानी
कारण कीं करिती ते पुनरपि उद्योग फळचि इच्छूनी ।।३९।।

लाभे फळ तरि कैसी होइ कथा मानसी फळेच्छाती
पुनरपि तरि लोक पहा करिती उद्योग सारखे पळती ।।४०।।

फल तरि त्यासि म्हणावें दुःखाचा समूळ नाशची झाला
प्राप्ती पूर्ण सुखाची होउनि कर्तव्य नाद नच उरला ।।४१।।

कर्तव्याचें ओझें वाहत जों निजशिरीं बनुनि रंक
तोंवरि दुःखाभाव न होइ तया सौख्य लाभ निःशंक ।।४२।।

सर्वांग दग्ध झाल्या पायांवरि लेप चंदनाचा जो
लावी प्रकार तैसा जाणा कर्तव्य शेष आहे जों ।।४३।।

शरविद्ध हृदय तळमळ निववाया कवळि अप्सरेला जो
व्यर्थ प्रकार तैसा जाणा कर्तव्य शेष आहे जों ।।४४।।

क्षयरोग ग्रस्त असे परिसे संगीत मरण दारीं जो
व्यर्थ प्रकार तैसा जाणा कर्तव्य शेष आहे जों ।।४५।।

सत्यसुखी जगिं तेची ज्यांना कर्तव्य शेष नच काहीं
दिसती तृप्त सदोदित स्वात्मसुखें शांत पुर्ण निजदेहीं ।।४६।।

'कर्तव्य असें मज हें' बोले नर तो जगीं न सुखि होई
शूलारोहित मनुजा कोण म्हणे गंधमाल्य सुख देई ।।४७।।

शतशा कर्तव्याचा ठेवुनि जे व्याप वागती जगती
वाहति आस सुखाची थोर चमत्कार वाटतोच अती ।।४८।।

अविचाराची थोरवि लोकांच्या काय मी अहो कथुं ती
अगणित कर्तव्याच्या गिरिखालीं क्रांत ही सुखी म्हणती ।।४९।।

करितो प्रयत्न भूपति जैसा सुख साधण्या सदैव पहा
तैसाची सुखार्थ करी भिक्षारत दिवसरात्र यत्न महा ।।५०।।

हेत्वानुरूप फळें ही मिळविति ते वेगळीं म्हणति धन्य
कृतकृत्य मानिताती आक्रमितो मार्ग मीहि नच अन्य ।।५१।।

दृष्टि न परिणामावरि देउनि वागे गतानुगतिकत्वें
मी ही अंधापरि तरि हिताहित किं गुरुवरा पुसों जावें ।।५२।।

न कळे ते जाणाया उतराया संशयार्णवांतून
सद्गुरुमुख बोधगिरारूप तरी गांठुया त्वरा करून ।।५३।।

निश्चय ऐसा करुनी शुद्धमती जामदग्न्य शीघ्रगतीं
सद्गुरुदर्शन घ्याया सोडोनी शैलराज मग निघती ।।५४।।

अविलंबें आला जों पर्वतवर गंधमादनावरती
तों देखे पद्मासनिं दत्तगुरू भूरवी किं सुखमूर्ती ।।५५।।

धांवत गेला श्रीगुरुपदपीठा पुढति धरे पडला
धरूनि करें पदकमलां ठेवि तया उपरि भाल तो अपुला ।।५६।।

यापरि सादर नमनीं तत्पर रामास सद्गुरू पाही
झाले प्रसन्न चित्तीं उठवुनि सप्रेम आशितें देई ।।५७।।

गुरू म्हणती वात्सल्यें, वत्स ! उठी पातलास बहुकाळ
तू तें न पाहि, कथिबा शरीरादि कुशल वृत्त तव बाळ ।।५८।।

उठुनीं क्षणीं गुरूनें दाखविल्या आसनावरी बसला
मर्यादें कर जोडी हृष्टमुखें यापरी वदे बोला ।।५९।।

गुरुदेवा ! करुणाब्धे ! आहे भवदमृत कर कृपा व्यजन
माझ्या शिरीं विधीकृत रोगादिक ताप होय किमपीन ।।६०।।

भवदानुग्रहलब्ध स्वात्मामृत दृढकरंडक स्थित हा
व्याधी भास्वत तापे बाह्य जरी प्रखर त्यागणी न पहा ।।६१।।

अपुल्या कृपें गुरुत्रर केलें मज मुदित अंतरीं बाह्य
या चरणा अंतरलों होता हा रोग मजसि असहाय ।।६२।।

त्यावांचुनि तापद मज नव्हता कीं रोग कोणता आन
तोहि अतां हरिलासे झालों मी निरुज पाहतां चरण ।।६३।।

झालों संपूर्ण सुखी दर्शन लाभें परंतु घोळतसे
बहुता दिवसापासुनि गोष्ट मनीं एक शल्य बोचतसे ।।६४।।

संशय बहुकाळाचा फेडावा गुरुवरा दया करुन
भवदाज्ञा होइल तरि सांगावा आपणास इच्छि मन ।।६५।।

ऐकुनि भार्गव वचना यापरि गुरु दत्त मोद मनि मानी
केवळ करुणासागर गुरुबोले प्रेमयुक्त अशि वाणी ।।६६।।

बारे परशूरामा ! प्रेमें तवथोर तुष्ट मी पाही
सांग तुझा संशय तो करिन समाधान जाण लवलाही ।।६७।।

**इति श्रीमदितिहासोत्तमे त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे**
**भार्गवप्रश्ने प्रथमोध्यायः ।**

# अध्याय २

श्रीगुरू आज्ञा होतां अत्रिसुता आदरें करी नमन
भार्गव विनीत होउन वदता झाला मुनीस हृष्ट मन ।।१।।
हे भगवन् सर्वज्ञा ऐकावें हो दयालु गुरुनाथा
पूर्वीं क्षत्रियवंशा विषयिं मला क्रोध फारसा होता ।।२।।
वधिले क्षत्रिय भरिले हृदरुधिरें एकवीस वेळां मी
स्तन्यमुलें गर्भवती नुरवी निक्षत्र व्हावि कीं भूमी ।।३।।
तोषवि पितरां करि मी नियमें तर्पण क्षत्र रुधिरानें
मद्भक्ति गौरवातें करिती मज शांत आपुल्या वचनें ।।४।।
सांप्रदयोध्ये माजीं प्रत्यक्ष हरीच रामराज्य करी
क्षत्रिय जिंकावा तो गर्वबळें चाल केलि त्याजवरी ।।५।।
परि तो भगवंत करी पूर्ण पराभूत मजसि गर्वहरी
ब्राह्मण केवळ जाणुनि मजला तो सत्य जीवदान करी ।।६।।
परतुनि येतां मार्गीं वाटे मज खंति फार अयशाची
परि ताप मना झाला विसरेना स्मृति तया कधि दिनाची ।।७।।
दैवें मजला भेटे मार्गीं संवर्त साधु अवधूत
दुष्कर संत परीक्षण भस्मा माझारि अग्नि कीं गुप्त ।।८।।
शिशिरापरि शीतल कीं तत्संग करी मलाहि अति शांत
रविरश्मीं तप्तनरा निववी तरू जेवि गर्द छायेत ।।९।।
त्यांच्या स्थितिसंबंधीं करितां मी प्रश्न सदय चित्तानें
मधुर वचें प्रतिपादी प्रश्नार्थचि गूढ साररूपाने ।।१०।।
प्रश्न तयां करूं न शके जैसा कीं रंक राज्ञिशीं गोष्टी
पुनरपि सांगा विनवी म्हणती जा घेइ दत्त गुरुभेटी ।।११।।
यास्तव आलों चरणाजवळी जे होती सुखद गुरुराया !
मार्गीं जन संसर्गें अंध जसा लाभतो सुखोपाया ।।१२।।

कळलें न कांहिं मजला वदला संवर्त जें मुखें सारें
मागें ऐकियलें म्यां त्रिपुरामाहात्म्य भक्ति देणारें ॥१३॥
औपासन पद्धतीनें गुरुरूपा देविमूर्ति हृदयांत
धारण नित्य करी मी फल सद्यः प्राप्त काय हो त्यांत ॥१४॥
गुरुदेवा सांगावें करूनि दया बोलिला मूनी वाचे
कृतकृत्यता न लाभे कळलें जरि तें न शांति सुख कैचें ॥१५॥
मुनिवच कळल्यावांचुन करणें जे कर्म फोल ते गमते
बालक्रिडेसमची औपासन कर्मसार नच दिसतें ॥१६॥
पूर्वीं यजुनी यज्ञ देउनि बहु दक्षिणा करुनि कष्ट
अन्नादिक अर्पुनिया केलें देवेंद्र पूर्ण संतुष्ट ॥१७॥
संवर्त मुखें कळले सर्वहि तें कर्म होय अल्पफळ
यास्तव मजला गमतें अल्पफळचि होय दुःख कीं निवळ ॥१८॥
असुख जसें दुःख असे अल्पसुखहि त्यापरीच दुःखगमे
कारण तें सरतांची दुःखागम अधिक जाणवे नेमें ॥१९॥
इतुक्यावरिच न संपे यांत असें आणखीहि एकभय
मृत्यु सहाय्यक कर्मचि न दिसे त्या वारण्या हितोपाय ॥२०॥
त्रिपुरोपासन विधिनें करितों जें त्याचि ही अशीच गती
तें सर्व काल्पनिक क्रीडा बालिश तयापरी दिसती ॥२१॥
आपण कथिल्यारीती वा अन्ये ही उपासना शक्य
नियता नियतपरिने शास्त्राधारेचि बोलणे सत्य ॥२२॥
विधि भिन्न जसें दैवत यज्ञापरि ही उपासना होय
कर्मचि यास्तव मायिक शाश्वतफल यांत हो असे काय ? ॥२३॥
अवलंब असत्याचा करुनी फल सत्य लभ्य होय कसें
शास्त्रें, म्हणाल, म्हणती 'जीवन तो कर्म' यास अवधि नसे ॥२४॥
भगवान्संवर्त तरी ज्ञानस्थिति मांजि शांतची दिसती
कर्तव्य विषज्वलनीं शीतल सर्वांग मुक्त कैं राहती ॥२५॥
हास्यास्पद कर्मपथा लोकांच्या त्यजुनि मार्ग धरि दुसरा
निर्भयतेचा गमला, जळत वनीं तोयमग्नगज किं खरा ॥२६॥

कर्तव्य मुक्ततामृत पिऊनि संवर्त होइ हृष्ट मन
ऐशा मुक्तदशेला झाला तो प्राप्त कारणे कोण ॥२७॥
सांगावें कीं मजला समजाउनि सर्व हें गूरूदेवें
कर्तव्याहिग्रस्ता व्यथिता मज मुक्त करुनि निववावें ॥२८॥
यापरि भाषण करुनी गुरुचरणा भार्गवें नमन केलें
ऐकुनि गुरुनें त्याला ज्ञानासी पात्र पूर्ण मानियलें ॥२९॥
सहज दयाघन गुरुते प्रेमानें भार्गवास तें वदती
वत्सा तुज बुद्धि अशी झाली तूं धन्य होय बा जगतीं ॥३०॥
बुद्धि अशी जणुं नौका सागरिं बुडत्यास तारि साचार
घडल्या कर्मोपासन पुण्यबळें प्राप्त होय सुविचार ॥३१॥
ज्या हा विचार होई त्याला पद परम पावन प्राप्त
हृदयाकाशरूपा ती देवी हृदयांत राहिजे गुप्त ॥३२॥
भक्तिवशें भक्तांच्या हृदयीं पावे विकास ती पूर्ण
मुक्तचि अनन्य भक्ता करि त्याचे मृत्युपाश तोडून ॥३३॥
कर्तव्यातें समजुनि वेताळचि दूर जों न जाति भयें
तों वरी न शांति मनुजा सुख कैचें कर्म शेष जों होयें ॥३४॥
कर्तव्यरूप अहिनें केलासे दंश ज्या नरा त्याला
शाश्वत कल्याणलभे न घडे हें पात्र दुःखभोगाला ॥३५॥
कर्तव्य विषा सेवुनि जन मूर्छित सर्वथा जगीं झाले
बनले अंधचि केवळ हितमार्गचि कोणता तया न कळे ॥३६॥
भलताच मार्ग धरिती जाति जसे अंध मागुनी अंधा
पडतिच मोहीं पडती न कळे गति कोण त्या मती मंदा ॥३७॥
कर्तव्यविषें मूर्च्छित हे जन कैसें अनादि पासून
विष सागरीं पचति ते ऐके दृष्टांत येइ समजून ॥३८॥
कांहीं पांथिक येती विंध्याद्रीं क्षुधित फार ते झाले
शोधिति फिरुनि फळा तों विषमुष्टि फलांस पाहुनी धाले ॥३९॥
समजुनी त्या तुंदि फळें भक्षिति नेणुनि रुचि क्षुधाभ्रमित
विष त्यांचे तनुजाळी दाह बळें होति ते तदा व्यथित ॥४०॥

अंधुकता दृष्टि प्रति ये विषशमनार्थ यत्न ते करिती
भाक्षिलि विषमुष्टि फळें नेणुनि तुंदींत दोष ते गणिती ।।४१।।
फिरतां वनांत होतीं कनक फळे भासली तयांलिबे
विषनाशक म्हणुनी त्या भक्षण करिती यथेच्छ अविलंबे ।।४२।।
झाले उन्मत्त बहू धुंदिमुळें मार्ग सोडुनी जाती
अतिनिबिड खोल गारीं कठिण स्थळि जाउनी तदा पडती ।।४३।।
कंटक घुसुनी झाले छिन्नतनू जानुपादकर फुटले
दूषुनि परस्परांतें उच्चरवें कलह करित ते सुटले ।।४४।।
मुष्टिप्रहार काष्टें पाषाणा कडुनि एकमेकासी
ताडिति विदीर्ण काया होउनि ते प्राप्त होति नगरासी ।।४५।।
अपरात्रीं दैववशें नगरद्वारा समीपते येती
परिरक्षक ते त्यांना रोधिति अंत:प्रवेश नच देती ।।४६।।
विसरुनि देशाकाला भ्रांतचि ते भांडती अति त्वेषें
तैं ते रक्षक पुरिचे एक बळें झोडिती तयां रोषें ।।४७।।
सैरावैरा पळती रक्षाया प्राण, सोडुनी नगरी
पळतां परिखीं कांहीं पडले त्या सहज भक्षिलें मगरीं ।।४८।।
कांहीं पडले कूपीं कांहि जलाशयिं तिथेच ते मेले
कांहीं कलहीं मरती उरले ते पळुनि जीवसह गेले ।।४९।।
एवं स्वार्थेच्छेनें मोहित जन होउनी भ्रमें अंध
कर्तव्यनिषें मूर्छित होती दु:खानळीं स्वतां दग्ध ।।५०।।
तूं धन्य भार्गवा बा श्रेयस्कर पावलास सुविचारा
बीजचि कल्याणाचें होईकीं प्रथम पायरी थारा ।।५१।।
निश्रेयस वाड्यावर चढण्यास्तव, पाहिजे विचार बरा
परमपदाची प्राप्ती त्याविण कोणा न होय मित्र खरा ।।५२।।
अविचार हाच मृत्यू मोठा त्यानेच मारिले सर्व
सुविचारें कल्याणा जय पावे शत्रु होति हतगर्व ।।५३।।
अविचारी रात्रिचर दानव ते पावले विनाशासी
सुविचार कास धरुनी देव पहा भोगिती विलासासी ।।५४।।

जिंकिति निजशत्रूंना देव कसे चित्ति धरुनि सुविचार
सुखतरू हा अंकुरतो सुविचार बिजांतून वाढतो फार ।।५५।।
या सम शोभादायक पुरुषासी नान्यची अलंकार
श्रेष्टपदीं विधिवहरी पूज्य असे हेतु यास सुविचार ।।५६।।
शिवशंकर सुविचारें होइ महेश्वर तसाच सर्वज्ञ
मृगपाठीं भ्रमुनि पळे राम कसा संकटीं पडे प्राज्ञ ।।५७।।
परि पुढति विचारानें बांधुनिया सेतु सागरा लंघी
लंका राक्षस रावण जिंकुनि घे जानकी प्रियासंगीं ।।५८।।
ब्रम्हा अविचारानें होउनिया मूढ जाहला विवश
अभिमानाला तेणें होय शिरच्छेद विदित इतिहास ।।५९।।
अविचारें असुरांतें देइ महादेव वर, तया दुष्ट
भस्म कराया आला पळति भयग्रस्त पावले कष्ट ।।६०।।
अविचारें श्रीहरि जंव भृगुच्या पत्नीस मारूनी टाकी
झाला शाप तदुपरी दु:सह तपास पावला लोकीं ।।६१।।
यापरि विचार सुटतां दानव पशु दैत्य मनुज सुर थोर
सर्वांस कष्ट होती दु:सह विपतीस पावती घोर ।।६२।।
जगिं धन्य तेचि भार्गव ! तेचि महाभाग जाण सुविचारा
सोडुन कधीं न जाती करि मी त्यांच्या पदीं नमस्कारा ।।६३।।
अविचारें केलें तें कर्तव्यचि जाण मोहवश करिते
तेंच विचारें करितां जे संकट दु:ख मुक्तता देते ।।६४।।
यास्तव बहुकाळें जन पुण्यबळें प्राप्त होति सुविचारा
अविचार असे जोंवरि सुविचारा तों असे कुठें थारा ।।६५ ।।
ग्रीष्मीं भास्कर जेव्हां चंडकरें तापवी मरूदेशा
तेथें सांगा कैसें वारि मिळे थंड फोल ती आशा ।।६६।।
संतत हृदय जयाचें झालें अविचार पावकीं तप्त
साधन केल्यावांचुन शीतल सुविचार वायु कै प्राप्त ।।६७।।
साधन ते श्रेष्ठ असे हृदयस्था देवता कृपा लाभ
त्याविण कोणा कैंचे प्राप्तमहत्श्रेय नाशुनी अशुभ ।।६८।।

सुविचार सूर्यनाशी अविचार तमांधतेस अनिवार्य
सद्भक्तियुक्त देव्याराधन सुविचार साधितें कार्य ॥६९॥
करितां प्रसन्नदेवी आराधुनि भक्ति पूर्ण हृदयांत
चिन्मय देवी प्रकटे सूर्यनभीं कीं विचार रूपांत ॥७०॥
यास्तव निजात्मरूपा चिन्मयती शिवमहेशिनीदेवी
आराधावी प्रेमें वर्जुनिया कपट काम पूजावी ॥७१॥
सद्गुरुपासुनि घेउनि दीक्षाक्रम योग्य ती उपासावी
आराधनेसि मूळ श्रद्धा तशि भक्ति विमल ठेवावी ॥७२॥
श्रद्धा भक्तिस कारण देवी महात्म्य पूर्ण ऐकावें
यास्तव भार्गवरामा ! ऐकविलें प्रथम तूजे तें ठावे ॥७३॥
श्रवणें त्या तुज रामा ! मंगल जें प्राप्त जाहलें आहे
सुविचार लाभला जो कल्याणप्रद भय न कोणतें राहे ॥७४॥
मोठें भय असतें तों न पवे जोवरि विचार उदयास
अविचार रत सदोषी प्रति दिवसीं पावतो नर भयास ॥७५॥
ज्यापरि औषध घे तरि झाला ज्या सन्निपात त्या भीती
मरणाचि असे तोंवरि धातु शरीरीं न शुद्ध जों होती ॥७६॥
जो सुविचारा पावे जीवित त्याचेंच हो सफल झालें
नर योनि भली पावुनि ज्यासि न हा प्राप्त ते कशा आले ॥७७॥
सुविचार असा न लभे जन्मतरू विफल वांझ समजावा
जन्म तयाचा जाणा सफल तरू जरि विवेक उपजावा ॥७८॥
नर जो विचार शून्यचि जाणावा कूप मंडुका परि तो
कूपीं जन्मुनि बेडुक राहि तेथेंच काहिं नेणतो ॥७९॥
जाणेना शुभ किंवा अशुभ कसें कूपिं जन्मतो मरतो
ब्रह्मांड रूप कूपीं जन हे तज्जन्म विफलची ठरतो ॥८०॥
कारण कीं नेणति ते स्वहिता कोणतें कसें काय
वरचेवर जन्म तसे पावति मृत्यूस नेणती सोय ॥८१॥
दुःखद तेच सुखप्रत सुखकारक त्यास दुःखमय गणिती
शिजती संसारार्तलि अगणित दुःखास भोगुनी शिणती ॥८२॥

नच विटती संसारा जरि भोगिति अमित दुःख त्यापायीं
सोसुनि लाथा रासभ रासभिच्या पाठिशी जसा जाई ।।८३।।

तैसे दुःख चपेटे भोगुनि अविचारि पचति संसारीं
तूं राम ! विचारात्मा पावसि दुःखाब्धि पर तीरीं ।।८४।।

**इति श्री त्रिपुरारहस्य ज्ञानखंडे विचारमाहात्म्ये**
**द्वितीयोध्यायः ।**

[सत्संग महात्म्य]

## अध्याय ३

सदय गुरूंचें भाषण राम सकौतुक प्रेम ऐकून
सादर नमुनि गुरुतें विनयें पुनरपि करीतसे प्रश्न ।।१।।
भगवन् यथार्थ कथिलें आपण जें सर्व सत्य आहे कीं
अविचार धरूनि चित्तीं करिती जन घात आपुला लोकीं ।।२।।
सुविचारचि कल्याणद माहात्म्य श्रवण हेतु सुविचारा
कळले परि मम मानसि संशय हा धरूनि बैसला थारा ।।३।।
श्रवण कसे शक्य असे त्यासि असे कोणता उपाय वदा
घडतें सहजें म्हणु तरि सकळांसी प्राप्त कां न होय कदा ।।४।।
मजलाहि कां न झाली श्रवणेच्छा अजवरी तसे इतर
मजहुनि अधीक दु:खें भोगिति जाणा पदोपदींच चिर ।।५।।
परि ते श्रवणा साधुनि होति सुखी कां न हें कृपें बोला
ऐके प्रश्न दयाघन दत्त गुरू सार्द्र त्याकडे वळला ।।६।।
कथितों भार्गवरामा ! कल्याणद मोक्षबीज तुज परिस
सत्संग श्रेष्ठ असे साधन सर्वांत दु:ख नाशास ।।७।।
सत्संगासी म्हणती कारण परमार्थ व्हावया प्राप्त
तुजलाचि पहा लाभे संवर्त सुसंग पूर्वकालांत ।।८।।
म्हणुनी तुजला झाली श्रेयस्कर बुद्धि मोक्ष लाभाची
संतांसि शरण जातां सांगति ते सोय सत्य सौख्याची ।।९।।
परम श्रेय न लाभे कोणा कधि साधु संगतीवीण
यास्तव यत्न करूनी साधावा साधु संगची जाण ।।१०।।
ज्या जसि संगति होई फल त्याला लाभते तसें लोकीं
न धरी संशय कांहीं दृष्टांता ऐक सांगतों मी कीं ।।११।।
मुक्ताचूडा व्हय नृप पूर्वीं होता दशार्ण देशासीं
हेमचूड आणि मणीचूड असति दोन पुत्र राजासी ।।१२।।

दोघेहि देखणे अति विद्या परिपूर्ण सद्‌गुणी होते
करण्या शिकार घेउनि संगे परिवारसैन्य निघती ते ॥१३॥
बलवान शूर योद्धे धारण करुनी धनुष्य उत्साहें
शिरले सह्याद्रि वनीं वसति जिथें व्याघ्रसिंह वृक पशुहे ॥१४॥
उभयहि शरसंधाने सोडुनिया तीव्र बाण चापल्यें
वधिती मृगावृकांना सिंहा सुकरारिसांस कौशल्यें ॥१५॥
या परि होताहेतों सुटला वारा प्रचंड त्या समयीं
सिकता गोटे वर्षवि भीषण कीं प्रळय वात ते ठायीं ॥१६॥
भरली धुळी अंबरि जणुं आभाचीच पातली रजनी
काळोखीं सर्व लता वृक्ष शिळा प्राणि दिसतिना नयनीं ॥१७॥
सर्व गिरी काळोखे व्याप्त दिसे उंच सकल भासेना
वर्षति वाळू गोटे वरुनि तदा पळत सुटली सेना ॥१८॥
कोणी झाडामागें कोणि शिळा दरडि गिरि गुहा कोणी
गांठिति आश्रय, जाती घोड्यावर राज पुत्र दूर पळुनी ॥१९॥
हेमचुडा पळतां पथि मुन्याश्रम एक लागला रम्य
कदली खर्जूरादिक तरुवेष्टित दृष्टि पाहि अनुपम्य ॥२०॥
त्या आश्रमांत दिसली लावण्यवती कुमारिका त्याला
अति तप्त सुवर्णापरि कांति जिच्या द्योतवी शरीराला ॥२१॥
लक्ष्मी परिमुख कमला अवलोकुनि राजपुत्र मनि तोषे
किंचित्स्मित वदनें तिस बोले तूं मज कुमारि ! कोण असे ॥२२॥
निर्जन भीषण वनि तूं निर्भय निर्धास्त राहतेस कशी
कोणाची तूं होसी एकटि कां राहसी कथीं मजशीं ॥२३॥
ऐकुनि तद्वचनातें शुद्ध मती कन्यका वदे कैसें
हे राजपुत्र ! तुमचें स्वागत हो आंत या बसा ऐसें ॥२४॥
सत्कारच अतिथींचा करणें हा धर्म तापसीयांचा
थकलात बहु दिसतां झाला त्रास प्रचंड वायूचा ॥२५॥
खर्जूर तरुस अश्वा बांधुनि घ्या कांहि वेळ विश्राम
मम वृत्त विदित नंतर होई नृप पुत्र उक्त करि काम ॥२६॥

पुढती नृपपुत्रातें खाद्य फळें पेय आणुनी देते
सेवन करूनी झाला शिण त्याचा दूर देखुनी वदते ॥२७॥
ऐकावें नृपपुत्रा मधुसम बहुमिष्ट बोलते वाचा
या आश्रमांत राहे शिवभक्त व्याघ्रपाद नांवांचा ॥२८॥
त्यांनीं तप सामर्थ्यें जिंकियलें स्वर्ग सर्व अवलोकीं
ब्रह्मज्ञानी त्यावरि सत्य असे देती मान मुनि लोकीं ॥२९॥
त्या व्याघ्रपाद मुनिची धर्मसुता होय हेमलेखा हे
विद्याधरी अति सुंदर नामा विद्युत्प्रभा जगीं लाहे ॥३०॥
एके काळीं आली स्नाना वेणूनंदीचिया उदकीं
त्या वेळीं तेथें ये वंगाधिपती सुषेण एकाकी ॥३१॥
स्नान करी तंव तीची सुंदर कांती विशेष त्या दिसली
ओल्या वस्त्रांतुन त्या योगें त्याची मती तिथें रिझली ॥३२॥
कामशरें विद्ध अशा सुंदर रायासतीहि वश झाली
रतिदान मागतां तिस भूपाळा संमती तिनें दिधली ॥३३॥
संभोग तीस देउनि राजा स्वपुरीकडे निघुन गेला
राजर्षि वीर्य विफल न जाइ तिचें उदरिं गर्भची ठरला ॥३४॥
घडला दोष, पतीच्या भीतिमुळें गर्भ टाकुनी गेली
वीर्य अमोघ नृपाचें जन्मे मी कन्यका तये काळीं ॥३५॥
संध्योपासन वेळीं नदिवरती व्याघ्रपाद मज पाही
सदया आश्रमिं मजला प्रतिपाळी अधिक काय करि आई ॥३६॥
धर्में प्रतिपाळ करी जो जन त्यातेंहि तात वदतात
मी धर्मसुताकीं त्यांची पदसेवा करुनि राहि वचनांत ॥३७॥
मुनि महात्म्यबळेंची येथें भय कोणते नसे कांहीं
कोणी दुष्ट सुरासुर आश्रमिं येण्या समर्थची नाहीं ॥३८॥
जरि कोणी दुष्टमती येइल तन्नाश होइ तात्काल
कथिलें चरित्र माझें नृपसुत व्हा स्थीर कांहि लवकाल ॥३९॥
मत्तात अतां येईल वंदन त्या करुन दर्शना घ्यावें
बोलुनि गोष्टि तयासी साधुनिया इष्ट जें उद्या जावें ॥४०॥

ऐकुनि भाषण तीच्या मोहित रूपास राज सुत झाला
सांगाया निज हेतू धैर्य नव्हे खिन्न मानसीं बसला ।।४१।।
पाहुनि त्याची ती स्थिति जाणे कीं विवश होय हा कामा
राजसुत वदे विदुषी "धैर्यधरा खेद कां उगि रिकामा" ।।४२।।
इतक्यांत तात येइल वांछित जें स्वमनिं लभ्य घ्या करुन
यापरि वदताहे तों मुनि आले व्याघ्रपाद बाहिरुन ।।४३।।
घेऊनि पत्रे पुष्पे लभ्यवनीं पातले मुनीराज
आलें पाहुनि त्यांना नृपसुत राहे उभा तदा सहज ।।४४।।
मुनितें नमन करूनी सादर त्या नाम आपुलें कथिलें
आज्ञा देतां बसला कामावश हा असे तयां कळले ।।४५।।
योग दृष्टिबळें हा योग असे योग्य जाणुनी मुनिनें
उपवर धर्मसुता ती हेमचुडा अर्पिली वरोविधिनें ।।४६।।
झाला मोद अतीशय हेमचूडा आणि तीस नगराती
मूक्ताचूडहि होई संतुष्ट अती महोत्सवा करितो ।।४७।।
सविधी थाटानें मग केला त्यांचा विवाह उत्साहें
लग्नाउपरी क्रीडानृपसुत निजपत्निशीं करित राहे ।।४८।।
प्रासादाच्या सौधी, उपवनिं जाऊनियां नदीतीरा
रम्यस्थळिं पत्निसवें होउनि अनुरक्त तो करि विहारा ।।४९।।
परि राजपुत्र निरखी पत्नी भोगीं दिसे अनासक्त
साश्चर्य खेद तिजला म्हणतों मी तुजवरीच अनुरक्त ।।५०।।
ऐसें असुनी तूं कां दिससि उदासीन हीनरति सतत
नाहींत मनाजोगे भोग तुझ्या हें सुहासिनी दिसत ।।५१।।
स्वर्गोपम अच्युत्तम भोगीं या तुज विरागता भासे
अनुरक्तचि तूं नसतां भोगांनीं सौख्य होय मज कैसें ।।५२।।
अनुरागीं तन्मय मी असतां तुज ठायिं चित्त तव रमतें
अन्यत्रचि, विमनस्का तूं माझें वचन नायके गमतें ।।५३।।
मी येउनि आलिंगन दे कंठीं तुज समीपची राहे
परि तूं पुससी 'नाथा कधि आला' ठाउके जसें नोहे ।।५४।।

अत्युत्तम दुर्मिळशा भोगीं तुज मजपरी स्पृहा नाहीं
कवणाही भोगानच अनुमोदन देशि कां वरें स्थितिही ॥५५॥
मी नसतां एकाकी राहसि तंव नेत्र मिटुनि तूं बससी
येतां मी तुज पाहे निश्चळ अति योगिनी परी दिससी ॥५६॥
तूं जरि विमुख असे मज सौख्यतरी भोग विषयि होय कसें
दारुस्त्री कवटाळुनि कवणा कधि सांग सौख्य होत असे ॥५७॥
तुज अभिमत तें मजशीं मान्यचि तुज सानुकूल मी राहे
ज्योत्स्नेला कुमुद जसे अनुसरुनी शोभतात उत्साहें ॥५८॥
प्राणाधिक प्रिये मज सांग वरें माझि कीं तुला शपथ
कां तव चित्त विरागावरि ऐकुन शांत होय मम चित्त ॥५९॥

**इति श्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे सत्संगमाहात्म्ये**
**तृतीयोध्यायः ।**

[हेमचूडोपाख्याने अंतःसंग फल]

## अध्याय ४

निकटस्थ प्रिय पतिचें भाषण ऐकूनि हेमलेखा ती
किंचित् हास्यमुखानें प्रेमाने त्यास जाहली वदती ।।१।।
व्हाया बोध पतीला तत्वांचा युक्तिने वदे वचना
ऐकावें पतिराया तुमचेविषयीं नसे विराग मना ।।२।।
मज न कळे या लोकीं सत्यप्रिय वस्तु कोणती आहे
त्या परि अप्रिय कोणति करित विचारा न निश्चया लाहे ।।३।।
याचा विचार करिते शक्य जसा स्त्रीमतिप्रती आहे
परि नच निर्णय होई सांगाजी तत्वता विनंतीहे ।।४।।
पुसतां ऐसें त्याला हास्य करूनि बोलतो प्रिये कांते !
'असतो स्त्रीजन मूढचि' वचनीं या सत्यता मला गमते ।।५।।
प्रिय आणि अप्रिय हें पशु पक्षी तीर्यगेंहि ओळखिती
स्वीकार तो प्रियाचा अप्रिय जें त्यास ते त्यजुनि देती ।।६।।
इतुकें स्पष्ट सुलभची यासि कशाला विचार बहु करणें
सुखकारक जें प्रिय तें अप्रिय तें दुःख दे समज म्हणणें ।।७।।
मुग्ध बनुनि तूं यासी करिसि कशाला विचार ना क्लिष्ट
पतिचें भाषण ऐकुनि पुनरपि ते बोलली कसें स्पष्ट ।।८।।
स्त्रीजन मूढचि असतो न दिसें कीं प्रौढता तयां माजीं
परि आपण सुविचारी तरि द्या समजूत घालुनी माझी ।।९।।
समजावुन द्या मातें, पटतां मज, सोडिते विचाराया
संगें अपुल्या राहिन तत्पर, विषयोपभोगिं मी राया ।।१०।।
सुख दुःखचि जे देई जाणावें त्याक्रमें प्रियाप्रिय कीं
आपण कथिलें राया सूक्ष्म विचारें परंतु अवलोकीं ।।११।।
देश व कालाकारीं होय जरी भेद वस्तु एक परी
देते सुखा व दुःखा प्रिय कीं अप्रिय कशी म्हणाल तरी ।।१२।।

एकच अग्नि पहा हो काल जरी भिन्न भिन्न फळ देई
भिन्नाकारीं देशी होतो परिणाम भिन्नची पाही ॥१३॥
शीतीं जो प्रिय वाटे ग्रीष्मीं तो अग्नि त्याज्य जीवांसी
तैसाचि थंड देशीं प्रिय जो अप्रियच उष्ण देशासी ॥१४॥
शीत प्रकृति लोकां प्रिय अप्रिय होई उष्ण जीवांसी
अल्पकारें सुखदे अधिक तरी पात्र होय दुःखासी ॥१५॥
हाच प्रकार आहे दारा धन पुत्र राज्य इत्यादीं
राजा मुक्ताचूडचि धनदारीं सौख्य किंतिकसंपादी ॥१६॥
अनुदिनि वाहत चिंता परि साधु त्यागिं नेणती दुःखा
असले सुखार्थ जरि हे विषय परी सांत ते असति देखा ॥१७॥
अखिल न विषय प्राप्ती होइ कुणा सुख न पूर्ण वरि दुःखा
थोडे विषय मिळूनी थोडें तरि सौख्य होय परि ऐका ॥१८॥
अल्प सुखा सुख न गणी कारण कीं दुःख मिश्र तें राही
दुःखं द्विविध जगीं या बाह्यांतर बोलती तया पाही ॥१९॥
तनुगत धातू दोषें उपजे तें बाह्य दुःख शारिरिक
इच्छावेगें अंतरिं होय तया दुःख वदति मानसिक ॥२०॥
त्याद्वयि जग जें ग्रासी तें जाणा मानसीक तीव्र अती
दुःखरूप वृक्षाचें दृढ शक्तिक बीज वासना म्हणती ॥२१॥
वांछाकिंकर बनुनी इंद्रादिक नाकिचे सतत
करिती प्रयत्न व्हावा स्वोत्कर्ष सुखांत ठेवुनी चित्त ॥२२॥
इच्छावशेष असतां सुख जें त्या दुःखरूपता येतें
तें सुख वदाल तरि मग तैसें कृमिकीटकास संभवते ॥२३॥
एक परीं कृमिकीटक सुख जें तें श्रेष्ठ मानितां येतें
अल्पचि वांछा मिश्रित असतें परि मानवा नसे सुख तें ॥२४॥
शतशा वांछा मानसिं नाचति, जें प्राप्ति अल्प करिल सुखी
तरि न सुखी कोणाला म्हणतां येइल, वदा बरे स्वमुखीं ॥२५॥
सर्वांग दग्ध झाल्या शीतलता चंदनाल्प जरि देई
तरिच सुखी होइल नर ज्याच्या मनिं वासना भरति राही ॥२६॥

आलिंगन स्त्रियेशीं देई पुरुषा सुखा असे म्हणती
तेथेंहि शरिर बंधन दुःखचि केवल नसें सुखावाप्ती ।।२७।।
कामविकारावेशें रति काळीं शीण पावती सकळ
नंतर थकुनी पडती ढोर जसे भार वाहिल्या विकळ ।।२८।।
तरि नाथ ! कसें न कळे रति सौख्यचि सत्य सौख्य गणितां हे
स्त्रीसंगमी मिळे जें इंद्रिय संघर्षजन्य सुख आहे ।।२९।।
तैसेंच काम सुखही सांगा श्वानासि नाहिं कां मिळत
स्त्रीसौंदर्याचें जरि दृष्टीला अधिक सौख्य अभिलषित ।।३०।।
ऐसें म्हणाल तरि तें स्वप्न स्त्रीसमचि भावनाजनित
ऐका पूर्वी होता मदनासम रूपवान राजसुत ।।३१।।
त्याला प्राप्त जहाली रतिसम सुंदर मनोहरा रमणी
तो राजपुत्र राहे तिजवरि आसक्त फार दिन रजनी ।।३२।।
परि ती रमणी होई अनुरक्तचि राजसेवका ठायीं
म्हणुनि पहा सेवक तो ठकवी त्या नृपसुता बहुपायीं ।।३३।।
मोहवितो नृपपुत्रा पाजुनि मदिरा तयास बहुमात्र
होता मदांध त्याप्रति प्रेषी दासी कुरूप अनपात्र ।।३४।।
भोगी मग सेवक तो लोकोत्तम सुंदरीस राज्ञीस
एकांतीं एकटकीं बहुदिन फसवूनि त्या मदांधास ।।३५।।
मदिरा मदांध राजा यापरि दासीसवें रमे नित्य
मनिं आपणास मानी धन्य जगीं भोगि कीं प्रिया सत्य ।।३६।।
मजसा सभाग्य कोणि न लोकोत्तर सुंदरीस भोगितसे
बहुकाळ लोटला या दैवबळें एकदा घडे ऐसें ।।३७।।
सेवक मदिरा पात्रें ठेवुनि बाहेर जाइ कामाला
निकडीच्या, तें राजा करि मदिरापान, अधिक न प्याला ।।३८।।
नित्यापरि रतिकामा उत्सुक तो जाय शीघ्र रतिभवना
दिव्य मनोहर जेथें भोगविला सांचि पूर्णता जाणा ।।३९।।
रतिभवनिं शिरे जैसा देवपतीनंदनीं शची भवनीं
मंचकिं कामावेगें उपभोगी दासितें विशंक मनीं ।।४०।।

रत्यानंतर देखे मंचकिं दासी कुरुप अति हीन
विकृत कुरुपा तीच्या पाहुनि झाला मनीं अती खिन्न ।।४१।।
ही कोण कशी येथें न दिसे मम भामिनी करि विचारा
क्रोधें पुसे कुठे मम पत्नि असे बोल लावि नच उशिरा ।।४२।।
ऐकुनि विमद नृपाचे शब्द तदा दासि ती मनीं भ्याली
न निघे शब्द मुखांतुनि मोठ्यानें रुदन तें करिती झाली ।।४३।।
नृप जाणे मनि कोणी फसवि मला करूनिया कपटजाल
वामकरें आकर्षी दासी कचनेत्र जाहले लाल ।।४४।।
सव्य करीं शस्त्र धरी पुसतो क्रोधें थरारतें अंग
दरडावी दासीला घडतें तें वृत्त सत्य मज सांग ।।४५।।
बोल खरें नाहीं तर वधितो तुज याक्षणीं, तदा दासी
प्राणभयें सांगे त्या घडत असें वृत्त पूर्व कालासी ।।४६।।
सांगितलें दासीनें भृत्यकपट त्यास राज्ञि अनुकूल
दिधले दावुन राजा एकांतीं भृत्य राणिचें युगुल ।।४७।।
भूतलि सत्रंजीवर मलिनांग कृष्णवर्ण रूक्ष मुखी
पिंगट नेत्री नीचा निजकांता निजुन बाहुनी विळखी ।।४८।।
रतिभोगें श्रांत अती मृदुकर वेष्टूनि भृत्य कंठासी
निजपत्नीमुख त्याच्या तोंडावरि ठेवुनीं पडे खासी ।।४९।।
पायें लपटुनि जंघा गाढालिंगन तया दिलें आहे
त्याचे कर होते तत्पत्नि उरोभागिं नेत्रिं तो पाहे ।।५०।।
फुललेल्या पुष्पलते सम पत्नी श्रांत दास संगतित
दिसली राजा दुसरी रोहिणि कीं राहु बाहुपाशांत ।।५१।।
निद्रेनें नष्ट जिची स्मृति ऐशा पत्निला तशा स्थितित
पाहुनि राजा होई भ्रष्ट स्मृति पडुनि मोह मूर्च्छेत ।।५२।।
तितक्यांत सांवरोनी धैर्य धरून बोलला मुखें ऐसें
मद्य विमोहित मूढा मजशि अनार्यास धिक् जिणें भासे ।।५३।।
धिःकार असो त्यांना जे ठेविति प्रीति मानसी स्त्रीची
पक्षि न धरि एक तरू स्त्री न तशी होइ, एक पुरुषाची ।।५४।।

काय म्हणावें मजशीं हलगट परि मूढ होउनी गेलों
बहुकाळापासुन ही प्राणाहुन अधिक पाहतां झालों ।।५५।।
वेश्या तशि न स्त्रीही वश राही कोणि एक पुरुषास
बन गर्दभची नर तो जो स्वस्त्रीवर धरील विश्वास ।।५६।।
चंचल अभ्राकारीं पालट जैसा शरद् ऋतु माजीं
तैशापरि अस्थिरता स्त्रीं चित्ताची सदैव जाणाजी ।।५७।।
महदाश्चर्य कसा मी आजवरी स्त्रीस्वभाव गुण नेणे
पूर्णासक्त इच्यावरि सोडुनि मज सेवकास वश होणें ।।५८।।
जार समूहीं नटिपरि लपवुनि ती भाव आपुला दावी
खोटें प्रेम मजवरीं अपुलें मन अणिकावरी ठेवी ।।५९।।
मम छाये परि ती मज अनुसरते हा मनांत विश्वास
होता यावरि मदिरा मोहें नच शंकलो कदा तीस ।।६०।।
बहुकालवरी मजला संग घृणापूर्ण दासिचा घडला
सत्य न कोणि जगींया मजहुन नर मूढ अधिक सांपडला ।।६१।।
विश्वास ठेविला म्यां जीवरि तीनेंच मजशि ठकवीलें
आणि पहा हा सेवक किति विद्रुप नीच काय तिस गमले ।।६२।।
न कळे काय निरूपम सौंदर्य तिनें पाहिलें तया ठायीं
माझ्या सौंदर्याप्रति उत्सुक बहुलोक पाहण्याविषयीं ।।६३।।
मी नृप अनुरक्त तिशीं सोडुनि मज सेवकास रत व्हावी
बहु करि विलाप झाला चित्ति उदासीन भाळि कर लावी ।।६४।।
शेवटि सकळां त्यागुनि वैराग्यें नृपति निघुनि वनि जाई
सौंदर्य नाथ ! तस्मात् पाहि मनोजन्य भावना होई ।।६५।।
अनुभवितां मज ठायी सौंदर्य व रति सुखास तुम्हि जें कां
तैसेंच कां विशेषहि आढळतें जाण इतर ही लोकां ।।६६।।
जरि रमति ते स्त्रियांशीं विद्रुप अति कुश्चलाहि ज्या होती
समजाविते विषय हा ऐकावें हो समाहितीं चित्तीं ।।६७।।
स्त्री जी नर पाहि जगीं तो बाह्याकार पाहतो तीचा
प्रतींबिबात्मक रूपें आश्रय तो करुनि राहि चित्ताचा ।।६८।।

संकल्प रूपती स्त्री रति संस्कारें मना अभीलषित
बारंवार मनी ती सुंदर संभोग लालसा उठत ।।६९।।
चिर चिंतन क्षुब्ध करी सेंद्रिय मन स्त्री कुरूपहि भोगी
क्षोभ न जरि मनि होई स्त्री सुंदर रतिस ये न उपयोगी ।।७०।।
सौंदर्याचें चिंतन चिर चित्तीं क्षोभ जाण उपजवित
क्षोभ असा न दिसे की यास्तव बालांत योगि चित्तांत ।।७१।।
कसल्याही स्त्री ठायीं रतिसुख भोगी कुणीहि नर जेव्हां
आधीं तो सुंदरता चित्रमनीं उमटवी घडे तेव्हां ।।७२।।
अतिशय कुरूप कुश्चळ नारिरतीं तरुण होति तत्पर हें
उघड दिसे या लोकीं संतति तैशा स्त्रियास दिसताहे ।।७२।।
समजे त्यां कुरूपशा वा तत्सौंदर्यता ठसा न मनीं
तरि मग त्यांच्या ठायीं पुरुषां रति सौख्य लभ्य नच मानी ।।७४।।
विपरीत भाव शक्यचि कामांध भ्रमित चित्त मूर्खांना
सौंदर्य अधिक गमतें स्त्रीच्या निकृष्ट अंगि की त्यांना ।।७५।।
मलमूत्र पूर्ण अंगीं जरि त्या सौंदर्य भासते भारी
त्यां मग कांतें न दिसे कोठे दुजियां स्थळी कथाच तरी ।।७६।।
हे प्राणनाथ ! जाणा सौंदर्य असे कि कल्पना मात्र
करितां न भावना तशि सुख देण्या वस्तुही नव्हे पात्र ।।७७।।
सौंदर्य सहज देहीं जरि असतें माधुरी मधीं जैसी
तरि तें येतें बाला आणि कुमारासही अनुभवासी ।।७८।।
देशं भेदें दिसती भिन्नाकृति लोक एक पायाचे
एकचि नेत्र कुणाला खरकर्णी नवल कीं मुख ह्याचे ।।७९।।
कर्ण कुणाचे लांबट दाढा मुखबाह्य लांब कीं दिसती
नकटे मोठे नाकीं केश कुणा दाट मुळि कुणा नसती ।।८०।।
पिंगट केश कुणाचे श्वेत कुणा रांठ, मुळिच की नसती
कोणी कुष्टी कोणी पिंगट काळेचि तांबडे दिसती ।।८१।।
यापरि नानाविधजन स्वकिय मुला बायका वरि प्रीती
करुनि सुखा भोगी ती नाथ जशी तुमचि ही असे रीती ।।८२।।

सुख साधनांत सकल स्त्री देहा मुख्य सर्व गणितात
सर्वांते प्रियवाटे सुरनरहि तथा प्रबुद्ध भुलतात ॥८३॥
स्त्रीदेह असो किंवा पुरुषाचा जो स्त्रियेस आवडतो
याचें सूक्ष्म विचारें स्वरूप पहा कळेल कसा असतो ॥८४॥
पंजर अस्थींचा तो मांस मयी रुधिरपूर्ण नाडिशिरा
यांनी बद्धचि वेष्टित चर्मे कफपित्त आंत बाह्यबरा ॥८५॥
मलमूत्रयुक्त ऐसा शोषित शुक्रांत जन्म ज्या झाला
मूत्रद्वारें आला अतिकुश्चळ नवल कीं प्रियचि ठरला ॥८६॥
अत्यंत अमंगल या तनुला जे मानिती प्रियचि त्यांना
विष्टांतर्गत कीटक मानियल्या दोष कां तुम्हि वदाना ॥८७॥
यास्तव हे राजसुता प्रेमास्पद वाटतें शरीर जरी
तरि यांतिल धातूंचा पृथकत्वें मानसीं विचार करी ॥८८॥
तैसा प्रकार जाणा वस्तूंचा भोग्य भोजनीं होती
आंबट मधुर रसांच्या परिणामी सूक्ष्म दृष्टि द्या पुरतीं ॥८९॥
जे जें भक्षित होतें त्याची विष्टाच होय परिणामीं
हा अनुभव सर्वांचा नच संशय अन्यथा वदेना मी ॥९०॥
ऐसी स्थिति या लोकीं प्रियनाथा ! कोणतें व अप्रियतें
सत्य वदा, श्रवणें त्या दुर्लभ जे विषयि विसरता येते ॥९१॥
वाटे विस्मय मोठा ऐकुनिया उक्त हेमलेखेचें
करुनी विचार मानसिं घे पटवुनि सर्वसार वचनाचे ॥९२॥
तें त्या घृणा उपजली वस्तूंची भोग्य, होइ वैराग्य
प्रश्न प्रिये क्रमानें करुनि पवे स्वात्म लाभ सौभाग्य ॥९३॥
केवल चित्ति आत्मरूपा त्रिपुरा देवीस ओळखी हृदयीं
ज्ञानी होउनि विचरे स्वस्वरूपा पाहि तो सकळ ठायीं ॥९४॥
झाला जीवन्मुक्त भ्रातामणिचूड बोधिला त्यानें
हेमचुडा पासूनी स्वज्ञाना साधिलें मग पित्यानें ॥९५॥
मूक्ताचूड स्त्रीतें बोधुनिया मुक्त करि तसे सून
पुढती ज्ञानी झाले राजाचे मंत्रि आणि पौरजन ॥९६॥

ब्रह्मज्ञानाविण त्या नगरि नुरे शेवटीं नर प्राणी
झाले मुक्त सकळची सोडुनिया वासनावरी पाणी ।।९७।।
ब्रम्हपुरीसम शोभे अत्युच्च जगीं विशाल नगरी ती
तेथे मैना पोपट पंजरिचे पठति नित्य या रीती ।।९८।।
आत्मा चैतन्य भजा हो सांडी करून चेत्य वस्तूंची
तें चेत्य नसे त्या विण जैसें प्रतिबिंब होय दर्पणची ।।९९।।
चेत्यचि चैतन्य तसे सर्व चराचर तसाच मीहि असे
चैतन्यचि सर्वांना स्वातंत्र्यें भासवून विलसतसे ।।१००।।
आश्रय सर्वां भावा ऐसें चैतन्य एक हो सेवा
भ्रम दूर वेगिं सारा चिन्मय त्या दृष्टि लागि कीं ठेवा ।।१०१।।
कीरांचा पाठ असा ऐकुनियां वामदेव मणि विप्र
जे ब्रह्मनिष्ट देती नगरासी नाम तें नवें क्षिप्र ।।१०२।।
जेथिल तीर्यक् पक्षी गोष्टी करितात आत्मविद्येच्या
'विद्यानगर' अशा हें नामें हो ज्ञात पृष्टि जगतीच्या ।।१०३।।
अद्यापि जगती तें मिरवितसे नगर त्याच नावास
तस्मात् भार्गव रामा मोक्षप्रद होय साधु सहवास ।।१०४।।
ज्ञानी झाले सकलहि घडला त्यां लाभ हेमलेखेचा
यास्तव चित्तीं धरि तूं श्रेयस्कर साधुसंगची साचा ।।१०५।।

**इति श्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे हेमचूडोपाख्याने**
**सत्संग फलं चतुर्थोध्यायः ।**

[हेमचूडोपाख्याने बंधाख्यायिका]

## अध्याय ५

सज्जन सहवासाचा ऐकुनि परिणाम परशुरामाला
मोद अतीशय झाला प्रश्न पुढे आणखी करी गुरुला ॥१॥
सत्यचि सत्संगति हे हेतु असे श्रेय सर्व देण्याला
भगवन् भवत्कृपेनें तें मजला पटुन ये अनुभवाला ॥२॥
संग जसा ज्या होई, फल त्याला लाभते तसें लोकीं
स्त्री असुनि हेमलेखा तत्संगें मोक्ष पावले जनकीं ॥३॥
हेमचुडा प्रति कैसा केला हा बोध हेमलेखेनें
ऐकूं हे मनि इच्छा पुरवावी कथुनि साग्र वरदानें ॥४॥
रामाचा प्रश्न असा ऐकुनिया बोलती गुरुदत्त
भार्गव तुजला कथितो पावन ती गोष्ट चित्त करि दत्त ॥५॥
सति वचनें हेमचुडा विषय बहू निरस मानसी गमले
खिन्न उदासिन होई तन्मन विषयावरी बहुत विटलें ॥६॥
चिरकाल वासनाना मन त्याचें विवश जाहले असकें
यास्तव भोगांना तो त्यागुं शकेना न सरळ भोगुं शके ॥७॥
या परि चिंते माजीं व्यतित करी आयु मानुनी ओझें
स्त्रीतरि निरुत्तर करी मागें पुनरपि विचारण्या लाजे ॥८॥
विषयां भेटी होतां स्त्री वचन स्मृति असून भोग घडे
इच्छा वश होउनिया पश्चात् निंदी मनास ताप जडे ॥९॥
संस्कार बळें विषयावरि त्याचें चित्त ओढलें जाई
स्त्रीवचनाची होतां स्मृति त्यांतिल दोष मानसीं घेई ॥१०॥
त्या योगें तच्चित्तीं दुःखभरे खिन्नता उदासिनता
झोक्यापरि आंदोळे विषयीं मन पावुनी व्यथा बहुता ॥११॥
वस्त्रीं भूषणिं भोजनिं पानीं स्त्रीसंगमीं व मित्रजनीं
नानापरिच्या वहनीं चित्तास गमे न सौख्य दिन रजनीं ॥१२॥

सर्वस्वा मुकलेल्या मनुजा परि खेद करितसे सतत
इच्छा बल विषयावरि ओढी मना दोष दृष्टि करि परत ।।१३।।
यापरि उदासतेने झालें मुख शुष्क हेमचूडाचें
त्याग न भोग करू शके विषयाचा त्या समूळ दु:खाचें ।।१४।।
एकांती हेमचुडा पाहुनि दु:खांत हेमलेखेने
नाथा ! दु:खी दिसतां पूर्वीसम कां न मोद वृत्तीने ।।१५।।
कां हो वरें स्थिती ही शरिराला व्याधि कांहि का आहे
व्याधीमुळें मनाला चिंता आणीक ताप होताहे ।।१६।।
भोगांत भीति असते रोगाची ज्ञानि थोर वदतात
कफवातपित्त देही नांदति वैषम्य होय त्यांच्यांत ।।१७।।
दोषांच्या वैषम्यें होणारे व्यापुनी असति रोग
रोगापूर्वी सूक्ष्मचि वैषम्य विनाशास नसे मार्ग ।।१८।।
वस्त्रें खाद्यें शब्दें स्पर्शें कीं दर्शनें तसा कर्में
देशें कालें होई दोषींही गुप्तविषमता नेमें ।।१९।।
व्यक्त न दोष विषमता लोकां दुर्वेद्य ती असे साची
आयुर्वेद कथिकरा चिकित्साच लक्षणावरून त्याची ।।२०।।
वैषम्य दोषि नसल्या त्याचि चिकित्सा कशास कोण करी
यास्तव नाथा ! सांगा कारण खेदास काय होय तरी ।।२१।।
यापरि भाषण सतिचें ऐकुनि पति बोलला प्रिये परिस
मम दु:खाचे कारण नाहीं दुसरे तुझाचि उपदेश ।।२२।।
तत्पूर्वी सुखकारक वस्तु अतां सर्व जाहल्या नष्ट
सांप्रत मजला कोठें लभ्य नसे सौख्य दु:खची स्पष्ट ।।२३।।
राजा जरि पुरवीतो वध्यनरा मिष्ट खाद्य सुखद नव्हे
तद्वत् सांप्रत मजला त्याचमुळें भोगनिरस वाटतिहे ।।२४।।
इच्छावश बेगारी होइ न मी भोगि विषय संतोषें
काय करूं सांग बरें सत्य सुखापात्र होइ मी कैसें ।।२५।।
यापरि राजसुताचें वच ऐके स्वगत हेमलेखा ते
करिते विचार यासी श्रवणे वैराग्य लाभले गमतें ।।२६।।

ऐसी स्थिति जी याची सूचविते मोक्षबीज त्याठायीं
कारण ज्यास असंभव मोक्षाचा श्रवण होउनी हृदयीं ।।२७।।
अणुभरि पालट न घडे त्याही स्थिति ना विराग विषयाचा
आराधुनि परमेश्वर होइ जया तुष्ट देव हृदयींचा ।।२८।।
त्यालाच अशी स्थितिये इतरा नच, हा विचार शुद्धमती
करूनी तयार झाली सति तेव्हां बोधण्यास कीं स्वपती ।।२९।।
कौशल्यें ती विदुषी नच दावी ज्ञान आपुलें पतिस
अन्य मिषें ती बोले ऐका मम एक पूर्व इतिहास ।।३०।।
पूर्वी माझी माता खेळाया देई एक सखि मजला
होती शुद्ध परि जडे असत्शीला स्त्रीसंगती तिजला ।।३१।।
सामर्थ्यवती होती स्त्री ती नव चित्रसृष्टि करण्याला माया
माझ्या सखिशीं तीनें केली संगति न कळत मातेला ।।३२।।
होता असत्य सारा व्यवहार जरि तिला वश मी
झालें कारण होती ती माझ्या लाडक्या सखि प्रेमीं ।।३३।।
राहीन मी कधि कुठें सोडून पळभरहि माझिया सखिस
तीचा स्वभाव निर्मळ पाहुनि मी राहि वश सदा तीस ।।३४।।
संगति सदा तियेची मम भाव मिळे तिच्याशिं ऐक्यत्वें
परि ती मैत्रिण तीची होति महा नाटकी स्वदुष्टत्वें ।।३५।।
माझ्या सखिला दावुनि आमिष ती करित निजसुताधीन
जो होता मूढ अती मदिरा पीऊनि धुंद करि नयन ।।३६।।
मम सन्मुख सखिला तो मस्त बलात्कार करून भोगितसे
या नित्याच्या त्रासें अंग तिचें फार कष्ट पावतसे ।।३७।।
त्यागि न परि मज म्हणुनी होय मला स्पर्श एकदा त्याचा
झाला सुत त्या उभया जन्मे आकार धरुनि बापाचा ।।३८।।
तो सुत पुढतीं वाढुनि होई व्यवहारि थोर जें तरणा
अतिशय चंचल उपजे बापाचा त्यांत येई मूढपणा ।।३९।।
आजिपासुनि लाभे नाना रचना प्रकार सामर्थ्य
अस्थिर नामें पुत्रा मूढ पिता शून्य आजि शिक्षार्थ ।।४०।।

करिती प्रयत्न, त्यांनीं केला त्या, प्रविण इष्ट गोष्टींत
त्या योगें तो झाला अप्रतिहत शीघ्रशी गतिप्राप्त ।।४१।।
सारांश ती सखी मम असुनी ही सती सत्य भावाची
असती संगें झाली प्राप्ति तिला मलिनशा अवस्थेची ।।४२।।
चिरकाल संगति तिच्या राही ती, ममसखी म्हणुनि जडलें
अत्यंत प्रेम तिचें पति पुत्रावरति दाट ते बसलें ।।४३।।
मजशीं क्रमाक्रमानें जे जडलें प्रेम ती करीत कमी
परि सरळ जी स्वभावें सोडाया संग सिद्ध होय न मी ।।४४।।
राहे मी तिज संगें अनुसरुनी वागले सदैव पुढें
प्रिय पति तीचा भोगी सतत तिला वरिवरी तदा मूढें ।।४५।।
मजलाच बळें ओढुनि झाला तो सिद्ध मर्जाशि भोगाया
परि मी निर्मळ शुद्ध स्वभावता कसलि होय वश कि तया ।।४६।।
इतुकी सावध राही मी परि लोकांत गवगवा होई
हा मूढ भोगि मजला ऐशी अपकीर्ति शेवटीं पाही ।।४७।।
राजसुता ! मज जवळी ठेवुनि सुत माझि ती सखी पुढती
गेली निजपति सन्निध राही तत्संगि ती गढून अती ।।४८।।
पुढतीं अस्थिर राहुनि मज संगें वाढला दिसे पुष्ट
आजीच्या अनुमतिनें वरितो पत्नीस पाहूनी इष्ट ।।४९।।
चपला नाव असे तिज चंचल बहु वागणूक होति तिची
पतिला रुचेल ऐसें क्षणोक्षणीं धरित रूप ती बरुची ।।५०।।
चपला होति चतुर बहु तैसी अति कुशल आणखी दक्ष
त्या योगें ती पतिला स्वाधिन घे करुनि ओढुनी लक्ष ।।५१।।
अथिर स्वतां जाई एके क्षणि कोटि योजनें दूर
परते पुन्हा त्वरेनें मिळे विश्रांति त्या फिरे शूर ।।५२।।
अस्थिर जेव्हां जेव्हां कोठें तरि जावया मनी योजी
त्या समयीं ही चपला रूपें धरण्या सदा असे राजी ।।५३।।
जिकडे पति तिकडे ही जाउन रिझवीत त्यास बहु परिनें
चपला नांदत राही अस्थिर पति संगतींत या रितिने ।।५४।।

चपला प्रसवे पुत्रां एके समयीच पांच जे झाले
मातृ पितृ परायण जे स्वाधिन ते आजिनें मदिय केले ।।५५।।
सखिच्या प्रेमें त्यांना वाढवि मी नीट जाहले थोर
चपळेचीं पांच मुलें करिती प्रत्येक भिन्न एक घर ।।५६।।
विस्तृत व चमत्कारिक केलीं निर्माण मंदिरें पांच
मात्राधारें होता बळि त्या मग जनक होय वश सांच ।।५७।।
जनका स्वस्थानाप्रति घेउनिया ते क्षणोक्षणीं जाती
ज्येष्ट मुलाच्या गेला अस्थिर तो एकदा घरा प्रीतीं ।।५८।।
श्रवण करी तो तेथें नाना विश्व सुस्वरादि शब्दास
केव्हां मधुर अतीशय गायन मंगल सुरेख वाद्यास ।।५९।। शब्द, कान.
मंत्राथर्वण वेदिय यजु–सामांतिल ऋचा व शास्त्रास
त्या परि आगम विधिना पैंजणनूपुर खास इतिहास ।।६०।।
भृंगांचा गुंजारव पिक गायन मधुर आणखी ध्वनिजे
पुत्राच्या प्रेमानें ऐकुनिया मानसीं बहूत रिझे ।।६१।।
संतुष्ट जनक होई वश जाणुनि तो प्रकार करि अन्य
कर्णकटू अतिभीषण ऐकंविजे शब्द होति ना मान्य ।।६२।।
सिंहाचा घोरध्वनि घोष विजेचा निनाद मेघाचा
ब्रम्हांड कटाहचिरी ध्वनि भीषण गर्भपात करि साचा ।।६३।।
ऐकुनि अस्थिर हे रव चकित मनें बाजुला वळुनि राहे
कोणी रडती दुःखें करिती विलापास कोणि तो पाहे ।।६४।।
दुसरा तत्सुत नेई एके समयीं पित्यास निजसदनीं स्पर्श, त्वचा.
तेथे त्यास मिळाले स्पर्श सुखद आसनी मृदुलवसनी ।।६५।।
मृदुशय्या कांहीं मृदु वस्त्रें कांहीं कठीण शीतलशी
कोठे उष्णचि गमले आलें यापरि तिथें अनुभवासी ।।६६।।
त्यामाजीं सुखकारक वस्तूंना भोगितां मनीं वाटे
आनंद बहू त्याला नसति तशा देति दुःख त्या मोठें ।।६७।।
नंतर अस्थिर जाई तृतिय सुतांच्या घरास उल्हासें दृश्य, नेत्र.
तेथें तो जाउनिया बहुविध आकार वर्ण पाहतसे ।।६८।।

नाना रंग दिसति त्या लाल तसे पांढरे निळे हिरवे
मिश्रण बहुपरि त्यांचें पिंगट धुरकटचि ओबटे बरवे ।।६९।।
स्थूळ कृशादि अणूसम दीर्घ बहू लांब आणि वाटोळे
सुंदर भीतिप्रदची पाहे आकार दीर्घ वर्तूळें ।।७०।।
बीभत्स दिव्य रौद्रक्वचिदंधक इतर चांगले इष्ट
तेजोमय हितकरही तदितर आकार पाहि तो स्पष्ट ।।७१।।
देखावे यापरि जों अस्थिर राहे पहात तों आला
चौथा पुत्र तयाला घेउनि आपुल्या विचित्र घरिं गेला ।।७२।। रस, जिव्हा.
फल पुष्पें उपभोगी नानाविध पेय जें सुधा मधुर
अंबट गोड इतरही लेह्य तसे चोष्य भक्ष्य ते रुचिर ।।७३।।
सेवन केल्या माजीं कांहीं कडु तिखट दाहकहि होते
मधुरांबट खारट कीं असती कट्वाम्ल लवणमिश्रीते ।।७४।।
कडवट तिखट क्षारहि मधुराम्लरसांसि तो पहा सेवी
प्रेमें निज पुत्रांसह विविध रसांतील घेत नित्य चवी ।।७५।।
तों पंचमसुत आला नेइ पित्या लागि आपुल्या भवना गंध, नाक.
होतें विचित्र वहु जें भोगि सुखासिक तिथें फळा सुमना ।।७६।।
तेथें त्यास मिळाले भिन्नौषधि गंध कांहीं दुर्गंध
कोमल वास तसे कीं उग्र जया दर्प आणि सौगंध ।।७७।।
कांहीं मोहक मादक उत्तेजक कांहि गंध जे होते
मूर्च्छा गंध बहु असे अनुभवि अस्थीर यापरी तेथें ।।७८।।
एक सुताच्या घरुनी दुसऱ्याच्या जात येत नियमानें
क्रम चाले रमत सुखीं दुःखीं आक्रोश करित थैमानें ।।७९।।
पितृवत्सल सर्व मुलें जनका वांचूनि विषय नच घेती
आवडता जरि असला बापासह विषयभोगि ते बसती ।।८०।।
अस्थिर पुत्रांच्या गृहिं सेवि जरी विषय राहि अतृप्त
तेथिल विषया चोरुन अपुल्या गृहिं ठेवि आणुनी गुप्त ।।८१।। — Memory
पत्निसवें एकांतीं भोगित ते विषय त्यांत चवि घेत
सन्निध त्याच्या तेथें सुत त्याचे कोणिही पहा नसत ।।८२।।

चाले ऐसें तों ये चपला भगिनी महाशना तेथें
खादाड बहू तीनें वरिला अस्थिर करीहि लोभ तिनें ॥८३॥
सुखवाया तिस अस्थिर करि उद्योगास विषय संपादी
आणी ते भक्षण करि लवमात्रें तृप्ति तीस नाहि कधीं ॥८४॥
लागे क्षुधा म्हणूनी धाडी पति लागि भक्ष्य आणाया
तोही सिद्धचि राही वर वर तिजसाठि विषय मिळवाया ॥८५॥
अस्थिर पंच सुतासह मिळवी आणीक तोहि भस्म करी
नूतन पत्नी त्याची दुसऱ्या क्षणिं भूक भूक हाय भरी ॥८६॥
धाडी पति पुत्रांना आणाहो खाद्य जा करा यत्न
यापरि होतां होतां झाले तीस दोन दिव्य सुत रत्न ॥८७॥
ज्वालामुखि नाम असे एकाला निंद्य वृत्त दुजियास
दोघेही मुलगे हे आवडती जाण फार मातेस ॥८८॥
जेव्हां अस्थिर देई आलिंगन त्या महाशने प्रेमें
जवळि वसे ज्वालामुखि तज्ज्वाळा स्पर्शती तया नेमें ॥८९॥
त्या योगें अस्थिर तनु भाजुनिया गाढ मूर्छनेंत पडे
कधि ऐसें होई कीं आवडता निंद्य वृत्त अंगि जडे ॥९०॥
त्यावेळीं सर्व जगीं छी थू करिती मृता परी होई
यापरि जेव्हां जेव्हां अस्थिर दुःखांत मग्नची राही ॥९१॥
त्याची ती स्थिति पाहुनि पुत्रप्रेमातिरेक मम सखिला
देई दुःख अतीशय तत्संगें सौख्य लाभ नच घडला ॥९२॥
मम सखिचा पौत्र असे नावाचा निंद्यवृत्त तसि करणी
दुसरा जेष्ट असे जो ज्वालामुखि तो प्रसिद्ध जगदहनीं ॥९३॥
मिठि मारुनि पहिला तिस निंद्य करी द्वितिय तीस आलिंगी
भाजी तद्देहा तैं झाले मी लुप्त मात्र तत्संगीं ॥९४॥
मम सखि दुःखीं राही बहु वर्षें माहि दुःख अनुभविलें
अस्थिर महाशनावरि तैं पासुनि पारतंत्र्य त्या आलें ॥९५॥
नगरि दश द्वारांची कर्म बळें एकदां मिळे तेथ
अस्थिर महाशनेसी राही घेऊन माय सुत सात ॥९६॥


करि इच्छा सुखचि मिळो परि भोगी दिवसरात्र दुःख अती
सुत एक शरिर जाळी दुसरा अत्रूस नुरवितो जगतीं ।।९७।।
कांता महाशना त्या भक्षासाठीं क्षणोक्षणीं ओढी
चपळा सुत पाचांच्या सदनासी येरझार नच सोडी ।।९८।।
यास्तव अस्थिर लाभे सुख न कधीं कष्टमात्र बहु पडती
पाहुनि कष्टमय स्थिति पुत्राची मम सखीस दुःख अती ।।९९।।
त्या दुःखें ती पावे मूर्च्छा ऐशी विपत्ति तिस वळघे
वसती महाशनेसी ज्वालामुखि निंद्य वृत्त सुत दोघे ।।१००।।
त्यांचें पालन पोषण करि सासू शून्य सासरा मूढ
चपळा महाशना ह्या सवतिमधें जाहला न कधि बिघड ।।१०१।।
अस्थिर महाशनेच्या नगरीं त्या पूर्ण होय आधीन
सखिच्या लोभाकरितां मींहि तिथें राहि ठाण देऊन ।।१०२।।
सखिच्या दुःखा वेगें जरि मी बहु जाहले हतप्राय
परि मी रक्षित सर्वां माझ्याविण सर्व पावतीच लय ।।१०३।।
मी नसल्या काय घडे परि झाले मीच शून्य सखिसंगें
शून्याच्या सान्निध्यें, झालें मी मूढ मूढ अनुषंगें ।।१०४।।
अस्थिर योगें अस्थिर चपला करि चंचलत्व मज आलें
ज्वालामुखिच्या योगें ज्वालामय निंद्यवृत्तही झाले ।।१०५।।
सखिसंगतींत यापरि भासे परिणाम मजवरी चित्र
ती तें जरि मी सोडी तरि न वसे ती जिवंत पळ मात्र ।।१०६।।
संग अशांचा घडला व्यभिचारिणी बोलती मला मूढ
मी निर्मळ स्वरूपें ज्ञानी हें फक्त जाणती गूढ ।।१०७।।
मम जननी थोर सती असुनी निःसंग आणि शुद्ध अती
सूक्ष्मचि परमाणुहुनी विस्तीर्ण न भाहूनि फार जी होती ।।१०८।।
सर्वज्ञ परी नाहीं ज्ञात तिला कांहि असुनि कर्तार
निष्क्रिय सर्वाधारचि सर्वाश्रय परि न देचि आधार ।।१०९।।
असुनी अरूप वेई नानारूपें अयुक्त सर्वांशी
सर्वव्यापी द्युतिमान् सर्वत्र ज्ञेय परि न कोणासी ।।११०।।

स्वानंदी थोर परी घे ना आनंद मातृपितृहीन
मजपरि सुता तियेला होत्या किति तरि तयासि गणती न ॥१११॥
सागरि तरंग जैसे उठति तशा होति भगिनि मज अमित
राजसुता सर्वहि त्या वागति माझ्या समान कीं सतत ॥११२॥
मी मोठी मंत्रवती वागुनि भगिनी गणांत तत्परही
शुद्ध अती स्वस्वरुपें जननी परि हो असंग मी राही ॥११३॥
त्या नगरीं सखिसुत जें अस्थिर होऊनिया अति श्रांत
जननी अंकावरि तो स्वस्थपणें होइ लीन निद्रेंत ॥११४॥
अस्थिर झोपी जातां त्याचे ते विकल होति सुत सात
निद्रा घेती सर्वहि राहे तेव्हां न कोणि जागृतित ॥११५॥
त्या समयीं अस्थिर सख ज्या अभिधान प्रचार हें आहे
पुररक्षणार्थ पूर्व द्वारयुगीं भ्रमण करित तो राहे ॥११६॥
अस्थिर त्याची माता पुत्रासह होइ लीन झोपेंत
तेव्हां तत्सखि सासू असती जी या जगी असे ख्यात ॥११७॥
आच्छादुनि त्या सर्वा रक्षितसे पौत्र पुत्रसह त्याच्या
झोंपी गेल्या सर्वहि मी जाई हळुच जवळि मातेच्या ॥११८॥
आलिंगितां मला ती होइ मला प्राप्त पूर्ण सौख्य तदा
पुनरपि जागृत होतां सर्वचि मी अनुसरे तयास सदा ॥११९॥
अस्थिर सखा महाबलि नामें ख्यात प्रचार दक्षभला
रात्रंदिन संचारा करुन प्रतिपाळि एकटा सकळा ॥१२०॥
तो एकलाचि होई कार्यास्तव पंच आणि दशविधही
पुरपुरवासी व्यापुनि रक्षितया माजि मिसळुनी पाही ॥१२१॥
नसतां प्रचार त्यांशीं सलग तरी होति नष्ट ते सकल
जैसे मणि मालेचे सुत्राविण गळति होउन मुकुल ॥१२२॥
पावुनी संगम माते घडवी संयोग मजशि सकलांचा
संजीवित ममयोगें तो झाला सूत्रधार नगराचा ॥१२३॥
होतां जीर्ण नगर तो ने सकला शीघ्र अन्य नगरास
ऐसें प्रचार योगें अस्थिर करि राज्य भिन्न देशास ॥१२४॥

अस्थिर सतिपुत्र असे लाभे स्वामित्व भिन्न नगराचें
त्याला प्रचार देई आश्रय बहुपरि सहाय करि त्याचें ।।१२५।।
प्रियमान्य मर्जशि अस्थिर वाढवि प्रत्यक्ष मीच कीं त्यास
चपला महाशनेच्या संगति तो पात्र होइ दु:खास ।।१२६।।
अस्थिर दु:खी झाला ज्वालामुख निंद्यवृत्त सहवासें
दुसरे पंचतनय त्या वरि वरि ओढोनि घालिती फासे ।।१२७।।
यास्तव अस्थिर भोगी क्लेश महासौख्य लाभ नच झाला
त्याचे पंचसुत पहा फिरविति केव्हां इतस्तता त्याला ।।१२८।।
केव्हां पत्नी चपला चाळवित्या खिन्न बहुत तो होई
केव्हां महाशनेच्या भक्ष्यास्तव खटपटीस तो जाई ।।१२९।।
केव्हां ज्वालामुख त्या भेटुनि करि दाह सर्व शरिरांत
तेणें मूर्च्छित होई काय करावा उपाय नच गमत ।।१३०।।
कधि निंद्यवृत्त भेटुनि करि त्याला निंद्यपात्र अपमाना
त्यायोगें अपणाला मानुनि मृततुल्य शोक करि जाणा ।।१३१।।
दुष्टस्वभाव पत्नी सुत पीडित अनुसरूनि त्या राहे
दुष्ट कुलोत्पन्न सदा अस्थिर तो ग्रासिला बहू मोहे ।।१३२।।
अस्थिर परिवारासह बहुविध नगराप्रती फिरत गेला
कधि भीषण अटवीला कधि हिंस्र पशूंच्याहि स्थानाला ।।१३३।।
अत्यंत तप्तभागीं कधि शीतल देशि जेथ अज्ञान
भरली दुर्गंधि जिथें त्यापरि अंधारयुक्त जें स्थान ।।१३४।।
एवं अस्थिर फिरला मूर्खांच्या संगतींत बहुदेशीं
त्यायोगें अतिदु:खी झाली सखि माझि कष्ट उगि सोशी ।।१३५।।
निर्मळ शुद्ध सखी मम म्हणुनी मजला तिचा कि मोह गमे
तत्संगतींत राहुनि सर्व कुटुंबास पाळि मी प्रेमें ।।१३६।।
दुष्टांच्या संगतिनें झालें कां सौख्य आजवरि कोणा
ग्रीष्मीं अफाट सिकता प्रांतीं कां होइ शमन जल तृष्णा ।।१३७।।
यापरि दु:खी गेला काळ बहू एकदा सखी आली
होऊनि खिन्न अतिशय साधुनि एकांत भेट मज दिधली ।।१३८।।

कथिला उपाय तिजला वरिती एका विचक्षणा पतिला
जिकी अस्थिर कांहीं वधिले तत्पुत्र बांधि इतराला ॥१३९॥
शेवटिं सहाय माझें घेउनि ती मम सखी पहा गांठी
अंतःपुर मातेचें माझ्या तिस घट्ट मारि मिठि कंठीं ॥१४०॥
त्या योगें शुद्ध सती झाली मग मग्न सहज आनंदीं
नाथा ! त्यापरि आपण सखिच्या पुत्रास अटकवा बंदी ॥१४१॥
साधा भेट जननिची नित्य सुखा प्राप्त करूनि घ्या आतां
हें मी स्वतां अनुभवी सौख्याचें स्थान सांगते कांता ॥१४२॥

**इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे हेमचूडोपाख्यावे**
**बंधाख्यायिका पंचमोध्यायः ।**



॥ प्रशासन नाम ॥

## अध्याय ६

स्वस्त्री भाषण ऐकुनि वाटे आश्चर्य हेमचूडाला
बोले स्वतां अविद्वान् परि विदुषी पत्नितें हसुनि बोला ॥१॥
ऐके प्रिये तुझें हें कथन नसे शक्य गगन चित्रपरी
भासें असंभवनिय प्रत्यक्ष निराधार फोल कांहि तरी ॥२॥
विद्याधरि कन्या तूं वाढलि ऋष्याश्रमांत परवाची
तरुणी न पूर्ण होसी, तारुण्य स्पर्श तुजसि नुक्ताची ॥३॥
ऐसे असतां सांगसि, वस्तुस्थिति घडलि पूर्व काळासी
बाधा झाल्या परि तव वचन, असंबद्ध वाटतें मजसी ॥४॥
न कळे या तव वचना द्यावें सत्यत्व कोठवरि कैसें
सांग कुठें तव ती सखि आणि तिचा बद्ध पुत्र मज गवसे ॥५॥
तव कथनीं बोलियलीं नगरें तीं सांप्रती असति कोठें
राहो ती गोष्ट परी, प्रथम कथी राहि ती सखी कोठें ॥६॥
मातेने दिधली ती सखि, नाहीं प्राप्त झालि कधि मजला
अंत:पुरिं मातेला पूस, पिता मम वरी न दुसरीला ॥७॥
शीघ्र मशीं सांग कुठें आहे ती तुझी सखी व तत्पुत्र
वंध्यासुता परि तुझें भाषाण गमतें न सत्य लवमात्र ॥८॥
तव कथन गमे मजला जेंवि विदुषक मुखें वदेवाणी
वंध्यासुत आरुढाला प्रतिबिंबांतिल रथावरी कोणी ॥९॥
तत्तनु होति विभूषित युक्ति सुवर्णाचिया अलंकारीं
जाई गगन वनासी घे नर शृंगायुधासि तो स्वकरीं ॥१०॥
भावी राजा मारूनि जिंकी गंधर्व नगर तो समरीं
मृगजळ सरिते माजीं स्वप्नींच्या स्त्री जनीं विहार करी ॥११॥
त्यापरि तववच गमतें व्यर्थचि मज अर्थहीन सार नसे
ऐकुनि निर्णय पतिचा चतुरा ती बोलते पहा कैसें ॥१२॥

नाथा जें मी कथिलें तुजशीं नाहीं वरें निरर्थक तें
मज ऐशांचें भाषण किमपि निराधार जाण कधि नसतें ।।१३।।
तपनाशक खोटें त्या न स्पर्शति सत्यशील संभवल्या
न तपस्वि कुलीं खोटें सौंदर्य जसें न पाहि कोडेल्या ।।१४।।
जिज्ञासूतें दावुनि जो न खरा मार्ग अन्य पथि नेत
त्या दोषें त्या न मिळे सुखसाधन नीच उच्च लोकांत ।।१५।।
समदृष्टी होण्या तो झाला ज्या तिमिर रोग नेत्रास
नेत्रीं अंजन घाली अंजन शब्देंच काय फळ त्यास ।।१६।।
सुजनन जिज्ञासूतें अहित कथी अज्ञमानि त्या अहित
कथिमी प्रियाच तुमची जिज्ञासु तुम्हास नाथ विपरीत ? ।।१७।।
यद्यपि मम वच मिथ्या वाटे तरि करि विचार तू सूक्ष्म
शीतें होय परीक्षा भाताची सूज्ञ जाणती नियम ।।१८।।
व्यवहारज्ञ परिक्षिति अंशावरुनी समग्र वस्तूस
मदुदाहरण तुम्हाला ज्ञातचि घ्या पूर्विचें किंचित्तास ।।१९।।
पूर्वीं विषय तुम्हाला सुखद बहू वाटती अभीलषित
मद्वचनें कळलें कीं सुखसाधन नव्हति ते असें खचित ।।२०।।
परिसांप्रत इतरांना विषयांचें सौख्य वाटतें चित्तीं
यावरुनि मद्वचाची सत्य असे कीं असत्य घ्या प्रचिती ।।२१।।
राजन् मी जें कथितें ऐकावें सरळ शुद्ध भावानें
सज्जन वचनिं नसावा किमपि अविश्वास शत्रु त्या जाणे ।।२२।।
श्रद्धानामक माता, शरणांगत बालकास रक्षितसे
सर्व कुतर्कापासुन, यास्तव लागा तुम्ही तिच्या कासे ।।२३।।
श्रद्धान आप्त वचनीं ऐशा मूर्खास सोडुनी जाती
श्रीकीर्ति सुखें, होई श्रद्धा शून्याचि हीनदीन गती ।।२४।।
आधार असे श्रद्धा जगतां, बहु काय सर्व जीवन ती
माते ठायीं श्रद्धा हीन, कसें मूल वाचते जगतीं ।।२५।।
पुरुषास सौख्य कसलें, स्त्रीवरि विश्वास नांहि जरि साचा
प्रेमोद्गमवृद्धा विश्वास न जरि सुतावरी त्याचा ।।२६।।

श्रद्धेविण शेतकरी कैसा नांगर धरील शेतासी
श्रद्धेनें प्रवृत्ती पेराया होइ धान्य सांठ्यासी ॥२७॥
ढासळल्या श्रद्धा तरि होई व्यवहार बंद लोकांचा
फळ लाभें प्रवृत्ती श्रद्धा संबंध त्यांत नच साचा ॥२८॥
म्हणाला जरि कां ऐसें याला श्रद्धाच हेतु होई कीं
फल भावना धरूनी वर्ते, श्रद्धाच ठेवि जाणनिकी ॥२९॥
व्यवहाराला श्रद्धा ती विण न श्वास सोडणें घेणें
शक्य असे नाथ ! तरी होउनि सुश्रद्ध सत्य सुखि होणें ॥३०॥
श्रद्धा नच ठेवावी नीचावरि मत असेल जरि ऐसें
ऐकावें नाथ अशी श्रद्धेस्तव न प्रवृत्ति होत असे ? ॥३१॥
प्रवृत्तिस त्या होई श्रद्धाची मूळ अन्य काय असें
प्रश्न तियेचा ऐकुनि तिज लागीं हेमचूड बोलतसे ॥३२॥
नृपसुत बोले ऐके सर्वांवरि एकसा असो श्रद्धा
म्हणशी प्रिये न पटतें श्रद्धा जी सज्जनी असें शुभदा ॥३३॥
श्रद्धा साधुवचनावरि ठेवावी कीं हितेच्छु पुरुषानें
अन्यत्र ठेवितां मग भोगावें दुःख जेवि माशाने ॥३४॥
सरळ गळा विश्वासुनि बडिशांतरि वक्र नेणुनी मासे
मुकती प्राणा दुर्जन नच विश्वासार्ह साधु कीं जैसे ॥३५॥
जे नागवले जगती ठेवुनि विश्वास दुर्जनावरती
विश्वास सज्जनांचा तारक ज्या गोष्ट सिद्ध हे करती ॥३६॥
सारांश अनुभवाविण कोणावरि ठेवणें न विश्वास
योग्य दिसे तरि कैसें सत्य तुझ्या मानुं मी विधानास ॥३७॥
यापरि हेमचुडानें केलासे प्रश्न हेमलेखेसी
वदती झाली त्यातें ऐकावे नाथ ! देइ चित्तासी ॥३८॥
संभव वरिल विधाना कैसा तें कथित नाथ ! हो परिसा
हा वाइट हा उत्तम याला आधार कोणता कैसा ॥३९॥
ती लक्षणें प्रमाणें कळतीं ऐसें म्हणाल कांहि जरी
श्रद्धा नाहिच त्याला उपयोगी कोणतें प्रमाण तरी ॥४०॥

नाहिंच पटणार तया कसलें ही दूसरें प्रमाण कधीं
श्रद्धाधारें वागति सर्व जगीं गोष्ट पावते सिद्धी ॥४१॥
स्पष्टपणें गोष्टचि ही कथिते अत्यंत सुलभाशा बोलीं
श्रद्धा सोडुन केले तर्क असंभाव्य वा न तर्क मुळीं ॥४२॥
या उभयपक्षि पुरुषा इहपर लोकांत जाणहित न घडे
कालें करून कदाचित् दुसऱ्याच्या श्रेय कांहि पदरिं पडे ॥४३॥
पहिल्या कुतर्क योगें लाभ न इतिहास पूर्विचा परिसे
सह्याद्रिकडे कौशिक मुनि गोदेच्या तिरास राहतसे ॥४४॥
तो फार शांत होता सन्मतिचा दृश्य जगत मर्मज्ञ
त्याच्या संगति राहति शिष्य बहू त्यांत तर्कटी सूज्ञ ॥४५॥
गुरुच्या पश्चात् जमले शिष्य जगत्स्वरूप निर्णयास्तव ते
बुध्यनुसारचि अपुलें मत बोलोनि वाद जाहले करिते ॥४६॥
शिष्य समाजीं विद्वान् नामें जो शुंग होउनी पुढती
इतरांच्या सर्व मतां खंडुनि सर्वांस जिंकि तो स्वमतीं ॥४७॥
श्रद्धान त्यास शास्त्रीं बुद्धीनें भ्रष्ट वादि पांडित्य
जरि इतर मानिती कीं सिद्ध करी ज्या प्रमाण तें सत्य ॥४८॥
परि हा तर्कटि मोठा तर्क असंभाव्य करुनि शिष्य जना
खोडुनि काढी स्थापी स्वमत पहा काय बोलिला वचना ॥४९॥
परिसा तुमचें मत तें सत्य म्हणूं ज्या प्रमाण सिद्ध करी
परि हें सिद्ध न होई ऐका मी सांगतो प्रमाण परी ॥५०॥
असल्या प्रमाण दोषी त्या योगें सिद्ध तें असत्य असे
प्रथम प्रमाण आहे निश्चित निर्दोष पारखा ऐसें ॥५१॥
ऐसा निश्चय करण्या घ्यावें लागे प्रमाण जरि दुसरें
त्याला तिसरें यापरि अनवस्था होय काय सिद्ध बरें ॥५२॥
एवं निर्णय होई प्रमित प्रमाण न च प्रमात्याचा
यास्तव भासे जें जें सर्वंहि त्या आश्रयोचि तें शून्याचा ॥५३॥
जें कीं नव्हे प्रमाणा विषयचि तें शून्य होउनी राहे
तस्मात् सर्वंहि शून्यचि ऐसा याचाचि निर्णयो आहे ॥५४॥

शुंगवचातें ऐकुन मंद द्विज तन्मतासि अनुसरले
आभासात्मक तत्वा सेवुनि ते शून्यवादि कीं बनले ।।५५।।
शून्या भजुनी मुकले स्वानंदा मूढ पावले नाश
परि बुद्धिमान करिती शुंगमता विषयि ते विचारास ।।५६।।
कौशिक सन्मुख त्यांनीं शुंगमता मांडिलें तदा मुनिनें
संदेह रहित केलें, तर्क असंभाव्य सोडि नाथ मनें ।।५७।।
शास्त्राधारेंचि करी तर्क बरा साधिपूर्ण कल्याण
योग्य असे हें जाणे वदली स्वपतीस यापरी वचन ।।५८।।
ऐकुन हेमचुडाला वाटे आश्चर्य विदुषतें बोले
थोर प्रिये कथुं तुझें ज्ञान किती अजवरी न ओळखिले ।।५९।।
धन्य तुझी मी हितसा घडला मज भाग्य थोर तव संग
श्रेया हेतु श्रद्धा पटलें परि शक्य तें कसें सांग ।।६०।।
कोठें श्रद्धा ठेवूं आणि नये ठेवुं कोणत्या ठायीं
शास्त्रें अनंत असतीं त्यांच्या अर्थीं विरोध बहु होई ।।६१।।
त्यावरि आचार्य तसे व्याख्या करणार भिन्नमत कथिती
न कळे त्यांतुनि घेऊं टाकूं तरि काय नाहिं अचल मती ।।६२।।
ज्याला जें रुचतें तें सत्य दुजें नाशिवंत हानिकर
ऐसें ठरवुनि धरिती आग्रह अपुल्या मती अहंकार ।।६३।।
ऐसा प्रकार आहे नच कोणी गांठिती पहा अवधी
जो मानि शून्य तत्वा अशून्य वाद्यासि तो सदा निंदी ।।६४।।
अश्रद्धेय म्हणावें कैसें त्या शास्त्र संमती मिळतें
म्हणुनी प्रिये विचारी समजावी नीट सत्यची मजतें ।।६५।।

**इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखडे प्रशंसनंनाम**

**षष्ठोध्यायः ।**

|| ईश्वरस्वरूप निर्णयं नाम ||

## अध्याय ७

यापरि हेमचुडानें केलासे प्रश्न हेमलेखेला
जाणेजीं जगताचें स्वरूप यथार्थचि वदे असें त्याला ।।१।।
ऐकावें प्रियनाथा ! सादर एकाग्र चित्त मी कथितें
कारण मन हें चंचळ कपिसम अस्थिर सदैव कीं असतें ।।२।।
पडती मह्या अनर्थीं जन सारे जाण या मना पायीं
करितां विचार गमतें सर्वानर्थास मूळ मन होई ।।३।।
सुप्तीं माजीं नसतें मन अस्थिर तें प्रसंग सौख्याचा
यास्तव नाथा ! करुनी स्थिर चित्ता श्रवणलाभ घ्या साचा ।।४।।
श्रवणांत जरि अनास्था केलें तें श्रवण फोलची जाय
चित्रीं लिहिल्या वृक्षा फळ येणें जेवि शक्य ना होय ।।५।।
सोडुनि कुतर्क पंथा हानिप्रद आदरीति सुविचारा
ऐशा सूज्ञ नरांना मिळतें फळ चांगले कि अवधारा ।।६।।
करुनि विचार सयुक्तिक साधावें साधनासि निष्ठेनें
सुविचारें श्रद्धाजी निपजे ती फलद होय नेमानें ।।७।।
सोडा स्वैर कुतर्का नाथ ! तुम्ही योग्य तो विचार करा
वागति जनसकल जगीं श्रद्धें व्यवहार करिति फलद खरा ।।८।।
शास्त्र विचारें कृषिवळ नांगरूनी योग्य काळि फळ घेती
सोनें रूपें व औषधि यांचा व्यवहार काळ ओळखिती ।।९।।
सत्तर्कानें श्रद्धें अनवस्थित तर्क सोडुनी होती
प्राप्तचि सुफला यास्तव नाथ ! हिता साधि तूंहि याच रितीं ।।१०।।
कल्याण साधनानें श्रद्धेनें यत्न करूनि हित घ्यावें
शुंगापरि अनवस्थित तर्क बळें साधना न सोडावें ।।११।।
श्रद्धायुक्त मनानें पुरुषें केल्यास यत्न हित होतें
नेटानें दृढ यत्नें करितां साधन कसें न फळ मिळतें ।।१२।।

करुनि प्रयत्न साधी शेतकरी धान्य धनहि संसारी
राजा लक्ष्मी वैभव विप्र सुविद्या सुखास देणारी ॥१३॥
शूद्रा सेवावेतन देवांसि सुधा तपासि वर लोक
लाभें कर्म करूनी यत्नें मिळविती अभिष्ट कित्येक ॥१४॥
श्रद्धारहित कुतर्की वाद करुनि आयु जो क्रमी त्याला
सांगा वरें कधींही थोडे तरि प्राप्त होय फळ त्याला ॥१५॥
करुनी यत्न न लाभे फळहि कदाचित् म्हणून जो श्रद्धा
सोडिल तरि हतभागी अपुला रिपु होय भोगि दुःख सदा ॥१६॥
सुविचार तसी श्रद्धा अवलंबुनि मुख्य साधनास वरा
ज्या योगें श्रेय मिळे नेटानें पुरुष यत्न त्यास करा ॥१७॥
साधनिं वैचित्र्य असे आणि विविधता म्हणूनि शोधावे
त्यांतुनि मुख्य असे जें ज्यानें कीं श्रेय निश्चयें फावे ॥१८॥
सुविचारें श्रद्धेने स्वानुभवें मुख्य साधना घ्यावें
सत्वर अवलंबावे कैसें तें सांगतें कि ऐकावे ॥१९॥
परमश्रेय म्हणावें यल्लाभें पुनरपी न दुःख असे
सूक्ष्म विचारें जगिया चोंहिकडे सर्व ठायि दुःख दिसे ॥२०॥
ज्या माजीं दुःख असे कोंणि, तया श्रेय परम बोलावे
संपत्ति, राज्य, वनिता, सुतलौकिक, सैन्य कोश हे अघवे ॥२१॥
विद्वत्ता बुद्धि बहु, नेत्र अती दिव्य, देह जणुं कुसुम
सर्वहि अस्थिरनश्वर, कालाग्नी माजि होति कीं भस्म ॥२२॥
हे क्षणिक सर्व असती, यांत असे सूक्ष्म बीज दुःखाचें
यास्तव सामर्थ्य नसे या सर्वां, श्रेय परम देण्याचें ॥२३॥
साधन परम श्रेयद, यांहुन की जाण वेगळें आहे
वनिता धनादि गमती उपयुक्त परंतु हा भ्रमचि पाहे ॥२४॥
भ्रममूळ मोह, सकळा मोहवि, तो ईश जो जगत्कर्ता
मायावी तो ईश्वर, त्यापासुन मोह होय या जगता ॥२५॥ मायावान:
स्वल्पचि विद्या योगें, मांत्रिकही भुलवितो जगीं लोकां
मर्यादित तद्विद्या, भुलवी तो थोडक्यास अवलोका ॥२६॥

सुटती न अल्प विद्या, मांत्रिक मोहांतुनीहि नर भुलले
मायावी थोर महादेव, कसा जिंकु शकति मोहखुळे ॥२७॥
प्रतिविद्या संपन्नचि होइल, नर जो तरेल मोहासी
मांत्रिक निर्मित जाणा येइल, त्या स्वस्थता अनुभवासी ॥२८॥
परि ती विद्या शिकण्या, करणें मांत्रीक संगती इष्ट
यास्तव मांत्रिक सेवा करुनि, करावें तयास संतुष्ट ॥२९॥
तेवि महा मायावी ईश्वर, केल्याविना प्रसन्न कसा
हा मोह जगद्रूपी निरसे, यास्तव तयास शरण असा ॥३०॥
होता प्रसन्न ईश्वर देइ महाज्ञान, तो दया करुनी
त्या ज्ञान बळें सहजें हरे माया मोह, जाय जिव तरुनी ॥३१॥
आहेत मार्ग दुसरे, परम श्रेयास साधण्या कथिले
ईशकृपेवीण परी होती ते व्यर्थ जाण कीं सगळे ॥३२॥
आराधी विश्वाचा चालक, परमेश आधि तो प्रेमें
मग तो कृपाळ देई मोहविनाशकचि साधनें नेमें ॥३३॥
पंचभुतात्मक जग हें आहे प्रत्यक्ष कार्यभूत दिसे
पृथ्व्यादि भुतें होतीं अंशरुपें सूक्ष्म त्यास हेतु असे ॥३४॥
क्रम हा उत्पत्तीचा यासी कारण असे जगत्कर्ता
शास्त्रेंहि साक्ष देती सर्वांहुनि भिन्न लक्षणी पुरता ॥३५॥
शास्त्र म्हणे एक, जगा नाहीं कर्ताचि ते स्वतां झाले
हें मत दुसऱ्या शास्त्रीं, युक्त विचारांनि पूर्ण खंडियले ॥३६॥
प्रत्यक्षातें मानुनि 'आत्मा नाहींच', जे म्हणे शास्त्र
शास्त्राभास गणा त्या, लक्ष त्या देति सूज्ञ तिळमात्र ॥३७॥
केवळ शुष्कचि तर्कें भरलें, ते शास्त्र ठीकची त्यजितां
दुसरे कितेक म्हणती यद्यपि असला जगास कुणि कर्ता ॥३८॥
न ज्ञानपूर्वक जगा केलें, त्यांनें निसर्गता झाले
हे असमंजस गमतें अढळेना कर्म बुद्धिविण घडलें ॥३९॥
बहुता शास्त्रावरुनी जगकर्ता बुद्धिवानची ठरतो
कर्ता कार्य अगोदर चिंती मनिं मग कृती तशी करतो ॥४०॥

सारांश जगत्कर्ता आहे, हें शास्त्र तर्कयुक्ति बळें
सिद्ध असे विलक्षण दुसऱ्या कर्त्याहुनी असाहि कळे ॥४१॥
होई अनाकलनीय कृति, कर्ता पाहिजे अचिंत्य गती
शक्ति अनंता पारचि कार्य तसें बळ विशाल ज्या नमिती ॥४२॥
शरणागत उद्धारा शक्ति असे पूर्ण ज्याचिया ठायीं
यास्तव राज सुता त्वां शरण रिघावें जगत्पती पायीं ॥४३॥
विश्वासा दृढ करण्या समजा ऐश्वर्य शालिपुरुष असे
सेवा करुनी भावें प्रेमबळें भृत्य त्यास सुखवितसे ॥४४॥
तरि तोहि पुरुषवेळीं भृत्यहिता साधितो अगत्यानें
त्यापरि भक्त दयाघन ईश्वर केला प्रसन्न हो ज्यानें ॥४५॥
त्याचे त्रैलोक्यपती पुरवि न कां सर्व हेतु सदयत्वें
लोकीं थोर पुरुष ते असती निष्ठुर कृतघ्न मानित्वें ॥४६॥
परि परमेश्वर केवळ करुणासागर सुखैक धाम असे
भक्त मनोरथ पुरवी हृद्गत जाणूनि नित्य रक्षितसे ॥४७॥
ऐशा गुणेंच ईश्वर झालासे वंद्य सकळ लोकांना
व्यवहार या जगाचा चाले नियमीत रक्षि भक्तजना ॥४८॥
राजा नसे व्यवस्थित तरि त्याचें राज्य पावते विलया
अति दक्ष जगच्चालक ईश्वर हा रक्षि सकल करुनि दया ॥४९॥
त्वरित दयाधन ईशानाथ असा शरण सादरें भावें
तोचि तुम्हा नेइल कीं परम पदाश्रेय जेथ लाभावें ॥५०॥
राजन् उपासनेचे भेद बहू भजति ईश्वरा काम
धरुनि चित्तीं व्यर्थचि, भक्ति म्हणा तीच सत्य निष्काम ॥५१॥
संकट थोरचि आलें तन्नाशा भजति ईश्वरा प्रेमें
ईश्वर दयाळु आहे वारिल तो भजक संकटा नेमें ॥५२॥
किंवा उपासन नसे पूर्ण उपेक्षा करील तो त्याची
भजती सकाम जरि कां होते त्या प्राप्ति अल्प लाभाची ॥५३॥
लौकिक थोर पुरुषही होतो वश सेवकास सप्रेम
जाणुनि भाव तयाचा बहुकाळें शुद्ध सरळ निष्काम ॥५४॥

लौकीक धनी असती अल्पज्ञ तयासि फार काळानें
कळते निर्हेतुकता, सर्वज्ञचि इश हृदयि असल्यानें ।।५५।।
तत्काळचि सर्वेश्वर जाणे कीं शुद्ध भाव भक्तांना
देतो फळ शीघ्र अति परि देण्या इष्ट फळ सकामांना ।।५६।।
घेतो साह्य नियतिचें फळ देतो पूर्व कर्म लक्षूनी
निष्काम जरि उपासक शरण असे पूर्ण भाव ठेवूनी ।।५७।।
योगक्षेम तयाचा परमेश्वर आपण स्वतां वाही
दुर्लक्ष पूर्व कर्मा करुनी नियतिकडे न तो पाही ।।५८।।
सिद्ध करुनि मोक्षाचें साधन त्या आणि फळदशे तूर्ण
यापरि महेश्वरत्वचि त्यांचें स्वातंत्र्य जाणिजे पूर्ण।।५९।।
असती विमुख महेशा त्यांवरि सामर्थ्य नियति कर्माचें
चाले विदितचि सकलां चरितमनीं घ्या मृकंडु तनयाचें ।।६०।।
सर्वेश्वर भक्तांना नियती प्रारब्ध शक्ति लागुं न दे
ऐकावी प्रियनाथा ! उपपत्ती याचि मी तुम्हास वदे ।।६१।।
प्रारब्ध नियति नसती वस्तुत: लंघनीय जरि कोणा
पुरुषा प्रयत्न रहिता असती ते कीं अभेद्य तुम्हि जाणा ।।६२।।
म्हणुनिच योगी जिंकी प्रारब्धा करुनि रोध वायुचा
प्राणायाम तयाला लागुं न दे स्पर्श दु:ख लेशाचा ।।६३।।
पौरुष पराङ्मुख नरा ग्रासी प्रारब्ध सर्प नियमानें
प्रारब्ध नियति कल्पित नियती दृढ कल्पना अनुभवानें ।।६४।।
संकल्परूप नियती ईशाची शक्ति सत्य संकल्प
यास्तव ती जीवांना नाहीं कीं लंघनीय अत्यल्प ।।६५।।
कुंठित नियती होते असते जे ईशभक्त त्यां पाशीं
इतरां ठायि अकुंठित कारण कीं ते स्वतां असेच तशी ।।६६।।
यास्तव कुतर्क सांडुनि नाथा ! व्हा त्या महेश्वरा शरण
निष्काम भावनेनें नेइल तो श्रेयपदि करीं धरुन ।।६७।।
सुखगिरि शिखरीं चढण्या जाणाही प्रथम पायरी होय
सोडुनि या दुसऱ्या पथिं जातां नच त्यांत तिळभरी सोय ।।६८।।

श्रीगुरु म्हणती रामा ! यापरि ऐके प्रिया वचा चूड
अतिशय मुदित मनानें पुनरपि बोले तिला असें गोड ।।६९।।
सांग प्रिये स्वरूपच ईशाचें नाम काय वदतात
कर्ता चालक जगता आहे जो कीं स्वतंत्र अत्यंत ।।७०।।
कोणी विष्णु तयाला कोणी शिव गणपतीहि म्हणतात
कोणी सूर्य म्हणे त्या नरसिंहहि कोणि बुद्धही सुगत ।।७१।।
कोणी अर्हत कोणी म्हणती त्या वासुदेव कीं प्राण
चंद्र कुणी अग्नि तया कर्म, अणू देति त्यास अभिधान ।।७२।।
भिन्न मतेंच विविधता जगताच्या कारणा असे आलीं
यांतुनि कोठें ठेवूं ईश्वर हा भाव कथि तुझ्या बोलीं ।।७३।।
तूं नेणसि तें नाहीं ऐसा निश्चय असेचि मम चित्ता
कीं व्याघ्रपाद भगवान् धर्मपिता ब्रम्हदर्शि मुनि होता ।।७४।।
म्हणुनिच तव ठायीं तूं असुनी स्त्री ज्ञान दिव्य दिसताहे
यास्तव तूं मज बोधीं मधुरवचें प्रेम मजवरी आहे ।।७५।।
ऐके प्रश्न पतीचा झालासे मोद हेमलेखेला
बोले ती ऐकावें ईश्वर निर्णय कथीतसे तुजला ।।७६।।
या सर्व जगज्जाला निर्मी ईश्वर करीही संहारा
ब्रह्मा विष्णु महेशहि तोचि असे सूर्य चंद्र अवधारा ।।७७।।
कथिती बहुप्रकारें लोक अशा तोचि सर्व जाण असे
परिवस्तुता नसे तो शिव विष्णु ब्रह्मदेव इतर तसे ।।७८।।
ऐकावें अवधानें स्पष्ट पहा सांगते विषय नाथा
मानिति शैव त्र्यंबक पंचमुखी शंकरा जगत्कर्ता ।।७९।।
घटकर्त्यापरि मानिति कर्त्या या देह आणि चेतनता
वस्तूंचा व्यवहारीं चेतन शरिरीच आढळे कर्ता ।।८०।।
अशरीर वा अचेतन कर्ता हा नाढळेच जगिं कोठें
संभव कर्तृत्वाचा उभयांतुनि चेतनासिची उमटे ।।८१।।
कारण कीं स्वप्नांतरिं टाकुनि शरिरास जीव निर्मी तो
चिद्देहं वस्तूंना अनुभव ऐसा जनांसि कीं येतो ।।८२।।

सूक्ष्म विचारें कर्त्या होय चिदात्म्या शरीर हें करण
जीवा शरिरापेक्षा युक्तचि स्वातंत्र्य त्या नसे पूर्ण ।।८३।।
परि या जगकर्त्याला स्वातंत्र्यें पूर्ण साधनापेक्षा
नसतें हें युक्तचि कीं निर्मी तो करुनि साधनोपेक्षा ।।८४।।
यास्तव शरीर त्याला नाहीं हे मुख्यता पहा ठरतें
नसतां, लौकिक कर्त्यापरि त्या सामग्रिची गरज उरते ।।८५।।
ईश्वर जग दुत्पत्तीं जरि घे सामुग्रि देश कालाची
तरि जीवासम होई त्याच्या हानीच पूर्ण विभवाची ।।८६।।
जगदुत्पत्तीपूर्वीं ईशाला साधनें हवी असलीं
तत्कर्ता नसल्यानें सर्वच कर्तृत्वता तया कसली ।।८७।।
परमेश्वर जग निर्माया ठेवि न देहादिची गरज कांहीं
ईश्वर अतनू आहे ठरलें हें स्थूल शरीर त्या नाहीं ।।८८।।
चिद्रूपा ईशातें स्थूलमती लोक नोळखति साचें
भक्तिस्तव प्रकारें भिन्न पहा ध्यान कल्पिती त्याचें ।।८९।।
त्या योगें परमात्मा भक्त प्रिय भिन्न भिन्न धरिरूपा
परि निष्कर्षं आहे चेतनची शुद्ध देह चिद्रूपा ।।९०।।
सत्ता परमात्म्याची चेतनता शुद्धचिति त्रिपुराही
भासे तिच्याच ठायीं बहुरूपें भिन्न नसुनि जग पाही ।।९१।।
विश्व चराचर सारें प्रतिबिंबित नगर आरशीं जैसें
चिद्रूपचि तें आहे मग तेथें उत्तमाधमचि कैसें ।।९२।।
अपर रुपाची महती परमात्मस्वरुपिं नाहिं जाणावें
देहरहित ईशातें सूज्ञें पररूप शुद्धची ध्यावें ।।९३।।
शक्य न मतिमंदाहें त्यानें साकार मूर्ति तें ध्यावें
निष्काम भक्तियोगें श्रेयातें ईश भजुनि साधावें ।।९४।।
वांचुनि उपासनेच्या अन्य पथें कोटि जन्म जरि झालें
कांहिं न सार्थक होई केलें तें व्यर्थ कष्टची गेले ।।९५।।

इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे ईश्वरस्वरूप निर्णयंनाम
सत्पमोध्यायः ।

॥ हेमचूडोपाख्याने संसाराख्यायिका विवरण ॥

## अध्याय ८

पत्निवचें हेमचुडा कळला निर्णय महेशतत्वाचा
चैतन्य तूर्यरूपी परमेशा जाणुनी निवे साचा ॥१॥
ओळखि परमेशाचें त्रिपुरादेवी असे सगुणरूप
सर्वोत्तम, अनुरागें झाला तद्भावनेंचि तद्रूप ॥२॥
पुढतीं तो सप्रेमें देव्योपासन करीत निष्ठेनें
तीव्रपणें अनुरागें क्रम चालवि लोटले कितिक महिने ॥३॥
त्या योगें परमेश्वरि देवी होई प्रसन्न तत्हृदयीं
विषय प्रीति उडाली चित्तीं, सुविचार मग्न तें होई ॥४॥
दुर्लभ ही स्थिति जाणा नच लाभे ईशवर कृपेवीण
चित्त विचारीं लागे मोक्षा हें मुख्य देइ साधून ॥५॥
श्रीगुरु बोले रामा ! चित्त न होई विचार तत्पर जों
करुनी उपाय शतशा प्राप्त नव्हे श्रेय परम कितिहि झिजो ॥६॥
यापरि गूढ विचारीं असतां तो मग्न एक दिवसासी
त्याची भेट घडुन ये दैवें एकांति जाण पत्नीसी ॥७॥
अवलोकि हेमलेखा येताना मंदिराकडे स्वपती
उठली त्यातें आणी सादर त्या बसवि आसनावरती ॥८॥
योग्योपचार योगें केला सत्कार राजपुत्राचा
विनयें प्रेमभरें ती त्याला अतिमधुर बोलते वाचा ॥९॥
बोले प्रियतम नाथा ! बहु दिवसां भेटला मला आजी
स्वस्थ असे कीं प्रकृति शरिर निरोगी असे न सांगाजी ॥१०॥
कारण इतुक्या अवधीं नच झाली कशि तुम्हा स्मृती माझी
नच भेटतां मला कीं मजशीं नच बोलतां दिसामाजी ॥११॥
नच घटकां कधि जाई आणि कसें जाहलें असे आतां
स्मरत नसे मजला की नसतां मम संमती तुम्ही नाथा ॥१२॥

स्वप्नीं गोष्टहि केली एखादी होय जागृतींत कशी
ऐसी स्थिति असतांना होइ कसा हा प्रकार अकळमशीं ॥१३॥
मज वांचुन एक निशी युगसम व्हावी किती तशा जाती
दु:खें बोलुन ऐसें आलिंगी त्यास होइ खिन्न अती ॥१४॥
कांतेच्या आलिंगनिं नच होई अल्पसा विकार तया
बोले उलट तियेला पाडुं नको व्यर्थ मजशि मोहीं या ॥१५॥
पूर्णपणें ओळखिलें मी आतां तुजशि खेद न स्पर्शी
ब्रम्हज्ञानी होशी धीर तशी मोह काय करि तुजशीं ॥१६॥
यास्तव विचारण्या तुज आलो मी कांहि ऐकुनी घेई
पूर्वी तूं कथिली जी गोष्ट मला स्पष्ट करुनी ती देई ॥१७॥
कथिली जननी तूं ती कोण सखी कोण पति तिचा कोण
तत्सुत आदि करुनी कोण बरें स्पष्ट सांग मज पूर्ण ॥१८॥
मज न बरें तें कळले नच वाटे तूंहि अन्यथा कथिलें
मजला ऐसें गमतें अन्य मिषें की मलाचि बोधियलें ॥१९॥
यास्तव फोड करुनि तूं मज सांगे स्पष्ट कळुन ये चित्तीं
अंतरिचा हा संशय छेदी माझी असे तुला विनती ॥२०॥
प्रश्न पतीचा ऐकुनि झाला बहु मोद हेमलेखेला
निरखी त्या, मानी कीं ईशदयें शुद्ध चित्त हा झाला ॥२१॥
चिच्छक्ती देवीनें केलें या आपला, सुफल झालें
पूर्विल सुकृत याचें विषयांवरि पूर्ण चित्त कीं विटले ॥२२॥
पात्र असे हा ज्ञाना बोध करूं यास म्हणुनि ती बोले
नाथा ईशदयेनें भाग्य गमे थोर प्राप्त तुज झालें ॥२३॥
विषयीं वैराग्य असे एरवि कोणास जाहले न दिसे
ईशप्रसाददर्शक भोगीं वैराग्य चिन्ह आदि असे ॥२४॥
दुसरें चिन्ह विचार प्रवण मनाचें असे तया लागीं
कथितें आता स्व-कथा ऐक तरी श्रवण करून सर्वांगीं ॥२५॥
मम माता कि पराचिति सखि माझी जाण बुद्धि ती होय
असती स्त्रीच अविद्या यत्संगति बुद्धिला गमे रम्य ॥२६॥

स्पष्ट दिसे सामर्थ्यचि जगतीं या जाण तूं अविद्येचें
रज्जूवर अहि भासवि करि ते उत्पन्न जाल भीतीचें ॥२७॥
मोह महासुत तीचा त्याचा मन, कल्पना मने वरिली
स्त्री सुंदर त्या उभया सुतरत्नें पुढति पांच जीं झालीं ॥२८॥
ज्ञानेंद्रियें असति तीं त्यांचीं स्थानें किं गोलकें पांच
सेवन करितां विषया होती संस्कार त्या मनीं साच ॥२९॥
संस्कार रूप पुष्टी बापाला देति पुत्र ते जाणा
चोरुनि भोगी मन तें स्वप्न असे कल्पना बहिण तृष्णा ॥३०॥
सुत आशा तृष्णेचे काम तसा क्रोध शरिर कीं ग्राम
मी कथिला मंत्र महा स्वरुपाचें स्फुरण तें करीं ठाम ॥३१॥
प्राण प्रचार जाणा परम सखा लाधला मनाला जो
कांतारादिक कथिले जाणावे नरक, भोगि मनाला जो ॥३२॥
मम संगमांत बुद्धि स्थिर चित्स्वरुपांत ते समाधिगणा
मम माता स्थानाच्या प्राप्तिस कीं मोक्ष नाम तुम्हि जाणा ॥३३॥
यापरि सूक्ष्म विचारा समजुनिया नीट हो तुम्ही नाथ
प्राप्ती परम पदाची घ्या करुनी मुख्य हाचि परमार्थ ॥३४॥

**इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंड हेमचूडोपाख्याने**
**संसाराख्यायिका विवरणे अष्टमोध्यायः ।**

॥ हेमचूड विश्रांति ॥

## अध्याय ९

विस्मय हेमचुडाला ऐकुनि पत्नी वचा बहू झाला
हर्षभरें तद्वाणी होई सद्गदित बोलतो तिजला ॥१॥
धन्य प्रिये चतुर तूं आत्मस्थिति निरुपिलीस आख्येनें
महति ज्ञानाची तव वर्णन करुं मी शके न वाचेने ॥२॥
गोष्ट तुझी गूढ अती प्रथम न कळली मुळीं मला कांहीं
स्पष्ट करून कथिल्यानें आता मज पूर्ण समजली पाही ॥३॥
स्मरते ती अनुभवि मी अद्भुत गमते कितीहि लोकरिती
कोण पराचिति कैसा अपणाला जन्म होय माता ती ॥४॥
आम्ही कोण असूं ते स्वरुप असे सांग आमुचें काय
रामा पतिच्या प्रश्ना ऐकुनि ती त्यास बोलती होय ॥५॥
प्रियतम गूढ विषय हा ऐकावा जपुन शुद्ध बुद्धीनें
त्या योगें आत्म्याच्या स्वरूपा पावाल कीं विचारानें ॥६॥
आत्मा न योग्य दिसण्या शक्य न तो सांगणे कसा आहे
आत्मस्वरूप ज्ञानें निजमाता ओळखी पटे पाहे ॥७॥
येथ न उपयोगि पडे उपदेशक आणि कांहि उपदेश
निर्मल बुद्धी योगें आपण शोधा स्वयं स्वरूपास ॥८॥
आत्मत्वें सर्वत्रीं देवादी कीटकांत तें भासे
भाना भासित भासें तद्भानें सर्वमान विषय नसे ॥९॥
कोणि न कोठें केव्हां शक्त तया अंशता निरूपील
माझा डोळा मजला दाखिव म्हणणेंच होय समतोल ॥१०॥
कुशलहि आचार्य तरी दाविल तन्नेत्र त्यास कोण कसा
नेत्र पहाण्या कामीं गुरुचा उपयोग नाहि कांहींसा ॥११॥
उपदेशक कामाचा फक्त असे मार्ग दावण्यापुरता
तुजला उपाय कथिते जाणाया आत्मतत्व परिस अतां ॥१२॥

जे जें माझें म्हणशी किंवा तुज भासतें असे माझें
त्याहून भिन्न अससि तूं जाणुनि घे यापरी स्वरूप तुझें ॥१३॥
एकांतीं जाउनिया शांत मनें करि विचार तूं याचा
'माझें' म्हणतां येइल सोडुन त्या शोध घे स्वरूपाचा ॥१४॥
मीच पहा कीं आपण भासे माझी प्रिया असें म्हणतां
मी नाहींच तुम्ही कीं सोडुनि आत्मीय घे स्वरूपभूता ॥१५॥
एवं मम भावातें दूर करी त्यागितां न येचि जया
ऐशा स्वरुपा शोधा तेणें पावाल थोरशा श्रेया ॥१६॥
यापरि पत्निवचातें ऐके नृपपुत्र तेथुनी उठला
चढला शीघ्र हयावरि नगराच्या बाह्य भागिं तो आला ॥१७॥
पुढती रम्योद्याना जाइ तिथें स्फटिक मंदिरीं शिरला
मंदिर विशाल होतें त्याच्या शौध्रावरी चढुन गेला ॥१८॥
सोडी भृत्यजनांना खालीं अज्ञापि चौकीदारांना
बसतों मी एकांतीं आंत नका येउ द्याच कोणांना ॥१९॥
महाराज असो किंवां कोणि असो मंत्रिमंडळांतून
सोडुं नका आंत कुणा आज्ञा माझीच घेतल्यावीण ॥२०॥
आज्ञापुनि त्यायापरि गेला वेंघूनि नवय मजल्यासी
जेथुनि दूर ठिकाणें खिडक्यांतुनि नीट येति दृष्टीसी ॥२१॥
उच्च अशा स्थळिं घालुन वस्त्रासन त्यावरी बसे शांत
साधुनि चितौकाऱ्या करुं लागे तो विचार अत्यंत ॥२२॥
चित्तीं म्हणे खरोखरच जन कैसें जाहले असे मूढ
एकातेंही न कळे आपण तें कोण झोपले गाढ ॥२३॥
प्रत्येक आपणास्तव करितो उद्योग खपुनिया स्वांगें
कोणी पठती शास्त्रें कोणी घोकीत वेद वेदांगें ॥२४॥
द्रव्यार्जन करि कोणी कोणी हांकीत राज्य शकटाला
कोणी करिती युद्धा कोणी विषयांत गढुनिया गेला ॥२५॥
सारे प्रकार असले आपणास्तव सर्व लोक करितात
ते आपण कोण कसे नोळखिती ते भ्रमांत पडतात ॥२६॥

आजवरी मीहि तसा आपणां नेणूनि वागतां राही
स्वप्नापरि तें झालें आत्मविचारासि मी आतां पाही ।।२७।।
संपत्ति राज्य गज घोडे होति न स्वरूप माझें
यांना न मी म्हणूं ये भिन्नपणें ठरति सर्व कीं 'माझें ।।२८।।
त्याअर्थी मी म्हणजे देह खरोवर नसें मुळीं शंका
क्षत्रिय वंशीं जन्मे गौर असे वर्ण ज्यास अवलोका ।।२९।।
परि चुकलें, इतरहि जन मजपरि देहास मीच म्हणतात
शंकित होउन यापरि पुनरपि करितो विचार चित्तांत ।।३०।।
होतां होतां अंतीं 'देह असे मी' विचार खंडितसे
'माझा देह' म्हणूं ये तरि तो माझें स्वरू होत नसे ।।३१।।
अस्थी मांस रुधिर मय देह विकारी प्रतिक्षणीं होय
सावयव छिन्न होई यास्तव ममरूप तो कसें काय ।।३२।।
स्वप्नादिस्थिति जेव्हां मी राहे काष्ट लोष्ट सम देह
प्राण तदंतरि जड कीं यास्तव हे नव्हति मीन संदेह ।।३३।।
मन बुद्धि ममत्वें मी नसती मजहूनि भिन्न ते दिसती
यास्तव देहापासुनि मन बुद्धी वरि न सर्व मी होती ।।३४।।
भासे सदैव मी तरि मीचे केव्हांहि नाहि आभात
ज्याचें भान सदा मी तो आहे यांत कांहि संशय न ।।३५।।
'अहमस्मि' सदाभासे कोणास्तव तें नसे मला कळलें
अनुभव माझा ज्यास्तव तेंचि मला कां वरें स्फुट न झालें ।।३६।।
भासति घटादि वस्तू नेत्रें प्राणत्वगेंद्रियें कळतो
मन आहे आभासे जाण मनोज्ञान देइ अनुभव तो ।।३७।।
त्यापरि बुद्धी समजे 'मीचे' भानास हेतु कां न कळे
या इतुक्यांच्या भासे गमतें आत्मा कसा मला निवळे ।।३८।।
यांचा विचार देतों सोडुनि मग संभवेल आत्मरूप
निश्चय ऐसा करुनी त्यागि मनांतून विषय संकल्प ।।३९।।
तैसें करितां तत्क्षणिं दिसला त्या आंत निबिड अंधार
हेंचि स्वरूप माझें करितां झाला असाच निर्धार ।।४०।।

कळलें स्वरूप म्हणुनी चित्तीं त्या मोद थोर होताहे
पुनरपि अनुभव घेण्या स्वरुपाचा चित्तरोध करुं पाहे ॥४१॥
चंचल मन दृढ नेटे रोधितसे पूर्ण अचल जैं झालें
पाहीं अंतरिं तेथें अद्‌भुत अति दिव्य तेज देखियलें ॥४२॥
क्षणभरि अनुभवितां त्या विस्मित होऊनि जागृतीं आला
करितो विचार चित्तीं स्वरूपीं बहुधा प्रकार का गमला ॥४३॥
पुनरपि अवलोकाया स्वरुप तदा मानसा निरुद्ध करी
तंव तें लीन जहालें बहुवेळ वरी सुषुप्ति माझारी ॥४४॥
अवलोकीं निद्रेमधि स्वप्नीं तो अति विचित्र देखावा
जागा झाल्यानंतर चिंतेनें करि विचार ऐकावा ॥४५॥
होउनि निद्रावश मी देखे स्वप्नास कायशा ? तमतो
अद्‌भुत तेजहि मी जें देखियलें स्वप्न भासची गम तो ॥४६॥
स्वप्नविलास मनाचा विघ्नेंही गमति टळति कैंवितरी
पुनरपि निग्रह करुनी पाहुं अशा निश्चया मनास करी ॥४७॥
म्हणुनी चित्त निरोधी दृढ तेव्हां क्षणस्थिरच तें झालें
ते समयीं त्या झाला अनुभव तच्चित सौख्यसरि बुडलें ॥४८॥
पुनरपि सावध होई तो तरि तत्काल चित्त चलनत्वें
बोले काय असें हें स्वप्नकिं घडलें असेल भ्रांतित्वें ॥४९॥
किंवा सत्यचि आहे थोर मला वाटतो चमत्कार
विषयानुभव न घेतां कैसें मज सूख लाधले फार ॥५०॥
होया सुख लेशासीं तुल्य नसे कीं जगांत सुख कसलें
निद्रिस्थापरि होतो मी तेव्हां सुख तिथें कुठुन आले ॥५१॥
कारण काय सुखाया न कळे मज त्याविना कसें झालें
आत्मज्ञानासाठीं होतों प्रवृत्त मी न तें घडलें ॥५२॥
आत्मा न दिसुनि भलतें आले अनुभव न येती ते कामा
अंधःकार म्हणावा किंवा सुख कीं प्रकाश हा आत्मा ॥५३॥
यांहुनि भिन्न असे कीं सर्वहि हें आत्मरूप जाणावें
निर्णय न घडे यास्तव विदुषी पत्नीस हे विचारावें ॥५४॥

निश्चय होतां नृसुत बोलावी द्वारपाल त्या सांगे
नगरीं जाउन यावें घेउन पत्नीस माझिया वेगें ॥५५॥
द्वारिक संदेशावरि अविलंबे तेथे हेमलेखा ये
चंद्र जसा मेरूगिरि चढुनी सौधावरी तशी जाये ॥५६॥
पाहे राजसुतातें आत्मस्थित चित्त शांत अविकारी
आसनिं निश्चल बसला इंद्रियगण मानसांत लीन करी ॥५७॥
जाउनि समीप बसली त्याच्या ती अगदि आसनावरती
एकासनिं बसतां ती तत्क्षणिं नेत्रास तो करी वरती ॥५८॥
पाहे तीस समीपचि बसलेली त्यास तीहि अवलोकीं
दृष्टादृष्ट परस्पर होता आलिंगनास देती कीं ॥५९॥
अत्यंत मधुर वचनें केला प्रारंभ बोलण्यास तिनें
नाथा पाचारण मज केलें तुम्हि निरुज की शरीरानें ॥६०॥
बोलाविलें मजशि कां आज्ञा तुमची म्हणूनि मी आलें
पृच्छा प्रिय पत्नीची ऐकुनि नृपपुत्र सादरें बोले ॥६१॥
ऐक प्रिये कि बसलों एकांतीं ज्यापरी तुवां कथिलें
व्हावें स्वात्म निरीक्षण मी चित्तस्थिर विचार पर केले ॥६२॥
अगदीं तन्मय झालों पाही मी भिन्न तैं चमत्कार
आत्मा उपलब्ध सदा सर्वत्रीं भासमान होणार ॥६३॥
आत्मादर्शन कारण असती कीं अन्य भास मज सुचलें
यास्तव बाह्याभ्यंतर भास निरोधूनि चित सम केलें ॥६४॥
प्रथमांधःकार दिसे दुसऱ्यांदा पाहिला प्रकाश अती
तिसऱ्यांदा सुख गमले काय बरें हें असेल कथि सुमती ॥६५॥
आत्मस्वरूप हें कीं अन्य असे स्पष्ट तूं मला सांग
करुनी विवेचन कथी व्हावी मज आत्म ओळखी चांग ॥६६॥
या प्रश्ना उपरीती पर तत्वज्ञा म्हणे पतिस परिसा
कथिते सविस्तर, तुम्ही चित्त स्थिर करूनि शांत असा ॥६७॥
साधुनि बाह्य निरोधा केला तुम्हि यत्न तो बरा झाला
तत्वज्ञ मान्य असुनीं हाचि असे मुख्य शुभद सर्वांला ॥६८॥

त्या वांचुनि कधि कोणा प्राप्त नव्हे आत्मतत्त्व सत्यत्वें
परि बाह्यरोध कारण आत्मप्राप्तीस नाहिं प्राप्तत्वें ।।६९।।
अप्राप्त कसा आत्मा होइल आत्माचि जरि खराच असे
प्राप्त कसा होइल तो आत्मा अप्राप्य त्याचि प्राप्ति नसे ।।७०।।
झालें प्राप्त न जें कीं प्राप्ती त्याचीच जाण संभवते
प्राप्ताची प्राप्ति कशी मनरोधें आत्मभाव नच घडतें ।।७१।।
अंध:काराच्छादित वस्तु जसी दीप दावितो ती कीं
दीप न वस्तू निर्मी तेवि घडे आत्म लभ्यता लोकीं ।।७२।।
ठेवुनि सुवर्ण विसरे जैसा कीं भ्रांत चित्त नर कोणी
सोडुनि दुसरें चिंतन एक मनें लक्षितांच ये स्मरणीं ।।७३।।
होतो नष्ट सुवर्णा प्राप्त जसा तों तसेंच हें आहे
अवरोध चिंतनाचा नष्ट प्राप्तीस हेतु परि नोहे ।।७४।।
त्या परि बाह्य निरोधन आत्मप्राप्तीस हेतु मुळीं नाहीं
आत्मा न गमे कळला कारण तत्परिचय नसे तुम्हा कांहीं ।।७५।।
तेजानभिज्ञ जैसा राजसभे लागिं रात्रि जो गेला
देखे दीप सभासद परि नेणे कीं प्रकाश उगमाला ।।७६।।
ऐकावें नाथ तुम्हा दिसला तमकीं निरोधना उपरी
तमदृश्य पूर्वसंधी शेष असे स्वरूप भाव समजधरी ।।७७।।
तो भाव सदा चिंती परमानंदास देई तो अचुक
त्या स्थळिं पडतीच बळी मोहासी लोक जें बहिर्मुख ।।७८।।
थकले शोध करूनि ते प्राप्त न झाले स्वरूप भावा त्या
जरि शास्त्रज्ञहि लोकीं कुशलहि तार्कीक मिरवि पांडित्या ।।७९।।
स्वरूपज्ञाना मुकले रात्रंदिन भोगितीचि दु:ख महा
शब्दार्थ कला कुशलां नच होई प्राप्त परम पदकिं पहा ।।८०।।
जोंवरि पंडित कोणी त्याविषयीं शोध यत्न करिताहे
किंवा विचार करि त्या प्राप्त नसे ग्राह्य तें मुळींच नव्हे ।।८१।।
तें न मिळे दूर कुठे बसल्या ठायीं सदाहि लाभतसे
तें न विचारें समजे नष्ट विचारींच पूर्ण तें विलसे ।।८२।।

पळतां न हाति लागे शिर छाया त्या क्रिया न साधाया
निर्मळशा आदर्शीं बालक तो निरखि वस्तु पडछाया ।।८३।।
परि आरशा न पाहि तैसें जन पाहतात जगतासी
प्रतिबिंबित झालेले थोर अशा आत्मरूप आदर्शीं ।।८४।।
परि आत्मा नसल्यानें परिचित त्या नेणतीच आत्म्याला
आकाश नेणुनि जसा नर पाही त्यांत जग न गगनाला ।।८५।।
तैसा प्रकार आहे आत्मरूपाविषयिं सूक्ष्म तूं पाहे
ज्ञेय ज्ञान अशाद्वय भागांनीं जगत जाहलें आहे ।।८६।।
त्या माजीं ज्ञान असे स्वतासिद्ध त्या विना नसे कांहीं
आधार तें प्रमाणा सर्व तयाला प्रमाण मुळि नाहीं ।।८७।।
त्यासि अपेक्षा नाहीं दुज्या प्रमाणाचि सिद्ध सर्वादि
अमकें साधन त्याची सिद्धि करी हे न त्या नसे सिद्धि ।।८८।।
नाहिं असें शक्य न तें त्यावर आक्षेप ना न उत्तर कीं
तत्स्वरूप असें जणूं मोठें आदर्श भिंग अवलोकीं ।।८९।।
प्रतिबिंबासम भासे आत्मादर्शीं समस्त जग पाही
देशा अमुक व काला अशि मर्यादा तयास कीं नाहीं ।।९०।।
ज्ञानांतर्गत म्हणुनी देश न काल त्या करि परिच्छेद
भान परिच्छेदाचें होइ जसा वस्तुने गगनिं भेद ।।९१।।
प्रियतम ! सूक्ष्म विचारें निजरूपा ध्यानिं घ्या समाधींत
सामान्य चिद्रुपावरि दृश्य जगत हें असे विराजीत ।।९२।।
समरस व्हा त्या स्वरुपीं तेणें सर्व कर्तृत्वता येते
तत्प्राप्ति स्थानाला ऐकुनि घ्या शोध, लभ्यतें होतें ।।९३।।
निद्रा जागर संधीं संविद्भेदामधें निजस्वरुप
संविद्भेयामध्यें तूं लक्षी सूक्ष्म बुद्धिनें आप ।।९४।।
परमपद असे ते हें, हेंचि असे स्वस्वरूप, कळतां ते
मोह न पावे पुनरपि अज्ञानें जग विशाल हें दिसतें ।।९५।।
त्या स्वरूपीं रूप नसे रसगंध स्पर्श शब्दहीं नाहीं
तेथें सुख दुःख नसे नाहीं तें ग्राह्य नाहिं ग्राहकही ।।९६।।

सर्वरूप सर्वाश्रय नटते हें सर्वता नसे त्याला
सर्वेश्वर तो धाता विष्णु सदाशीव त्यासि कीं बोला ।।९७।।
क्षणभरि चित्ता रोधुनि सद्रूपं स्वात्म आत्मयासि पहा
दृश्योन्मुखता सोडुनि अंतर्मुखता करूनि स्वस्थ रहा ।।९८।।
'मी पाही' हें सोडा अंधापरि अचल पाहि ना पाही
विसरुनी असाल तैसें आपण व्हा साधि शीघ्र तू स्थितिही ।।९९।।
यापरि सूक्ष्म विचारें हेमचुडा प्राप्त होइ आत्मपद
लागे त्यास समाधी विसरुनिया देह जगत संबंध ।।१००।।

**इति श्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे हेमचूड विश्रांतिर्नवमोध्यायः ।**

॥ हेमचुडोपाख्यान ॥

## अध्याय १०

निजपतिला आत्मस्थिति लाधलि हें पूर्ण हेमलेखेनें
जाणुनि समाधि त्याची राहुं दिली कीं तशी, मुहुर्तानें ॥१॥
सावध होई नृपसुत पाहे जगता प्रती स्त्रिये लागीं
तत्काल पुन्हा इच्छी राहु समाधींत, म्हणुनिया वेगीं ॥२॥
नेत्रा मिटण्या तत्पर दिसला तो म्हणुनि आपुल्या हातें
हस्त धरुनि ती त्याचा अमृतापरि मधुर बोलते त्यातें ॥३॥
प्रियतम काय विचारा करितां न कळे मला तुम्ही आतां
उघडचा किंवा मिटल्या नेत्रानें हानि लाभ काय कथा ॥४॥
उघडचा नेत्रें सांगा अंतर तें काय लाविता त्यांना
भेटें काय विशेषें इच्छी मी ऐकण्यास बोलाना ॥५॥
स्वरूप मदानें नृपसुत आळसला मत्त बहु दिसे डोले
इच्छिन बोलाया तो प्रश्न करी स्वप्रिया म्हणुनि बोले ॥६॥
ऐक प्रिये बहु दिसां विश्रांति स्थान लाभलें मोठें
दुःखमयी रुक्षजगीं न दिसे जागा पहा सुखा कोठें ॥७॥
असती निरस विषय हे चोखाव्या चोयटचा पुरें झालें
दुर्दैवें अंधापरि ममदृष्टी आत्मसूख नच आलें ॥८॥
कोणी दरिद्रि जैसा मागतसे भीक नेणुनी ठेवा
गुप्त घरांतिल नव्हता सुखसागर हृदयिचा मला ठावा ॥९॥
दुःख बहू लाग्वितशा विषयसुखा श्रेष्ठमानुनी बसलों
विद्युत्प्राय विनाशी सुख शाश्वत वाटलें तया फसलों ॥१०॥
लागुनि त्यांच्या नादीं झालों मी पात्र अमित दुःखांना
मुकलों स्वस्थपणा मी, सुख दुःख ज्ञान नाहिं लोकांना ॥११॥
इच्छिति सुख, मूर्खापरि दुःखाच्या राशि घेति ते पदरीं
यास्तव सखें पुरें हें यत्न करुनि भोगणें कि दुःख तरी ॥१२॥

करुनी कृपा मजवरी जोडितसे हात मी प्रिये तुजला
सुखमय आत्मस्थानीं चिविश्रामासि घेउं दे मजला ।।१३।।
तूंहि अरे ! दुर्दैवी दिससी मज जाणुनीहि परम पदा
सोडुनि विश्रांतीच्या लाभा कां श्रमसि भोगण्या विपदा ।।१४।।
ऐकुनि हास्य मुख करी बोले ती प्रियकरा मला खेद
वाटे या गोष्टीचा नाहिं तुम्ही जाणिलें कि परमपद ।।१५।।
त्याची प्राप्ति जहाल्या मोहरहित चित्त मोकळें असतें
गगन जसें पृथ्वीहुन दूर तसें स्थान आपणाहुन तें ।।१६।।
जाणितलें जें आपण न जाणिल्या सारखेंच तें गमतें
सांगा नेत्रां मिटिल्या कीं उघडच्या स्वरूप पाहतां येतें ।।१७।।
कृति एखादी करुनी कीं टाळुनि पद कुणीं न हातळिलें
स्थाना विशिष्ट जाउनि किंवा दुसऱ्या जाउनी न मिळे ।।१८।।
झांकुनि नेत्रा किंवा करूनि कृती कीं स्थळास जाऊनी
जरि तें प्राप्य असें तरि कैसें त्या पूर्णपद म्हणेल कुणी ।।१९।।
जरि ते अदृश्य होतें सान अती नेत्रपाति उघडीतां
धन्य भलें पूर्णचि पद मोह तरी केवढा नवल चित्ता ।।२०।।
कोटचवधी ब्रह्मांडें ज्या स्वरुपीं कोपऱ्यामध्यें पडती
स्वरूप विशाल पावे उघडीतां पापणी विनाश ती ? ।।२१।।
प्रियतम ऐका कथितें सर्वाचें सार मी तुम्हादेखा
जोंवरि हृदयग्रंथी फुटल्याना तों नसे कि उगम सुखा ।।२२।।
असती कोटचवधी या हृदयग्रंथी कि मोहरज्जुवरी
अज्ञान स्वरूपाचें जे त्याला म्हणति मोहरज्जु खरी ।।२३।।
तीवर दिधल्या असती विपरीत ग्रहरूप बहुग्रंथी
देहात्मबुद्धि हीच ग्रंथि असे प्रथम मख्य जी भ्रांती ।।२४।।
ती योगें झाला हा संसार प्रबल आणि अनिवार
ग्रंथि दुजी भासात्मक जगतीं आत्मा न होय अविचार ।।२५।।
त्यापरि ईश्वर जीवीं जीवा जीवांत भेद या ग्रंथी
काल अनादीपासुन आत्म्याविषयीं जीवांस जी भ्रांती ।।२६।।

दुमडून ग्रंथि बने त्या योगें पुरुष होतसे बद्ध
उलगडल्या म्हणजे त्या जीवांची मुक्तता असे सिद्ध ॥२७॥
डोळे मिटुनी पद जे प्राप्त करूं इच्छितां पुरे झोंप
सर्वाकार निरासीं संवित् जे शष जाण निजरूप ॥२८॥
तीच महादर्श असे ज्यामधि संसार चित्र भासतसे
तरि सांगा ते केव्हां कोठेंही रूपिं कोण त्या न दिसे ॥२९॥
संवित्ति म्हणाल जरी अमुक रूपीं काळीं स्थळी नाहीं
तरि तो देश व कालहि बंध्यापुत्रापरी ठरति पाही ॥३०॥
आदर्शाविण संभव न प्रतिबिंबा तसा असंभव या
नाहीं जरि संदित्पद कोठेंहि न कांहि राहि पतिराया ॥३१॥
नेत्रोन्मिलनें नाथा होईना लुप्त तें कदा देखा
'मी जाणे तें' ऐसें जोंवरि हृदयीं कराल उल्लेखा ॥३२॥
तोंवरि पद तें प्राप्त न झालें जें प्राप्त तें न तें कांहीं
नेत्रें उघडचा किंवा मिटिल्या जे प्राप्त पूर्णपद नाहीं ॥३३॥
कारण तुम्ही करितसां मर्यादित त्यास कर्म कालाहीं
संवित् तेजस्वि महा कालाग्नी परि पहा कुठें नाहीं ॥३४॥
अग्नीपरि संवित्करि अपणासम अमित कल्पना काष्टा
तें परम पद कळाल्या कर्तव्य नुरे कांहि फोल या चेष्टा ॥३५॥
रोधुनि चित्ता पाही स्वरूप मी ग्रंथिजाण ही सोडा
जगदात्मरूप नाहीं अन्य असें समुळ भाव हा काढा ॥३६॥
जिकडे तिकडे भरला आत्मा आनंदरूप अवलोका
आदर्शी प्रतिबिंबें तेंवि पहा आत्मरूपिं जन लोका ॥३७॥
सर्वत्र पाहतों मी आत्मरूपच भावना नुरो द्यावी
सामान्य चिद्रुपासी समरसता स्वस्थताचि साधावी ॥३८॥
स्वस्त्री वचना यापरि ऐकुनि नृपपुत्र शांत मनि झाला
भ्रांती समुळ निमाली आत्म्याचें रूप निवळलें त्याला ॥३९॥
तद्रुपता पावुनिया त्यासि पुढें प्राप्त जाहलें स्थैर्य
स्त्री जन संगति राही क्रीडा करि साधितो जगत्कार्य ॥४०॥

विस्तृत राज्य करी तो शास्त्रहि ऐके व शत्रु ना जिंकी
द्रव्याचा करि संचय गोडी श्रवणाचि उपजवी लोकीं ॥४१॥
करि राजसूय यज्ञा हय मेधहि हेमचूड सांग जगीं
अयुत द्वय वर्षे तो जीवन्मुक्त स्थिति सुखा भोगी ॥४२॥
पाहुनि हेमचुडाची मुक्त दशा करि विचार मणिचूड
मुक्ताचूड पित्याच्या हृदयीं येती विचार बहु गोड ॥४३॥
कीं हेमचूड सांप्रत पूर्व परि वागतां नसे दिसत
हृष्ट करीन सुखागम दुःखोद्‌गमि खेद त्यास नच गमत ॥४४॥
अरि मित्र लाभ हानी लेखी सम घडुनि हें कसें आलें
नाटक नटापरी तो चालवितो राजकारणा लीलें ॥४५॥
असतो गुंग मदानें सतत दिसे गुंतलें मनहि त्याचें
अन्यत्र कवण ठायीं परि करितो सर्व कार्य नेमाचे ॥४६॥
कैसें शक्य असे त्या करुनि विचारा तयास एकांतीं
भेटुनि पुसती त्याते प्राप्त तुला जाह्ली कशी शांती ॥४७॥
त्या उभया हेमचुडें कथिलें क्रमवार मर्म योगाचें
आत्म्याशीं बुद्धीच्या, केला त्यां बोध आपुल्या वाचें ॥४८॥
त्या योगे पुत्रपिता परमपदीं स्थीर जाह्ले मुक्त
राजापासुन मंत्र्या जगताचें मर्म जाह्लें प्राप्त ॥४९॥
करुनी तत्व विचारा स्वरूप पावून जाह्ले ज्ञाते
हळुहळु विशाल नगरीं करिती बोधास एक एकातें ॥५०॥
सर्वी क्रमाक्रमानें नगरीं त्या तत्व पूर्ण जाणितलें
पुरुष स्त्रिया गुराखी पुरजन विज्ञान पावते झाले ॥५१॥
त्यागिति अहंपणातें सर्वांना देहभाव मुळि नाहीं
कोणाच्याही अंतरिं काम क्रोधादि लोभ नच राही ॥५२॥
असले तरि मर्यादित नच तापद ते परंतु सहकारी
कामक्रोधा जिंकुनि करिती व्यवहार सर्व ते नगरीं ॥५३॥
परतत्वाच्या गोष्टी सांगुनि माता मुलांस खेळविती
ब्रम्ह विचारी तत्पर सेवक ते स्वामि चाकरी करिती ॥५४॥

तत्वांच्या संघातुन पात्रें निर्मूनि करिति ते रचना
तात्विक कथानकाची करिती नट नाटकें तिथें नाना ।।५५।।

गायक गाती गीतें ज्यांत असे कीं विवेक आत्म्याचा
विदूषकहि नगरीचे करिती उपहास अज्ञ लोकांचा ।।५६।।

परतत्व विचारांनीं पूर्ण व दृष्टांत युक्त सुंदरशीं
शास्त्रें असतीं तिची पढविति शास्त्रीहि शिष्यवर्गासी ।।५७।।

यापरि तेथें पुरुष स्त्रिया भृत्यगण व नाटकी गवयी
मुत्सद्दी सरदारहि गणिका जन कारगीर व शिपायीं ।।५८।।

सारे लोकचि झाले ब्रम्हज्ञानी व मुक्त सुविचारी
प्राक्तन संस्कारवशें वागति ते क्षोभ रहित संसारी ।।५९।।

घडली गोष्ट शुभाशुभ तात्काळचि विसरुनी तिला जाती
होणाऱ्याबद्दल ते सुखदु:खाचा विचार नच करिती ।।६०।।

सद्य:कालि हंसावे मानावा मोद शोक कोप जसा
असला प्रसंग तैसे व्यवहारीं वागती कि मधुमाशा ।।६१।।

ऐशा त्या नगराप्रति सनकादिक जेधवा पुढें आलें
विद्यानगर असें त्या दिधलें नामासि त्यांहि जे चाले ।।६२।।

जेथिल पोपट मैना करिती उपदेश आत्मविद्येचा
वर्जुनि चेत्य पदार्था आत्म चितिरूप तो भजा साचा ।।६३।।

तें चेत्य नसे त्याविण जैसें प्रतिबिंब दर्पणचि होई
चैत्यचि चैतन्य तसे सर्व चराचर तसा असे मीही ।।६४।।

चैतन्यचि सर्वांना भासवि तेंचि स्वयेंचि विलसतसे
आश्रय सर्वां भावा चैतन्यचि एक हो भजा ऐसें ।।६५।।

भ्रमदूर वेगिं सारा चिन्मय त्या दृष्टि लागिं की ठेवा
जेथिल तीर्यक् पक्षी वदनांतुनि काढिती अशा भावा ।।६६।।

विद्यानगर अशा त्या नामें अद्यापि जगति ते मिरवे
सकळांसि हेमलेखा बोधी विज्ञान नगरि त्या बरवें ।।६७।।

बोधी हेमचुडाती विचरे तो मुक्त होउनी जगतीं
नंतर सर्व इतरही झाले ज्ञानी स्वरूप ते भजती ।।६८।।

यास्तव सत्संग महा श्रेयस्कर मूळ साधनचि होय
कल्याणाची इच्छा तरि सेवा एक साधुचे पाय ।।६९।।

**इति श्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे हेमचुडोपाख्याने**
**दशमोध्यायः ।**

|| जगत्तत्वनिरूपणं ||

## अध्याय ११

भार्गवरामें ऐकिलि अद्‍भुत ती गोष्ट हेमचूडाची
तदुपरि गुरुसि विचारी कीं संशय एक तन्मनाडाची ।।१।।
भगवन् आपण कथिलें अद्‍भुत जें ज्ञान कीं दया करुनी
होय चमत्कारिक अति किंबहुना वाटतें अशक्य मनीं ।।२।।
हें दृश्य विश्व कैसें केवळ चैतन्यरूप समजावें
प्रत्यक्ष अनुभवा हे ये न श्रद्धा बळेंचि मानावें ।।३।। ?
चेत्योपाधी वांचुन चैतन्याचा न होय अनुभव कीं
यास्तव अशक्य आहे पटण्याला हें मनास अवलोकीं ।।४।।
मग्न अशा संशयिं मी स्वामि असां सदय मशि कृपाधामा
प्रेमें समजावी मज श्रीगुरु तैं बोलती परशुरामा ।।५।।
परिसे नीट तुज कथीं दृश्याचें तत्व जाण विस्तारें
हें दृश्य केवळ असें दृङ्मात्रचि नाहिं किमपि दुसरें ।।६।।
उपपत्ति कथितसे मी दृश्याची चित्त देउनी परिसे
उत्पत्ति दिसे होतां यास्तव हें दृश्य विश्व कार्य असे ।।७।।
'नूतनतेनें भासन' उत्पत्तिस लोक या जगीं म्हणती
जगत दिसे नाविन्यें क्षणोक्षणीं त्याचि होय उत्पत्ती ।।८।।
सरिता प्रवाह समहें क्षणोक्षणीं नित्य दिसुनि पालटत
कोणी म्हणती यातें स्थावर जंगम पदार्थ संघात ।।९।।
जगसमुत्पन्नचि असे सिद्ध असें जाहलें जगत कार्य
झालें न तें स्वभावें तेणें न अति प्रसंग परिहार्य ।।१०।।
अन्वय व्यतिरेकानें पाही न दिसे जगी विसंगतता
कारण कार्यी समता तरि कैशी मानुं ये अकस्मिकता ।।११।। ?
दृश्य नसे जगकारण म्हणुनि नसे तें मुळीं न मानावें
कार्याकारण न्याय्यचि तत्व असें बहु जनांसि जें ठावें ।।१२।।

बहुशा कारण दिसतें कार्य मुळीं म्हणुनि पूर्वि कार्याच्या
कारण अवश्य आहे मानाने लोककार्य पद्धतिच्या ॥१३॥
ना तरि विरोध येई व्यवहारारूढ गोष्टि नच घडती
केव्हांहि अकारण, जनि कार्या पूर्वीच साधने जमती ॥१४॥
आकस्मित जग होई आपाप विधान हें न संभवते
वदती कोणी जग हे अव्यक्त जडाणुपासुनी बनते ॥१५॥
जग हें व्यक्त अव्यक्त अणू अशा पासुनी न संभवतें
कारण सत् व असत् हे भिन्न परस्पर न ऐक्य पावतिते ॥१६॥
पीतचि अपीत कैसें प्रकाश जो तोचि तम कसें म्हणतां
वस्तू एक विरोधी धर्म तिचे दोष होय संकरता ॥१७॥
ईश्वरेच्छादि कारण तरि इच्छेनें क्रिया न संभवतें
हेतु असंभाव्य जगा गुण साम्यात्मक प्रकृति गमते ॥१८॥
कारण गुण वैषम्या मागुति गुण साम्य हेतु अकळ असे
चैतन्याधिष्ठित न प्रकृति जगत्कार्य तरि घडेल कसें ॥१९॥
सारांश जगत्कार्या कारण अदृष्ट अकळ जरि उरतें
वेदप्रमाण घ्यावें निर्णय तरि शक्य हो सुसंगत तें ॥२०॥
योग्यप्रमाण दुर्घट होय प्रमातृजीव अपूर्ण जरी
सामान्य नियम कर्त्याविाचुनि कार्य नसे कुठें उजरी ॥२१॥
म्हणुनी कर्ता निश्चित चेतनही पाहिजे जगत्कर्ता
जग कार्य अचिंत्य असे कर्ताहि तसाच संभवे गुणता ॥२२॥
कर्ता अचिंत्य शक्तिक घ्यावा आगम विचार ह्यामार्गीं
श्रेष्ठ प्रमाण तेंची पूर्णेश्वर तत्व निर्णया लागीं ॥२३॥
श्रुति कथि सृष्टी पूर्वीं होता पूर्ण स्वतंत्र ईशान
अनुपादान असा तो स्वातंत्र्यें आपुल्या करी भान ॥२४॥
जगचित्राचें स्वरुपीं क्रीडेस्तव आपुल्या करी स्वजन
जैसें स्वप्नानिर्मी पुरुपधरी स्वप्नदेह अभिमान ॥२५॥
विचरे आपण तद्रुप सत्य नसे मावळें कि स्वप्नांतीं
त्यापरि जगता निर्मुनि ईश्वर घे त्यावरी अहंवृत्ती ॥२६॥

जगत नसे ईश्वर तनु कीं त्याचा प्रलयिं होतसे लोप
स्वप्नीं लोपे त्वत्तनु रामा तूं देहरहित चिद्रूप ॥२७॥
एवं जगदाभावें ईश्वर चिन्मात्र निर्विकार असे
चिन्मय निजस्वरूपीं जगचित्रा तो स्वयेंचि दावितसे ॥२८॥
सर्वत्र संचला तो जगचित्राधार तोचि अन्य कसा
चैतन्याविण कोठें काय कधी वस्तु कांहीं पाहतसा ? ॥२९॥
जेथें चैतन्या नसे देश असा किमपि सिद्ध होत नसे
मानावा चैतन्या भाव करी अन्य कोण सिद्ध तसें ॥३०॥
चैतन्य महासत्ता ग्रासक जगतास नित्य भासतसे
सागर रहित तरंगा सूर्याविण कीं प्रभेस वाव नसे ॥३१॥
त्यापरि संविद्रूपाविण जगता अन्य कीं नसे सत्ता
म्हणुनी सृष्टीपूर्वी चिन्मात्र महेश एकची होता ॥३२॥
त्यापासुनि उत्पत्ती होय चराचर समस्त जगताची
त्यावरि ते नांदतसे अंतीं जाते लयास तेथेंची ॥३३॥
आशय ऐसा श्रुतिचा येथें संशय विरोध योग नसे
अदृष्टार्थी विषयीं श्रुत्यागम हें प्रमाण थोर असे ॥३४॥
मणि मंत्रादी योगें लाभे सर्वत्र सिद्धि दिसत असे
परि त्यांच्या श्रेष्ठ फळां जन अल्पप्रज्ञ जाणतील कसें ॥३५॥
यास्तव वेदागमजे कथिलें ईशें प्रमाण मानावें
श्रुति कथि सृष्टी पूर्वी होता ईशान देव या नावें ॥३६॥
तो निर्मी अखिल जगा नसतां कांहीं तया उपादान
कारण तो शुद्ध अती पूर्ण स्वातंत्र्ययुक्त ईशान ॥३७॥
प्रकट करी अखिल जगच्चित्रा तो कीं चिदात्म भिंतिवर
नच कांहीं त्या वांचुन जग सारें नाहिं त्याज बाहेर ॥३८॥
ईश्वर परिपूर्ण असे भरला त्याविण नसे रितें स्थान
यास्तव सर्व जगाला नान्य असे तोचि कीं अधिष्ठान ॥३९॥
आदर्शी प्रतिबिंब प्रकट जसें जगत तेवि अवलोकीं
ईशस्वरूपावरती म्हणणे हें वाटतें समंजस कीं ॥४०॥

योगि जसा संकल्पें रचितो नगरास तेवि जगकार्या
देव जगत्कारण तो निर्मी संमत असे पहा आर्या ॥४१॥
समजे परशूरामा स्वप्न तुझी मानसीक सृष्टि असे
जी माजीं जडवस्तू जीव अनेक प्रकार भास दिसे ॥४२॥
असती बहुविध वस्तू केवळ त्या बा मनोमयचि नान्य
उद्भवती मनि, राहति त्यावरि लय त्यांत तें मनोजन्य ॥४३॥
जैसें स्वप्न मनोमय तैसो कीं ईश मानसांतून
जगदुत्पत्ति मनोमय जाणे चिन्मात्र एक ईशान ॥४४॥
चैतन्य सर्व साक्षि त्रिपुरा जाणे अनंत शक्तिक ती
पूर्णव्यापक असुनी सर्व परिच्छेद रहित शुद्धचि ती ॥४५॥
असति परिच्छेदद्वय लोकीं या देश आणि काल असे
आकारमयचि पहिला असतो दुसरा क्रियामयचि विलसे ॥४६॥
राहति घेउनि चितिचा आश्रय आकार तो क्रिया तीही
यास्तव त्यांच्या योगें मर्यादित कशि बरें चिती पाही ॥४७॥
कवण्या कालीं देशीं सांग बरें तूंचि ती नसे आतां
कैसा तो काल तसा देश शके राहुं तीचि ती नसतां ॥४८॥
असणें वस्तूंचें जें प्रकाश तो ज्ञानभान त्या म्हणती
होई चिती प्रकाशचि जाणे कीं अप्रकाशता अचिती ॥४९॥
मुख्य प्रकाश तोचि प्रकाश तो जो स्वतंत्रायोगें
तद्योगें जडवस्तु प्रकाशती न प्रकाशती स्वांगें ॥५०॥
चितिही स्वयंप्रकाशक अन्यापेक्षा प्रकाशना नलगे
चित्याश्रयें प्रकाशन जडजाताचें न अन्यथा योगें ॥५१॥
अस्तित्व वस्तुलागीं चितिवांचुनि शक्य जरि असें म्हणसी
तरि एक जनीं वस्तू आहे नाहीं नुरे स्थिती ऐसी ॥५२॥
म्हणुनि जनीं वस्तूचें अस्तित्वचि चित्प्रकाशकीं आहे
नाहि दुजा प्रतिबिंबावरुनि जसा आरसा तिथें पाहे ॥५३॥
तें जगदस्तित्व चिती तैसी जग सर्व तीचि ती आहे
आकाराधिक्य दिसे चितिचें नैर्मल्य हेतु त्या पाहे ॥५४॥

काठिण्य व निर्मळता असती प्रतिबिंब भासण्याइष्ट
जरि तारतम्य यांत प्रतिबिंब स्पष्ट आणि अस्पष्ट ।।५५।।
उदकीं व दर्पणीं हें तत्व पहा स्पष्ट मानसीं उमगे
दर्पण जड, घेण्याला प्रतिबिंबातें स्वतंत्र न स्वांगें ।।५६।।
यास्तव बिंबापेक्षा त्याला परि तीचि ती स्वतंत्र असे
निर्मळ अति स्वभावें बिंबापेक्षा तसी न ठेवितसे ।।५७।।
चिति ही सर्व व्यापक परिपूर्णा खंड एकरस आहे
यास्तव अन्य कशाचें मालिन्य न मिश्र तीमधें राहे ।।५८।।
निरवयव घनचि तीहीं सर्वी नैर्मल्य तींत अत्यधिक
प्रतिबिंब तें न भासे स्वतां असते अन्यानुषंगिक ।।५९।।
प्रतिबिंबस्वरूपज्ञ जाणति जगतास प्रतिबिंब असे
आणि ज्ञानी इतरहि लक्षिति अनुभव जगाविषयिं तैसे ।।६०।।
जग हें स्वतां न भासे किमपि परि तें चिदाश्रये विलसे
आदर्श प्रतिबिंबा जाणा जगभास तुल्यरूप असे ।।६१।।
रूपें विचित्र भासे चितिही परि अढळरूप ती असते
आदर्शा परि भासा भासवुनी निर्विकारची उरते ।।६२।।
आदर्शांतिल रूपें त्याहुनि तीं वेगळीं कदा नसतीं
त्यापरि चिद्रूपावरि भासे जग तें न अन्य होयचि ती ।।६३।।
आदर्शी प्रतिबिंबा बिंब असे हेतु अन्यथा नोहे
परि चितिच्या स्वातंत्र्यें बिंबाविण जगत भासतें पाहे ।।६४।।
रामा तूं चेतन घे अनुभव संकल्प करुनि अपणांत
अपुल्या ठायीं उमटति वस्तूंचे भाव कीं निर्निमित्त ।।६५।।
संकल्पाने बळ तें चिति स्वातंत्र्य स्थूल रूप असे
निःसंकल्प चिती जै असते स्वच्छैक तींत मळचि नसे ।।६६।।
शुद्धैक रूप चितिही सृष्टी पूर्वी स्वतंत्र की असते
स्वातंत्र्य थोर सृष्टी काली संकल्परूप कीं बनते ।।६७।।
संकल्पा योगें त्या प्रतिबिंबात्मक जगत भासतें आहे
त्याची दृढता स्थिरता जगता प्रति स्थैर्य देतसे पाहे ।।६८।।

स्वातंत्र्यें चिति निर्मी जगत दिसे समचि जाण सकलांला
मर्यादित सामर्थ्यें जीव करी तें गमेचि एकाला ॥६९॥
अभ्यास बळें किंवा मणि मंत्रौषधिमुळें जसे हटतें
जीवापूर्णत्व तसे हळुहळु स्वातंत्र्य बल तिथें चढतें ॥७०॥
रामा पाही केवळ संकल्पें ऐंद्रज्जालिक विचित्र
सृष्टी भासवि लोकां नसतां सामग्रि जवळि लवमात्र ॥७१॥
ही सृष्टि स्थिर सर्वां भासे व्यवहार्य सत्य सम अंतीं
पावे विलया स्वात्मीं ईशाचें जगत जाण त्याच रिती ॥७२॥
योग्याची सृष्टि पहा स्थैर्य तिला पूर्ण होय परिमितता
सामर्थ्यीं म्हणुनी ती उभवीती बाह्य वस्तुच्या वरता ॥७३॥
ईश्वर सामर्थ्य असे अमितचि तत्सृष्टि तद्रुपीं भासे
चैतन्या व्यतिरिक्त न जगता अस्तित्व जाण तूं तैसें ॥७४॥
जैसे आदर्शविना प्रतिबिंबा सत्व भिन्न कांहि नसे
प्रतिबिंब विचारें जग नान्यें मिथ्या असत्व ठरत असे ॥७५॥
सोडि न निजस्वभावा सत्य कधीं जे असत्य तें सोडी
रामा पांही चंचळ जगत असे स्थिरता न एक घडी ॥७६॥
सत्य व असत्य कळतें करितां त्यांचा विचार कीं स्पष्ट
आदर्श प्रतिबिंबासम भासे जग विचार करि नीट ॥७७॥
आदर्श अचल आहे प्रतिबिंब तरी सदा चलित पाही
जाणति सकल जगातें चल संवित् आधार त्या अचल राही ॥७८॥
आहेत अनिश्चित कीं जगतांतिल सर्व भाव जाणमनीं
दिव्य प्रकाशक रवि भासवि वस्तू परंतु नच मानी ॥७९॥
उलुक दिवांध तयाला उलट तमोराशि त्यास कीं पाहे
तम व प्रकाश निर्णय यास्तव दुष्कर पहा जगीं आहे ॥८०॥
विषही आहे कोणा मारक अन्यास पोषक ज्ञात
भिंत करी गमनासी रोध नरा करुनिया प्रतीघात ॥८१॥
परि गुह्यकादि योग्या अवरोधा भिंत ती कदा करिना
काल व देश जगां तरि दीर्घ असा वाटतो मनुष्यांना ॥८२॥

विपरित अनुभवाला अल्प असा येत योगि देवांना
आदर्शी प्रांताचा  व्यर्थ जसा दृष्यमात्र दूरपणा ॥८३॥

त्यापरि या जगताचें स्वरूप विचारापुढें नसे टिकत
सर्वाश्रयभूत चिती वांचुन जगिं सत्य अन्य नच दिसत ॥८४॥

जें जें कांहीं आहे भासे ते चिति महेश्वरी जाण
चैतन्यरूप जगहें नाहि दुजे स्पष्ट तुज करी कथन ॥८५॥

**इतिश्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे जगत्तत्व निरूपणं नाम एकादशोध्यायः ।**

|| ग्रंथ शब्द लोकावलोकन ||

## अध्याय १२

श्रीगुरुमुखकमलांतुन राम जगत्तत्व साग्रची परिसे
शंकाग्रस्त मनानें श्रीगुरुतें वचन बोलतो ऐसें ।।१।।
भगवन् आपण कथिलें जगताचें तत्व पूर्ण ऐकियलें
कथिल्यापरि सर्वहितें सत्य असे अन्यथा नसे वहिलें ।।२।।
परि हें जगसत्यात्मक भासे कारण कथी मला चांग
अन्य सुबद्ध नरांनीं मानियलें यास सत्य कां सांग ।।३।।
जग हें मायिक मिथ्या ऐकियलें सत्य कां मला भासे
संशय माझा जाउनि चित्ति समाधान हो भ्रम निरासें ।।४।।
ऐसी विनती ऐकुनि बोले गुरुसदय परशुरामासी
कथितों भ्रांति कारण विस्तारें ऐक या विचारासी ।।५।।
भ्रांति अनादि असें कीं तद्धेतू सत्य वस्तु जशि आहे
तशि न ग्रहण करूनि भलती तद्भावना धरी पाहे ।।६।।
विसरुनि आत्मरूपा भ्रांतीने जीव मी म्हणे शरिरा
निर्मळ चैतन्यात्मा रुधिरास्थीमांसमय न योग्यगिरा ।।७।।
आत्माचि देह बनतो दार्ढ्य बळें जाण भावनेच्या कीं
जरि आत्मा जाणियला देहभ्रम जात नाहि अवलोकीं ।।८।।
दृढ भावना बळें जग याच परी सत्य भासतें जाण
उलटी करितां तीतें अभ्यासे निरसन भ्रमा पूर्ण ।।९।।
जो भावना जसि धरी त्याला जग भासतें तसें जाण
ध्यानें व धारणेने तद्रुप जग सिद्ध करिति योगिजन ।।१०।।
याविषयीं एक तुला ऐकवितों पूर्व काल वृत्तांत
सुंदरपुर अति पावन नगर असे एक वंग देशांत ।।११।।
प्रख्यात व चतुर तिथें राजा नामें सुषेण राज्य करी
तदनुज तत्प्रिय तत्पर नाम महासेन त्यास अवधारी ।।१२।।

धर्में राज्य करी नृप सर्वांना मान्य कारभारासी
त्यानें एके समयीं हयमेधें अर्चिले महेशासी ।।१३।।
यज्ञाश्व सोडि तैं नृप त्या मागुन राजपुत्र बलशाली
जाती रक्षाया त्या स्वारी त्यांची दलासह निघाली ।।१४।।
मार्गीं जिंकुनि रोधक अश्वाचे ते पराक्रमी वीर
राजकुमार ह्याच्या संगें पावति इरावती तीर ।।१५।।
तेथें त्यांना दिसला तंगण राजर्षि तो तपोराशी
विजयमदें ते पुढती गेले गर्वें न भेटतां ऋषिसी ।।१६।।
पाहुनि ते ऋषिपुत्रा पुत्रावज्ञेंमुळें भरे क्रोध
निर्भिच्छीं नृपकुमरां यज्ञ ह्या तो धरूनि करि रोध ।।१७।।
तैं राजकुमारें त्या सैन्यबळें वेढिलें चहूंकडुनी
तेव्हां तंगण पुत्रें गंडशिला होति जी पुढें पडुनी ।।१८।।
केला प्रवेश अंतरि तिच्यासह अश्व पाहतां सकल
झाला विलीन न दिसे पाहुनि नृपपुत्र होति तैं विकल ।।१९।।
ते शस्त्रांनी मारा करुनी तैं फोडिती कि गंडशिला
टेकडी फुटतां ऋषिसुत सैन्यासह निघुन बाहिरीं आला ।।२०।।
संगर घोर करुनि तो ठार करी तैं सुषेण सेनेला
करुनि पराभव त्यांचा राजसुता बांधुनी विजयि झाला ।।२१।।
त्यां सह गंडशिलांतरि करिता झाला प्रवेश विजयानें
उरले वीर नृपांतें जाउनियां कथिति वृत्त खेदानें ।।२२।।
साश्वकुमारांचे तो ऐकुनियां हरण तैं सुषेणनृप
विस्मित सखेद बोले अनुजासी वचन पूर्ण निष्पाप ।।२३।।
वत्सा सत्वर जाई तंगणमुनि राहती तया देशीं
तापस अचिंत्य शक्तिक असती दुर्जय सुरासि मनुजासी ।।२४।।
करुनी प्रसन्न त्यांना सोडवि यज्ञाश्व निजकुमार सर्वे
घेउनि ये अविलंबें वासंतीं यज्ञकार्य साधावें ।।२५।।
तापस जनांसि कधिही उद्धट अभिमानयुक्त वागुं नये
येतां क्रोध करिति तें ब्रम्हांडा भस्म वाग तूं विनयें ।।२६।।

ऋषिते प्रसन्न करुनि साधुनि घे स्वीय कार्यभागातें
राजाज्ञा यापरि तो होतां जाई मुनिप्रदेशातें ॥२७॥
दिसला समाधिमाजीं मुनि त्या वाळूनि काष्टसमकाय
इंद्रियगणि निश्चलता मन बुद्धी शांत आत्म सुखि होय ॥२८॥
नि:संकल्प दशार्णवि मीपण त्याचें विलीनता पावे
पाहुनि मुनिवर्या त्या नमन करी भूमिला पडुनि भावें ॥२९॥
कर जोडुनि भावें तो नम्र महासेन करितसे स्तवन
करितो प्रयत्न होण्या मुनिसत्तम वरद आणि तुष्ट मन ॥३०॥
यापरि जातां त्रयदिन तंगणसुत तुष्ट होउनी आला
बोले राया तुझिया स्तवनें संतोष फार मज झाला ॥३१॥
काय तुझें ईप्सित तें सांगे मज करिन जाण सत्वर कीं
मी सुत तंगण मुनिचा आहे तुज मी प्रसन्न अवलोकी ॥३२॥
भाषण काल पित्याचा आला नच तो समाधिमधि लीन
द्वादश वर्षानंतर पावे त्याची समाधि व्युत्थान ॥३३॥
पंचाब्द काल गेला राहिल सप्ताब्द वरि समाधींत
ऐसा कालावधिचा झाला संकल्प पूर्व नियमीत ॥३४॥
तुज वांछित काय असे सांग मला तें करीन मी तूर्ण
समजुं नको बाल मला तपस्वि मी पितृतुल्य बलपूर्ण ॥३५॥
बल शक्त सर्व करण्या असतें योगी तपस्वि लोकांचें
यापरि भाषण ऐकुनि चतुर महासेन मुनि कुमाराचे ॥३६॥
साष्टांग नमन करुनी मुनिपुत्रा हात जोडुनी वदत
मुनिवर्या प्रिय माझें करण्याचा सत्य तव असे हेत ॥३७॥
व्युत्थित समाधिहून त्वत्पितया बोलणें असे इष्ट
इच्छी हें मी आजी वांछित मम हेंचि जाण कीं स्पष्ट ॥३८॥
जरि तूं प्रसन्न मजवरि साधुनि देहेचि शीघ्र तूं मातें
ऐकुनि वचन तयाचें पुनरपि मुनिपुत्र बोलतो त्यातें ॥३९॥
राजन् तव वांछित हें शक्य नसे सर्वथा असें होय
परि मी करतो वदलो तरि आतां अन्यथा वदूं काय ॥४०॥

केलीस याचना जसि थांब तसा कांहि काळ धीर धरी
दाखवितों तुज माझें योग बलासी पहा मुहूर्त भरीं ॥४१॥
माझा पिता स्थित असे शांत अशा परमपदि निजानंदीं
यत्नें बाह्य तयाला जागविण्या कोणि शक्त ना अगदीं ॥४२॥
अति सूक्ष्म योगयुक्तीं करि मी जागृत पहा अतां त्यासी
बोलुनि असे बसुनि तो करितां झाला निरुद्ध करणासी ॥४३॥
प्राणीं अपान योजुनि मुख्य प्राणेंचि बाहिरी आला
शिरला पितृशरीरीं चलित करी लीन तेथ मन त्याला ॥४४॥
त्याचें मानस कर्षुनि जागृत करि शीघ्र बाह्य तो पडला
शिरला निज देहांतरि तों त्याचा जनक जागृतीं आला ॥४५॥
दिसला समोर राजा करिता हे नमन वदतसे स्तवन
काय असे हें चिंती योगाची दृष्टि परिज्ञान ॥४६॥
भूप स्तवनें तो मुनि होई संतुष्ट बोधि निज तनया
क्रोधें पुन्हा न करि तूं ऐसें रिपु कोप ने तपा विलया ॥४७॥
राजा रक्षी लोकां निर्विघ्नचि पार पाडि तपयाग
यज्ञास विघ्नकर्ते दैत्य परि मुनि कसा करी भंग ॥४८॥
यास्तव दे याला तूं राजसुत व अश्व जाउ दे त्वरित
कारण कालातिक्रम यज्ञाला हो न इष्ट मज गमत ॥४९॥
कथितां ऐसें तत्सुत संतोषें शिरुनि टेकडीमाजीं
घेउनि आला अश्वा नृपपुत्रा देइ त्यास करि राजी ॥५०॥
अश्वा व राजपुत्रा धाडि महासेन परत नगरासी
साष्टांग नमन केलें मुनिला आश्चर्य मानि चित्तासी ॥५१॥
कर जोडुनि तुष्ट करी मुनिस वदे इच्छि मी कळायाला
भगवन् अश्वासहते कुमर कसे राहिले वदायाला ॥५२॥
गंडशिला ही राशी शैलांची आंत नाहिं कीं पैस
मावति कसें तदंतरि स्वामिवदा बोलती मुनी त्यास ॥५३॥
राजा एक कथितसे मी होतों पूर्वि थोर सम्राट
अति विस्तृत भूमीवर बहुवर्षें राज्य चालवी नीट ॥५४॥

पुढति महादेवकृपें ज्ञान मला होय चिति महेश्वरिचें
लोक व्यवहार गमे त्या योगें निरस मन विटे साचें ।।५५।।
कंटाळलों जगाला केलें मग राज्य निज सुताधीन
येउन राही वनि या कांतेसह येथ किमपि आधीन ।।५६।।
घोर तपस्यें माजीं वर्षें अर्बुद पहा इथें गेलीं
माझी सेवा करुनी मम कांता मोक्ष गांठिती झाली ।।५७।।
भवितव्य अटळ असतें झाली कामार्त एकदां कांता
होतों समाहित मनें आली जें मजशि विवश एकांता ।।५८।।
स्थिरचित्त मजशि पाहुनि विव्हळ जी होति कामवेगानें
असहाय स्थिति माजीं मद्रतिची भावना करीत मनें ।।५९।।
दृढभावना बळानें मद्रतिची प्राप्ती जाहली तीतें
धारण करि गर्भातें प्रसवे सुतरत्न जें पुढें दिसतें ।।६०।।
ठेवी सुत मांडीवरि उठवी ती मज समाधीपासून
पंचभुतीं तनु मिळवुनि ब्रम्हपदा जाय सर्व निरसून ।।६१।।
ओसंगि दिसे बालक कळले निजधाम गमन मज सतिचें
आलि दया मजत्याची संगोपन मी करी पुढें त्याचें ।।६२।।
ऐकियले मजपासुन पूर्वी मी राज्य शासना केलें
राज्य करावे आपण इच्छा त्या होइ मजशि प्रार्थियलें ।।६३।।
माझ्या उपदेशानें योगाची सिद्ध लाधली त्यातें
निर्मी त्या सामर्थ्यें भाववळें टेकडींत लोकांतें ।।६४।।
तेथें हा राज्य करी सागरवलयांकितावनी वरती
मत्सुत यज्ञाश्वातें राजसुता ठेवि जाण त्या जगतीं ।।६५।।
यापरि मुनिनें कथिलें गंडशिलेंतील रोधना त्यातें
ऐकुनि नम्रपणें नृप पुसता झाला मुनीस प्रश्नाते ।।६६।।
ऐकियलें वृत्त बहू अद्‌भुत जें स्वामिनें कृपें कथिलें
इच्छा जगत पहावें शैलांतिल दाखवा कृपें बोले ।।६७।।
नृपविनती मुनि ऐकुनि आज्ञा करि निजसुता म्हणे दावी
यातें जगत तुझें कीं वांछित याचें असे स्वयें पुरवी ।।६८।।

ऐसें सांगुन मुनि तो होइ पुन्हा कीं समाधिमधिं लीन
तंगणसुत मग घेउन जाइ महासेन निजसवें सुलिन ॥६९॥
संनिध गंडशिलेच्या येतां मुनिपुत्र तीमधें शिरला
परि शक्य न भूपातें मुनिपुत्रा हांक दे बहिःस्थिरला ॥७०॥
गंडशिलेंतुन मुनिसुत भूपा पाचारि कीं प्रवेश करी
शक्य न पाहून येई बाह्य वदे त्याप्रती धरून करी ॥७१॥
राजा या लोकींचे असती अयोगी तसाच तूंहि दिसे
योगा परिज्ञ भासे गंडशिला घन तुला प्रवेश नसे ॥७२॥
पित्राज्ञें तुज नेणें अंतरि मजला अवश्य कीं आहे
स्थूल शरीरा त्यजि तूं तृणावृता कोटरीं पडूं देहे ॥७३॥
सूक्ष्म शरीरें मग तूं मजसह करि वा प्रवेश शैलांत
ऐकुनि बोले नृप मी येउं कसा देह बाह्य न ज्ञात ॥७४॥
मुनिवर ! कथि मज कैसा सोडूं हा देह शक्य ना मातें
जरि या सोडि बलानें तरि मग मी प्राप्त होइ नाशाते ॥७५॥
ऐकुनि भाषण त्याचें मुनिसुत हांसे वदे असें त्याला
योगा न भिज्ञ दिससी राजा तूं मिटवि मात्र नेत्राला ॥७६॥
वदुनि असें तो शिरला मिलिताक्षाच्या त्वरें शरीरांत
आकर्षि लिंग देहा ठेवी स्थूलासि त्या गुहे आंत ॥७७॥
योगाच्या सामर्थ्यें नृपसह शैलामधं त्वरें शिरला
सुप्त विकल भूपाते सावध करण्यास कल्पिलें स्थूला ॥७८॥
त्यामाजि योजितां त्या सावध नृप होउनी पुढें पाहे
ऋषिसुत करि धरुनि त्या दूर महाकाशि शीघ्र नेताहे ॥७९॥
त्यावेळीं वर खालीं बाजूंना भीम गगन ना अंत
पाहूनि भय मानि वदे मुनिपुत्रा सोडु तूं नको हस्त ॥८०॥
जरि सोडिशी पडे मी खालि निराधार होइ मम नाश
भीतिग्रस्त नृपातें पाहुनि करि हास्य मुनि वदे त्यास ॥८१॥
राजा सोड भयाला सोडीना मी तुला धरी धीर
अवलोकीं जगतातें शैलांतरिच्या मना करी स्थीर ॥८२॥

त्या योगें धीर धरुनि पाही नृप खालिं दूर आकाश
नक्षत्रासह भरलें अंध तमें व्याप्त सर्व आवकाश ॥८३॥
जातां पुढती त्यांतून आढळलें चंद्रमंडळ तयास
अत्यंत शुभ्र शीतल तेथें ये जाडयता शरीरास ॥८४॥
मुनिपुत्र रक्षि त्यातें शीतलता वारुनी, पुढें जाती
रविमंडळ लागे त्या तत्किरणें देह तप्त होय अती ॥८५॥
मुनिपुत्रें योगबळें शीत दिलें तत्तनूस शिशिराचें
पाहि पुढें लोक दुजें भासति ते स्वीय लोक समसाचे ॥८६॥
त्या उपरी पावति ते हेमगिरी, शिखरिं जाउनी बसती
तेथुनि नृप अवलोकी मुनि सुत त्या दावी सर्व जे दिसती ॥८७॥
मुनिपुत्रें त्यास दिली शुभदृष्टी दूर वस्तु पहाण्यास
गोल कडयापरि पाहे गिरि लोका लोक नाम हें ज्यास ॥८८॥
तद्‌बाह्य दिसे तम बहु विस्तृत घन आंत त्या सुवर्णभुमी
सप्तसमुद्र द्वीपें सप्त तसे गिरि नद्या निधति उगमीं ॥८९॥
भुवनें चौदा त्यामधि इंद्रादिक देव मनुज राक्षसही
किं पुरुष यक्ष बहुविध नृप तैथें हे प्रकार बहु पाही ॥९०॥
त्यापरि वैकुंठादिक कैलासहि सत्य लोक तिन लोकीं
मुनिसुत ब्रम्हा विष्णू शिवरूपें राहि भूप अवलोकीं ॥९१॥
यापरि विभागुनि मुनी त्या लोकी सृष्टि कारणा पाहे
रूपांतर करुनी तो व्यवहारा सृष्टिच्या करीताहे ॥९२॥
तेथें पृथ्वी वरती होउनि सम्राट राज्य रथ हाकी
यापरि योगाचे बल त्याचे तो भूप तेथ अवलोकीं ॥९३॥
पाहुनि यापरि भूपा वाटे आश्चर्य थोर चित्तांत
विस्मित भूपा बोले मुनि गेला काल किति पहाण्यांत ॥९४॥
द्वादश अर्बुदवर्षें गेलीं बा येथ एक दिवसांत
बाहेर चला जाऊं भूमीवर जेथ तात तप करित ॥९५॥
वदुनि असें मुनिसुत तो भूपासह बुडुनि त्या महाकाशीं
आला पूर्वि जयापरि गंडशिला बाह्य भूप्रदेशासी ॥९६॥

इति श्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे गंडशैल लोकावलोकने द्वादशोध्यायः।

|| शैललोक दर्शनं ||

# अध्याय १३

मुनिसुत शैलांतरिं घे राजा स्थूल काढुनि, त्याचा
संस्कारमात्ररूपी सूक्ष्मचि घेऊनि बाह्य ये साचा ।।१।।
त्याच्या सूक्ष्मातें मग स्थूल शरीरांत तो प्रविष्ट करी
संयोग योग्य त्यांचा झाल्यावर उठवि तो नृपा स्वकरीं ।।२।।
उठुनि नृप पाहतसे भूमितरु माणसें नद्या व तळीं
सर्वहि नूतन पाही दिसली त्या सर्वही स्थिति निराळीं ।।३।।
झाला विस्मित तो अति मुनिपुत्रा बोलतो महाभाग !
हा लोक कोणता मज दावियला हें कृपे मला सांग ।।४।।
पूर्वींहुनि विलक्षण दिसतो हा प्रांत नूतनचि अगदीं
विस्मय वाटे मजला सांग कसें तैं तया मुनि निवेदी ।।५।।
राजा ऐक असे हा पूर्वींचा लोक अन्य कीं नोहे
बहुकाळ असे गेला स्थित्यंतर त्यांत जाहलें पाहे ।।६।।
शैलांतरिं आपण जो घालविला दिवस एक त्या कालीं
द्वादश अर्बुद वर्षें भूमीवर ह्या पहा असति झालीं ।।७।।
बहुकाळ लोटल्यानें ह्या लोकीं जाहलें रुपांतरकीं
व्यवहार भिन्न लोकीं भाषा ही भिन्न होय अवलोकीं ।।८।।
यापरि कालगतीनें लोकस्थिति बदलते अशी सारी
ऐसा प्रकार बहुधा आढळला जाण या जगा भितरीं ।।९।।
अवलोकीं मम जनिता राहि समाधींत योग बलवंत
याच स्थळिं पूर्वीं तूं करुनि स्तुति तोषवीसि मम तात ।।१०।।
गंडशिलाही पाही जींत तुला दाविलें नव्या जगता
त्वत् भ्रातृवंशि झाले पुरुषसहस्रावधी भुमीवरता ।।११।।
सुंदरपुर नगर जिथें वंगाची होति राजधानी कीं
तेथें घोरारण्यचि वाढे पशुहिंस्र फिरति निःशंकीं ।।१२।।

त्वद्बंधु कुळीं सांप्रत राज्य करी वीरबाहु विख्यात
मालवदेशीं क्षिप्रा नदिच्या कांठीं विशाल नगरींत ॥१३॥
त्वद्वंशीं सुशर्मा हा करितसे राज्य द्रविड देशासी
वर्धन नगरामाजीं ख्यात असे ताम्रपर्णि तीरासी ॥१४॥
राजा ! अशा प्रकारें लोकस्थिति बदलते सदोदीत
अल्पावधि माजीं कीं झाले निर्माण हें नवें जगत ॥१५॥
पुढती कालें करुनी पालटती गिरि नद्या तलाव भुमी
ऐसी स्थिति जगताची आलोची मागुनी पुढें बहु मी ॥१६॥
पर्वत तेथें होते खोल दरी, खोल उच्च कीं होते
निर्जल देशीं वाहे नीर विपुल खडक वाळु कीं बनते ॥१७॥
कठिण शिलाप्रायभुमी पालटुनी कोमलाति मृदु होती
मृदु कोमल भूमीचे बहुठायीं कठिण शैलची बनती ॥१८॥
उखरकिं सुपीक होती सुपीक त्या बरड होति सर्वस्वी
रत्नाचें सिकता कण वाळु कणाचेचि रत्न तेजस्वी ॥१९॥
खारें होई जीवन मधुर कुठें मधुर खारटचि बनतें
कहिं वाढे जनसंख्या पशुसंख्या अधिकची कधीं चढतें ॥२०॥
कधि या जगतावरती कृमी कीटक अधिक वाढुनी होती
यापरि सृष्टी भीतरि रूपांतर भिन्न काळगती ॥२१॥
यास्तव लोकच पूर्विल अमुचा तो भासतो असा देखा
ऐकुनि कथन असें हें भूप महासेन चित्त वरि शोका ॥२२॥
त्या शोकें नृप मूर्च्छित भूमीवर दुःखि होउनी पडला
देई धीर मुनि तया त्या योगें सावरे उठुनि बसला ॥२३॥
होतां सावध दुःखें भूप महासेन करि विलापास
निज बंधु व सुत त्याचे स्वीय स्त्री वर्ग आठवे त्यास ॥२४॥
स्वकिय मुला बाळांना स्मरुनि रडे हळहळे बहु प्रीती
मोहें नृप शोक करी बंधु प्रमुख स्मरुनिया चित्तीं ॥२५॥
शोकग्रस्त नृपातें करण्यास्तव बोध मुनि वदे ऐसें
राजा ! ज्ञानी असुनी कोणास्तव शोक करिसी काय पिसें ॥२६॥

शहाणे न कर्म करिति निष्फल कधि सत्य जाण तूं राजा
बालिश त्यास म्हणावें करि जो कर्मा न साधि फळ काजा ।।२७।।
सांग बरें कोणास्तव करिसी तूं शोक काय हेतु असे
पुसतां असें नृपाला शोकें तो व्याप्त मुनिस बोलतसे ।।२८।।
न दिसे काय तुम्हाला मुनिवरा शोकामदीय कारण जें
पुसतां कारण कैसें झालें सर्वस्व नष्ट कीं माझें ।।२९।।
एका आप्ताच्या जननाशास्तव शोक फार करितात
ज्याचे नष्ट सकल त्या कारण दुःखास, नवल पुसतात ।।३०।।
ऐकुनि वच त्याचें मग बोले मुनिपुत्र त्या हंसत राजा
करणें शोक असे कीं कुलधर्म सनातनचि कुळांत तुझा ।।३१।।
केल्या न शोक तुजला मोठासा प्रत्यवाय कीं लोकीं
अथवा शोकानें तव झाले जे नष्ट लभ्य होती कीं ।।३२।।
धैर्यें विचार करि तूं शोकानें लाभ कोणता देख
नष्ट स्वजना करितां करिशी जरि दुःख कथित मी ऐक ।।३३।।
झाले नष्ट पितामह मुख्य असे आप्त पूर्वि त्या करितां
करणें शोक सयुक्तिक होतें परि दुःख तूं करित नव्हता ।।३४।।
सांग बरें बांधव तें कोणाचे जरि तुझे कशावरुन
म्हणशी सहोदर तरी विष्टाकृमि कीटकासही जनन ।।३५।।
उदरीं त्याच मिळे कीं बांधव त्या कां न गणिशि सांग बरें
केला न शोक त्यांच्याकरितां त्वांकधि असे न काय खरें ।।३६।।
राजा प्रथम विचारी कोण असे तूं व नष्ट जें होत
ते कोण वस्तुतां तं देह किं तद्भिन्नवस्तुसंघात ।।३७।।
संघाताचा किंवा अंशाचा तदिय नाश जरि नाश
देहांचें अंशांशहि क्षणोक्षणीं पावतीच विलयास ।।३८।।
मूत्रोत्सर्ग श्लेष्मा नख केशा सतत नाश अवलोकीं
सर्वात्मना तनूचा सामर्थ्ये नाश कल्पवेना कीं।।३९।।
त्वद्बांधव शरिरांश पृथ्व्यादि रुपांत उघडची उरला
शेवट त्यांचा गगनी होतो त्या नाश नाहिं कीं ठरला ।।४०।।

देह नव्हे तूं होसी देही मद्देह म्हणसि कीं त्यास
जैसें 'मद्वस्त्र' तया भिन्न असे मी तसाच तूं तनुस ॥४१॥
देहाहुन भिन्नचि तुज कसला संबंध अन्य देहासी
त्वद् भ्रात्रादिक वस्त्रीं संबंध तुशीं न त्यापरी त्यांशी ॥४२॥
वस्त्र तसें शरिर तरी शोक कसा तुजशि तच्छरिरनाशी
माझें शरीर डोळे प्राणहि माझे मदीय मन म्हणशी ॥४३॥
तरि मज सांगे सत्य स्वरूप तुझें कोणतें पुसे तूं ते
प्रश्न ऐकुनि घडिभर शांतपणें तो विचार करि चित्तें ॥४४॥
परि त्या न सुचे उत्तर दीनपणें तो मुनीस बोलतसे
भगवन् कोण असे मी न कळे मज बहु विचार करित असे ॥४५॥
करितों मी शोक खरा कारण त्याचें कळें न मज चांग
अज्ञानी मी, आहे शरण तुला गुह्य हें मला सांग ॥४६॥
आप्तस्वकीय मरतां सर्वहिजन शोक कां बरें करिती
आपण कोण दुजाही कोण असे नेणती उगे रडती ॥४७॥
मी शिष्य असे तव कीं स्पष्ट मला सांग हें कळे पूर्ण
ऐकुनि विनति तयाला मुनि बोले ऐक सांगतों तूर्ण ॥४८॥
राजा ऐक सकलजन मोहित होऊन देव मायेनें
नेणति स्वरूपाला करती ते व्यर्थ शोक मोहानें ॥४९॥
जोंवरी सद्रुप आपण न कळे तों दुःख सर्वही करिती
कळतां स्वस्वरूपची शोकाचें नाव त्या नुरे पुढती ॥५०॥
जैसा निद्रित कोणी विसरे स्वप्नीं स्वतास दुःखकरी
किंवा मांत्रिक निर्मित मायेला फसुनि मानि तीस खरी ॥५१॥
मंत्रबळें निर्मियल्या सापाची भीति मानसीं धरतो
तैसें स्वरूप नेणुनि मायेनें मूढदुःख तो करितो ॥५२॥
स्वप्नांतुन जागृत तो वा शिकल्या इंद्रजाल विद्येसी
भयमुक्त जसा होई हांसे पाहूनि अन्य भीतासी ॥५३॥
आत्मज्ञानी त्यापरि जिंकुनि मायेसि पार दुःखाच्या
होती हंसती अन्या दुःखित जे डोहिं बुडति मायेच्या ॥५४॥

म्हणुन स्वरूप जाणुन तर माया दुस्तरा त्यजी शोका
सदसद्विचार बळ घे लंघि महसेन मोहजा असुखा ।।५५।।
ऐकुनि मुनिवचनातें भूप महासेन त्या वदे ऐसें
भगवन् आपण कथिला दृष्टांत इथे न योग्य विषम दिसे ।।५६।।
स्वाप्निक किंवा मांत्रिक भास असे असत् आणि मिथ्या तो
परि जागृतींत दृष्ट प्रपंच सर्वार्थ साधिसा असतो ।।५७।।
तो सत्यच चिरवाटे प्रत्यक्ष अलोप नसे स्वप्नसम
ऐकुनि भाषण त्याचे बोले मुनिपुत्र बुद्धिमान् परम ।।५८।।
राजा एक विषम तूं गणिशी दृष्टांत हा दुजा मोह
जैसा स्वप्नस्था भ्रम रज्जु गमे सर्प त्या न संदेह ।।५९।।
राजा स्वाप्निक वृक्षहि त्या काली सर्व साधिती अर्थ
श्रमपरिहारा पांथिक जाई तैं तरुसमीप छायार्थ ।।६०।।
देइ न काय फला तो क्षुधित अशा पांथिकास निववाया
स्वप्नस्थ वस्तु गमती स्थिर व अबाधित अलोप त्या समया ।।६१।।
परि सर्व होय बाधित जागृति येतांचि जरि असे म्हणशी
तरि हा प्रपंच दृश्यहि विलया पावेच कीं सुषुप्तीसी ।।६२।।
पर दिवशीं तो भासे जैसा तैसा अबाधितचि राहे
म्हणशी तैं स्वप्निकही पर दिवशीं अनुभवास येताहे ।।६३।।
स्वप्न प्रपंच तैसा भासेना पुनरपी असे म्हणसी
राहिन तसाच जागृति पालट त्या होय जाण पळ घडिसी ।।६४।।
नूतन अस्थिर सोडा पृथ्व्यादि स्थीर भासती किं तसे
वदसी तों स्वप्नींही पुत्र कलत्रादि भास होत असे ।।६५।।
अनुवृत्ती स्वप्नींची मिथ्या तरि जागृतीं तशिच जाण
सूक्ष्म अशा बुद्धीनें पाही तूं स्वप्न जागृति समान ।।६६।।
जागृदवस्थेंतिल जे देह नद्या तरुदिवे क्षणें आन
होती पालटती तरि तेचि ते केवि ये म्हणूं जाण ।।६७।।
अचल असे पर्वतही अन्यक्षणि भिन्न होति स्वरुपत्वें
निर्झर ओढे वाहति त्यां मधुनी भेद होय सहजत्वें ।।६८।।

मूषक वाळवि शूकर निर्झर हे राहती गिरी ठायी
त्यांच्या योगें संतत पर्वतरूपांत भिन्नता होई ॥६९॥
पर्वत समुद्र भूमी क्षणोक्षणीं मुख्य वस्तु पालटती
तेंचि तें म्हणुं कसे ये बुद्धीनें सूक्ष्म ऐक उपपत्ती ॥७०॥
काल व देश विशेषीं अनुवृत्ती स्वप्नि जागरी समची
देशि व काली सर्वी दुर्लभ अनुभूति कार्य वस्तूची ॥७१॥
नसली वस्तुरूप तरि कारणरूपेंचि राहि अनुवृत्ती
म्हणशीं तरि कारण तें पृथ्व्यादिभुत प्रधान त्या म्हणती ॥७२॥
कारण तें स्वप्नींही होतें अनुवृत्त भूत कार्य दिसे
जागृतिसम भेद नसे स्वप्नाचा जागृतींत बाध असे ॥७३॥
बाध न जागृति होई प्रपंचास कधीं असे जरी म्हणसी
तरि मी कथितों ऐके बाध जनीं म्हणति अनवभासासी ॥७४॥
निद्रेमाजीं नसतो भास पहा बाह्य या प्रपंचाचा
'मिथ्यत्व पदार्थांचें ओळखणें' बाध होय कीं साचा ॥७५॥
म्हणशी असे जरी तूं तुज कोठें शुद्ध दृष्टि ही भ्रांता
दृष्टि अशी त्याजवळी असते जो ज्ञेय वस्तुचा ज्ञाता ॥७६॥
यास्तव राजा जाणे स्वाप्निक सृष्टी परी जगज्जाल
जागृति तैसा स्वप्नामाजींही दीर्घ भासतो काल ॥७७॥
तस्मात् स्वाप्निक सृष्टिहि होय न बाधीत अर्थ कार्यत्वें
म्हणुनी स्वाप्निक भावहि जाग्रद्भावासमान अस्तित्वें ॥७८॥
जाग्रदवस्थे माजी जागृत आहो असें जसें गमतें
तैसें स्वप्नींहि कळे आपण जागेच पाहि भासत तें ॥७९॥
ऐसें असतां राजन् जागरि स्वप्नांत काय भेद असे
तरि मग सांगे तूं कां स्वप्नांतिल आप्तविषयिं दुःखि नसे ॥८०॥
सामर्थ्य भावनेचें आणी सत्यत्व सर्व जगतास
त्या शून्य भावितांतें होई प्रतिबिंबहीन आकाश ॥८१॥
मिथ्या सर्व जगत हें दृढ ऐसी भावना स्थिरचि केली
तरि आत्मा सर्वत्रीं येइ अनुभवास सत्य हे बोली ॥८२॥

दृष्टांत यास म्हणजे पाहिली जी सृष्टि टेकडी भितरीं
भवताली टेकडिच्या पाहुं चला एक करुनिया फेरी ॥८३॥
वदुनि असे धरुनी कर राजाचा मुनि निघे फिरायास
फेरी करुनी आले मुनिसुत राजासमेत शैलास ॥८४॥
तैं बुद्धिमान मुनी त्या बोले ही टेकडी अती सान
दो कोस परिघ जीचा पदचारी सहज येत जाऊन ॥८५॥
विस्तृ राज्य तदंतरि देखियलें जागृति किं स्वप्न असे
सत्य असे कीं मिथ्या सांग बरे तूं विचार करुनि जसें ॥८६॥
बारा अर्बुद वर्षे भरलीं कीं आंतल्या दिसामाजी
सत्यासत्य विवेचुनि सांग असे कीं प्रचीति तुज ताजी ॥८७॥
स्वप्नें दोन असावीं भिन्न तसा हा प्रकार तूं जाण
तस्मात्सार जगांतरि एक असे भावना मनीं आण ॥८८॥
त्यजितांचि भावना ती जग हें तत्काल जाइ विलयास
यास्तव जग हें स्वप्नचि जाणुनि तू त्यागि शोक दुःखास ॥८९॥
आदर्शरूप आत्मा केवल आधार या जगच्चित्रा
हे जाणुनि तू राहे असिस जसा कीं तसा सुहृन्मित्रा ॥९०॥
अखिल जगच्चित्रा या होय चिदात्माचि आरसाधार
पूर्णपणें ओळखुनी परमानंदासि भोगि नच पार ॥९१॥

**इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे शैललोक दर्शनं नाम**
**त्रयोदशोध्यायः ।**

॥ सदाशिवतत्त्व ॥

## अध्याय १४

मुनिवच ऐकुनिया नृप करित विचारासु शुद्ध बुद्धीनें
जगतदशा स्वप्नासम जाणे त्यजि शोक शीघ्र शांत मनें ॥१॥
धैर्यें निःशोक असा भूप करी मुनिसुता पुन्हा विनति
जाणसि बुद्धिबळें तूं परावर ब्रह्मतत्व सप्रतिती ॥२॥
अविदित तुज नाहि असे कांहींही मजसि हें मनीं गमते
म्हणुनी विचारितों तुज सांगावें कीं कृपा करुनि मज तें ॥३॥
हें सर्व भावनेनें होतें उत्पन्न वदसि होय कसें ?
करितोहि भावना मी परि पाहि बाह्य जाहलें न तसे ॥४॥
तूं भावना प्रभावें केली निर्माण सृष्टि शैलांत
एकाच वेळि कैसा अनुभव ये द्विविध देशकालांत ॥५॥
कथि कोणता खरा तूं खोटा तो कोणता मला न कळे
प्रश्न नृपाचा ऐकुनि मुनिसुत समजावि त्या क्रमें सगळें ॥६॥
संकल्प भावना कीं द्वय सिद्धासिद्ध तत्प्रकार बुझे
सिद्धीं विकल्प नसतो ध्येयाची एकनिष्ठता न दुजें ॥७॥
निर्मी खरोखर पहा चतुरानन भावना बळें जगता
परि जीव सत्य भावी दृढ ये सत्यत्व त्या मग समस्ता ॥८॥
संकल्प जन्य जगता त्यापरि कोणी न भावि सत्यत्व
हाची विकल्प चित्तीं यास्तव तव भावने असिद्धत्व ॥९॥
ही सिद्धि भावनेची असते बहुता प्रकारची कोणा
जन्मापासुन कोणा योगें मणि औषधीमुळें कोणा ॥१०॥
तपयोगें मंत्रानें प्राप्त असे लाभतें वरें कोणा
जन्मापासुन विधिला रत्नानें यक्ष राक्षसा जाणा ॥११॥
औषधि सिद्धि सुरांना योग्यांना योगमार्ग जन्य असे
तपकर्त्या तपयोगें मंत्रबळें मांत्रिकास लाभतसे ॥१२॥

वर सिद्धि विश्वकर्मादिक मुख्या लाभली असे जाण
इच्छित जैसें तैसें दृढभावी पूर्व होय विस्मरण ॥१३॥
यापरि दृढ अभ्यासें होई जें पूर्विचें स्मरण बंद
तें निर्विकल्प होई स्थीर तुझी भावना पहा सिद्ध ॥१४॥
जेव्हां विकल्प पावति यत्नावाचुन लयास संपूर्ण
तें सिद्ध भावना तव इच्छिसि जें सिद्ध होतसे तूर्ण ॥१५॥
राजा विकल्प उठती मध्यें तरि भावना तव न सिद्ध
सृष्टि नवी करणें तुज इष्ट तरी शीघ्र भावना साध ॥१६॥
ऐके नृपा द्विविधता देशाकाला कशी कथी तुजला
तूं असशी अनभिज्ञ व्यवहारा आणि लोक पद्धतिला ॥१७॥
वास्तव विचित्र गमते तुज हें तरि लक्ष देउनी ऐक
भासावें विविधत्वें आहे वस्तुस्वभाव तूं देख ॥१८॥
सूर्यप्रकाश एकचि परि भासे दो रितीं पहा लोकीं
तमरूपें उलुकांना इतरांना वाटतो प्रकाशक कीं ॥१९॥
पश्वादिकां मनुष्या पाही श्वसनावरोधकरित जल
मत्स्यादि जलचरांना घेण्या श्वास होइ न प्रतिकूल ॥२०॥
अग्नीभस्म करि जिवां परितित्तिर अग्निलागि भक्षितसे
उदकांत अग्नि विझतो परि कुंडीं कांहि पेट घेत असे ॥२१॥
सारांश सर्व भावी आढळते द्विविधता जगी ऐसी
प्रत्यक्ष अनुभवा सेंद्रिय वस्तुप्रकार कथि तुजसी ॥२२॥
अन्य निरिंद्रिय असती अमित विरुद्ध स्वभाव भाव जनीं
त्याची मी उपपत्ती कथितों तुज ऐक लक्ष देऊनी ॥२३॥
अनुभव हे नेत्रांनी होती परि दृष्टिला विकार जडे
नेत्रांमुळेंच भासे दृश्य न त्या बाह्य कांहि दृष्टि पडे ॥२४॥
पित्तविकारें दूषित दृष्टीला बाह्य सर्व पीत दिसे
नेत्रांसि तिमिर होतां वस्तुएक द्विधाच भासतसे ॥२५॥
वैचित्र्य दृष्टि दोषीं बहुतापरि भिन्न जगत दावितसे
पूर्व समुद्रामाजीं कारंडक नामज्यास बेट असे ॥२६॥

तेथिल जनास वस्तू सर्वत्र सदैव तांबड्या दिसती
दुसऱ्या रमणक बेटीं वस्तुंना लोक उलटची पहाती ॥२७॥
तळभाग दिसे वरती वरचा जो भाग त्यास खालि दिसे
अन्य प्रदेशि यापरि घटना जसि चक्षुची असे तैसें ॥२८॥
अनुभविती वस्तुंना भिन्नरितीं पावती समाधाना
दिसतां विपरीतत्वें तेथि जन औषधोपचारांना ॥२९॥
करुनी पूर्वीच्या परि दृष्टी घेतात शुद्ध करुनी ते
यास्तव जगतावरती नेत्रें जें कांहि पाहिले जाते ॥३०॥
तितुकें सर्वहि होई चाक्षुषांश पीतची दिसे पित्तें
त्यापरि घ्राणादींद्रिय अंशचि गंधादि विषय होती ते ॥३१॥
भाव मनाचे होती मनोमय, तसेंच जाण सर्वांचें
वस्तुक्रम संबंधहि अक्षोद्भव बाह्य किमपि ना साचे ॥३२॥
राजा ऐके भासे जितुकें जगि बाह्य तें जगत् हेतू
आधार आद्य कारण जगचित्रा भितिसम बुझे मनि तूं ॥३३॥
परि त्या 'बाह्य' म्हणाया निश्चितसे नाढळे अपादान
शोधांतीं शरिरातें नच अन्या मानुं येतसें जाण ॥३४॥
भासे बाह्य शरीरहि केंवि अपादान होइ जगतातें
'पर्वत बाह्य' म्हणाल्यावर कैसें बाह्य पाहुं ये त्यातें ॥३५॥
बाहेर घागरीसम शरिरहि संपूर्ण बाह्य भासतसे
यांचा भासक त्याच्या बाह्य म्हणुं तरी न संभवे तैसें ॥३६॥
दीप व रवि प्रकाशा बाह्य तरी भासमान होय कसें
यास्तव जग भासे तें बाह्य नसे भासकां तरींच दिसे ॥३७॥
भासक कोण ? शरीर न जें होई भास्य पर्वतापरि कीं
भास्य असे जें भासक म्हणणे त्या योग्य नाहि अवलोकीं ॥३८॥
भासक जरि कां पावें भास्यत्वा तरि न भासकत्व उरे
भासक उरे भास्यची अपुलें हें योग्य कां विधान बरे ॥३९॥
यास्तव भासक तत्वचि केवल अति शुद्ध भासकैकरूप
असतें एक रसात्मक परिपूर्णचि केवल प्रकाशरूप ॥४०॥

व्यापी भास न देशाकालासहि पूर्ण त्यामुळें कीं तें
अन्याचें भान नव्हे जगभारूपैकरस सदा असतें ॥४१॥
अंतर्बाह्य असें जें सर्वहि भानांतरीच तें राही
भानस्वरूप आत्मा नाहि अपादान अचल शिखराही ॥४२॥
स्वातंत्र्यें स्वप्रभ तो भासे सर्वी सदैव अविनाशी
भानस्वरूप आत्मा सारा दृश्य प्रपंच जो ग्रासी ॥४३॥
त्यालाच पराचितिकीं त्रिपुरादेवी महेश्वरी म्हणती
वेदांतीं या ब्रम्हचि वैष्णव ते यास विष्णु वदताती ॥४४॥
शैवोत्तम शिव ऐसें शक्त्योपासक तया म्हणति शक्ति
चैतन्या व्यतिरिक्तचि बोलावें तें अपूर्ण कीं व्यक्ति ॥४५॥
चिच्छक्ति पूर्ण सर्वा व्यापी आदर्श की प्रतींबिंबा
भास्यापेक्षे भासकपण ये स्वांगीं नसे निरालंबा ॥४६॥
भास्य सकल मग्न असे चैतन्यीं दर्पणांत कीं नगर
परि तें नगर असेना भिन्न तयाहून जेंवि जळि मगर ॥४७॥
तैसें जग चैतन्यीं भासे परि भिन्न त्याहुनि नाहीं
संपूर्ण निबिड दर्पणि भासतसे नगर बिंबलें पाही ॥४८॥
परि ते आदर्शाहुन भिन्न असें सिद्ध नाहि कीं होत
त्यापरि जगत दिसे कीं निबिड अखंडैकरस चिदात्म्यांत ॥४९॥
परि तें भिन्न चितीहुन आहे हें दावणेंचि शक्य नसे
आकाश असे पोकळ अवकाशें शून्यतत्वरूप असे ॥५०॥
त्यायोगें त्यामाजीं सामावें द्वैत जगत भिन्नत्वें
परि चैतन्य असे सद्रुप आणि अखंडैकरस चिदात्मत्वें ॥५१॥
यास्तव आदर्शापरि चितिमाजी द्वैत लेश नच राही
संवित्‌ही स्वच्छ असे स्वातंत्र्यें बहु समर्थ ती पाही ॥५२॥
म्हणुनि स्वात्मरूपावरी सर्व चराचरचि विश्व भासविते
न लगे कारण कसलें तिजला ती द्वैत चित्र दाखविते ॥५३॥
आदर्शी जरि भासति बहुविधरूपें परी तदेकत्व
राही अबाधित असे अविकृत आदर्श निर्विशेषत्व ॥५४॥

तैसें स्वात्मीं दावुनि जगत बहुविचित्रही अनेक परी
चित्तत्व अबाधितची राहे कीं स्वप्रतीति सततवरी ।।५५।।
स्वमनोराज्यस्थितिचा राजा तूं मनिं विचार सूक्ष्मकरी
चैतन्य धरी रूपें बहु तें चिन्मात्र सर्व असति खरीं ।।५६।।
प्रतिबिंब पडो न पडो आदर्श जसा तसाचि शुद्ध असे
तैसें सृष्टी कालीं की प्रलयीं निर्विकल्प चितिच वसे ।।५७।।
स्वातंत्र्यबळें चितिही एकरसचि आपणास भासविते
स्वात्मींच बाह्यकरुनी दर्पण गगनास जेवि दाखवितें ।।५८।।
प्रथमच सृष्टि असे ही कोणि अविद्या हिला म्हणति तमही
व्यापक चितिच्या ठायीं अंशात्मक बाह्यभास जणुं होई ।।५९।।
पूर्णाहंता चितिचा अनहं भावांत हा जणूं छेद
भासे भिन्न म्हणुनि जड अव्यक्तचि ज्यास होय अनुवाद ।।६०।।
येथें चिति मर्यादित भासे जे आत्मबाह्य शिवतत्व
जाणा, भास न त्याचें शक्ति अहंरूप तें द्वितियतत्व ।।६१।।
चितिबाह्य महाकाशा अव्यक्त जडासि मी म्हणुनि घ्यावें
आच्छादि अहंभावें त्यासि सदाशीव तत्व बोलावे ।।६२।।
जाडय प्रधान भासे तेव्हां तें ईश्वराख्य तत्व असे
या द्वय तत्व विचारीं अनुगत सामान्य भान तत्व दिसे ।।६३।।
या म्हणति शुद्ध विद्या तत्वें हीं पांच शुद्ध आत्मियची
जड शक्ति विकास नसे भेद नसे रूढ म्हणुनि होति शुची ।।६४।।
संवित्स्वातंत्र्यबळें पावे वृद्धीस भेद संकल्प
जड शक्ति मुख्यधर्मी भासे धर्मत्व घेइ चिद्रूप ।।६५।।
तेव्हां जडशक्ति पहा पावे माया म्हणून अभिधान
भेद विशेषा निश्चित करि माया भेदभावना धरुन ।।६६।।
चिति पावे संकोचा होई जैं भेद भावनें व्याप्त
मग पंचकंचुकानें युक्त तदा पुरुषता तिला प्राप्त ।।६७।।
विद्याराग कलासह काल तसा नियति कंचुके पांच
कर्तृत्व अल्पचि कला विद्या किंचिज्ञता असे साच ।।६८।।

मर्यादित इच्छेला राग व अल्पायुकाल जाणावा
अल्प स्वतंत्रताही नियति, असो पुरुष या गुणें ठावा ॥६९॥
काल अनादीपासुन जीवें कर्मे अनेक जीं केलीं
तत्संस्कार समूहा चित्त्याश्रित तैं असे प्रकृति बोली ॥७०॥
त्रिविध फलें कर्माचीं त्रिगुणात्मक त्यामुळें प्रकृति बनते
प्रकृतीची एक असे स्थिति तेव्हां चित्त जाण म्हणवीते ॥७१॥
निद्राकालीं प्रकृती निद्रांतीं चित्त तीस म्हणतात
संस्कार पिंडसहिता चिति लागी वदति जाणते चित्त ॥७२॥
अव्यक्तचि चित्तत्वा पावे संस्कार पिंड भावानें
होती प्रकार बहुधा चित्ताचे जाण पुरुष भेदाने ॥७३॥
निद्रेंत अभेद असे जीवांचा प्रकृति नाम पावे ते
जाउनि निद्रा जागृति येतांची चित्त ती पहा बनते ॥७४॥
चैतन्य प्राधान्यें चित्तातें पुरुष जाण म्हणतात
अव्यक्त प्राधान्यें प्रकृतिपणा पावतें पहा चित्त ॥७५॥
मन बुधि अहंकार त्रिविध असा भेद चित्त तें पावे
अंत:करणाचे कीं तीन असे भेद हो क्रियाभावें ॥७६॥
ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रिय त्या पासुनि भिन्न पंचके होती
शब्दादि विषयपंचक भूतें सूक्ष्म व स्थूल उद्‌भवती ॥७७॥
चिति सर्व साक्षिणीही बाह्याभासा क्रमें अशा दावी
स्वात्मीं प्रकट करुनी क्रीडतसे थोरवी कुणी वदावी ॥७८॥
या सर्वां, आद्य अशी त्रिपुरा चिच्छक्ति देवि ती विधिला
निर्मी भावबळें जो प्रकट करी जगत भावना लीला ॥७९॥
तूं मी यारूपें जी भासे संवित् परा असे त्यांत
चिच्छक्ति असे एकचि नाहीं तिळमात्र भेद कीं तींत ॥८०॥
भेद दिसे जो कांहीं होय उपाधीमुळें जितें भावी
विधि, उपसंहरितां ती भेदाची समुळ नष्टता व्हावी ॥८१॥
सामर्थ्यं भावनेचें चितिच्या तव ठायिं आवृतचि झालें
मायेनें, दूर करी झांकण, सामर्थ्य पाहि तूं अपलें ॥८२॥

देश असो काल असो अथवा जे कांहि भावि जो जैसें
त्यापरि त्याला दिसतें विस्तृत कीं अल्प भेदता तैसें ॥८३॥
केला एक दिनाचा जेथें मी भाव एक दिन झाला
वर्षे अर्बुद बारा विधि होई भावितां तया काला ॥८४॥
म्हणुनी अनुभव येई ऐसाकीं दीर्घ अल्प कालाचा
विधिनें निर्मीयेल्या टेकडिचा परिघ चार मैलाचा ॥८५॥
परि तेथें मी भावी प्रदेश अनंत अनंतता ये त्या
यास्तव सत्य म्हणों ये प्रकार हा ये म्हणों तथा मिथ्या ॥८६॥
राजा अंतरि घे तूं कोस असा देश अल्पची काल
करि भावना तिथें त्या भावुनि अति थोर देश चिरकाल ॥८७॥
जों काल भावना तव भासे तों अमित काल सर्वत्र
यास्तव बाह्य जगत हें केवल तूं जाण भावना मात्र ॥८८॥
राजा बाह्य जगत हे भासे अव्यक्त चिद्रुपावर कीं
बाह्यात्मक अव्यक्तचि भितीवर चित्र जगत अवलोकीं ॥८९॥
अव्यक्त भित्तिमात्रचि जगत दिसे भित होय चिद्रूप
सामान्य जना जाण्या कालावधि योगि घेति अत्यल्प ॥९०॥

**इति श्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे सदाशिवतत्वे**
**चतुर्थद्वशोध्यायः ।**

|| अष्टावक्रीय ||

## अध्याय १५

भार्गव रामा ऐकुनि अत्यद्‌भूत शैललोक वर्णन तें
आश्चर्य मना वाटे होई विस्मित पुन:पुन्हा चित्तें ।।१।।
गुरु कथित शुद्ध बुद्धीं आलोचुनि निश्चया करून मनीं
जाई परत गुरुकडे प्रश्न करी सादरें तया नमुनी ।।२।।
भगवन् कथारुपानें केला तुम्हि बोध जो मला देखा
करुनी विचार त्यावरि बहुपरि हें सार काढिलें ऐका ।।३।।
संवेदन चैतन्यचि तत्व असे एक सत्य आधार
संवेद्या ज्ञेया जें कल्पित कीं भास दर्पणीं नगर ।।४।।
चिति ही संविद्रूपा परमा शक्ती महेश्वरी देवी
स्वस्वरूप भितीवरती जग चित्र भेदमय दावी ।।५।।
स्वातंत्र्य बळे केवळ ती अनुपादान भासवी जगता
करुनी सूक्ष्म विचारा जाणितलें सार हें गुरूनाथा ।।६।।
परि संवित् ही असते वेद्यरहितची निरूपिलें ऐसें
वेद्यरहित आढळणे शक्य न संवेद्य भावधरुनि वसे ।।७।।
वेद्यरहित संवित्‌ही केवळ कोठें न अनुभवा येते
ती निर्विकल्प कळणें पुरुषार्थ थोर बोलती ज्ञाते ।।८।।
पुरुपार्थचि मोक्ष जरी तरि तो आहे कसा मला सांगे
विज्ञानें मोक्ष मिळे होउनिया मुक्त जगिं कसा वागे ।।९।।
ज्ञानी दिसती लोकीं करिता व्यवहार नवल मज वाटे
व्यवहारीं मग त्यांची स्थिति ती संवेद्यरहित राहि कुठें ।।१०।।
संवित् ही शुद्ध जरी व्यवहारा योग्य केंवि हे न कळे
विज्ञानरूप एकचि त्याचें फळ मोक्ष एक न निराळे ।।११।।
तरि मग लोकीं कैसा ज्ञानी व्यवहारिं भेद आढळती
कांहीं ज्ञानीं कर्में शास्त्रविहित योग्य काळि आचरती ।।१२।।

कित्येक भिन्न परिनें आराधिती देवतांस भक्तीनें
कोणि इंद्रिय निग्रह करुनि समाधींत रमति सौख्याने ॥१३॥
कोणि तपश्चर्येनें देह व इंद्रिय गणांस शोषविती
कांहीं बहुपरि शिष्या संवादें तत्व बोधची करिती ॥१४॥
कोणी शासन करिती राज्याचें दंड नीतिमार्गानें
कित्येक सभेमाजीं वाद प्रतिवाद करिति नेटाने ॥१५॥
दुसरे रचि नाना शास्त्रे वा ग्रंथ ठेविती लिहुन
कित्येक आपणातें दाखविती मुग्ध वेड पांघरुन ॥१६॥
कित्येक जनामाजीं वागति अति निंद्य वर्तनावरुनी
परि हो ज्ञानी म्हणुनी असती विख्यात सर्व जाण जनी ॥१७॥
नसतां भेद तयांच्या साधनिं फलि भेद कां दिसे स्थितित
विज्ञानीं समता कीं कांहि असे तारतम्य त्याच्यांत ॥१८॥
मजला हे गुरुराया सांगावें स्पष्ट करुनि पूर्णपणें
चरण अनन्य शिष्या श्रीगुरु हे सदय असति सहजपणें ॥१९॥
प्रश्नां ऐकुनि यापरि श्रीगुरु चित्तास मोद बहु झाला
जाणुनि त्यां योग्य असे त्यांनी प्रारंभ बोलण्या केला ॥२०॥
तूं श्रेष्ठ बुद्धिमानीं रामा तूं स्पर्श तत्पदा करिशी
झालासि सद्विचारी पात्रकिं तें तत्व जाणण्या होशी ॥२१॥
हा सद्विचार रामा ! ईशकृपेनेंच लाभतो जाणा
भगवदनुग्रहाविण प्राप्त नव्हे श्रेय सर्वथा कोणा ॥२२॥
आत्मा देवकृपा करि झालासे लाभ एवढा तुजला
हा सद्विचार लावी त्याचाचि कृपाप्रसाद वृद्धीला ॥२३॥
तूं कथिलें तत्व तसें सत्य असे त्यांत चूक नच कांहीं
कथिसी त्यापरि चिद्रुप शुद्ध असे ज्ञात नीट तुज नाहीं ॥२४॥
तुज न कळे तें सम्यक यास्तव तूं प्रश्न करिसि कीं ऐसें
जो त्या ताटस्थ्येंची जाणे तों खरें न कळलेंसें ॥२५॥
तें निश्चित जाणितल्या ताटस्थ्याची तया गरज नाहीं
ताटस्थ्यें कळलें जें ज्ञान असे स्वप्नसें क्षणिक पाही ॥२६॥

स्वप्नांतिल निधि पुरुषां होइ निरर्थक मुख्यसाधु
ताटस्थीं जो अनुभव देइन फल मुख्य साधुनी तैसा ॥२७॥
यासंबंधीं तुज मी कथितों इतिहास एक पूर्वीचा
होता विदेह देशीं राजा सद्धर्मि जनक नांवाचा ॥२८॥
श्रेष्ठ प्रज्ञ असा तो ज्ञानी परतत्व जणता होता
करि एकदां यजन तो विधिपूर्वक आत्मदेविचें मखता ॥२९॥
तेथें जमले तेव्हां ब्राह्मणवर बहु तपस्वि विद्वान
आले वैदिक याज्ञिक थोर कलाभिज्ञ आणि इतर जन ॥३०॥
अन्यत्र त्याचवेळीं केला प्रारंभ यज्ञ वरुणानें
पाचारिलें द्विजांना परि गेले तेथ अल्पसंख्येने ॥३१॥
जनक करी प्रेमादर विप्रथवा म्हणुनि त्याकडे जमला
तर्क कुशल वरुणाचा पुत्र महा बृद्धिमान् तिथें आला ॥३२॥
धरुनी द्विज वेषातें कपटें नेण्या द्विजांस तो येई
मख मंडपीं प्रवेशे जनकाप्रति थोर आशितें देई ॥३३॥
निंदी सभ्यांविप्रां सर्वांदेखत सभेंत तो बोले
राजा यज्ञ सदन तव मजला नच शोभिवंत कीं गमलें ॥३४॥
जमती समुद्रकाठीं काक बहू मज गमें तसें येथें
शोभे सभा खरोखर विद्वज्जन संमुह बैसला जेथें ॥३५॥
शारदि शोभादायक हंसतती कमल सारि जशी गमतें
परि मज येथें न दिसे एकहि विद्वान्, चित्त नच रमतें ॥३६॥
राजा कल्याण असो तव, जातो मज अशक्य कीं राहणें
मूर्ख प्रचुर सभाही योग्य नसे मज अशा स्थळीं बसणें ॥३७॥
वदतां वारुणि ऐसें सभ्यांना चित्ति येइ संताप
वदतीरे विप्राधम ! सर्वांचा करिसि तूं अधिक्षेप ॥३८॥
कोणति विद्या अवगत जेणें तूं जिंकिशील सकलांना
व्यर्थचि कां बडबडशी आम्हा जिंकूनि मग करी गमनां ॥३९॥
प्राय:भूलोकींचे सर्वहि विद्वान असति कीं येथें
मूर्खा ! भूलोकांतें जिंकाया धरिसि हांव दुष्ट मते ॥४०॥

ज्या विद्येने आम्हा जिंकु शकसि सांग कोणती रे ती
पुसतां सभ्य असें त्या वारुणि बोले तयां असे पुढती ।।४१।।
बहु बोलणें कशाला, ऐका पण, मी तुम्हास जिंकीन
वादांत, अन्यथा तरि बुडवा भज सागरांत नेऊन ।।४२।।
उलट तुम्हा पैकीं जे हरतिल वादांत मज पुढें त्यांना
नेऊन सागरीं मी बुडविन, हें मान्य तरि विवादाना ।।४३।।
ऐकुन भाषण ऐसें सभ्यांना संमती दिली त्यास
वारुणिशीं द्विज करिते झाले अति जोरदार वादास ।।४४।।
वारुणि बहुशां विप्रां जिंकी जल्पुनि वितंड पद्धतिनें
टाकियले विप्रांना शतशा नेऊनि सागरीं त्याने ।।४५।।
बुडतां विप्र समुद्रीं वरुणाच्या, दूत नेति यज्ञात
घेउन सत्कार तिथें साधिति ते यज्ञकाज मोदांत ।।४६।।
बुडति कहोला ऐकुनि सुत अष्टावक्र मुनि तिथें आला
वादकलाभिज्ञ असा करुं जाणे तो वितंडवादाला ।।४७।।
वरुण सुतातें जिंकी तैं अष्टावक्र करुनि वादास
आज्ञा करि बुडवा त्या तो घे निजरूप टाकि वेषास ।।४८।।
अष्टावक्र पराजित वारुणि हृत विप्र घेउनी आला
जनक सभेमाझारी विजयानंदचि कहोल तनयाला ।।४९।।
अष्टावक्र मदानें विजयाच्या दर्प दावि विप्रांस
अपमान करी त्यांचा तेणें ते प्राप्त होति खेदास ।।५०।।
तेथें एक तपस्विनि काषायांबर जटासहित आली
दुःखी विप्र शरण तिस जातां ती त्यांस शांतविति झाली ।।५१।।
नित्य तरुण व मनोहर रूपा ती पातली नृपसभेसी
जनकें योग्यरितीनें केला सन्मान पूजुनी तिजसी ।।५२।।
तेथें कहोलपुत्रा वदली ती वत्स होसि चतुर खरा
जिंकुनि वारुणितें तूं वादीं केलेंस मुक्त विप्रवरां ।।५३।।
तुज मी स्वल्प विचारी दे उत्तर निर्वितंड सरळ मुला
अमृतत्व दायक असें पद सर्वी श्रेष्ठ विदित काय तुला ।।५४।।

जें पद जाणितल्यावर जाती संदेह सर्व नच उरती
जाणायाचें कांहि न राहि तया कामना सरे पुरती ॥५५॥
जें जें अवेद्य पद तूं जाणशि तरि शीघ्र सांग कीं मजला
तापसिच्या प्रश्नांवर मुनि अष्टावक्र वदतसे तिजला ॥५६॥
तापसि ! जाणितलें पद अनेकदां तवदे तुला ऐक
अविदित मज कांहि नसे या लोकीं हेंच काय हो देख ॥५७॥
शास्त्रें सर्व जगांतिल आलोडी सर्व मी करामलक
तूं जें विचारिलें तें सांगतसें तापसी ! बरें ऐक ॥५८॥
तें पद जगता कारण आदि व मध्यांत हीन विलसतसे
शुद्धाखंड चिदात्मक चिरा परिच्छिन्न सर्व देशि वसे ॥५९॥
त्याचा आश्रय करुनी जगत पहा सर्व हें विराजतसे
आदर्शी नगरापरि बोलति त्या जाण परम पद ऐसें ॥६०॥
जाणितल्यानें पदतें निश्चलची अमृतसिद्धि लाभतसे
आदर्श जाणिल्या मग संशय नच चित्ति कांहि राहतसे ॥६१॥
कीं प्रतिबिंबें त्यांतिल अमित जरी नसति भिन्न त्याहून
त्यापरि जाणिल्यातें इच्छा जाई समूळ निपटून ॥६२॥
तें पद अज्ञेय असे ज्ञात तयाहुन दुजास होत नसे
यापरि तापसि ! तें पद जाणितलें शास्त्र दृष्टि कथि तैसें ॥६३॥
ऐकुन वचन तयाचें बोले ती तापसी पुन्हा त्यास
मुनिपुत्रा ! त्वां कथिलें योग्यचि तें मान्य होइ सर्वांस ॥६४॥
वदलासि असें तूं की तें राहि अवेद्य वेदका भावें
जाणितल्यानें वदसी अव्यय अमृतत्व सहज लाभावें ॥६५॥
तरि तव उभय विधानें होति सुसंगत कशीं बरें चांग
म्हणशी अवेद्यतें मी जाणियलें नाहि ते नसे सांग ॥६६॥
वा तें असे व जाणशि तरि त्या बोलूं नको अवेद्य असे
परि तूं कथिला निर्णय शास्त्राचा शास्त्रदृष्टि जाणितसें ॥६७॥
यास्तव न जाणशी तें प्रत्यक्ष असे तया न तूं जाणे
दिसती प्रत्यक्ष तुला प्रतिबिंबें पडलि आंत पूर्णपणें ॥६८॥

परि तो न आरसा तुज दिसला प्रत्यक्ष हें कथी कैसें
जनकासमोर वदसी थोर सभेमाजि बालवच ऐसें ॥६९॥
होसि पराभूत असें कां न बरें मानिसीं स्वतां आतां
वदतां तापसि ऐसें धरि अष्टावक्र मूकतावक्ता ॥७०॥
घाबरला मनि झाला लज्जित बहु, मान मुनि करी खाली
स्वांतरि होउनिया स्थिर करुं लागे बहु विचार त्याकालीं ॥७१॥
परि शेवटीं न सुचले उत्तर त्या म्हणुनी बोलतो विनयें
प्रश्नाचें तव तापसि ! उत्तर कीं मम मुखासि कांहि न ये ॥७२॥
मानी मज शिष्य तुझा कथि शास्त्र वदें कसें विरुद्धवच
न वदे तुज मी मिथ्या तपनाशक जें अनर्थ दे साच ॥७३॥
जाणुनि भाषण मुनिचें सत्य विमल तापसी प्रसन्न मनें
वदली अष्टवक्रा सर्व सभासदहि ऐकती श्रवणें ॥७४॥
वत्सा ! रहस्य बहुतां न कळे हें होति या स्थळी मूढ
तर्कें केवळ कळणें शक्य न शास्त्रेंहि राखिती गूढ ॥७५॥
येथें सर्व समाजीं जाणे मी आणि एक नृप जनक
आम्हा दोघांवांचुन जाणेना वर्म हें कुणी अणिक ॥७६॥
बहुशा वादविवादीं ऐसी चर्चा क्वचित् कुठें होतें
विद्वान प्रायः करिती तर्क बळें वाद त्या कळेना तें ॥७७॥
केवळ तर्कानें हें किंवा अति सूक्ष्म बुद्धिनें न कळे
सद्गुरु सेवा करुनी कीं ईश कृपेंच वर्म हें निवेळे ॥७८॥
मुनिपुत्रा मी आतां कथितें तुज ऐक सूक्ष्म बुद्धिनें
करि तद्विचार अंतरि त्याविण समजे न कांहि केल्याने ॥७९॥
अंतर्मुख वृत्तिनें जो न प्रत्यया ज्ञान हें आले
तों हें कथिलें किंवा ऐकियले ते कदां फुकट गेलें ॥८०॥
जैसा कोणी समजे कंठातिल हार असुनि कंठस्थ
नेला कीं चोरानें विस्मृतिनें चित्ति होई अस्वस्थ ॥८१॥
'हार तुझ्या कंठि असे' सांगितलें त्यास जरि दुजें कोणी
वळुनी स्वकीय कंठा पाहि न जों अन्य शोध सोडोनी ॥८२॥

तों न मिळे हार तया केला जरि बहु विचार बुद्धीनें
स्वकिय स्वरूप तैसें आत्मा हें ऐकिलें जरी श्रवणें ।।८३।।
असला विचारशीलहि अंतर्मुख वृत्तिनें न जों पाही
प्रत्यक्ष तया आपण तोंवरि तो बाह्य नाढळें कांहीं ।।८४।।
दीप प्रकाशित करी वस्तूंना तत्प्रकाशि त्यां उजळी
तो न प्रकाश्य होई अन्या दीपाकडून कधिकाळीं ।।८५।।
तरि अन्य दीप नलगे दावाया त्या स्वयं प्रकाश असे
त्याच परी सूर्योदय जाणा अन्य प्रकाशकहि तैसे ।।८६।।
तरि मग दीपादिक हे प्रकाश्य नच होति म्हणुनि नसती ते
किंवा प्रकाश देति न उक्ति अशी सांग योग्य कां दिसते ।।८७।।
त्यापरि दीपादिक हे चित्तत्वानें प्रकाशिलें जाती
परि तें चित्तत्व नसे होणारे की प्रकाश्य शुद्ध अती ।।८८।।
संवेद्य नसुनि देते प्रकाश असे बोलतां कुठे बाधा
अंतर्मुख दृष्टीनें वत्सा करि तूं विचार घे श्रद्धा ।।८९।।
परमश्रेष्ठ त्रिपुरा चिच्छक्तिच होय कीं जगाधार
सर्वा प्रकाशित करी सर्वत्र सदा स्वयं प्रकाश कर ।।९०।।
जरि ती नव्हे प्रकाशित तरि कांहीं न प्रकाशितचि होई
असतां प्रकाशित कहीं वस्तु तरी ती सदा स्वयें राही ।।९१।।
भासे न ती स्वतां कशि जी लक्षि अभाव त्या प्रकाशाचा
कैशा परिनें भासे ती सूक्ष्मचि करि विचार तूं त्याचा ।।९२।।
कुशल जरी पंडितही होती हतबुद्ध या स्थळीं जाण
अंतर्दृष्टि अभावें बुडती मोहांत जाति वाहून ।।९३।।
बाह्य प्रवृत्ति टाकुनि जों नाहीं दृष्टि शांत होणार
तोंवरि अंतर्मुखता नाहीं कोणा कदापि मिळणार ।।९४।।
अंतर्दृष्टि न लाभे तोंवरि कैसें स्वरूप दर्शन रे
संकल्पाभाव असे अंतर्दृष्टीच, तो न, ती न ठरे ।।९५।।
सर्वहि संकल्पाचा त्याग करीं तूं स्वरूप मनि घेई
स्थिर हो क्षणस्वभावी मग तोहि विचार सोडुनी देई ।।९६।।

ठेवी स्मृतीं अवस्था ती मग करि तद्विचार सर्व कळे
तत्व असंवेद्य कसें होई वेद्यचि कसें तुला निवळे ॥९७॥
जाणितल्या अज्ञेया प्राप्त तुजसि होइ अमृतत्व दशा
मुनिपुत्रा सर्व कथी तुजसि नमस्कार जात मी देशां ॥९८॥
कळलें नीट न तुज हें कारण कीं श्रवण एकदां घडलें
तरि जनक ज्ञानी बोधिल तुज सांगुनी जिथें नडलें ॥९९॥
पुनरपि विचारि राजा संशय तव करिल दूर हा त्यांना
वदुनि निघे, जनक तिची करि पूजा सभ्यही करिति नमन ॥१००॥
होई अदृश्य तापसि वायुबळें जेंवि अभ्रलेखा कीं
रामा तुजला यापरि कथिली आत्मोपलब्धि अवलोकीं ॥१०१॥

**इति श्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे अष्टावक्रीये**
**पंचदशोध्यायः ।**

## || अष्टावक्र जनक संवाद ||

### अध्याय १६

ऐकुन रम्यकथा ती भार्गव रामास वाटले नवल
वदला अत्रिसुतातें तृप्त करा श्रवण इच्छिती कवल ।।१।।
ऐकियली पूर्वकथा अत्यद्‌भुत मम मनास वाटे ती
अष्टावक्र महामुनि जनकातें प्रश्न काय करि पुढती ।।२।।
राजा काय निरूपी उत्तर त्या सर्व सांग गुरुमूर्ति
ऐसी रम्यकथा नच ऐके मी कधि करि श्रवणपूर्ति ।।३।।
विज्ञानवृत्त मजला श्रवणिय कथि हे गुरो दया करूनी
भार्गव विनवी यापरि वदती गुरुदत्त त्या दयाळ मुनी ।।४।।
अत्यंत कथा पावन भार्गव रामास बोलते झाले
जनक महात्मा सांगे मुनिला तें पाहिजे किं ऐकियले ।।५।।
तापसि गेल्या पुढती मुनि अष्टावक्र विप्रवर संगें
घेउनि जनक सभेसी गेला त्या प्रश्न करितसे स्वांगें ।।६।।
तापसि भाषण होतें गहन व संक्षिप्त तें तया न कळे
कथिलें स्पष्ट विदेहें भार्गव तें ऐक सांगतों सगळें ।।७।।
अष्टावक्र विदेहा बोले कीं तापसी कथी गहन
न कळे पूर्ण मला तें संक्षिप्तचि जाहलें तिचें कथन ।।८।।
यास्तव दयानिधे ! तूं सांग कसें तें अवेद्यतत्व असें
स्पष्ट करून समजावी ऐकुनि नृप चकित त्यास बोलतसे ।।९।।
अष्टावक्र मुने ! तुज कथितों मी ऐक चित्त दे मातें
तें तत्व न अज्ञेयचि आहे न ज्ञेय सर्वथा होतें ।।१०।।
तें जरि अज्ञेय असे तरि सद्‌गुरु सांगतील त्यास कसें
श्रीगुरु बोधिति तत्वा गुरु चरणाश्रय अवश्य मूळ असे ।।११।।
वेद न परम पदाचें आहे अति सुलभ आणि दुर्लभही
अंतर्मुख वृत्ति जया साधलि त्या सुलभ तें असे पाही ।।१२।।

ज्याची दृष्टि बहिर्मुख दुर्लभ अति आत्मतत्व त्यास असे
अनिरूप्य तें खरोखर तरि आहे तें अवेद्य पाहि तसे ॥१३॥
तरिपण अन्य रुपानें सांगूं येतें व जाणतां येतें
दृश्य पदार्थ ज्ञानावरुनी तें वेद्य जाण कीं होतें ॥१४॥
जे जें तुज भासतसे विचार करि सूक्ष्म बुद्धिनें त्याचा
आधार भान शक्तिच भास्य पृथक् भास्य वस्तु भानाचा ॥१५॥
ती भानशक्ति आहे तत्व परममुनिसुता मनी आण
जें वेद्य तें नसे कीं वित्ति न तें भासतें स्वतां जाण ॥१६॥
वित्ति असे अन्य जिणें जाणूं ये वेद्य अप्रकाश असें
वेद्य विभिन्न जड असे परि वित्तीनेंच तें प्रकाश्य दिसे ॥१७॥
असती पदार्थ बहुविधरूपें परि वित्तिमाजि भेद नसे
भेद असे वेद्याचा धर्म न तत्स्पर्श वित्तिलागि असे ॥१८॥
वेद्य पदार्थालागीं असती आकार भिन्न भिन्न परी
आकाररहित वेद्याकरि पाही वित्ति सूक्ष्म बुद्धि करी ॥१९॥
आदर्श जसा भासे प्रतिबिंबाकार असुनि आश्रय त्या
सर्वाधार चितिगमे दृष्याकारास पावली मिथ्या ॥२०॥
म्हणुनी ते वेद्यच चितिकरितां व्यावृत्ति वेद्यवस्तूंची
ती वेद्य न स्वभावें, आहे विश्वा समस्त आश्रयची ॥२१॥
ती रूप जाणत्याचें म्हणुनी वेद्यत्व तीस नच ये कीं
यास्तव अष्टावक्रा निजरूपा करि विचार अवलोकीं ॥२२॥
शरिरप्राणमनादिक अस्थिर हे तूं नव्हेसि जाण असे
होति न हे रूप तुझें तेवि न तू देह धातु संघ दिसे ॥२३॥
अन्य विषय करुनी जैं निरखि अहंबुद्धि कांहि त्यांत नसे
त्याचपरी प्राण व मन असति अहं हीनरूप तव कैसें ॥२४॥
न पराचिति कधि राही भिन्न अहंबुद्धिला न ती टाकी
अष्टावक्रा तू तरि चिति होसी सर्व नेत्रि अवलोकीं ॥२५॥
अंतर्मुख दृष्टि करी तेथें चितिरूप आपणा पाही
श्रोते सुबुद्ध लक्षिति निजरूपा बोध ऐकतां क्षणिही ॥२६॥

दृष्टि न नेत्र गोलकें म्हणवी येथे तरी मनोनेत्र
ज्यायोगें स्वप्नांतिल पाहूं ये सृष्टि मुख्य तो नेत्र ॥२७॥
त्याची प्रत्यावृत्ती विप्रा तुज सांगतों बरें ऐक
कांहीं न दिसे नेत्रा जरि तत्प्रत्या वृत्तिही नव्हे देख ॥२८॥
वस्तु विशिष्ट पहाया दृष्टी अन्यावरूनि वळवावी
पूर्णपणे मग तीतें वस्तु विशेषाकडेच लावावी ॥२९॥
तरि स्पष्ट दिसे मग न दिसे ती अन्यथा प्रकारानें
आसुनी समोर न दिसे नेत्र प्रत्यावृत्ति हीन असल्यानें ॥३०॥
दिसले असूनि तिकडे वळती न नेत्र न पाहिल्यासमतें
त्याचपरी सद्विप्राचर्मश्रोत्रादिक स्थितिहि गमते ॥३१॥
सुखदुःखाचें भास न होय मनालागि या रितीं पाही
अप्रत्यावृत्त असे मन पुरुषा कांहि कीं कळत नाहीं ॥३२॥
ज्ञेयासी तदेकपर अंतर्मुखताहि दृष्टिची जाण
अंतर्मुख शुद्ध असें चित्तचि जाणे स्वरूप नच आन ॥३३॥
याविषयीं तुज आणिक कथितो मी चित्त देउनी ऐक
आत्मा होय मनातें गोचर व अगोचरहि असे देख ॥३४॥
भांबावती इथें बहु शास्त्री पंडित तसेच वैदिकही
उभय कृतीनें होते गोचरता बाह्य वस्तुची पाही ॥३५॥
आद्य परावृत्त करी मन नंतर तें तदेक पर व्हावें
अन्य पदार्थापासुनि जें परते मन उगी स्थिती पावे ॥३६॥
त्यावेळि इष्ट वस्तू होइ न गोचर तटस्थता राहे
यास्तव तदेक परता होणे ही कृति अवश्यची आहे ॥३७॥
यापरि दोन कृतीनें मर्यादित भाव वस्तु दिसतात
अपरिच्छिन्न चिदात्म्यास्तव त्यांची नाहि कीं गरज गमत ॥३८॥
अन्य पदार्थावरुनी मन फिरतां प्रत्ययास चिति भेटे
पाहि पुरस्थित दर्पणि वस्तु पहावी विशिष्ट जें वाटे ॥३९॥
सारुनि दूर इतर, ती आणावी लागते तया पुढती
आवश्यक उभय कृती प्रतिबिंबालागिं दर्पणी असती ॥४०॥

परि दर्पणांत गगन प्रतिबिंबा पाहण्या मनीं धरितां
अन्य परावृत्तीनें साधतसे कार्य अन्य नच करितां ॥४१॥
व्याप्त गगन सर्वत्रीं स्थितहि सदा दर्पणीं पहा असते
अपरिच्छिन्न परि तदा प्रतिबिंबाच्छादनें दिसत नसतें ॥४२॥
सर्वीं अनुगत आहे आश्रय सर्वां असें गगन पाही
अन्य परावृत्तीनें भासत दर्पणि दुजें नको कांहीं ॥४३॥
त्याच परी चिति आहे अनुगत सर्वत्र सम सदाधार
व्यापुनि मनास राहे परिपूर्ण अनंत जाण विप्रवर ! ॥४४॥
वास्तव चिति अनुभवण्या अन्य परावृत्त मन पुरें आहे
द्विजवर ! सांग बरे चिति कोठे कधि न प्रकाश करिताहे ॥४५॥
जेव्हां व जिथें नाहीं चिति तरि जेव्हां जिथें नसेना तें
अनुभवण्या चिति लागीं विषयीं विनिवृत्त मन पुरें होतें ॥४६॥
नूतन अभिमुख करणें कांहि नको त्यामुळें चिदात्मा हा
साकार पदार्थासम वेद्य नव्हे तू असा विचार पहा ॥४७॥
परि तो शुद्ध मनानें वेद्य असे अनुभवास ये सहज
अन्याकार रहित करि संकल्प विहीन शुद्ध मन समज ॥४८॥
हेंचि असे साधनपर अनुभवण्या स्वस्वरूप मुख्य असे
जोंवरि न शुद्धि होई चित्ता तों ज्ञान लाभ होत नसे ॥४९॥
शुद्धांत:करणीं तें ज्ञान बरें प्रकट कां न होणार ?
या तत्व शोधनाच्या कामीं याविण न अन्य पडणार ॥५०॥
कर्मोपासन तैसें वैराग्यादिक उपाय जे करिती
ते चित्तशुद्धिसाठीं नच कांहीं अन्य लाभ ते देती ॥५१॥
सारांश असे जाण कि शोधित चित्ता स्वरूप वेद्य असे
यापरि जनकें कथितां ऐकुनि मुनिपुत्र त्यास बोलतसे ॥५२॥
राजन् निवृत्तच मना तें परचैतन्य अनुभवा येतें
अन्य उपाय नसे त्या कथिलें ऐसें तुम्ही पहा मातें ॥५३॥
तरि मग निद्रेमाजीं निवृत्तच मना स्वरूप सहज कळें
अन्य उपाय कशाला झोंपेंत कृतार्थता जिवास मिळें ॥५४॥

ऐकुनि विप्र वचातें नृप बोले परिस लक्ष देऊन
होय समाधान असें कथितों तव संशयास निरसून ।।५५।।
असते सुषुप्तिमाजीं जरि मन परावृत्तची परी लीन
होउन तमावृत मुके स्वमत्वासि मग तया नसे भान ।।५६।।
आदर्शासी कज्जल लेप दिल्या गगन त्यांत काय दिसे
अन्य परावृत्त जरी प्रतिबिंबित गगन त्यांत होत नसे ।।५७।।
निद्रेनें लिप्त मना अन्य परावृत्त परि न चिति भासे
आत्मप्रकाश कधिही अयोग्य मनां तरि जाण होत नसे ।।५८।।
नाही तरि लोष्ट कुडचामाजीं चिति भास कां बरे नोहे
यास्तव चैतन्याचा भास असे शुद्धमानसीं पाहे ।।५९।।
नूतन अर्भक जन्मे त्यालाही भासमान चिति नसते
कारण ऐक कथितसे होइ मषी लेप दर्पणा वर ते ।।६०।।
प्रतिबिंब तिचें त्यावर असणें अदृश्य जरि असे लोकां
दर्पण घे प्रतिबिंबा जे राही श्लिष्टवरति मषिदेखा ।।६१।।
तैसें निद्रेमाजीं निद्रातमलेपत्या मना होई
अन्य परावृत्त न तें यास्तव चित्त्याव भास नच घेई ।।६२।।
होतां जागृत येते स्मृति निद्रेचीच आठवी स्थिति तो
जी योगें येतो त्या अज्ञानानुभव जागरीं कथितो ।।६३।।
हेंचि पुन्हा तुज कथितों स्पष्टपणें स्वस्थ होउनी ऐक
प्रकाश विमर्श अशा असति अवस्था मना उभय देख ।।६४।।
बाह्य पदार्थि मनाचा संबंध घडे स्थिति प्रकाश असे
तन्नामरूप निश्चय सविकल्पची करी विमर्श दशे ।।६५।।
भेदादर्शन असतें प्रकाशीं म्हणूनि निर्विकल्प दशा
वस्तू विचार असतो सविकल्पकची विमर्शि अमुक असा ।।६६।।
'हा अमुक याप्रकारीं' जी ठायीं शब्दभेद मुळि नसति
वस्तूदर्शनरूपें प्रकाश म्हणतात निर्विकल्पक ती ।।६७।।
या वस्तु दर्शनावरि 'हा अमुक' अशाच शब्द भेदानें
प्रकटे सविकल्पक जो जाणावा कीं विमर्श नेमानें ।।६८।।

ऐकुनि विप्र वचातें नृप बोले परिस लक्ष देऊन
होय समाधान असें कथितों तव संशयास निरसून ॥५५॥
असते सुषुप्तिमाजीं जरि मन परावृत्तची परी लीन
होउन तमावृत मुके स्वमत्वासि मग तया नसे भान ॥५६॥
आदर्शासी कज्जल लेप दिल्या गगन त्यांत काय दिसे
अन्य परावृत्त जरी प्रतिबिंबित गगन त्यांत होत नसे ॥५७॥
निद्रेनें लिप्त मना अन्य परावृत्त परि न चिति भासे
आत्मप्रकाश कधिंही अयोग्य मनां तरि जाण होत नसे ॥५८॥
नाहीं तरि लोष्ट कुडचामाजीं चिति भास कां बरें नोहे
यास्तव चैतन्याचा भास असे शुद्धमानसीं पाहे ॥५९॥
नूतन अर्भक जन्मे त्यालाही भासमान चिति नसते
कारण ऐक कथितसे होइ मषी लेप दर्पणा वर ते ॥६०॥
प्रतिबिंब तिचें त्यावर असणें अदृश्य जरि असे लोकां
दर्पण घे प्रतिबिंबा जे राही श्लिष्टवरति मषिदेखा ॥६१॥
तैसें निद्रेमाजीं निद्रातमलेपत्या मना होई
अन्य परावृत्त न तें यास्तव चित्त्याव भास नच घेई ॥६२॥
होतां जागृत येते स्मृति निद्रेचीच आठवी स्थिति तो
जी योगें येतो त्या अज्ञानानुभव जागरीं कथितो ॥६३॥
हेंचि पुन्हा तुज कथितों स्पष्टपणें स्वस्थ होउनी ऐक
प्रकाश विमर्श अशा असति अवस्था मना उभय देख ॥६४॥
बाह्य पदार्थि मनाचा संबंध घडे स्थिति प्रकाश असे
तन्नामरूप निश्चय सविकल्पची करी विमर्श दशे ॥६५॥
भेदादर्शन असतें प्रकाशीं म्हणूनि निर्विकल्प दशा
वस्तू विचार असतो सविकल्पकची विमर्शि अमुक असा ॥६६॥
'हा अमुक याप्रकारीं' जी ठायीं शब्दभेद मुळि नसति
वस्तूदर्शनरूपें प्रकाश म्हणतात निर्विकल्पक ती ॥६७॥
या वस्तु दर्शनावरि 'हा अमुक' अशाच शब्द भेदानें
प्रकटे सविकल्पक जो जाणावा कीं विमर्श नेमानें ॥६८॥

अभिनव, अन्य दुजा हे असति प्रकार कि मनोविमर्शाचें
अभिनव आभास समज नव नव अनुभवचि वस्तु जाताचें ।।६९।।
अन्य विमर्श स्मृत्यात्मक असतो पूर्वकालि अनुभविजे
संस्कार ते स्मरावे द्वय शक्तिक हा विमर्श तूं समजे ।।७०।।
निद्रेंत निर्विकल्प ज्ञान असे ती सुषुप्ति जाणवी
जागृति विकल्प पुष्कळ अमूढ दशा ती म्हणून बोलावी ।।७१।।
निबिड प्रकाश असतो निद्रेंत म्हणूनि तीस मूढदशा
म्हणती त्यापरि जाणा दीपादिक पाडितात निबिड असा ।।७२।।
पूर्ण प्रकाश जडता म्हणती विद्वान त्यास मूढदशा
निद्रा प्रथम जहाली म्हणती अव्यक्त त्या महाकाशा ।।७३।।
कांहींच न प्रकाशित दृश्याभावचि सुषुप्ति ती जाण
वस्तू दर्शन कालीं जागरिही या स्थितींत राहि मन ।।७४।।
मूढत्व तें मनाचें मन नासे क्षणि मग विकल्प उठल्यानें
अव्यक्त शक्ति राही जाण सुषुप्तींत चिर दृढत्वाने ।।७५।।
म्हणुनी मन राहि तिथें लीन असे म्हणति तत्ववेत्ते कीं
जागरि वस्तू दर्शनि मन राही लीन सूक्ष्म अवलोकीं ।।७६।।
विप्रा तुज मी कथितों अनुभव माझा रहस्य मनि आण
ऐके सूक्ष्म विचारें पंडितही होति मूढ कीं जाण ।।७७।।
समाधि निर्विकल्पही आणि सुषुप्ति व पदार्थ दर्शन तें
तीन प्रकार असती एक परी निर्विकल्प दृष्टी तें ।।७८।।
भासे भेद विमर्शीं व्यवहारीं त्रिप्रकार तरि झाले
त्याला कारण जाणा भास्यामधि भेदनिश्चया केले ।।७९।।
केवल समाधि माजी भासे चैतन्य सुप्ति अव्यक्त
वस्तूदर्शन कालीं दृश्याकारच असे तिथें व्यक्त ।।८०।।
भास्य त्रिविध असे जरि भेदें तत्ज्ञान निर्विकल्पसम
असतें एकच सर्वीं 'प्रकाश निबिड' तरि पावलें नाम ।।८१।।
सुषुप्ति समाध्यवस्था राहति बहुकाळ त्यामुळें त्यांचा
अनुभव ये सर्वांना स्पष्टचि कळतो विमर्श नंतरचा ।।८२।।

वस्तुदर्शन असतें क्षणिक तयाचा विमर्श कळत नसे
सुषुप्ति तशीच समाधि अल्पत्वें जागरी नच विमर्श ॥८३॥
सुषुप्ति क्षणिक जागृति तैशीच समाधिही क्षणिक असते
ज्यांना सूक्ष्म दृष्टि त्यांपूर्व परिचयें सुषुप्ति लक्षवते ॥८४॥
सूक्ष्म तशीच अपरिचित समाधि असते म्हणून नच कळते
व्यवहारीं सकळांना क्षणिक अंशि समाधि संधि आढळते ॥८५॥
परि ओळख नसल्यानें त्या त्यांना सर्व होति कीं फोल
जागृति विकल्पशून्य स्थितिला देती समाधि हा बोल ॥८६॥
होइ विमर्शाचा जैं अभाव तैं स्थिति समाधि जाण असे
त्यापरि निद्रासमयीं वा दर्शनिं मन समाधि पावतसे ॥८७॥
परि न मुख्य समाधि त्या म्हणुं ये कारण विमर्श संस्कार
भेदोत्पत्तिकर असे गर्भी त्यांच्या लपूनि असणार ॥८८॥
एरवि पदार्थ दर्शनि अविमर्शनरूपची समाधि असे
तत्रापि मुनीपुत्रा ! कथितों मी स्पष्ट आदरें परिसे ॥८९॥
प्रथमज अव्यक्त असे 'नच कांहीं' नास्ति हेंच रूप जया
अत्यंता भावत्वें नास्तित्वें भान होइ त्या समया ॥९०॥
जडशक्ति चिदात्म्याची जाण सुषुप्तिच असे म्हणति तिजला
'कांहीं नाहीं' ऐसा आभासचि भास (न) त्या अवस्थेला ॥९१॥
याकारणें सुषुप्तिस आली जडरूपता जडज्ञानें
परिचिति समाधि माजीं भासे ती ब्रह्म होय जाण मनें ॥९२॥
ग्रासकदेशाकाला 'कांही नच' भास नाश करिते कीं
अस्तित्वरूप केवल चितिनिद्रा एक केंवि अवलोकीं ॥९३॥
म्हणुनी पुरुष जनीं या कैसा होइल कृतार्थनिद्रेनें
यापरि अष्टावक्रा केलासे बोध जनक नृपतीनें ॥९४॥

**इति श्रीत्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे अष्टावक्र जनकसंवादे षोडशोध्यायः ।**

# ॥ अष्टावक्रीय ॥

## अध्याय १७

ऐकुनि बोध नृपाचा मुनि अष्टावक्र त्या पुसे पुढती
श्रीगुरु म्हणती रामा ! कथितों तुज वृत्त तें धरी चित्तीं ॥१॥
अष्टावक्र वदे 'नृप !' कथिलें लोकीं समाधि आढळती
सूक्ष्म अतिसान अशा तरि सांगा स्पष्ट त्या मला कळती ॥२॥
तरि कोणत्या प्रसंगीं समाधि निर्विकल्प असतात
प्रश्न तयाचा ऐकुनि जनक महात्मा तयास म्हणतात ॥३॥
ते ब्रम्हन् ऐक तुला व्यवहारांतिल समाधि सांगतसे
प्रथम प्रिय भार्या जें गाढालिंगन पतीस देत असे ॥४॥
तेव्हां अंतर्बाह्य क्षण मात्र न भास त्या नसे झोप
यास्तव त्या स्थिति लागीं जाण समाधिच असे न संकल्प ॥५॥
बहुकाळ वांछिले जें वाटे दुष्प्राप्य निश्चयचि केला
ऐशा समयीं व्हावें प्राप्त अकस्मात तें मुदित झाला ॥६॥
तेव्हां अंतर्बाह्य क्षणमात्र न भास त्या नसे झोप
यास्तव त्या स्थिति लागी जाण समाधिच असे न संकल्प ॥७॥
नि:शंक निर्भय उगे हृष्टमनें मार्गि चालता व्हावा
कोणी तों एकाकी व्याघ्र जणूं काळ त्यापुढें यावा ॥८॥
तेव्हा अंतर्बाह्य क्षणमात्र न भास त्या नसे झोप
यास्तव त्या स्थितिलागीं जाण समाधिच असे न संकल्प ॥९॥
पुत्र कुणाचा कर्ता गृहका जों प्रिय निरोगि असलेला
मेला कीं एकाकी ऐके तो जें अशा कुवार्तेला ॥१०॥
तेव्हां अंतर्बाह्य क्षणमात्र न भास त्या नसे झोप
यास्तव त्या स्थितिलागी जाण समाधिच असे न संकल्प ॥११॥
इतर प्रसंग असती समाधिचे सांगतों तुला ऐक
जागृति निद्रा स्वप्नस्थिति संधीं ये समाधि कीं देख ॥१२॥

दूरस्थ वस्तु कळण्यास्तव मन एकाग्र करुनि सूक्ष्म तर
गवतावर जळुसम तें पसरत जातें पुढेंचि लांबवर ।।१३।।
देहीं देहाकारचि वस्तूवर मन असे तदाकार
देह व वस्तूमध्यें सूक्ष्म सदा लक्षितें निराकार ।।१४।।
बहु कासया कथूं तुज करि तूं स्वमनीं विचार सूक्ष्म असा
व्यवहारी नच वृत्ति ज्ञान वरी एक घेइ बहु भासा ।।१५।।
भिन्न ज्ञान समूहें चालें व्यवहार तत्तदाकार
तैर्थिक सुगत कणादिक मतवादी वर्णिती मतासार ।।१६।।
आत्मा किंवा बुद्धि क्षणोक्षणीं भिन्न भिन्न होत असे
क्षणिक व खंडज्ञाना मधि संधीं निर्विकल्प भान वसे ।।१७।।
यास्तव कहोल पुत्रा जाणिल त्या दरपळीं समाधि असे
इतरांतें शशशृंगापरि नच जन्मांतरींहि कधि गवसे ।।१८।।
नृप भाषण ऐकुनि मुनि बोले ' राजा ! असें जरी म्हणशी
निर्विकल्प समाधिकीं व्यवहारीं प्राप्त होय सर्वांशीं ' ।।१९।।
तरि मग संसार कसा त्यांचा राही न लोप कां पावे
सुप्तींत निर्विकल्पज्ञान असुनि अव्यक्त जडहि भासावें ।।२०।।
म्हणुनी मोक्ष न पावे, तरि होई निर्विकल्पि चिति लाभ
संसार कां न संपे भर्जित बीजासि कां फुटे कोंब ।।२१।।
निर्विकल्प समाधि कीं कारण मोक्षा समूळ नाश करी
अज्ञान कुळा, म्हणवी विज्ञानचि राहि तेंथ काय तरी ।।२२।।
राजा मम संशय हे कथिलें तुज सर्व ही निरास करी
प्रश्न तयाचे ऐकुनि बोले नृप जनक, सदय दृष्टि वरी ।।२३।।
राजा बोले द्विजवर एक पहा कथितसे रहस्य तुला
संसृति अनादिच इचा अज्ञानापासुनी उगम झाला ।।२४।।
सुख दुःखा व भास न प्रवाह जीचा सदैव चालु असे
स्वप्नापरि असुनी ही सर्वां जीवांस नित्य भासतसे ।।२५।।
ज्ञानें विनाश पावे संसृतिही मान्य निश्चयें सकलां
ते ज्ञान सविकल्पची असल्याविण नाश तो न होय भला ।।२६।।

निर्विकल्पक ज्ञानें नाश न पावे कधीच अज्ञान
कारण तें ज्ञान नसे करित विरोधा स्वतां कुणा जाण ।।२७।।
शुद्ध ज्ञान सहायें सविकल्पाच्या विचित्र आकारा
स्वात्मी भिंति परि जगा होई अधिष्ठान सर्व विस्तारा ।।२८।।
निर्विकल्प ज्ञान कीं शुद्ध ज्ञानच विकल्प उल्लेख
त्यावरि उठे तयाला सविकल्प म्हणून बोलती देख ।।२९।।
अज्ञानहि सविकल्प ज्ञान असे तें नसे इतर कांहीं
कारण कार्येत्यादिक रूपें नाना प्रकारचें पाही ।।३०।।
आत्मस्वरूप विस्मृति आहे अज्ञान कारणचि जाण
अवच्छेदरहित असे सर्वि चिदात्मा भरून परिपूर्ण ।।३१।।
साधक देशकाला उभय परिच्छेद ज्या नसति म्हणुन
ऐश्या आत्म्याविषयीं अपूर्णक असें भान तेंचि अज्ञान ।।३२।।
'मी हा येथें आहे' हें मूलाज्ञानरूप कीं आहे
देहादि स्वत्वानें भासति पल्लव तया फुटति पाहे ।।३३।।
अज्ञानाचें निरसन होई न जों लय नव्हेचि संसार
आत्मस्वरूप चिति हें न कळे अज्ञान तों न जाणार ।।३४।।
दोन परीनें असतें ज्ञानं परोक्षापरोक्ष तूं जाण
प्रथम परोक्ष असे तें कळतें गुरुमुखें व शास्त्र वाचून ।।३५।।
ते असमर्थ असे कीं देण्या प्रत्यक्ष मोक्ष पुरुषार्थं
झालें तुज जें वाटे ज्ञान असे तें परोक्ष कीं व्यर्थं ।।३६।।
श्रुति शास्त्र श्रद्धेनें लभ्य गमे तें न होइ फलदायी
तेंच खरें ज्ञान असे प्रत्यक्ष समाधि पक्व जें होयी ।।३७।।
तें ज्ञान समर्थ असे, नाशी अज्ञान, मोक्ष फल देई
ज्ञानोत्पत्तीपूर्वक समाधिनें ज्ञान पक्व जें होई ।।३८।।
यास्तव अज्ञान्याला नच कांहीं लाभतें समाधीनें
रत्नानभिज्ञ जैसा कोशागरि नेणतो असुनि रत्नें ।।३९।।
ऐकुन माहित ज्याला रत्न असे तो तदेक पर होई
त्या योगें ओळख त्या पटुनी तो मणिसुखा मनीं घेई ।।४०।।

होइन तदेक पर जरि ऐकुन माहित समोर असुनी ही
रत्नाची ओळख त्या चतुरहि पटणें जसें घडत नाहीं ।।४१।।
मूढ तसा अज्ञानें न पवे विज्ञानजन्य मोक्षफल
पंडित ऐकुन झाले ज्ञानें जरि युक्त, कष्ट ते सकल ।।४२।।
असतां अतत्पर तया प्राप्त नव्हे सत्य तत्व विज्ञानें
गगनांत तारका जसि पाहुन नेणेचि अमुक या ज्ञानें ।।४३।।
ओळख पटे न मूढा श्रूत ज्ञानहीन पूर्ण असल्यानें
ऐकुन जाणे तोही नोळखिच अतत्परत्व वरिल्यानें ।।४४।।
शुक्र पहाया इच्छी तो जाणे प्रथम तद्दिशारूप
निश्चय करुनी गगनीं शोधी त्या करि बहू खटाटोप ।।४५।।
शेवटिं एकाग्रमनें गगनीं त्या स्पष्ट ओळखी पाही
मूढ कि अज्ञानानें दुसऱ्या ऐकुनि ठाउकें राही ।।४६।।
परितत्पर नसल्यानें असुनि समाधि स्वतत्व नोळखिती
जैसा नर दुर्दैवी नेणे स्वधनास करित ओंभवती ।।४७।।
म्हणुनी सर्व अशांना येति समाधी न कांहि उपयोगी
त्याच परी शिशुंनाही असती जरि निर्विकल्प पडुनि उगी ।।४८।।
न मिळे फळ मोक्षाचें त्यांचें अज्ञान राहिच अलोप
आत्मस्वरूप प्रत्यय देण्याला ज्ञानयोग्य सविकल्प ।।४९।।
तें ज्ञान समर्थ असे नाशी संसार हेतु अज्ञान
बहु जन्मार्जित पुण्यें जैं होई तुष्ट देव ईशान ।।५०।।
लाभे मुमुक्षत्व त्या तैंच नान्यथाहि कल्प कोटीनें
दुर्लभ चराचरीं या जन्म असे चेतनांत जाण मनें ।।५१।।
त्यांतहि सुदुर्लभ असे मानव योनींत सर्वथाजन्म
अत्यंत सुदुर्लभची नरयोनी बुद्धि ती परमसूक्ष्म ।।५२।।
अष्टावक्रा जगतीं अचरांचा शंभरांश चर नसती
त्याचपरी प्राण्याच्या शतांशहि नाहिं की मनुज गणती ।।५३।।
प्राणि शतांश मनुष्यें अल्पपरी वागती पशुसमान
नच एक दोन शतही कोटद्यावधि पाहती नच निदान ।।५४।।

नेणति वाईट बरें, करिती न विचार पापपुण्याचा
कोटयावधि इतरहि, धरिती कीं सतत छंद विषयांचा ।।५५।।
मिथ्या पांडित्य मदें, सोशिति ते जन्ममृत्यु आवडिनें
त्यांच्यांत कांहि असती चतुर, विचारी, व थोर बुद्धीनें ।।५६।।
परि दुष्कृत संस्कारें, आत्मपदा मानिती न नास्तिक ते
भगवन्मायाच्छादित परमपद कदा न जाणुं ये त्यातें ।।५७।।
मायांध भ्रममोहित हतभागी, पावती कसें पद ते
न शिरे बुद्धि तयांची अद्वैत परमपदीं, अडुन पडतें ।।५८।।
इतरहि असती ज्यांच्या बुद्धि शिरे पद परंतु हतभागी
मिथ्याभिमान योगें वाढविती ते कुतर्क अविरागी ।।५९।।
विचित्र भगवन्माया, पावुन कीं परमपदहि ते भ्रमती
चिंतामणिची प्राप्ती झाल्या जणुं, ते कुकल्पनें त्यजिती ।।६०।।
परदेवता जयांनी केली तुष्टच उपासना करुन
सुविचारें सुश्रद्धें होती निर्मुक्त ते भ्रमांतून ।।६१।।
अद्वय पदावरी मग त्यांची श्रद्धा जडून पावति ते
कथितों द्विजवर तुजला क्रम त्याचा, ऐक तूं अचल चित्तें ।।६२।।
बहु जन्मार्जित पुण्यें, निष्ठा त्या देवतेवरी जडते
निष्ठापूर्वक त्याला, नित्य तदाराधनापुढें घडते ।।६३।।
मग देवता कृपेनें विषयीं, वैरस्य त्यास लाभतसे
वैराग्यें श्रेयाची प्रबलेच्छा निष्टताहि वाढतसे ।।६४।।
भाग्यें सद्गुरु भेटी होई, ते ज्ञान बोधिती सगळे
हें ज्ञानपरोक्ष असे, अमुक असे पद म्हणून त्यास कळे ।।६५।।
नंतर साधक शिष्या करणें लागे विचार आत्म्याचा
तेणें उपपत्ति पटे, नासे संशय समग्र चित्ताचा ।।६६।।
निश्चित अद्वय आत्मा मीच, असा ध्यास मानसा लावी
चित्त तदाकार करी यत्न बळें, मन तदेक पर ठेवी ।।६७।।
अद्वय तत्व असे मी सविकल्पे ध्यान दृढ करी ध्यासें
तेणें संसृति मूलक अज्ञान समग्र नष्ट पावतसे ।।६८।।

परिपक्व ध्यान बळें लाभे त्या निर्विकल्पक समाधि
साक्षात्कारा उपरी स्मृतिमात्रें होइ त्यास पदसिद्धि ।।६९।।
अद्वय परमात्मा तो मीच अशा अनुभवा मनीं घेई
सविकल्प ज्ञानें या अज्ञान सकार्यची लया जाई ।।७०।।
ध्यानाच्या परिपाकें, मावळती कीं विकल्प अंतरिंचे
नानाकार विकल्पचि त्या ज्ञानैकरूप निर्विकल्पाचे ।।७१।।
ध्येयेतर उल्लेख न तें जाणावें विकल्प मावळला
नसतां विकल्प किमपी निर्विकल्पक स्वभावची उरला ।।७२।।
धुउनी पुसुनी चित्रा काढियल्या भिंतची स्वतां उरते
चित्राचें संमार्जन भिंतीच्या प्राप्तिला निवळ पुरतें ।।७३।।
तैसें विकल्प नसल्या स्वभावता निर्विकल्प मनचि उरे
आत्मस्वरूप लाभा देतो विकल्प त्याग एक पुरे ।।७४।।
याहून इतर नाहीं प्राप्त व्यवस्थान अधिक पावन तें
माया प्रभाव योगें भुलती पंडित न त्यास हें कळतें ।।७५।।
हें पद अद्वय कळतें क्षणमात्रें श्रेष्ठ बुद्धिमानांना
अधिकारी तीन पदा उत्तम मध्यम कनिष्ट आणि मना ।।७६।।
उत्तम जाणे तें पद उपदेशें एकदां श्रवण काळीं
साधे ध्यान तयाला मननबळें आत्मरूपिं मिठी घालीं ।।७७।।
पडति न क्लेश अशा अधिकाऱ्या तें स्वरूप जाणाया
ग्रीष्मीं रात्रीं ज्योत्स्नीं घडलें मम वृत्त ऐक या ठाया ।।७८।।
त्यावेळीं फुललेल्या उद्यानांगणिं पत्नि संगमीं शयनीं
स्थित होतों मी मदिरापानमदें धुंद जाहल्या नयनीं ।।७९।।
सिद्ध गणांचें भाषण मधुर त्र अद्वैत तत्व संबंधीं
गगनांतिल ऐके मी तत्क्षणिं मी जाणिलें पद न अवधी ।।८०।।
लव मात्र वेळि केले ध्यान न मनन पदहि पूर्ण जाणितलें
यापरि अर्ध मुहूर्तीं पावन पद मर्जाश जाण कीं कळले ।।८१।।
चित्त समाहित राही पुढति मुहूर्तभर समाधिच्या स्थितित
तेणें मग्न जहालों परमानंदाचिया समुद्रांत ।।८२।।

नंतर सावध होउन ये चित्ति विचार कीं महद्भुत हें
स्थान मला लाधे जें परमानंदमय अपूर्व बहु आहे ॥८३॥
अत्यंत अपूर्व स्थळ लाभे मज मी पुन्हा तिथें जाई
इद्राचें स्वर्ग सुखहि तुच्छ गमे त्या पुढें नको होई ॥८४॥
सत्यादिक लोक सुखें याच्या लेशा समान नव्हति पुरीं
नच कळलें मज आधीं घालविला व्यर्थ काल आजवरी ॥८५॥
जैसा चिंतामणिचा निज ठेवा विसरुनी कुणी घरचा
पिष्टाच्या मुष्टीस्तव झिजवी कीं उंबरा घरोघरचा ॥८६॥
त्यापरि लोक पहा हो स्वात्मानंदास नेणुनी श्रमती
अत्यंत श्रम योगें क्षुद्र बहू विषय सूख मिळवीती ॥८७॥
तेव्हां बाह्य सुखाची खटपट माझी पुरे नको आतां
स्वात्मानंद समुद्रीं मग्न रहावें असे गमे चित्ता ॥८८॥
न लगे मजला आतां व्यर्थ व्यवहार बाह्य मज वाटे
चर्वितचर्वण सम हें तिरस्कृत कष्टप्रद जणुं सराटे ॥८९॥
पुनरपि भोजन तेंची शय्याही तीच माल्यही तेंच
वस्त्रालंकारहिते स्त्री भोगहि ते नवीन नाहींच ॥९०॥
निंद्य व त्याज्य विषय ते सेवित जाण्यांत काय लाभ असे
वागे इतर जनांसम मीहि, गमे यापुढें मज न कोसें ॥९१॥
निश्चय ऐसा करुनी अंतर्मुख व्हावया बघे जेव्हां
दुसरा विचार शुभसा माझ्या चित्तांत उगवला तेव्हां ॥९२॥
आश्चर्य ! असा कैसा भ्रम मातें होय कीं पहा न कळे
आनंदें पूर्ण असा आत्मा जरि मी असे तरी कसले ॥९३॥
कर्तव्य मला उरलें प्राप्तव्यच काय आणि अप्राप्त
मिळणार कुठें कधि तें जरि तें होणार कीं मला प्राप्त ॥९४॥
अप्राप्ताची प्राप्तिच होय जरी सत्य ती कशी होई
परिपूर्ण चिदानंदीं मद्रूपीं संभवे क्रिया कायीं ॥९५॥
देह व इंद्रिय गणमन दिसती स्वप्नासमान कीं मिथ्या
माझेंच असे गमती सर्व अखंडैकरस चिदात्मीत्या ॥९६॥

एकांत:करणा त्यांतुन करितां विरुद्ध मज काय मिळे
दुसरीं अनिरुद्ध मनें असतीं माझींच कीं असेंहि कळे ।।९७।।
अनिरुद्ध निरुद्धमनें सर्वहि माझ्याच ठायि दिसतात
तरि माझ्या एक मना निरोधितां लाभ काय हो त्यांत ।।९८।।
झाला सर्व मनांचा निरोध जरि होइ काय तरि माझा
थोर महाकाशाहुन मज होय निरोध लाभ काय दुजा ।।९९।।
पूर्णानंदीरूपीं माझ्या तरि तो समाधि होय कसा
मी पूर्ण चिदानंदें आकाशापरिस अधिक पूर्ण असा ।।१००।।
आत्माच असे मजला शुभाशुभच कोणती क्रिया आहे
माझ्या सामर्थ्यावर कोटयवधि शरीर भास होताहे ।।१०१।।
आणिक जरि त्यामाजीं क्रिया होति भासमान तरि काय
मजला यास्तव आतां लेशहि कर्तव्य कांहि नच होय ।।१०२।।
आनंदपूर्ण आत्मा असतां मी मज निरोधनें काय
समाधि कीं व्युत्थानीं सत्य व पूर्ण स्वभाव मी होय ।।१०३।।
तरि आतां हा देह स्थित ज्या क्रियेंत तिथेंच तो राहो
सुमहानंद मंदिरीं स्थिर मज तरि नाहिं हानि कीं लाहो ।।१०४।।
अपरिच्छिन्न सुपूर्ण प्रकाशरूपी निरंजन असा मी
वर्णियली स्थिति त्याची यापरि अधिकारि तो असे नामी ।।१०५।।
बहुजन्म साधनानें अधमाला ज्ञानफळ मिळे जाण
श्रवणें मननें मध्यम सतत निदिध्यास साधनें करुन ।।१०६।।
ध्यानाभ्यास बळानें लाभे त्या पुढति सम्मकज्ञान
दुर्लभ साधारणत: समाधिजे ज्ञानयुक्त ते जाण ।।१०७।।
ज्ञानफलविहीन जरी शतशाहि समाधिकाय करणार ?
विज्ञान रहित ऐशा समाधिनीं काय लाभ होणार ? ।।१०८।।
लोकीं मार्गी जाता वस्तू जरि निर्विकल्प मन पाहि
देखे अभावनेनें म्हणुनी अज्ञान त्या विषयि राही ।।१०९।।
हे निर्विकल्प ज्ञान ज्ञान मात्रकीं निज स्वरूप असे
तें भासमान असुनी विकल्पेंच भास त्या परी न दिसे ।।११०।।

त्यावरि आच्छादान जों राहि विकल्पामुळें न तें भासे
होता विकल्प निरसन पुनरपि तें भासमान भासतसे ॥१११॥
ज्ञान ज्ञेयांतिल हा न जाणिल्या भेद अकळ ते राही
तेंच पुढें ज्ञात गमे ज्ञान क्रम हा तुला कथी पाही ॥११२॥
झाले श्रुत तुजला हें पटवुन घे तूं स्वतां विचार करी
प्रत्यक्ष जाणिल्यातें विज्ञानबळें कृतार्थ होशि तरि ॥११३॥
अष्टावक्रा यापरि जनकें बोधून पूजिलें मानें
घेउन आज्ञा त्याची मुनि गेला स्वगृहास हृष्टमनें ॥११४॥
श्रवणें मननें तदुपरि झालें त्या आत्मतत्व विदित खरें
निःसंशय परमपदीं स्थित जीवन्मुक्त होउनी विचरे ॥११५॥

**इतिश्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे अष्टावक्रीय**
**सप्तदशोध्यायः ।**

गुरुदत्त म्हणे भार्गव ! कथिली तुज वेद्यरहित संवित्ती
ही शुद्ध ज्ञान कला प्राप्तीच्या संधि लोकिं बहु येती ।।१।।
मायाविमोहित जना अपरिचयत्वें न जाणतां येते
स्थिति तीं सूक्ष्म दृष्टिच्या पुरुषांना ने तरास कळुं येते ।।२।।
रामा ! अधिक कशाला ऐके सारांश तुज कथीताहे
मन जाणे वेद्याला वेद्य न तें वेद्य वेगळें राहे ।।३।।
मन हें राहूं शकतें वेद्य विनिर्मुक्त आत्मरूपानें
यास्तव वेद्यरहित मन जाणे तूं शुद्ध वित्ति नावानें ।।४।।
वित्ति प्रकाशरूपा म्हणुनी ती ज्ञान सर्वदा असते
अन्यापेक्षा न लगे अनवस्थापत्ति सर्वही टळते ।।५।।
भार्गव पदार्थ भासति तुज तें तव भास हो तसे नाहीं
भासत नसल्या तूं मग नाहि तूं प्रश्न तव कसा पाही ।।६।।
गगन फुलासम असुनी इच्छिसि तूं निज हितास सांग कसा
अभावरूप असा तूं तुज आत्मा प्रत्ययास आणुं कसा ।।७।।
सामान्यपणें जाणे स्वतांस परि त्या विशेष भावपणें
नेणे मी म्हणसी जरि सामान्यचि नित्य रूप तव जाणे ।।८।।
तवरूपीं ठाव नसे विशेष भावास सर्व तुज कळतें
जाणुनि पूर्ण सकल तूं व्यर्थचि तव चित्त मोह कवळी तें ।।९।।
वस्तूंना भासवि जें ज्ञान असे तें विशेष आकारें
सामान्यचि तवरूपा भासविशी तूं स्वता न कुणि दुसरे ।।१०।।
देहादिक योगें तूं भासशि तरि ऐक मी तुला कथितों
तनु संकल्प चित्ति जें भास तया तैंचि एरवी नसतो ।।११।।
करि तूं सूक्ष्म विचारा स्फुरतें देहत्व जें इतर पहासी ?
संकल्पित वस्तु दिसे येइल देहत्व त्याहि वस्तूसी ।।१२।।

ज्याचा ज्याचा करिसी संकल्प तव स्वरूप तें दिसतें
तरि मग सर्वात्मकची रूप तुझें एक देहमात्र न तें ॥१३॥
दृश्यचि तव रूप नसे कारण त्या नाहि दिसत निश्चितता
तूं दृङ्मात्रचि होसी दृश्य नव्हे ती कदापि चितिमाता ॥१४॥
दृग्देवता स्वप्रभा दृश्य विशेष लेश रहितची समज
देह देश काल अशा चित्रांनीं शोभते जरी सहज ॥१५॥
तरि वर्जी संकल्पा शेष उरे तेथ शुद्ध चैतन्य
रूपचि तें आत्म्याचें करि निश्चय तें स्वरूप तव नान्य ॥१६॥
दर्शन होउन त्याचें देहादिक सर्व भाव लोपावें
कारण संसाराचें अज्ञान लया जाइ मोक्ष तो पावे ॥१७॥
मोक्ष असे आकाशीं पातालीं भूतलीं असें न वद
संकल्प वर्जनाने प्रकटे शुद्धात्मरूप मोक्षपद ॥१८॥
मोक्ष, स्वरूप रूपचि म्हणुनि न अप्राप्त तो कदा जाण
केवल मोह निरासें होत असे कीं कृतार्थता पूर्ण ॥१९॥
मोक्ष न अन्य स्थितिचा कृतक तरी तो विनाश पावतसे
स्वरूप स्थिति मोक्षाची ती विण शशशृंग परि कुठेंच नसे ॥२०॥
परिपूर्ण व सर्वत्र स्वरूप तरी मोक्ष राहि बाह्य कसा
प्रतिबिंबें दर्पण कीं स्वरुपाहुन भिन्न मोक्ष नाहि तसा ॥२१॥
बंधाच्या नाशातें जनि म्हणती मोक्ष अन्य नाहि असा
नाश अभावरूपची मग तो सत्य व भावरूप होय कसा ॥२२॥
भावा भावात्मक जरि वस्तु तशी संभवे न जगि कांहीं
स्वप्नांतिल भाव तरी उभयात्मक सर्व असति कीं नाही ॥२३॥
स्वप्नी दिसती सत्यचि जागरि त्या बाधची अभावपण
येन पदार्थाननुभव अभावानुभव बाधतो जाण ॥२४॥
ज्या बाध योग ऐसा असत्य ते जाण इतर ते सत्य
स्वप्नादिक दृश्याचा अनुभव मिटुन बाध होइ अगत्य ॥२५॥
भावा भावात्मक ज्या स्वप्नापरि वस्तु सर्वही मिथ्या
ज्यातें कोठें व कधी स्पर्शेना की अभाव तेजा त्या ॥२६॥

चित्तत्व असे एकचि न दुजें सत्य सर्वात्मना पूर्ण
म्हणुनी मोक्ष नसे कीं त्या सत्याहून भिन्नसा जाण ॥२७॥
पूर्ण स्वरूप चितिचें स्फुरण कळे एकदांचि तो मोक्ष
चेत्याचें परि वर्जन करितां चिति पूर्ण पाहि अपरोक्ष ॥२८॥
चेत्याच्या आभासें होई संकोच जाण चितिरूपीं
चेत्या भावी चितिही अपरिच्छिन्न स्वपूर्णता व्यापी ॥२९॥
जरि म्हणसी चिति लागीं होय परिच्छेद देशकालाचा
तरि तो चेतन कीं जड असतो हें स्पष्ट सांग बोल वचा ॥३०॥
तो जड न संभवे कीं चेतनही व्यापिते चिति अशेष
लोकीं कालें करुनी दिसे परिच्छिन्न भाव जो त्यास ॥३१॥
परिच्छेद्यत्व येई काल करी परिच्छेद चिति योगें
व्यापी चिति उभयांना तैं पावति ते स्थितीस कीं स्वांगें ॥३२॥
जरि न व्यापी चिति त्यां परिच्छेद कसे सिद्ध होति सांग बरें
चिति बाह्य चेत्य असते परिच्छेद करिल ते चितीस खरें ॥३३॥
चैतन्याविण चेत्या सिद्धि कशी शक्य सर्वथा पाही
चिति बाह्याचा ये न ज्ञानी संबंध सिद्धि त्या नाहीं ॥३४॥
एकांशें चित्त्याश्रय इतरांशें करि तिला परिच्छेद
तरि ऐसें न म्हणूं ये इतरांश न चिति विना असे सिद्ध ॥३५॥
म्हणुनी बाह्य सकलही वस्तू असती निमग्न चिति आंत
यापरि चेत्य जात ते सर्वहि चित्योदरीं असे वसत ॥३६॥
मग तें कैसें होई परिच्छेदक त्या चितीस जी पूर्ण
रामा मिथ्या चेत्यचि युक्त करी तूं विचार संपूर्ण ॥३७॥
भासे जें चिति माजीं प्रतिबिंबा परिच तें असे पाही
एका भावापोटीं न दुजा लोकीं दिसे कुठें राही ॥३८॥
भावांचा संकर हा शक्य न तो दोष थोर होइ पहा
वा ! बाह्यभास सर्गभ्रममूलक पूर्वि कथि तुला मी हा ॥३९॥
त्याचा आश्रय घेउनि राहति हे भाव सर्व, सत्य कसें ?
चैतन्यरूप आत्मा शक्तिबळें बाह्य सर्व नटत असे ॥४०॥

स्वातंत्र्य शक्तियोगें भासें चिति बाह्य अन्य कांहि नसे
यापरि भाषण गुरुचें ऐकुनि भार्गव पुनः तयास पुसे ॥४१॥
भगवन् आपण कथिलें सर्व मला तें अशक्यची गमतें
एकच शुद्ध चिति कशी विचित्र रूपें दिसे न संभवतें ॥४२॥
संवित्वेद्य असति कीं भिन्नद्वय वस्तु सर्व अनुभविती
चिति स्वप्रकाश असो चेत्य असे भास्य भिन्न होय किती ॥४३॥
व्यवहारीं प्रकाशित प्रकाशकाहून भिन्न वस्तु असे
त्यापरि चिति भासविते चेत्या तद्भिन्नचि चिति रूप नसे ॥४४॥
चेत्य न येच अनुभवा चैतन्यात्मक, जसें तुम्ही कथिलें
अष्टावक्र मुनीतें जनक महात्मा असे पहा बोले ॥४५॥
वर्जन संकल्पाचें केल्या मन निर्विकल्प होत असे
ज्ञान निर्विकल्प मिळे ज्ञानें संसार नाश पावतसे ॥४६॥
आत्मस्वरूप तेंची कथिलें परि शक्य तें कसें न कळे
आत्म्याला मन साधन, जाणे करितो मनामुळें सगळे ॥४७॥
आत्म्याला मन नसतां नाहीं तो भिन्न कीं जडाहून
मनरहित जड म्हणावें आत्म्या वैशिष्टच ये मनाकडुन ॥४८॥
मन योगें आत्मा हा पावे बंधास तेंवि मोक्षास
आत्मा बंध विकल्पें मन निर्विकल्पक मोक्ष दे त्यास ॥४९॥
मन आत्मा होय कसें मन हें साधन तयास जाण असे
स्थिति निर्विकल्प होतां मनरूपें द्वैत शेष राहतसे ॥५०॥
लोकीं भ्रांति विषय हा मिथ्या तरि भ्रांति जाण सत्य असे
म्हणुनी द्वैत नसे मुळि ऐसें हें जाण सिद्ध होत नसे ॥५१॥
नसलेल्या वस्तूचा व्यवहार कुठेंच नाढळे पाहीं
जगतीं वस्तू सर्वहि असुनी स्थिर चालवीति कार्येंही ॥५२॥
तरि त्या असत्य कैशा मग तुमचें सिद्ध होइ अद्वैत
सर्वत्र भ्रांति असे अभ्रांति भ्रांति कशि असे ज्ञात ॥५३॥
सर्वांना भ्रांति कशी एक परी होतसे गुरू राया
शंका डांचिति चित्तीं विनवी मी आपणा निवाराया ॥५४॥

या परि सरळ प्रश्नां ऐकुनि सर्वज्ञ गुरुवरा तोख
वाटे चित्तीं तेव्हां म्हणती बा ! ऐक उत्तरें चोख ।।५५।।
पूर्वीं सर्वचि कथिलें परि पुसणी पुनरपीहि ठीक असे
चित्त समाधान वरी नच तों पुसणें पुन्हा अयोग्य नसे ।।५६।।
पुसल्यावांचुन गुरुतें शिष्य मनोगत तरी कळेल कसें
जीवांच्या बुद्धिमधें भेद तरी तर्क भिन्न होति तसे ।।५७।।
स्वाभिप्राय न कथितां संशय निर्मुक्त त्यास कोण करी
प्रश्न करी ज्ञानादृढ आणि पहा कीं निरूपणा वितरी ।।५८।।
शंका न पुसे जो त्या विद्या अवगत कदाहि होत नसे
एक चितीनें बहुपरि भासावें शक्य पूर्ण वाटतसे ।।५९।।
एकचि आदर्श जसा प्रतिबिंबांनीं अनेकधा भासे
पाही स्वप्नामाजीं मन एकचि बहु विकल्प रूप दिसे ।।६०।।
दृष्टा दर्शन दृश्यचि आपण होउन अनेकधा विलसे
त्याचपरी संवित्‌ही बन्हाकारी विचित्र भासतसे ।।६१।।
चिति एक व चेत्य दुजें स्वप्नींही द्विप्रकार चिति भासे
अंध प्रकाश नसतां स्पर्शानें वस्तु सर्व जाणतसे ।।६२।।
अंधहि अवलोकी ती वस्तु नाना प्रकार स्थितियोगें
परि त्या शुद्ध चितीविण कोणासी काय भासते सांगे ।।६३।।
प्रतिबिंबाचें भासन आदर्शाबीण कधिहि होत नसे
आदर्शातिरिक्त असे प्रतिबिंबा राहणेंच शक्य कसें ।।६४।।
त्याच परी चिति वाचुन भिन्न असे कांहि भास्य शक्य नसे
म्हणुनी मन हें रामा ! चिति वांचुन अन्य कांहि नाहि असे ।।६५।।
ज्ञातृ ज्ञेय ज्ञानचि मन जैसें स्वप्नि जागृतीं तैसें
केवल कार्य सिद्धि हो म्हणुनी मन करण कल्पिलेंचि असे ।।६६।।
स्वप्नतरू छेदाया स्वप्नीं साधन कुठार कल्पित ही
तेथें क्रियां असत्यचि साधन तरि सत्य तें कसें पाहि ।।६७।।

मिथ्यानर श्रृंगानें कधि कोणा तरि विदारिलें आहे
यास्तव रामा कैसें मन साधन चेत्य सिद्धितें पाहे ।।६८।।

स्वप्नीं क्रियेस कारण दृक्‌शक्तीलाच म्हणती मन ऐसें
दृक्‌शक्ति विभिन्न असें मन केव्हांही क्रिया करीत नसे ॥६९॥
केवळ चैतन्यात्मा स्वातंत्र्येंची मनादि रूपांतें
कल्पुनि दृष्यद्रष्टा भेदांनी करि समस्त कार्या तें ॥७०॥
क्वचितचि केवळ असतो निर्विकल्पक स्थितींत आत्मा तो
बा ! चित्तत्व चिदात्मा हा परिपूर्ण स्वतंत्रची असतो ॥७१॥
चित्तत्व स्वप्रकाश असे यास्तव आकाश तुल्य नसे
एरवि उभयांमध्यें भेद असा अन्य कांहि नच भासे ॥७२॥
आकाशापरि आत्मा हा पूर्ण अनंत सूक्ष्म अजविमल
सर्वाधार असंगचि व अमृतहि असे व्यापुनी सकल ॥७३॥
चैतन्य एक जास्ती आकाशा ठायिं ते मुळींच नसे
चैतन्य पूर्ण गगना आत्मा अभिधान सत्य येत असे ॥७४॥
आत्म्यांत व आकाशीं तिळमात्रहि भेद याविणें नाहीं
आत्मा आकाश असे गगनहि आत्माच एरवी पाही ॥७५॥
उलूक रवि प्रकाशा अंधारचि समजतें मनीं जैसें
अज्ञानी आकाशा मानिति आत्माचि जाण तूं तैसें ॥७६॥
ज्ञानी मर्म समजती ' आत्मा आकाश होय ' वाक्याचें
पराचिति परेशानी स्वच्छ स्वातंत्र्य बळ असे जीचें ॥७७॥
भासतसे कीं आपण बहुरूपें करुनिया परिच्छेद
जैसा स्वप्नामाजी भासवि पुरुष प्रकार बहुभेद ॥७८॥
घेउन अनेकरूपें मानव पर्वत सरादिकांचींहीं
तैसी चिति ही भासे बहुधापरि भिन्नभिन्न रूपांहीं ॥७९॥
परि ती स्वातंत्र्येनें संवित् परिपूर्ण एकटी असते
जरि एक ऐंद्र जालिक त्याची क्रीडा अनेकधा दिसते ॥८०॥
प्रेक्षकवर्गा भासे बहुधा परि एकटा स्वदृष्टीनें
त्या परि निर्विकार चिति विलसे कीं एक पूर्ण जाण मनें ॥८१॥
शुद्धैकरूप चितिही रूपें भासते परिच्छिन्न
आवृत मायेनें ती होउनिया भासते बहुभिन्न ॥८२॥

मायावरण चितीचें मर्यादित लोक दृष्टिला भासे
गारोड्याची माया भ्रमवि दुजा परि न त्यास शून्य असे ।।८३।।
अति दुर्घट स्वातंत्र्य परचितिचें होय तेंच कीं माया
लोकीं योगी मांत्रिक ऐंद्र जालिकहि झिजवुनी काया ।।८४।।
माया वृत्त स्वातंत्र्य युक्तीनें घेति दुर्घटहि करिती
तरि मग परमचितीला मोठीशी गोष्ट काय आहे ती ।।८५।।
एकदेशिया ठायीं अहंभावचि परिच्छेद चितीला
या भावनेस नाहीं पूर्णत्व अविद्याच म्हणति तिजला ।।८६।।
सारांश परशुरामा ! चितिही शुद्ध स्वतंत्रता योगें
स्वात्मपरिच्छेदानें एकचि परि बहुविधा दिसूं लागे ।।८७।।
येथें भुलती पंडित तार्किक विद्वान बहिर्मुखत्वें कीं
आत्मस्वरूप त्यांनीं अपरोक्षें जाणिलें नसे लोकी ।।८८।।
गुरूपदिष्ट असें जें सत्य असत्य स्वतां न जों पाही
अंतर्मुख होउन तो न करीतत्शोधशब्दि जो राही।।८९।।
तों न तथा फळ कांहीं लाभे जरि बहुपरोक्ष ऐकियलें
रामा तुजला कथि जें तें अंतरिं पाहिजेच लक्षियले ।।९०।।
चिच्छक्ति परम देवी सर्वां सामान्य ती प्रकाशमयी
भिन्न जडाहून असे जडजाताकार ती स्वयें होई ।।९१।।
चिति स्वप्रकाश म्हणुनि ठेवि अहंतास्वरूप विश्रांती
चैतन्यांतरिं पावति विश्राम जडें तयामुळें दिसतीं ।।९२।।
जड न स्वतांच भासे स्वरूप विश्रांति त्यामधें नसते
स्वप्रकाश चिति भासे अनन्यापेक्ष ती सदा असते ।।९३।।
चिति भासमान होई स्वयेंच म्हणून स्वात्म विश्रांति
पूर्णाहंता तीतें योग्य, जडें न स्वतां कधिंच दिसती ।।९४।।
स्पर्श नसे भेदाचा असे न परिच्छेद कांहि चिति ठायीं
भासे सर्व दृष्य हें तीवर कीं नगर दर्पणा पायीं ।।९५।।
भेद कसा संभवतो कोण करिल परिच्छेद ती लागीं
पूर्ण स्वरूप चिति ही स्फुरत असे पूर्णता तिचे स्वांगीं ।।९६।।

स्वामीं विश्राम जिचा पूर्णाहंता असे तया नाव
या परि परशूरामा ! चिन्मात्र अखंडैकरस असे तत्व ।।९७।।
तत्व निरूपण वेळीं ज्या बहुनामेंचि भासमान असे
सामर्थ्य तें तयाचें स्वतंत्रता शक्ति तन्मयचि भासे ।।९८।।
एका अग्नी ठायीं प्रकाश व उष्णता उभय असती
स्वातंत्र्य व विश्रांती सह तेवी एकरसचि संवित्ती ।।९९।।
अघटित घटनाकर्ती शक्ति असे तीस म्हणति कीं माया
तीचें स्वरूप हें कीं दर्पण सम एक रस चिति ठाया ।।१००।।
नाना विचित्र भासा भासुवुनी दुर्घटास घडवीते
भासन कालीं तरि चिति निजरूपें अढळ एक रस असते ।।१०१।।
मर्यादित भासा त्या जाणावें कीं अनात्म भास असे
जड शक्ति अविद्याती शून्य हिते प्रकृति अन्य कांहि नसे ।।१०२।।
अत्यंता भाव असे आकाश प्रथम सर्ग तम म्हणती
हीं नामें त्यास दिलीं आदि परिच्छेदनांत जे होती ।।१०३।।
परिपूर्ण चिदात्मी जें अहं असें स्फुरण जाण ती भ्रांती
होई एक देशता भासन आकाश त्यास की म्हणती ।।१०४।।
'अहमात्मा' भावरहित आत्म प्रांतांत शेष जें राही
आकाश त्या म्हणावें संसार बीज तेंच कीं पाही ।।१०५।।
अज्ञानी जन दृष्टिस कोचर जो तोच हा असे भेद
रामा सूक्ष्म दृष्टिनें आकाश असें पाहतोसि तें शोध ।।१०६।।
आकाशचि जीवांचें त्यांतिल तें होय आत्म चैतन्य
आत्मा तुझा तसें तें अन्य शरीरींहि भासते नान्य ।।१०७।।
चिदानंद घन आत्मा तें त्याचा सत्य होय हें जाण
कल्पित यापरि स्वतां वपुगत आकाश राहि घेरून ।।१०८।।
चैतन्या तें म्हणती मन या आत्माच तें नसे अन्य
आवरक जडत्वाच्या दृष्टीनें म्हणवि मनचि चैतन्य ।।१०९।।
आवृत तत्व दृष्टि त्या प्रमात तथाच जीव बोलि अशी
त्या जीवें कोमल मृदु विरल विमल भाव युक्त आकाशीं ।।११०।।

केली कठिन, दाट घन मलिन दुजीपाहि कल्पना ऐशी
या चार भावनांतुन व आकाश पंच भूतांसी ॥१११॥
जननत्व मिळे त्यांचा पुढति बने देहजीव देहात्मा
आवृत देहाकडुनी कुंभोदरि दीप कीं प्रकाशात्मा ॥११२॥
व्यापी दीप प्रकाश कुंभांतर हाचि दंश देहांतें
आंतुन करि प्रकाशित गुप्तवें अंत करवि भानातें ॥११३॥
दीपप्रभा घटाच्या छिद्रांतुन जेवि बाह्य जात असे
तेवी चिदंश देहीं अक्षद्वारेंचि बाह्य जाणतसे ॥११४॥
पूर्ण व अक्रियचितितें गमन कसें बाह्य जाण संभवतें
आवरकाकाशातें चिति जों स्वज्ञान शक्तिनें करिते ॥११५॥
सारुनि दूर तोंवरीं चितिचें निर्गमन बाह्य भासतसे
स्फूर्ति शक्ति क्रिया ही म्हणजे व्यापार मनचि करित असे ॥११६॥
यास्तव रामा मन हें आत्माच असे न होय कांहि दुजें
चंचल चिति मन म्हणती आत्मा निश्चल चितीस तूं समजे ॥११७॥
आवरक निवारण हें चलन चितीचें विकल्प या म्हणती
हेंची रूप मनाचें तरिच जें विकल्प निरसना करिती ॥११८॥
विज्ञान पूर्ण रूपचि शेष उरे निर्विकल्प मोक्षद तें
रामा संशय न धरी चित्तांत विकल्प सोडिल्यावरते ॥११९॥
आवरण शेष राही ऐसा कारण नसेच आवरण
आवृति सत्य नसे कीं तो केवळ कल्पिली स्वतां जाण ॥१२०॥
मन चिती "शत्रुये निंदी मारी व बांधुनी घाली"
परि मिथ्यता विचारा संकला संकल्प सोडितां आली ॥१२१॥
निंदा बंधन ताडन सर्वंहि जाती लया क्षणार्धांत
कांहि न त्यांतिल उरतें त्यचपरि येथ समज चित्तांत ॥१२२॥
रामा ! बंधन सेंकीं येथें कोणा अनादि पासून
जडात्म भ्रांति सोडी बंध नुरे पाहि कीं तपासून ॥१२३॥
'बंधन असे' याभावें दृढ होई महाबंध अन्य कांहि नसे
बालक बागुल धांकें मिथ्या भयभीत चित्ति होत कसे ॥१२४॥

जोंवरि बंध असे ही भ्रांति लया जाईनाच तों कोणी
बुद्धिमान ही यत्नें नच संसृति मुक्त होय तूं मानी ॥१२५॥
चैतन्यात्म्या निर्मल बंध कसा संभवे असे कुठला
स्वात्मादर्शी भासे प्रतिबिंबात्मक दृश्य तेंच चितीला ॥१२६॥
बंध करी सत्यत्वें तरि दर्पणिचाहि अग्नि जाळुं शके
बंध खरोखर आहे मन एक असे उभयभाव हे देखे ॥१२७॥
असती बंधचि केवळ नसतां, तो कोठें व कधींच नसे
हे उभय भावमळ जों सुविचार जळें न जाति निर्मळ ॥१२८॥
धुतले स्वच्छ तोंवरी त्याचा संसार नाश करण्याला
काय मलाच विधीला भगवान् विष्णूस नीळकंठाला ॥१२९॥
कीं श्रीविद्यादेवी त्रिपुरेसही शक्ति नाहिं कोणाला
यास्तव परशूरामा त्यजि उभया पात्र होइ सौख्याला ॥१३०॥
म्हणूनी रामा मन हें उरे निर्विकल्पक स्थितींत जरी
तरि तें आत्ममात्रची म्हणूनी द्वैता तिथें नसेच उरी ॥१३१॥
'हें अमुक' असे भासे मन तेची अन्य जाण नच कांही
'हें अमुक' वर्जिल्यावरि आत्माची भान मात्र तो राही ॥१३२॥
रज्जू सर्प भ्रांती व्यवहारी सत्य वस्तुवर होई
रूपे सत्यचि रज्जू भासवि सर्पास निश्चयचि पाही ॥१३३॥
म्हणुनी सर्पा होई बाध अबाधीत रज्जु ती राही
रज्जूज्ञान उरे ते चिद्रूपाहून अन्यची पाही ॥१३४॥
घडला प्रकार जरि हा स्वप्नीं तरि रज्जु बाध त्या अंती
मग रज्जू ज्ञान कसें राहि निरालंब नष्ट झाली ती ॥१३५॥
यास्तव दृश्याचा लय होता तज्ज्ञान चिन्मयचि होई
तें भिन्न चित्म्याहुन नुरता ती द्वैत सिद्धि नच पाही ॥१३६॥
लोकीं व्यवहार जसा स्वप्नींही त्यापरीच भासतसे
स्वप्नस्थिति त्यावेळीं स्थिर ऐसी अनुभवास येत असे ॥१३७॥
स्वप्न व जागृति मध्ये हाच असे भेद तू मनीं आण
जागृदवस्थेमाजीं स्वप्नस्थितीस येइ असत्यपण ॥१३८॥

स्वप्नस्थितीत न कळे जागृद्व्यवहार सर्व मिथ्याहें
तरि पण इतक्यानेची जागृदवस्थेसि सत्यतानोहे ॥१३९॥
जागृति वस्तूजैशा स्थिर क्रियावान जेवि असतात
तैशाच स्थिर सक्रिय स्वप्नी नाहींत कां कधी दिसत ॥१४०॥
जागर भाव स्वप्नी, स्वप्नींचे जागरीं कदा न नसती
दोन्ही ही तत्काळीं स्थैर्य कार्यें समानची असती ॥१४१॥
सूक्ष्म विचारें पाही स्वप्नी जागरी भेद तो काय
ऐंद्रजालिक प्रकारीं स्थिरता व्यवहारही पहा होय ॥१४२॥
तरि तेवढ्यावरूनी सत्य तया काय बा ! म्हणों येई
सत्यासत्य विचार प्राकृत लोकां नसे कळत काई ॥१४३॥
यास्तव मोहित होउन मानिति ते सत्य जाण जगताला
स्पर्शन अभाव करि ज्या केव्हा ही सत्यची म्हणा त्याला ॥१४४॥
वस्तू भासेन जरी, अभानचि तें चितीस कधि नसते
जगती अनेक वस्तू म्हणुनी त्यांचे अभान की असते ॥१४५॥
एका भावीं दुसरी भासतसे चक्र की अभानाचे
विचारूनि कधी कोठे केव्हा होई अभान या चितिचें ॥१४६॥
चिति जेव्हां नच भासे ' जेव्हां ' तें तरि कसें बरें भासे
भासेल काय तरि मग न भासेचि ती विणे कळेल कसे ॥१४७॥
काल व भासन दोंचे अभान जरि ती चितीच भासतसे
यास्तव चिति सत्य असे तुज सत्यासत्य भेद सांगतसे ॥१४८॥
अन्यापेक्षे वांचुन भासे जे की स्वतां असे सत्य
इतर असत्य, नसता रज्जू सर्पादिक न ठरति मिथ्य ॥१४९॥
असत्य बाधें जें तरि पदार्थ असुनी भ्रमें नसे भासे
नसतां मुळि वस्तूती अस्तित्व तिचे कधी कधी उमसे ॥१५०॥
म्हणुनी बाधजयातें असत्य व सत्य बाध ज्या नाहीं
हा पक्ष अयोग्य असे असती अपवाद या बहुत पाही ॥१५१॥
चित्या भान तरि ' नसे अन्य ' ' नसे अन्य ' हेंहि नाहींच
' चैतन्य नसे भासत ' म्हणतो तार्कीक खर महासाच ॥१५२॥

मीच नसे म्हणती तो मग म्हणणार काय कोणि तरी
आत्माभान म्हणुनि जो संदेहा आत्मभाव विषयिधरी ।।१५३।।
ऐसा तार्किक तर्कें अन्याचा मोह नष्ट करिल जरी
मग गंडशिला सुद्धां करण्यातें काज शक्त होय खरी ।।१५४।।
सत्यापरि जरि भासे क्रिया वस्तुची न सत्य ती समज
विज्ञान प्रकार हे सगळे दिसति कीं भ्रांतिरूप मज ।।१५५।।
परि या भ्रांती लागी सत्य असे मानणे महा भ्रांती
असत्यता वस्तूंची जों न कळे भ्रांति तो पहा असती ।।१५६।।
हा जगता भास पहा सर्वांना सत्य सारखा भासे
परि तो भम रजताचा शिंप ज्ञानें जसा कळे नासे ।।१५७।।
चैतन्यात्मज्ञानें विज्ञान भ्रम असें उघड कळते
आकाश निळें आहे सर्वांना सारखें तसें दिसतें ।।१५८।।
तैसाच हा जगद्भ्रम सर्वांना समचि दोष साम्याने
अभ्रांति तें कळे जें विज्ञान शुद्ध चिदात्म रूपाने ।।१५९।।
या परि रामा पुसिलें तू जें तें सयुक्तिकचि कथिले
सोडी संशय सर्वहि करि निश्चय ज्यापरी श्रवणि आलें ।।१६०।।
प्रश्न तुझा पूर्वीचा "मुक्त व्यवहार संभवे कैसा"
त्याचें उत्तर आतां रामा तूं ऐक बोलतों जैसा ।।१६१।।
मुक्त ज्ञानी असती उत्तम मध्यम कनिष्ट या परिचे
घेती प्रारब्धवशे क्षणोक्षणीं सौख्य दुःख भोगाचे ।।१६२।।
स्वरूप ज्ञानी परि ते असती त्या ज्ञानि मंद की म्हणती
दुसरे भोगिति भोगा प्रारब्धें परि न लक्ष त्या देती ।।१६३।।
निद्रिस्त डांस दंशा जेवी तो ज्ञानि मध्यमचि जाणा
अमितहि प्रारब्ध वश कर्म फळें वेढिती जरी त्यांना ।।१६४।।
तरि ते स्वरुपापासुन नच ढळती आपदांस नच गणिती
आश्चर्य थक्क न करी सौख्य महाहर्षवी न सुदृढमती ।।१६५।।

अंतरि शांत इतर समबाह्य व्यवहार उत्तम ज्ञानीं
समजे यापरि होती ज्ञान परिपाक व बुद्धि भेदांनी ।।१६६।।

प्रारब्धें ज्ञान्यांचे व्यवहार विचित्र भिन्न कीं होती
मधुमत्तांच्या परि तूं त्याचे व्यवहार जाण संभवती ।।१६७।।

इतिश्री त्रिपुरा रहस्ये ज्ञानखंडे अष्टादशोध्याय:

|| ज्ञान स्थिति विभेद ||

## अध्याय १९

श्रीदत्तात्रेय मुखें श्रवण करी जाहलें समाधान
भृगुनंदन विनवी त्या मुक्त व्यवहार मज करी कथन ॥ १ ॥
भगवन् बुद्धि भेद कै कारण हो ज्ञान पक्वता भेदा
ही गोष्ट सविस्तर मज पुनरपि गुरुराज सदय पूर्ण वदा ॥ २ ॥
आत्मस्वरूप भाव ज्ञान तरी एकमेव समचि असे
प्राप्तव्य तेंच सर्वां मोक्ष तरी आत्मरूप भिन्नसे ॥ ३ ॥
ज्ञानाच्या परिपाकीं अधिक उणा भेद बुद्धि भेदाने
होइ कसा घडतें कीं साधनि त्यां काहि भेद असल्याने ॥ ४ ॥
यापरि भार्गव पुनरपि विचारितां श्रीगुरू दयाळ तया
विस्तारें त्या विषया करिती प्रारंभ त्यास सांगाया ॥ ५ ॥
श्रवण करी तुज कथितों मी सर्व रहस्य पूर्ण समजेसे
साधनि भेद नसे त्या ज्ञानोपेय कि अभिन्न एक असें ॥ ६ ॥
परि तारतम्य साधनि होण्यानें प्राप्त फलि विभेद दिसे
साधन पूर्णावस्था पावे तै ज्ञान पक्व होत असे ॥ ७ ॥
परि तें अपूर्ण असता पूर्तीस्तव कष्ट होति ते चांग
वस्तुतः साधनाचा ज्ञानास्तव तरि असे न उपयोग ॥ ८ ॥
ज्ञान नसें साध्य कधी स्वभावता ते स्वयंहि सिद्ध असे
चैतन्य खरोखर तें स्वयं प्रकाशचि सदैव भासतसे ॥ ९ ॥
नित्य भान स्वरूपा साधन आवश्य ते नसे काही
ते प्राप्तरोधन जळें धुतल्याने वासना चिखल पाही ॥ १० ॥
मग्न ज्ञान असे ते अनंत वासना पंकि नच दिसते
ते प्राप्त रोधन जळे धुतल्याने वासना चिखल असते ॥ ११ ॥
चित्त करंडा सुदृढ प्रयत्ने विचारती त्रयंत्राने
बहुकाळे बंद असा युक्त बळें उघडताच नेटाने ॥ १२ ॥

अंतरि चिद्रत्न दिसे जे भासवि आपणा व आभासा
यास्तव रामा साधन ठरते आवश्य वासना नाशा ॥ १३ ॥
वासनाधिक्य आणि न्यूनत्वची करिती विवेक बुद्धीने
जो वासना समूहे आच्छादिली बुद्धि जाण की असते ॥ १४ ॥
तोवरि साधन आहे अपेक्षित तयास भृगुवरा मान
वासना बहु प्रकारा परि त्यातुन मुख्यकरि तुला कथन ॥ १५ ॥
अपराध, कर्म काम त्रिविध असति मुख्य वासनाभेद
आत्म विनाशक ऐसी वेदा श्रद्धाच होय अपराध ॥ १६ ॥
विपरीत ग्रह दुसरा अपराध असेच दोष पुरुषात
अमित विद्या निपुण नर असल्याने मग्न याच दोषात ॥ १७ ॥
सत्संग शास्त्रज्ञ असुनि ते पावती न परतत्व
निर्विशेष परतत्वच नाही संभवेन त्यास सत्यत्व ॥ १८ ॥
असले तरि त्या कोणी कधिहि जाणावयास शक्त नसे
जरि जाणिलें तरि नव्हे परतत्वच हे असेहि मानितसे ॥ १९ ॥
हे तत्व जाणिल्याने मोक्ष कसा संभवे असे नाना
संशय विपरीत ग्रह अश्रद्धा ग्रासि यापरी त्यांना ॥ २० ॥
अपराध वासना ती हीच असे आद्य जीस म्हणती कीं
शतशासहस्रशाही शास्त्री विद्वान कुशल अवलोकी ॥ २१ ॥
होती स्वाधीन हिच्या जाती संसृति पुरात वाहून
ज्यांची पूर्व दुष्कृतें संस्कारें बुद्धि जाहली मलिन ॥ २२ ॥
तत्वोपदेश समयी तो त्यांना नीट ग्राह्य नच होई
आचार्य कथी बहुपरि ते व्यर्थचि सर्व अकल की जाई ॥ २३ ॥
ती कर्म वासना जी चित्त निरोधे अजिक्यची वाटे
कर्तव्य शेष म्हणवी तो काम अनंत त्यास बहु फाटे ॥ २४ ॥
सागर तरंग किंवा गगनीं नक्षत्र कणहि भूमीचे
किति असती मोजुनिया सांगू ये नच अशक्य ते साचे ॥ २५ ॥
एक तर काम संख्या परि शक्य न सांगणे असे कोणा
काम वासना तिसरी ही रामा ! निरूपिला तुला जाणा ॥ २६ ॥

ह्या काम वासनेला गगनाहूनहि विशाल जी अचल
अधिक गिरीहून असे म्हणती आशा पिशाच्चि की सकल ।।२७।।
लोक सकल ही योगे होती पहा की भ्रमिष्ट उन्मत्त
जाळी जणु सर्वांना दुःखे आक्रोश ते असति करित ।।२८।।
काही थोर महात्मे वैराग्य महामंत्र बळ सहायाने
ती पासुन सुटुनीया झाले अति शांत शीत अंगाने ।।२९।।
रामा ! त्रिविध वासना योगे मन पूर्णची भरून राहे
यास्तव आत्म तत्व ते नच त्याते भासमान होता हे ।।३०।।
वासना नाश म्हणुनी फळ घ्यावे साध्य साधनें करून
अपराध वासनालय सुविचारें होइ निश्चया वरून ।।३१।।
दुसरी निवृत्त होते या जन्मीं कीं अनेक जन्मांनी
ईश्वर कृपेच केवळ नच दुसऱ्या कोटिशा उपायांनी ।।३२।।
कामवासना तिसरी साधन वैराग्यची लया नेई
विषयीं दोष दृष्टिविण वैराग्य प्राप्ति नच कधीं होई ।।३३।।
थोडयाफार जशा ह्या असतिल कीं कामवासना चित्ती
थोडी फार तयापरि ठेवावी दोष दृष्टि लागे ती ।।३४।।
परि या सर्वाकारण आद्य असे कीं मुमुक्षुता जाण
मनन श्रवणादिक हे पडती कामी न मुळिच ती वीण ।।३५।।
त्यांचे मुख्य फल नव्हे प्राप्तच वक्तृत्वया कलाये ते
वक्तृत्व ज्ञानाने परमपद प्राप्ति त्या कशी होते ।।३६।।
नसता मुमुक्षुता जें ऐकियले की विचार योगाने
दृढ केले सर्वहितें व्यर्थ जसे प्रेत भूषित नगानें ।।३७।।
मंद मुमुक्षा व्यर्थचि फल श्रुतिवरी उठेल इच्छाजी
सामान्य जसि असे ती उपयोगा नाहि पडत फलकाजी ।।३८।।
फल ऐकुनि पुण्येच्छा कर्म, फलावहन ते पहा असते
सर्वत्र जीवधर्मी फल श्रुतिवरि करितीच इच्छा ते ।।३९।।
यास्तव मंद मुमुक्षा मोक्ष फला प्राप्त करून देत नसे
ती जशि तीव्र होय त्या परि मोक्ष तयास शीघ्र लाभतसे ।।४०।।

ऐशी तीव्र मुमुक्षा एक पुरे सर्व साधनी होई
प्रवृत्ति साधनि होई तत्परता नामती तदा घेई ॥४१॥
सर्वांग दग्ध कोणी शीतलतेवीण वांछिना काही
तेवी मुक्ती वांचुन अन्य अपेक्षा जया प्रती नाही ॥४२॥
तैं त्या होइ मुमुक्षा उत्कट अति मोक्षफल दती जाण
अन्य फला लागीं तो धारण करि दोष दृष्टि ते पूर्ण ॥४३॥
वैराग्य तीव्र असल्या मुमुक्षा क्रमेचि तीव्र होत असे
वैराग्य दोष दृष्टी जन्यकरी प्रेम विषयि नाही से ॥४४॥
तीव्र मुमुक्षा लाभे वैराग्यें जी मुळेंच तत्परता
तत्परता तीव्र करीं प्रवृत्ती साधनींच सादरता ॥४५॥
तीव्र प्रवृत्ति योगें बहु अद्‌भुत लाभतेंच मोक्ष फळ
या परि श्रीगुरु भाषण ऐकुनि भृगु पुत्र संशयें विकल ॥४६॥
होई संदिग्ध मनें प्रश्न करी गुरुवरास पुनरपितो
भगवन् पूर्वी कथिलें सत्संगचि मुख्य मोक्ष फळ देतो ॥४७॥
करि दोष दृष्टि कथितां ईशाचा पाहिजे अनुग्रह कीं
तरि तीनी मुख्य असें कोणतें वलभ्यते कसें लोकी ॥४८॥
घडतें न कारणाविण काही निश्चित असे नियम ठरला
हेतू वांचुन कैसें राहति हे कथि सविस्तरचि मजला ॥४९॥
पुसता ऐसें भार्गव दयानिधि श्रीगुरु वदति त्याला
ऐके भार्गव ! कथितो श्रेयासी मुख्य हेतु तो तुजला ॥५०॥
श्री देवि पराचितिजी स्वकिय स्वातंत्र्य वैभवें पूर्ण
भासविते जग चित्रा स्वात्मीं प्रतिबिंब दर्पणीं जाण ॥५१॥
त्याच परादेवीने धारण करूनी हिरण्यगर्भतन
कल्याणार्थ जिवांच्या अनाद्य विद्येच होति जे मलिन ॥५२॥
सर्व मनोरथ पूर्णक विद्याविधि वेद निर्मिले चांग
जीव स्वभावि असती विचित्र बहु कामवासना लाग ॥५३॥
कैशा परि जीवांचे होइल हित हा विचार करुनी ते
बहु भिन्न फलद ऐशा करिती निर्माण काम्य कर्मां ते ॥५४॥

सदसत्कर्मे करिती जीव सकल स्वभावतां पाही
पुढति कर्म परिपाकें त्यांतिल फलोन्मुख होउनी काही ।।५५।।
नाना योनी फिरता नर जन्मा प्राप्त होतसे जेव्हां
होइ वासना वश मग करू लागे काम्य कर्म तो तेव्हा ।।५६।।
परि पूर्ण काम होण्या करिता तो ईश्वरा पुजी नेमें
ईश्वर विषयक शास्त्रें अवलोकी मग कधी कधी प्रेमें ।।५७।।
प्रवृत्त काम्य कर्मा फल श्रुति मुळें पहा कुणी होई
परि सूक्ष्म कर्म दोषें इष्ट फला अंतरुनि तो राही ।।५८।।
त्या उद्वेगें पुढती काय करावे कळून घेण्याला
सत्पुरुषाते शोधुनि जाइल तो त्याकडे पुसायाला ।।५९।।
तेथे प्रसंग येई ईश्वर माहात्म्य कानि पडण्याचा
होय पुण्य परिपाके ईश कृपे तो प्रवृत्तची साचा ।।६०।।
सारांश पूर्व पुण्यें घडतो सत्संग त्यामुळे त्याला
अत्यंत दुर्मिळ अशी लाभे सोपान पंक्ति मोक्षाला ।।६१।।
प्राय: सत्संग असे साधाया मोक्ष आद्य कारण की
क्वचित् कुणा पुण्य बलें किंवा उत्कृष्ट तप बळें लोकी ।।६२।।
गगनांतून एकाकी फल पडतें त्यापरी मिळे श्रेय
कारण वैचित्र्यानें ज्ञान प्राप्तीहि भिन्नसी होय ।।६३।।
अधिक उण्या बुद्धीनें आणि कमी जास्त वासना योगें
थोडचा फार साधनें ज्ञानी स्थिति भिन्नसी दिसू लागे ।।६४।।
सहजें ज्याच्या बुद्धीं असते अति विरल वासना जाल
थोडचाच साधनें तो पूर्ण ज्ञानासि पात्र होईल ।।६५।।
नसती शुद्ध वासना ज्याच्या चित्तीं स्वभावता जाण
ज्ञान प्राप्ती त्याला बहुकाळें करून साधनाचरण ।।६६।।
मन ज्याचें पूर्ण असे स्वभावतां दाट वासना योगे
झाले ज्ञान जरि तया लुप्त असें राहि रवि ढगा मागें ।।६७।।
त्याचें साधन चालू राहि तरी ज्ञान पूर्णता पावे
म्हणुनी ज्ञान्यांची स्थिति दिसते कीं भिन्न राम ! समजावे ।।६८।।

चित्त पक्वता भेदें स्थिति माजीं भेद भासतो जाण
अधिक कमी जशि इच्छा व्यापी बुद्धीं तयापरी ज्ञान ॥६९॥
कमि जास्त भिन्न असतें ज्ञान्यांची स्थिति तरीच भिन्न दिसे
ज्ञान्यांच्या स्थितिमाजीं भेद परस्पर कसा कधी परिसे ॥७०॥
ब्रह्मा विष्णु महेश ज्ञानी हे जन्मतां पहा असती
स्वाभाविक गुण भेदें त्याची स्थिति वेगवेगळी दिसते ॥७१॥
ज्ञानीं मालिन्य असे त्यांच्या हें बोलणेंचि शक्य नसे
प्रकृतीच्या गुणभेदें त्यांच्या कार्यांत भिन्नता भासे ॥७२॥
ज्ञान्याची कृष्णतनू शक्य नसे गौर ती प्रतीकरणें
त्यापरि चित्त धर्मकीं प्रकृति गुणा शक्य नाहि पालटणें ॥७३॥
आम्हांकडे पहा की आम्हि असू तीन पुत्र अत्रिवरा
दुर्वास चंद्र मीही ज्ञानी स्थिति आमची न एक सरा ॥७४॥
क्रोधी भोगी त्यागी प्रथम दुजा मी विहीन संगासी
कर्मठ वशिष्ठ असती सनकादिक संग रहित संन्यासी ॥७५॥
नारद भक्ति प्रेमीं मग्न सदा दैत्य पक्ष घे कवि तो
देवाचा पक्ष गुरू घेउनि असुरा समस्त जिंकवितो ॥७६॥
श्रीव्यास कुशल वादीं शास्त्रें रचण्यांत दंग बहु सतत
जनक पहा राज्य करी कौपीन वरी विरागि जडभरत ॥७७॥
यापरि इतर ज्ञानी प्रकृतिवशें वागतात भिन्नरितीं
कथितो रहस्य त्याचे भार्गव तुजला परिस विशुद्धमती ॥७८॥
त्रिविध वासना कथिल्यापैकीं जी कर्मवासना दुसरी
बुद्धिमांद्य व मूढता लक्षण जीचे असे बलिष्ट खरी ॥७९॥
स्पर्श न लेश तिचा ज्यां ते असती बुद्धि मान सहजेंची
अपराध वासनालय पावतसे कामवासना त्यांची ॥८०॥
नष्ट न अभ्यासें करि नच होइ ती प्रतिबंधक ज्ञाना
यास्तव वैराग्याचा नसतो उपयोग फारसा त्यांना ॥८१॥
आवश्यक नसती त्यां मननध्यानादि समाधिही पाही
श्रवण एकच पुरे त्यातत्काल मनन ध्यासची होई ॥८२॥

त्यां पूर्णात्म पदकले असंदिग्ध, होति नष्ट संशयते
पावति जीवन्मुक्तावस्था जनका परीच शुद्ध मते ।।८३।।
सूक्ष्म व निर्मल त्यांच्या बुद्धिमुळें कामवासना पूर्ण
विपरीताभ्यास बळें नष्ट न त्या जाहल्या जरी जाण ।।८४।।
जाणितल्या परम पद पूर्वी ज्या कामवासना होत्या
नष्ट न झाल्यायोगें पूर्वि जशा कीं प्रवृत्त राहति त्या ।।८५।।
परि त्या करूं न शकती त्यांच्या बुद्धीवरी मुळिच लेप
विद्वान अशा ज्ञात्या 'बहुमानस' बोलती निराक्षेप ।।८६।।
कर्मवासनायोगें मन ज्याचें मूढ जाहलें अति कीं
जरि त्या भगवान्शंकर बोधी त्या ज्ञातपद नव्हे लोकीं ।।८७।।
अपराध वासना दृढ त्या ज्ञान कळे न जाति जरि कल्प
प्रथम द्वितिय वासना ज्याच्या मनिं वागती बहुस्वल्प ।।८८।।
कामादि वासनापरि दीर्घ असे श्रवण करुनि पुष्कळदा
मनन निरंतर करुनी समाध्यभ्यास छंद धरून सदा ।।८९।।
साहुन कष्ट अतीशय बहुकाले ज्ञान होय लभ्य तया
अभ्यास प्राकर्ष्यें व्यवहारी अल्प वागते काया ।।९०।।
मन त्याचें नष्टपरी असते की वासना क्षया योगें
ज्ञानी मध्यम वदती नष्ट मानस तया तसा अंगे ।।९१।।
त्यापैकी कोणाचा अभ्यास कमी असुन वासना लेश
उरत असे, मन त्याचें पूर्ण नव्हे नष्ट राहि अवशेष ।।९२।।
मंद ज्ञानि असति ते समनस्क तयास जाण म्हणतात
केवल ज्ञानि म्हणवी, तो जीवन्मुक्त इतर असतात ।।९३।।
ज्ञानी केवळ होती दुःखा भागीच दैव तंत्राने
देहाच्या अंतीं ते पावति मोक्षास जाण नियमाने ।।९४।।
'नष्ट मानस' ज्ञानी प्रारब्धा जिंकुनी जनीं वसती
प्रारब्ध बीज वाफुन भोगांकुर मनो भूमिवर निघती ।।९५।।
पूर्णभाव मनाचा असतो कीं नष्ट मानसा ठायीं
प्रारब्ध बीज नासे नष्ट बळचि कुसळ बीज खडक भुई ।।९६।।

अति बुद्धिमान जैसा करितो दशपंच काज एकदम
कोठे न अडुन पडतो अचुकपणे साधि सर्व काज सम ॥९७॥

ऐसे क्रिया निपुण नर आढळती बहूत या जगावरते
दिसतो मनुष्य जातो मार्गी बोले व कर्म करि हाते ॥९८॥

मन असुनी एक कशा क्रिया तीन एकदम पहा होती
शिष्य समाजी ज्यापरि पठणीं गुरू सहज सर्व ओळखिती ॥९९॥

कोण अशुद्ध म्हणे तैंनुच्चारी कोण शुद्ध ठीक म्हणे
त्वत्शत्रुराम ! वधिसी सहस्रार्जुनास पूर्ण तू जाणे ॥१००॥

त्याच्या सहस्रकरिं तो घेउन पृथकायुधें तुशी लढला
अस्खलित एक वेळीं चालवि शस्त्रें तुवांचि देखियला ॥१०१॥

मन होउनि बहुविध नर एका वेळीच जीं क्रमें करूनी
येती अचूक कार्ये बहुविध करितो तशापरी ज्ञानी ॥१०२॥

आत्माकार असुनि मन बाह्य विषयाकारही जरी होई
स्वस्थिति अढळच राही 'बहुमानस' म्हणुनि नाम त्या येई ॥१०३॥

तत्प्रारब्ध मनोभूवरि जे अंकुर दशेस येत असे
ज्ञानाग्निदग्ध करि त्या पुन:पुन्हा घडत जाइ कीं तैसें ॥१०४॥

प्रारब्ध बीज वाफे सुख दु:खांकुर तयास येत असे
त्यांचा विचार फल हें जरि अंकुर दग्ध येइ फल कैसें ॥१०५॥

उसन्या अनुसंधानें व्यवहारा करि पहा असा ज्ञानी
गमतीनें बाल जनीं प्रौढ दिसे खेळतां जसा कोणी ॥१०६॥

मिथ्याहारी जीती दु:ख व आनंद बाह्य तो दावी
बहुमानस जो त्याची स्थिति तैशी हर्षि शोकिं समजावी ॥१०७॥

अन्याच्या कार्यीतिल नसती आंतून हर्ष शोक जसे
ज्ञानी व्यवहार तसा बाह्य दिसे स्वस्थतांच आंत असे ॥१०८॥

ज्ञान्या अशा न घडला विरुद्ध भावनाभ्यास नाशाया
अंतर्वासना, तसा मनावरोधहि तयास निवटाया ॥१०९॥

म्हणुनी ज्ञानोत्तर त्यापूर्वी परि उठति वासना चित्तीं
यास्तव कर्मठ कोणी क्रोधी कामी कुणी असे दिसती ॥११०॥

ज्ञानी उत्तम यापरि विविधा चरणास दाविती लोकीं
समनस्क तयामाजीं मंदज्ञानी निरूपिला तो कीं ।।१११।।
मंद ज्ञानी निश्चित मानी हे दृश्यजात सत्य नसे
स्वरुप ज्ञानोपरि त्या अन्य समाधीं न कांहि भासतसे ।।११२।।
स्वरूपानुसंधानें स्थिति करणें मुख्य ती समाधि असे
निर्विकल्प स्वरूपचि सर्वां आधार मूळ विलसतसे ।।११३।।
स्फुरत असे तें सर्वां सतत तयावीण अन्य कांहि नसे
व्यवहार स्थिति माजीं अनुभव त्याचा समाधि येत असे ।।११४।।
परि तितक्यानें कांहीं सर्वां लभ्य न समाधि मोक्षाची
राहति स्वरूपस्थितिं अखंड जे त्या समाधि कीं साची ।।११५।।
व्यवहारीं ज्ञात्या चिति वेद्यरहितशी सदैव भासतसे
आकाशावर्ण नसे नील कळे दृष्टि तें तरीहि दिसे ।।११६।।
असत्यत्व वेद्याचें कळल्यां ते चितिस युक्त होत नसे
कळल्या तत्व तयामधि अतत्वांत भेद अन्य नच भासे ।।११७।।
ठरल्या असत्य वेद्यचि चितिशीं संबंध त्या कसा होई
ज्ञानी व्यवहारीं ही वेद्य संबंध विरहितची राही ।।११८।।
भास नहि बाधिताचें होई तरि वित्ति वेद्य युक्त नसे
अमनस्का मन नाशें पाही उन्मनि दशा सदैव असे ।।११९।।
नि:संकल्प स्थिर मन तेव्हां उन्मनि दशाच ती आहे
चलन मनाचे असणें तें सत्यच वेद्य संगती पाहे ।।१२०।।
उभयावस्था ज्ञानी उत्तम तो एक कालिं भोगितसे
असते समाध्यवस्था सतत व्युत्थानिं तोहि राहतसे ।।१२१।।
यास्तव त्याची असते संगरहित सदैव जाण संवित्ती
पूर्वी विचारलें त्वां ते कथिलें सर्व आण तूं चित्ती ।।१२२।।

इतिश्री त्रिपुरा रहस्ये ज्ञान खंडे ज्ञान स्थिति विभेद
कथनात्मक एकोनविंशत्याध्याय: ।।१९।।

## ॥ विद्यागीतानाम ॥

## अध्याय १९

यासंबंधी पूर्वी घडला वृत्तांत कथितसे तुजला
सत्यलोकिं अतिपावन चतुरानन सभे पूर्व कालाला ॥१॥
ज्ञाना प्रसंग घडला अतिसूक्ष्म असा विचार चर्चेला
पुढती आला तेथें होते सनकादि शिष्ट वेळेला ॥२॥
पुलस्त्य पुलह ऋतु भृगु अत्रि अंगिरा विधिज तथा च्यवन
वामदेव प्रचेता विश्वामित्रहि अरुंधती रमण ॥३॥
गौतम सुमंतु काश्यप देवल ही कण्व दक्ष आणि शुक
लिखित व्यास महर्षी असति पराशरहि त्यापरी शंख ॥४॥
आणिक इतरहि ऋषिगण त्यापरि राजर्षि मुख्य त्या समया
थोर अशा ज्ञान मखीं होते एकत्र सर्व त्या ठाया ॥५॥
तेथे त्या सर्वांनी अत्यंतचिसूक्ष्म विषय काढूनी
केली मोठी चर्चा पुसती विधिलागि नम्र होऊनी ॥६॥
भगवन् आपण सर्वहि लोकीं आहो परावर ज्ञाती
आम्हा सर्वांची स्थिति दिसते वेगळी प्रकृति भेदानीं ॥७॥
सतत समाधिस्थ कुणी राहति मीमांसारत कित्येक
दुसरे भक्ति प्रेमी मग्नचि कर्मठहि असति आणीक ॥८॥
कांही बहिर्मुखापरि उद्योगा चालवीति नियमाने
तेव्हां या सर्वांमधि सांगावे श्रेष्ठ कोणते विधिनें ॥९॥
सध्या स्वपक्ष श्रेष्ठचि आहे समजूत आमची ऐसी
प्रश्ना ऐकुन जाणुन अविश्वासु असेविधि वदे त्यासी ॥१०॥
मुनिहो ! जाणे जरि हें मीन तें ठीक महेश जाणे तो
निःसंदेहपणें हें सर्वात्मा सर्वज्ञच म्हणवीतो ॥११॥
तेथें जाऊं विचारूं ब्रह्मा मुनिसह पुढें निघे पाही
विष्णूसह भगवान् शिव होते कैलासि तेथ तो जाई ॥१२॥

प्रश्न मुनींचा विधिने मांडियला मग महेश पुढती तो
त्या ऐकुन विध्याशय जाणुन देवेश मनि विचारीतो ॥१३॥
मुनि अश्वस्त मन खरें नसती सश्रद्ध तरि कथी मी कीं
व्यर्थचि सारें जाइल यापरि चित्ती विचार अवलोकीं ॥१४॥
कथिले पीतरि म्हणती स्वमता परि हेंहि एक मत आहे
करुनी विचार ऐसा मुनि लागीं मग महेश वदताहे ॥१५॥
ऐका मुनि हो ! भीतरि जाणे न स्पष्ट हें असंशयता
परमेश्वरि विद्येचे ध्यान करूं आम्हि सर्वंची आतां ॥१६॥
होतां प्रसाद तीचा मग हा गूढार्थ आपणास कळे
ऐकुन शिव वच ऐसें विष्णूशंकर विधिसह मुनिसगळे ॥१७॥
श्रीविद्या देवीचें श्रीत्रिपुरा चिच्छरीरि जी जाण
ध्यान करूं लागति ते चित्त समाहितचि आसनीं बसुन ॥१८॥
ध्यानस्थ सर्व होतां ध्वनि गंभीर नभमंडळी होई
झाली प्रकट तिथें ती पराचिद्देवता मग शब्दमयी ॥१९॥
वदली कशास्तव तुम्ही केले मत्ध्यान हेतुमज सांगा
ईप्सित मद्भक्तांचे केव्हांही विफल होइना मागा ॥२०॥
आकाशवाणि यापरि ऐकुनि मुनि वंदनास ते करिती
ब्रह्मादि देव सर्वहि सादर तिजला नमूनिया स्तविती ॥२१॥
ऋषिगण सर्व म्हणति हे त्रिपुरेश्वरि देवि हे महेशानी
श्रीविद्या देविपरा नमन असो आमचे तुज भवानी ॥२२॥
अखिल जगास्त्रजुनी तूं ठेविसि स्वात्मींच त्यास रक्षूनी
स्वांतरि तल्लय करिसी नमन असो आमचे तुज भवानी ॥२३॥
जन्म नसे तुज म्हणुनी अनूतना असिसि सर्वदा तू कीं
तुजला नसे जरा ती नवात्मिका तू सदा पहातों की ॥२४॥
सर्वहि तूं सर्वज्ञा तूं सर्वानंद रूप सार दिसे
सर्व शून्य नच जाणे असार आनंद रहित तूंच असे ॥२५॥
पुनरपि तुज नमन असो मागें व पुढेंहि पाहतों तुजला
खालींवर तसि पार्श्वीं सर्वत्र तुला करीत नमनाला ॥२६॥

कथि आम्हा परापर स्वरूप तुझें ज्ञान आणि ऐश्वर्य
ज्ञानफल व तत्साधन कोण असे सांग साधकीं आर्यं ।।२७।।
सिद्धीची पूर्णस्थिति कोण असे श्रेष्ठ सिद्ध पुरुषांत
हें सर्व कथी आम्हां क्रमयुक्त नमस्कार तुजसि करित ।।२८।।
ऐसे प्रश्न मुनींचे ऐकुन महादेवि ती प्रसन्नमने
मुनि विषयीं प्रेमभरें स्पष्ट व उत्कृष्ट बोलते वचनें ।।२९।।
मुनि हो ! परिसा प्रश्ना तुमच्या मी उत्तरें क्रमें वदत
वेदार्णव मंथुन अजी सारामृत हें तुम्हा करीं देत ।।३०।।
आदर्शी प्रतिबिंब सम जग उपजे राहतें जयाठायी
अंती लयही पावे सर्वांना भासतें असें पाही ।।३१।।
आत्मज्ञान हीन त्या जें जगदाकार रूपची भासे
योगीजन अनुभविती ज्यातें स्वात्मींच निर्विकल्प असे ।।३२।।
गंभीर शांत जलधापरि निश्चल जाणती जयाला तें
भक्त अनन्य अतिशय प्रीतीं कापटच वर्जुनी ज्यातें ।।३३।।
सेविति नित्य सादरें आवडि अद्वैतपद असेंहि कळे
कल्पिति देवभक्त तरि विभेदभावा धरून भक्तिबळें ।।३४।।
अंतःसूत्र असे जें इंद्रिय मनबुद्धि यांस चाळवितें
नुरतें कांहि अभानीं ज्याच्या शास्त्रें परोक्ष जें कळतें ।।३५।।
तीच परा प्रतिभा ममदेवीचें रूप पर असें आहे
अमित ब्रह्मांडांच्या बाह्य असा अमृत जलधि जो आहे ।।३६।।
त्यांत मणि द्वीपांतरि कदंबवनी मणिमंदिरीं जाण
पंचब्रह्म मंचकीं त्रिपुर सुंदर अनादि असे मिथुन ।।३७।।
जे मूर्ति, रूप माझें अपर असे ऋषिवरा तुम्ही समजा
त्यापरि ईशान सदाशिव विधि विष्णू व पत्नि ज्या गिरिजा ।।३८।।
गणेश स्कंद दिक्पति शक्तिगणदेवता तथादितिज
देव नाग यक्ष तसे किन्नर किंदेव आदि जे पूज्य ।।३९।।
ते सर्व अपर रूपचि माझे असती परंतु मूढ जन
सर्वत्र मीच असुनी मोहें मज नेणतीच अज्ञान ।।४०।।

जरि भजती ते त्यांना भजती मातेंच फळहि मी देई
मजहून अन्य भजनिय नाहीं कोणी तसाच फलदायी ।।४१।।
जो भजतो मज जैसा त्याला देतें तसेंच फळ लोकीं
माझें ऐश्वर्य असे अपरिच्छिन्नची ऋषिवरांनो ! कीं ।।४२।।
अद्वय चिन्मय असतां किमपिन घेतां सहाय कोणाचें
मुनि हो ! भासतसे मी जगदाकारचि अनंत रूपाचें ।।४३।।
स्फुरतें जगदाकारें तरि माझें रूप अढळची राही
ऐश्वर्य असे माझें दुर्घट घडवूनि आणि तें पाही ।।४४।।
अवलोकावें मुनि हो ! ऐश्वर्य मम दृष्टि सूक्ष्म करुनी ते
आश्रय सर्वां अंतरि त्यांच्या असुनी असंग मी असते ।।४५।।
होते मुक्त वरिवरी असुनी मी नित्यमुक्त की साची
शिष्यत्वें सद्गुरु तें सेवन घे प्राप्ति आत्मरूपाची ।।४६।।
संसृति मध्यें पुनरपि पडते मी आत्मरूप विसरून
ऐशा विशाल जगता निर्मितसे मी न घे उपादान ।।४७।।
यास्तव नानापरिचें माझें ऐश्वर्य हें असे अमित
झाला सहस्र मुख तरि करुं न शके जाण तोहि तद्गणित ।।४८।।
परिसा तुम्ही कथित मी माझ्या ऐश्वर्य लेश मात्रेची
भासतसे विचित्र ही जगयात्रा प्रसृत सर्व की साची ।।४९।।
बहुविध ज्ञान माझें द्वैताद्वैत परापर भेदाने
तैसे तत्फल असते श्रेष्ठ कनिष्ठ बहुत प्रकाराने ।।५०।।
द्वैतज्ञान बहुपरी द्वैताश्रय देवभक्त त्यास असे
ध्यानोपासनरूपें स्वाप्निक केवळ मनोमयचि भासे ।।५१।।
परमेश्वर नियतीने योजित तें फलदत्यापरी होते
अपरहि बहुविध आहे द्वैतालंबन प्रमुखची असते ।।५२।।
अपरमूर्तिध्यान, जे कथि पूर्वी क्रमें मुख्यफल देई
अद्वैत ज्ञानाला मुख्य ज्ञानची बोलती पाही ।।५३।।
पराविद्या श्रीमती मम चिराराधन नचजरी घडलें
अद्वैत महाविद्या होइ न लभ्य किती जरी झटलें ।।५४।।

अद्वैत विज्ञानची केवल पराचिति होय अन्य नसे
त्याच्याच परिज्ञाने द्वैताची भावना सहज निरसे ॥५५॥

आत्माभिमुख होउनी चित्त अविच्छिन्न मग्न त्यांत जरी
विज्ञानस्पष्टपणें मुनिहो ! ये अनुभवास पूर्ण तरी ॥५६॥

श्रुति वाक्ये तर्काने युक्तकळे आत्मतत्व केवळ जें
या ज्ञान असें म्हणती नाशी देहात्मभाव तें सहजें ॥५७॥

तें होय ज्ञानचि कीं दृश्यसमस्त जगतिं जें दिसतें
या ज्ञाने भासेना दृश्य समस्त मावळुन जाते ॥५८॥

अद्वैत विज्ञान ते विज्ञाने ज्या समस्त जाणवतें
कोठें व कधी त्याला अविज्ञात असे लेश नच उरतें ॥५९॥

हे तापसोत्तमांनो ! विषयाचे अनुभव कीं जें होती
आत्मरूपची सर्वहि तें अद्वैत विज्ञान कीं म्हणती ॥६०॥

ऐशा विज्ञानबळें चिरसंचित नष्ट होति संशय ते
ज्यापरि वायूवेगें आकाशीं अभ्रलेश नच उरते ॥६१॥

ज्याच्या येउं न शकती समोर कीं कामवासना हीन
दंतविहीन अहीपरि समजामम तेंच परम विज्ञान ॥६२॥

विज्ञानाचें फल कीं दुःखें सर्वहि लयास जाऊनी
होई पूर्ण मुक्तता अत्यंत निर्भयतेस पावूनी ॥६३॥

द्वैताच्या संकल्पीं भय असतें ज्ञात होय अद्वैत
तरि कैसें द्वैत उरे सूर्योदयिं तम जसा नसे दिसत ॥६४॥

संकल्प द्वैताचा नष्ट तरी भय कुठून उरणार
जरि अन्य फळ तरि सदैव तें भयद जाण असणार ॥६५॥

कारण आत्मस्वरूप विरहित जें नाशवंत तें जाणा
सांत असे भयदायक निर्भयता किमपि तेथ राहीना ॥६६॥

सर्वत्र आढळे की संयोगावरि वियोग ठरलेला
फलयोग म्हटल्यावरि नष्टत्व कसें चुके तरी त्याला ॥६७॥

वास्तव आत्मरूप नसुन अन्यरूप जोवरी असते
तोंवरि भयनिश्चित त्या सर्व मतें अभय तेथ मुळि नसते ॥६८॥

फलजें अनन्य आत्मीं आत्मा फल मोक्ष त्यासची म्हणती
ज्ञाताज्ञेयज्ञान त्रिपुटी ऐक्यांत अभय फल घेती ॥६९॥
तेव्हांच सत्य मिळतें अभयात्मक मोक्ष फळ असें जाण ।
संकल्प विकल्पशून्य तमरहित स्थितिस म्हणति कीं ज्ञान ॥७०॥
ज्ञात्याचा शुद्धात्मा ज्ञानचिते प्रथम लक्षिलें न वचे
सद्‌गुरू व शास्त्रें उपलक्षक त्या असति नान्य कीं साचे ॥७१॥
हेंच असें रूप पहा म्हणती विज्ञेय ज्यास त्याचें कीं
ज्ञातृज्ञानज्ञेयी अनुगत जों भेद भासतो लोकीं ॥७२॥
तोंवरि ते ज्यारूपें भासति तो व्यर्थ भास कीं आहे
जेव्हां ज्ञात्रादींचा भेद परस्पर गळून जाता हे ॥७३॥
तेव्हां सत्यस्वरूप धन त्याचे प्राप्त होय तेंच फल
ज्ञात्रादी फल लाभ न तो मिथ्या भेद भास तो सकल ॥७४॥
व्यवहार सिद्धि करिता नसता हा भेद कल्पिला आहे
यास्तव येथें कांही प्राप्तव्य नवीन फल नसे पाहे ॥७५॥
मायायोगें जोंवरि आत्माज्ञात्रादिव फल रूपाने
भासे तोंवरि संसृति अचल असे नासते नच कशाने ॥७६॥
जेव्हा ज्ञात्रादीचा प्रसंगवशे भेद नाहिंसा होय
अभ्रालावायुबळें संसारा येइ त्यापरी विलय ॥७७॥
साधन तत्परता कीं एक महामोक्ष सत्य या परिचा
साधाया आहे तें ती असतां व्यर्थ शीण अन्याचा ॥७८॥
तत्परता तीव्र नसे लाभ नव्हे अन्यसाधनें शतशा
यास्तव तत्पर होणें साधन मोक्षास तो जरि हवासा ॥७९॥
साधीन निश्चयें हें चित्तस्थिति जै अशीच तत्परता
ऐसीतत्परता जरी राहि सदा मोक्ष नाहिं ती परता ॥८०॥
कांहि दिने मासें कीं वर्षे जन्मांतरीहि तो मुक्त
होणार विलंबे की शीघ्र जशी बुद्धिशुद्धता युक्त ॥८१॥
बहुदोष बुद्धि असती पुरुषार्थ विनाश जाण ते करिती
ज्यांच्या योगें बहुजन भोगिति दुःखास संसृती पचती ॥८२॥

प्रथम अनाश्वास असे द्वितिय तरी कामवासना होय
तृतिय जाड्यता जाणे यापरि हे तीन दोष समुदाय ॥८३॥
द्वय असति अनाश्वासी भेद पहा संशय व विपर्यय हे
मोक्ष असे कीं नाहीं संशय हा प्रथम दोषची आहे ॥८४॥
नाहींच मोक्ष म्हणतो होय असा विपर्ययचि दोष दुजा
प्रतिबंधक दोषद्वय तत्परते लागि असति कीं समजा ॥८५॥
उलटा निश्चय करितां दोषद्वय पावतीक्रमें नाशा
मूला छेदन करणें उपाय हा मुख्य होय कीं खासा ॥८६॥
मूल अनाश्वासाचें कीं शास्त्रविरुद्ध तर्क चिंतन हें
सोडुन देउन त्यातें सत्तर्काभ्यास साधनीं राहे ॥८७॥
उलटा निश्चय छेदक मूलास असाच दृढ करीताहे
तेथें श्रद्धा उपजुन अनाश्वास नष्ट शीघ्र होता हे ॥८८॥
कामादि वासनाही श्रवणप्रतिबंध करित बुद्धीला
श्रवण प्रवृत्त बुद्धि न होई जरि कामवासना तिजला ॥८९॥
लोकीं कामी दिसतो मग्न सदा काम्यवस्तुच्या ध्यानी
त्याला न दिसे पुढचें कथिलें ऐकू नयेच त्या कानीं ॥९०॥
केलें श्रवण तयानें तरि केल्या सारखें न तें होई
यास्तव कामवासना वैराग्य बळेंच जिंकुनी घेई ॥९१॥
कामक्रोधमुख्यशा सहस्रशावासना असति पाही
जरि सर्वा मूळ असा काम पवे नाश कांहि नच राही ॥९२॥
वैराग्यो पायें तरि करणें त्या कामवासना नष्ट
'अमकें हवे मला' ही आशाची कामरूप तें दुष्ट ॥९३॥
प्राप्य विषयीं केवल स्थूल अप्राप्यीं सूक्ष्म ती जाण
दृढ वैराग्य बळें त्या सर्वांचे करि समूळ निर्दलण ॥९४॥
वैराग्या हेतु असे विषयीं क्षणोक्षण दोषदृष्टि पहा
विषयपराङ्मुख होणें नाशाया वासना उपायच हा ॥९५॥
दोष तिजा बुद्धीचा जाड्य असे जो अशक्य जिंकाया
अभ्यासहि शक्य नसे ऋषिसत्तम ! ज्यास कीं निवाराया ॥९६॥

त्यायोगें श्रवणिं जरी तत्परता तें शिरे न बुद्धींत
जाड्य असे दोष महा करितो पुरुषार्थ नष्ट लोकांत ॥९७॥
परमेश्वर सेवेविण अन्य उपाय त्या प्रति नसे जाण
सेवा होइल जैसी तत्बुद्धी जाड्य करित संहरण ॥९८॥
जाड्य जसें अधिकउणें त्यापरि त्या प्राप्त होय फल लोकीं
जाड्याल्पें याजन्मीं अधिकतरी अन्य जन्मि पावे कीं ॥९९॥
करित मदाराधन जो अकपट निष्काम एकनिष्ठेने
साधन सामुग्री त्या होते की प्राप्त सर्व ममकृपेनें ॥१००॥
सत्वर असा उपासक निर्विघ्नपणें कृतार्थता पावे
करि मी बुद्धिविकासा सर्वांच्या ईश्वरीं मज भजावें ॥१०१॥
नेणुनि दुर्लक्ष करी मातें तत्परहि साधनीं असला
विघ्न गांठिति त्यातें फल लाभीं वानवा असे फसला ॥१०२॥
ऋषि हो सारांश असे तत्परता मुख्य साधन ज्ञाना
तत्परता युक्त असे साधक जो श्रेष्ठ मुख्य तो जाणा ॥१०३॥
मद्भक्तियुक्त त्यावरि असल्या तो सर्वमान्यची लोकीं
मी देह नव्हे आत्मानिश्चय हा सिद्धि तीच अवलोकी ॥१०४॥
देहात्मबुद्धि जाउनि आत्मा मी बोध निश्चयें झाला
बुद्धि मूढतावर्जित होई जै सिद्धि लाभत्या काला ॥१०५॥
आत्म्या विषयी निश्चय असतो सर्वांस ' मी असे ' ऐसा
देहयुक्तचि न केवल जन्ममृत्युचा तयामुळें फासा ॥१०६॥
देहादिकांस भासवि आत्मा केवल चैतन्य तो आहे
ऐसा निश्चय झाल्या संशय जाती लया समस्तचि हे ॥१०७॥
हे ज्ञानसिद्धि जाणा सर्वमान्य अन्य सिद्धि ती नाहीं
खेचरत्वादि तैशा अणिमादिक सानसिद्धि ज्या कांही ॥१०८॥
त्या सर्वसम न होती या ज्ञान सिद्धि षोडशांशाच्या
असती क्षुद्र सिद्धि त्या मर्यादिमाजि देशकालाच्या ॥१०९॥
स्वात्मसिद्धि शिवरूपाही अपरिच्छिन्न जाणकी आहे
आत्मज्ञान साधनी क्षुद्रसिद्धिही सहज लाभती पाहे ॥११०॥

परि त्या आत्मज्ञाना असति विघातक म्हणूनची त्याज्य
इंद्रजाल तुल्य सिद्धि या साधिती न स्वहित सायुज्य ॥१११॥
आत्मप्राप्तीयोगें ब्रह्मपदहि तुच्छ ज्या मनी वाटे
त्याला क्षुद्रसिद्धिचा कालापव्यय म्हणूनि मोह नुठे ॥११२॥
वास्तव आत्मज्ञाना वाचून दुसरी सिद्धि कांहि नसे
तीयोगें दुःख चिर नासे स्वानंदलाभ होत असे ॥११३॥
सिद्धि तीच इतर नव्हे सोडवि जी मृत्युच्या मुखांतून
ज्ञानसिद्धि असते बहुविध जसा अभ्यास जास्त वा न्यून ॥११४॥
बुद्धि नैर्मल्य भेदें तैसें ज्ञान परिपाक भेदानें
ही ज्ञान सिद्धि असते उत्तम मध्यम कनिष्ट नावाने ॥११५॥
द्विजश्रुतिपाठापरि लोकीं मान्य प्रकार सिद्धीचा
दीर्घाभ्यासी ब्राह्मण बहूद्योग शील तीव्र बुद्धीचा ॥११६॥
अस्खलित पाठ म्हणतो श्रुतिचा तो पाठ उत्तमचि जाण
व्यापारी पाठाप्रति लक्ष असे एरवी (अन्यथा) अलक्षपण ॥११७॥
म्हणतो अस्खलितचि जरि पूर्वापरि पाठ मध्यम गणावा
केवळ पाठाचकडे ठेवुनिया लक्ष लागत म्हणावा ॥११८॥
जरि अस्खलित म्हणे तो पूर्वापरि अधम पाठ तो होई
ज्ञानसिद्धिही त्रिविधा त्याच रितीनेच बोलिली जाई ॥११९॥
व्यवहारी लक्षरहित, अव्यापारी समाहिताभावी
नाहीं व्यवहार परी तत्वा प्रति लक्ष जो सदा ठेवी ॥१२०॥
अन्यूनधिक भावें उत्तम मध्यम कनिष्ट सिद्धिहि ती
उत्तम सिद्धी लागीं सिद्धि पराकाष्ठाहि असे म्हणती ॥१२१॥
ती ज्ञान सिद्धि असते निद्रास्वप्नाद्य अवस्थेंत जरी
चिन्मात्राहं भासे विचारक्षणि, 'परमोत्तमा'च तरी ॥१२२॥
व्यवहारी सर्वी जै होउं लागे प्रवृत्ति संस्कारे
आपेआपअयत्नें सिद्धिपराश्रेष्ठ जाण निर्धारे ॥१२३॥
संविद्रूप चिदात्म्या ठायीं प्रवृति सदा अनायासें
होई ज्ञान सिद्धिती परमावधि गांठिकीं म्हणा ऐसें ॥१२४॥

व्यवहारी प्रवृत्तही पाहि पदार्थ व भाव जणु न पाही
द्वैताभान असे तैं सिद्धि म्हणा पूर्णतेस कीं जाई ।।१२५।।
जागृदवस्थेमाजी व्यवहारीं स्वस्थता सुषुप्तिपरी
राही अंतरिं समजा ज्ञानाची सिद्धि पूर्ण होय खरी ।।१२६।।
उत्तमसिद्ध स्थितिचा ऐशा, व्यवहार करित असतांही
भंग न होय समाधीं ज्याच्याकधि सिद्ध उत्तमचि पाही ।।१२७।।
ज्याची श्रेष्ठ धारणा स्वानुभवें स्वांतरींच जाणतसे
इतर ज्ञान्यांची स्थिति सिद्धोत्तम नाम त्यास येत असे ।।१२८।।
तिळमात्र संशय ज्या इच्छा ज्याची समूळ नष्ट असे
व्यवहारीं निर्भय जो सिद्धोत्तम नाम त्यास येत असे ।।१२९।।
लोकीं सुखें व दुःखें व्यवहारहि सर्व जगतिं होत असे
स्वात्म्यावरि मानी जो सिद्धोत्तमनाम त्यास येत असे ।।१३०।।
अत्यंतबद्ध तैसे पूर्णभिजे मुक्त चित्तिं वाटतसे
स्वस्वरूप ज्यास असे सिद्धोत्तमनाम त्यास येत असे ।।१३१।।
बंधाचें जाळे जो पाही अपल्यावरीच पसरतसे
इच्छाना मोक्षा जो सिद्धोत्तमनाम त्यास येत असे ।।१३२।।
ऋषिवर काय कथूं मी जो उत्तम सिद्ध तोच मी समजा
किमपिन भेद असे मज आणि तयामधे मीच तो न दुजा ।।१३३।।
ऋषिवर हो या परि मी स्पष्टपणें प्रश्न सर्व सांगितले
कोणा न मोहबाधी ज्याला याचे रहस्य जरि कळलें ।।१३४।।
यापरि कथुनी अंतीं विद्यादेवी विराम घे राम !
ऐकुन ऋषिवर झाले निःसंदेह आणि पूरित काम ।।१३५।।
नंतर ऋषिवर गेले नमून शिवादिकास स्वस्थाना
रामा ! विद्या गीता कथिली तुज पापनाशि हे नाना ।।१३६।।
करिता श्रवण विचारें मननें स्वानंदराज्य लाभतसे
साक्षात् विद्या कथि हे यास्तव सामर्थ्यवान थोर असे ।।१३७।।
पठण करी नित्य जरी सत्वर त्या आत्मरूप तें गवसे
भवसागरी बुडे त्या गीताही पारकर्ति नाव असे ।।१३८।।

इतिश्री त्रिरज्ञानखंडे विद्यागीतानाम " विंशतितमोध्यायः " ।।२०।।

|| राक्षसोपाख्यान ||

## अध्याय २१

येथवरी मुनिदत्तात्रेय कथित बोध, राम ऐकून
बहुतेक मुक्त झाला तो, माया भ्रांतिजाल तोडून ।।१।।
अत्रिसुता नमन करी सादर त्या प्रश्न करितसे भावें
भगवन् निश्चित ऐशा ज्ञानाच्या साधनास सांगावें ।।२।।
जें सार आणि सोपें, साक्षात् फळदायकचि असावें हो
ज्ञान्याचें लक्षणही हो जेणें ज्ञानि ओळखी लाहो ।।३।।
ज्ञानी तनु भानीं जैं देहाभानीं कशारितीं वागे
व्यवहार करित असुनी अनासक्त चित्त तो कसा सांगे ।।४।।
हें सर्व कृपाकरुनी सांगावें स्पष्टची कळे जैसें
पुनरपि अत्रिसुताते जमदग्नितनयें विनविलें ऐसें ।।५।।
दयासिंधू श्रीगुरू ऐकुनिया विनति होति संतुष्ट
भार्गवरामा परिसे ज्ञान साधन रहस्य कितू स्पष्ट ।।६।।
ज्ञानासि मुख्य साधन देवतानुग्रह हें असे जाण
सादर भाव बळाने होई जो स्वात्मदेव पदि शरण ।।७।।
त्यातें सुलभपरीने, ज्ञानाची प्राप्ति निश्चयें होई
रामापरि कथिलें सर्वोत्तम साधनासि मनि घेई ।।८।।
अन्याची गरज नसे, साधनस्वतां समर्थ देइ फल
सोडुन त्यातें, अन्या भरिल्या, फळ नसे व्यर्थ कीं सकल ।।९।।
हे राम, योग्यच असे कथितों मी, लक्ष देउनी राहे
सर्व पदार्था चितिही भासविते ज्ञानमात्र ती आहे ।।१०।।
तव्दाह्य भासरूपी कल्पिता विद्यावरण तिस झाकी
आच्छादन सुविचारें नासेतें तत्स्वरूप कळतें कीं ।।११।।
तद्दर्शन अन्यांना दुर्लभ बहिर्मुख असति जे त्यांना
अन्यपरता नसे ज्या देवतत्परता युक्त भक्तांना ।।१२।।
सुलभत्वें प्राप्त असे शीघ्र, तया निश्चयें श्रवण मननें
देवतत्पर असे तो करुनी स्वल्पान्य साधनें त्यानें ।।१३।।

आत्मज्ञान प्राप्ती केली साधारणच निरूपणही
त्याचें श्रोत्यां राही करित तदाकार त्यामुळे होई ॥१४॥
यापरि तन्मयता ती निरूपणें दृढशि होतची राही
तेणे शिवता पावे तच्चित्त हर्षखेद रहित होई ॥१५॥
ज्या ज्या स्थळीं तयाचें मनजाय शिवस्वरूप त्यास करी
विज्ञानी उत्तम तो होई व जीवन्मुक्ततेस वरी ॥१६॥
उत्कटभक्ति प्रेमें अन्या शिवरूप–निरूपण श्रेष्ठ
साधन आहे रामा ! ज्ञाना यासम न अन्य उत्कृष्ठ ॥१७॥
भक्तियुक्तनिरूपणा सम नाहीं अन्य साधन ज्ञाना
ज्ञान्याचें लक्षण तें कठिण असे जाणणेंच सर्वांना ॥१८॥
तें असतें सर्वांतर जाण अगोचरहि नेत्र वाणीला
शक्य नच तन्निरूपण शक्य न तें जाणणेंहि इतरांला ॥१९॥
शास्त्रज्ञता कुणाची ओळखणें कठिण जेंवि यालोकीं
देहावस्त्राभूषायोगें न शक्य तसेंच हेंही कीं ॥२०॥
ज्ञानित्व वेद्य असतें स्वानुभवामात्र अन्यथा नाहीं
ज्यापरि रसगोडीही चाखी जो त्यासची कळे पाही ॥२१॥
चतुर व विद्वान असति ओळखिती भाषणादिकावरुन
ज्ञानित्व जेंवि मुंग्यांच्या मार्गि जाति ओळखुन ॥२२॥
स्थूलहि शांत्यादि असति अनेकपरि लक्षणेंच तीं सांत
असतीं सूक्ष्महि दुसरीं तीं अन्या येतिनाच लक्षांत ॥२३॥
ज्ञान्यासमान करिती दांभिकही अन्यसाधनाभिनय
चालति बोलति कथिती निरूपणहि दाविती पहा विनय ॥२४॥
आद्यचित्त शुद्धीस्तव केलीं जीं ज्ञान साधनें, होती
ज्ञानोत्तर सहजें स्थिर ऐशांचीं लक्षणें कथी मी ती ॥२५॥
मानापमानीं जयापजयीं लाभीं तसा अलाभीं ही
समची अविकारी जो राही ज्ञान्यांत उत्तमचि पाही ॥२६॥
आत्मानुभवाविषयीं केला प्रश्न अतिगूढ त्या जरिही
तत्काल असंदिग्धचि बोले ज्ञान्यांत उत्तमचि पाही ॥२७॥

हौस तया थोर असे स्वचित्तांतून ज्ञानचर्चेची
पुढती निरूपणीं जो होई त्या ज्ञानि सत्य समजाची ॥२८॥
स्वाभाविक कंटाळा कार्याचा, सदातुष्ट, शुद्धमन
महदापत्तींत असे शांत ज्ञान्योत्तमच करा नमन ॥२९॥
हीं चिन्हे ज्ञान्यांची स्वात्मपरीक्षणा लागि कीं कथिलीं
ज्ञान्यातें निःसंशय जाणाया लक्षणें हि सांगितली ॥३०॥
यावरून साधकानें स्वात्मस्थिति पाहिजे परिक्षीली
अन्याचे दोष जसे शोधाया दावि कुशलता अपुली ॥३१॥
तैसे स्वात्म निरीक्षण केल्या त्या कां न सिद्धि लाभतसे
अन्याच्या गुण दोषाविषयीं जेव्हां विचार घेत नसे ॥३२॥
परिगुण दोष आपले शोधी धरुनी विचार तत्परता
तरि त्या प्राप्तसाधने होउन तो सिद्धि मिळवि सत्वरता ॥३३॥
भृगुपुत्रा ज्ञान्यांची चिन्हे ही स्वनिरीक्षणार्थ दाखविलीं
त्यांचा स्वतांस्तव करी उपयोग न तीं दुजास्तवचि कथिलीं ॥३४॥
अन्यांचे परीक्षणा चिन्हेहीं नसति निश्चयें जाण
भृगुपुत्राकारण जे ज्ञानी असती शुद्धांतःकरण ॥३५॥
लाभे ज्ञान सिद्धी ती सत्वर साधनारंभि की त्यांना
दिसती पूर्ववासनानुरोधेंच कार्य मग्न ते नाना ॥३६॥
सामान्य व्यवहारी ज्ञानी तूं केंवि ओळखू शकसी
अभ्यासी तत्पर जे ज्ञानी केवळ परीक्षिती त्यासी ॥३७॥
पटते ओळख त्यांना शीघ्र जासा रत्न पारखी मणिला
दृष्टीसवें परीक्षी ज्ञानी जो मंद धरि तनुस्मितिला ॥३८॥
मूढासम कारण त्या सहज समाधिचा लाभ नच झाला
जोंवरि मग्नविचारी तों स्वरूप स्थिति लाभते त्याला ॥३९॥
असतो देहस्मृतिवर विचार विमुखत्व जैं सुखी दुःखी
होई भोगापरि तो पशुसम वागतां दिसतसे लोकीं ॥४०॥
पूर्णदशा तो भोगी मधिमधि संसार ताप त्यास नसे
यास्तव पशुसम त्याची जी सद्विचार विस्मृती भासे ॥४१॥

बंधनकारक त्याला नच होई दग्ध रज्जुपरि झाली
वस्त्रांतिमाचलद्वय जें लाक्षारंगि जाति बुडवीली ।।४२।।
व्यापी रंगचवस्त्रा मध्यम जो भाग रंगला जाई
तैसी व्यवहार दशा जी स्वरूप दर्शनांतरीं राही ।।४३।।
होई स्वरूपभूतचि बंधनकारक नव्हे म्हणुन त्याला
ज्ञानी मध्यम नसतो मंदापरि धरून देहयोगाला ।।४४।।
देह संयोग म्हणवी देहात्मत्वग्रहा बुधचि जाण
मध्यम विज्ञानी तो देहसंयोग कधींहि ठेवी न ।।४५।।
अभ्यासातिशयत्वें त्याचें मनची सदैव लीन असे
राहि समाधिस्थ सदा व्यवहार संबंध त्या कांहि नसे ।।४६।।
निर्वाहा पुरता तो वागवि देहास निद्रितापरिकीं
जैसा कोणी झोपी गेलेला वासनावशें लोकीं ।।४७।।
बोले किंवा चाले नंतर जाणेन नाठवे त्याला
जैसा मदिरा मत्त न जाणे करितो व बोलतो बोला ।।४८।।
तेवि महायोगी हा लोक व्यवहार बाह्य झाल्याने
कांहीं करी जरि कदा जाणेना ते पुन्हा विसरल्याने ।।४९।।
प्रारब्धवशें व पूर्व संस्कारे देह वर्ततो त्याचा
ज्ञान्या उत्तम ऐशा गंध नसे जाण देह भावाचा ।।५०।।
रथसारथ्यापरीतो देह व्यापार चालवित राहे
रथ योगें व्यापारा करि सारथि तो स्वतां रथचि नोहे ।।५१।।
तैसा हा देहाने व्यापारा सारथ्यापरी करितो
आपण देही किंवा नोहे कर्ता असेच चिद्रुपतो ।।५२।।
अंतरि सुशांत निर्मल राही व्यापार बाह्य करिता हे
जसि नाटकीं नटीही बाहेर व आंत भिन्न दिसता हे ।।५३।।
प्रौढ जसा बालांमधि खेळेपरि निर्विकारची असतो
ज्ञानी हा त्यापरि जगिं क्रीडे व्यापारिं राहि निर्मळ तो ।।५४।।
ज्ञानी मध्यम असतो स्वस्थ व्यवहारि दृढ निरोधानें
परि हा उत्तम राही अति शांत अचल तत्वविचारानें ।।५५।।

बुद्धि परिपाक भेदें उत्तममध्यम असा प्रकार असे
कथितो यासंबंधी झाला संवाद पूर्वि तो परिसे ॥५६॥
पूर्वीपार्वत देशी रत्नांगद भूप अमृतनगरींत
विपाशानदी तीरीं राहुन तो राज्यशासना करित ॥५७॥
रुक्मांगद हेमांगद दोन असे पुत्र त्या नृपाचे ते
जनकातें प्रिय मोठे धैर्यवान बहु उदारधी होते ॥५८॥
रुक्मांगदजो होता शास्त्रांत फार निष्णात
हेमांगदजो होता ज्ञानी श्रेष्ठ स्वरुप त्या ज्ञात ॥५९॥
निघती मृगयेला ते दोघेही एकदां सहित सेना
वसंतर्तूत जाती घोर बहूगहनवृक्ष युक्तवना ॥६०॥
वाधले तेथे त्यांनी व्याघ्रक मृग शशक बहू महिषवर
थकले म्हणुनी घेण्यास्तव विश्रांति गांठिती सरतीर ॥६१॥
सरतीरी वटवृक्षीं राहतसे ब्रह्मराक्षसक्रूर
शास्त्रज्ञ थोर असुनी पंडितवर्यां सिवाद करि थोर ॥६२॥
वादीं जिंकुनि त्यांना भक्षितसे क्रम असा तिथें चाले
रुक्मांगद चारमुखें ऐकुन हें वाद करू असें बोले ॥६३॥
बंधूसहरुक्मांगद जाउन त्या राक्षसासि वाद करी
परि राक्षस जिंकुन त्या भक्षावें म्हणुन त्यास घट्ट धरी ॥६४॥
घालावें मुखित्या तों हेमांगदराक्षसास बोलतसे
मद्बंधूला यातुं खाउं नको म्हणुन त्यास विनवितसे ॥६५॥
थांब जरा जिंकीं मज मग एकदांच भक्षि उभयांते
ऐकुन हेमांगदवध बोलतसे ब्रह्मराक्षस तयातें ॥६६॥
भक्ष्यमिळे बहुकाळें आज मला भूक लागली फार
यावरकरिन पारणा होइल मजलादकाजि आधार ॥६७॥
जिंकुन तुजला मग भक्षुनियां तृप्त शेवटी व्हावें
यापरि निश्चय चित्तीं केलासे नृपवरा मनीं घ्यावें ॥६८॥
बहुकाळानंतर मुनि वशिष्टवर देइ भक्ष्य खाण्याचा
एकेकाळीं भक्षी शिष्य, नृपा ! देवरात मी त्यांचा ॥६९॥

त्यायोगें मुनि देई क्रोधें मज शाप अतिभयंकरसा
यापुढती खाउं नको हे ब्रह्मराक्षस ! तूं मनुष्य असा ॥७०॥
करून अवज्ञा खाशिल तरि तवमुख दग्ध होइ तत्काळ
करितां विनंति बहु मी देती वर चांगला मुनि दयाळ ॥७१॥
येती वाद कराया तुजशीं त्या जिंकिल्या सुखें खाई
तेव्हांपासुन यापरि चालत आला असे क्रमचि पाही ॥७२॥
बहुदिवसानंतर मज उत्तम आहार लाभ झालासे
यातें भक्षण करुनी तुज वादीं जिंकण्यास इच्छितसे ॥७३॥
वदुनि असें खाण्यास्तव उद्युक्त अशा राक्षसास नृप बोले
करुनि कृपा थोडेसें मम वच हें पाहिजेस ऐकियले ॥७४॥
मद्‌बंधू मोबदला योग्य असा वरुन सोडशिल काय ?
कथिल्या तो मी देउन करविन त्या मुक्त इष्ट मज होय ॥७५॥
भाषण त्याचें ऐकुन तो ब्रह्मराक्षस म्हणतसे त्याला
कांहि नसे ऐसें जें त्वद्‌बंधूलागि होय मोबदला ॥७६॥
वेळेवर आलेलें हातीं प्रियभक्ष्य कोण सोडील
परिपण एक असे मम माझ्या प्रश्नास योग्य देशील ॥७७॥
जरि उत्तरें तरि तुझ्या बंधूला सत्य जाण सोडीन
हेमांगद म्हणत बरें बोल तुझे प्रश्न शीघ्र सांगेन ॥७८॥
ऐसें वदतांनृप त्या, विचारितो गूढ प्रश्न राजास
परशूरामा ऐके कथितों मी तुज असे वदे त्यास ॥७९॥
आकाशाहुन विस्तृत, परमाणूहून सूक्ष्म ती कोण
काय तत्स्वरूप असे, असते ती तरि कुठें, करी कथन ॥८०॥
आकाशाहुन विस्तृत परमाणूहून सूक्ष्म चिति आहे
स्फुरणें स्वरूपतीचें, आत्मा तत्स्थान, राक्षसा पाहे ॥८१॥
राजाएकच चिति अतिविस्तृत अतिसूक्ष्मही कशी होते
स्फुरणें काय, कसा तो आत्मा, हें स्पष्ट सांग तूं मातें ॥८२॥
विशालचि कारणत्वें आग्रहत्वेंच सूक्ष्म ती आहे
चिति हें स्फुरणें आहे, चिति आत्मा, ब्रह्मराक्षसा पाहे ॥८३॥

उपलब्धिस्थान तिचें काय असे केंवि होय ती प्राप्त
प्राप्तीपासून तिच्या होई फल कोण ठेविनच गुप्त ।।८४।।
बुद्धिप्राप्तिस्थानच तिचें एकाग्रत्वेंचि लाभतसे
हे ब्रह्मराक्षस पहा झाल्या ती प्राप्त जन्म येत नसे ।।८५।।
हे नृप पुत्र कोणती बुद्धि वद वी एकाग्रता कसली
येतो जन्म कसा बा सांग बरें ऐकण्यास मति सजली ।।८६।।
आत्मोन्मुखता म्हणवी ऐकाग्र्य, अविद्यावृत्ततचितिजाण
बुद्धि असे, देहाला आत्मा म्हणणेच जन्म, नच आन ।।८७।।
चिति उपलब्ध नसे कां तत्प्राप्ती लागिं कोणतें आहे
साधन कथितें मजला जन्म कशास्तव प्राप्त होताहे ।।८८।।
अविवेकानें चितिही प्राप्त नसे ती स्वतांच लाभतसे
कर्तृत्वाभिमान तो जन्माला मुख्य हेतु होत असे ।।८९।।
तूं म्हणसि अविवेक तो कैसा आपणचि नाम कोणाला
तैसा कर्तृत्वाचा अभिमान कसा स्पष्ट कथी मजला ।।९०।।
अपृथक् आत्मा देहा अविवेकच, कोण आपण विचारी
तूंच स्वतांस, 'कर्ता मी' हा कर्माभिमान उच्चारी ।।९१।।
अभिमान नाशभूपा कोण करी त्यास हेतु काय असे
आणखि त्याचें कारण काय असें हेंहि सांग ठीक, पुसे ।।९२।।
अभिमान नष्ट करितो विचार, वैराग्य त्यास मूळ असे
वैराग्या दोषदृष्टिविना हे ब्रह्मराक्षस हेतु नसे ।।९३।।
कोण विचार असे तो वैराग्य म्हणति नृप ! कशाला तें
आणिक दोषदृष्टिही म्हणती कोणास हें कथी मातें ।।९४।।
दृग्दृश्य परीक्षणची विचार, वैराग्य दृश्यवर्जन तें
दृश्य दुःखकारकही दृष्टि असे दोषदृष्टि कथि तूतें ।।९५।।
हें सर्व कशानें बा साध्य असे लभ्य तें कसें त्याला
कारण काय असें हें स्पष्टपणें सांग तू बरें मजला ।।९६।।
हे ब्रह्मराक्षस ! कृपें ईशाच्या सर्व साध्य होत असे
ईशकृपा तद्भक्तीं सत्संगावीण भक्ति लभ्य नसे ।।९७।।

ईश्वर तो कोण असे, भक्ति म्हणावें कशास, राजसुता ।
संत कसे असती ते सांग, मला शीघ्र तू बरें आता ।।९८।।
जगधारणा करी जो, परमेश्वर तो, तयाकडेच मन
लागे सतत, भक्ति ती, असति, दयाळू व शांत संतजन ।।९९।।
कथि राजपुत्र मजला, कोण सतत भयग्रस्त यालोकीं
दुःखी कोण सदारे, दैन्य स्थितिमाजि कोण राही कीं ।।१००।।
भयग्रस्त धनिक महा थोर, कुटुंबी सदैव दुःखातें
पावे, आशाग्रस्तापाठीं सदैवहि दीनता असते ।।१०१।।
निर्भय कोण जगीं या, दुःखरहित कोण आढळे सांग
नाहीं दैन्य असा रे कोण असे, स्पष्ट तूं कथी चांग ।।१०२।।
संगरहित असतो कीं निर्भय, जितमानसा नसे दुःख
आत्मज्ञानी असतो दैन्य रहित, भोगितोच आत्मसुख ।।१०३।।
कोण असे दुर्लक्ष्य जगीं, व देहरहित तो असे कोण
निष्क्रिय जो आहे कीं, कोण तयाची क्रिया असे जाण ।।१०४।।
जीवन्मुक्त दुर्लक्ष्य असे, देहरहित तोच, जरि देही
त्याची क्रिया जगीं या, असते, निष्क्रियाचीच कीं पाही ।।१०५।।
आहे व नाहिं ऐसे काय असंभवच कोणाचा
कथि एवढेंच आतां सोडिन तव बंधु लागिं मी साचा ।।१०६।।
दृग्वस्तु असे व नसे, असंभव अत्यंत, जाण दृश्याचा
सांगितलें हें आतां सोडी मत्बंधु सत्य करि वाचा ।।१०७।।
तो ब्रह्मराक्षस दिसे तुष्ट मनी, उत्तरासि जें ऐके
रुक्मांगदासि सोडुनि सदेह, तो विप्र होउनी ठाके ।।१०८।।
तेजस्वि तपोमूर्तिच, विप्रा, त्या नृपकुमार पाहूनी
पुसती त्या कोण बरें आपण साश्चर्य चित्त होऊनी ।।१०९।।
तें त्या विप्रश्रेष्ठें कथिला वृत्तांत आपला सर्व
मगध प्रांतीं होतों ब्राम्हण वसुमान्नामक मी पूर्व ।।११०।।
सकल शास्त्रवेत्ता, ही माझी सर्वत्र कीर्ति कीं होती
विद्याभिमान योगें, शतशा विप्रां दिला पराभूती ।।१११।।

विजयमदें गर्वित बहु झालों मी, एकदां असें झालें
अष्टक मुनि शांत परावरज्ञ, मगधनृपती सभे आले ॥११२॥
त्यांच्याशीं मी केला आत्मविद्यासंबंधि, जोराचा
वाद सभेमाझारीं, तर्क बळें वितंउशुष्कची साचा ॥११३॥
वेदार्थ भरित अशा सुंदर, तद्भाषणास दूषियले
युक्ति व तर्कबळें त्या खंडून, आक्षेपार्ह ठरवीलें ॥११४॥
राजसभेमाजीं मी, त्यांच्या वचनांतरीं बहूदोष
जरि आगमाधारची दाखवुनि, निंदिलेंच सविशेष ॥११५॥
राजसभेंत जरी मी निंदी त्या, स्वस्थ शांत मुनि होते
परि काश्यपसुतशिष्य क्रोधें, शापी मला न साहुनि तें ॥११६॥
द्विजाधम ! अधिकारतव नसतां तूं निंदितोस आचार्या
चिरकाल ब्रम्हरक्ष होउन तूं राहशी कुजनवर्या ॥११७॥
शापें भयभीत असा गेलों अष्टक मुनीस मी शरण
कांपत कांपत जाउन केलें साष्टांग त्यास मी नमन ॥११८॥
तैं त्या शांत मुनिवरें, जरि मी विरोध विशेष त्या केला
केली दया मजवरी, शापविमुक्तता पंथ दाखविला ॥११९॥
ते म्हणती, प्रश्नातव दिधलीं म्यां योग्य उत्तरें, परि त्या
खोडुनि तर्कबळानें दूषित त्वां दाविलेंसकी सत्या ॥१२०॥
कोशी विद्वान् देई तदुत्तरें मुक्त तूं तदा होसी
राजसुता ! आज मला चिरकालें मुक्त तूं दयें करिसी ॥१२१॥
तरि तूं आत्मज्ञानी सर्वोत्तम महापुरुष मज वाटे
हें वृत्तराक्षसाचें ऐकुन हेमांगदा नवल मोठें ॥१२२॥
पुढती पश्नोपरि त्या वसुमंता, उत्तरें करी बोध
उत्तम योग्यपरीने नृपसुत तो होई जावया सिद्ध ॥१२३॥
वंदुन वसुमंताते हेमागंद बंधुसह गृहा गेला
भार्गव ! यापरि सर्वंहि विचारिलें तूं निरूपिलें तुजला ॥१२४॥

इति श्री. त्रि. र. ज्ञानखंडे राक्षसोपाख्याने
" एकविंशतितमोध्याय: ।"

राक्षस कथा परिसिल्यानंतर भृगुपुत्र परशुरामानें
अवधूत कुलेशातें केलासे प्रश्न थोर विनयानें ।।१।।
त्या शापमुक्तविप्रें भगवन् पुढती विचारिले काय ?
उत्तर हेमांगद त्या काय वदे सकृप सांगता होय ।।२।।
उत्सुक ऐकाया बहु मानस माझें अतृप्त ऐकुनही
वदतां ऐसें भार्गव सदय गुरू बोलती तया पाही ।।३।।
रामा ! संभाषणि त्या गहन असे अर्थ ऐकवी तुजला
नंतर वसुमानद्विज हेमांगलदास विचारितां झाला ।।४।।
हे राजपुत्र पुसतो किंचित् मी सांग कीं मला तूं तें
पूर्वीच परमपद हें अष्टक वादांत जाणिलें होतें ।।५।।
संभाषणें तुझ्या तें पुनरपि मी चांगलेंच जाणितलें
ज्ञाततत्व असुनी तूं स्थिति ऐसी तव कशी न तें कळलें ।।६।।
आत्मतत्व जाणुनि तूं व्यवहारातें कसा बरे करिशी
प्रकाश आणि तमाला एकस्थळ असंभव दिसे मजशी ।।७।।
हे राजपुत्र मजला सांग बरें हें विचित्र होय कसें
यापरि भाषण ऐकुन हेमांगद बोलुं लागला ऐसें ।।८।।
ब्रम्हन् अद्यापि तुझी भ्रांति नसे नष्ट जाहली पूर्ण
आत्मस्वरूप ज्ञाना व्यवहारें बाध कायसा जाण ।।९।।
व्यवहारें बाधित जरि होई तें स्वप्नतुल्य कीं ज्ञान
मग तेणें पुरुषार्थ प्राप्ति नसे पाहि तूं विचारून ।।१०।।
व्यवहार मुळीं चाले ज्ञानाच्या आश्रयें न अन्यानें
तें ज्ञान व्यवहारें होई बाधित मना न हें माने ।।११।।
जाण ज्ञान असे तें जेथें हें जगतसर्व भासतसे
संकल्पें व्यवहार ज्ञानाठायीं समग्र होत असे ।।१२।।

नि:संकल्प स्थितिनें बुद्धीला एकदां स्वरूप कळे
होई कृतार्थ निश्चय बंधरहित होय मुक्ति त्यास मिळे ॥१३॥
प्रश्न तुझा वसुमंता संमत विबुधांस होइसा नाहीं
यापरि ऐकुन पुनरपि बोले तो नृपसुता असें काहीं ॥१४॥
राजकुमार असें हें सत्यचि निश्चय असाच माझाही
विकल्परहित असे जें संवेदन तें स्वरूपची होई ॥१५॥
सविकल्प पुन्हा होतां भ्रांति कशी गांठणार त्यानाही
रज्जू कि सर्प सर्पजसा स्वरुपावरती विकल्प भ्रांतिचही ॥१६॥
हेमांगद वदे विप्र ! नेणसि तूं भ्रमाभ्रम असति कैसे
जाणति गगन निर्णया त्यांनाही गगन नीलची भासे ॥१७॥
व्यवहारीं ते बोलति गगन निळें म्हणुनि कां भ्रम तयांना
झाला ऐसें म्हणणें योग्य दिसे हे तुझ्या विचारि मना ॥१८॥
अज्ञान्यातें भ्रम जो ज्ञान्याला ती प्रमा असे लोकीं
सत्यतारूप जीवच त्यांतुन गेल्या मृताहि परि तो कीं ॥१९॥
दर्पण प्रतिबिंबास ज्ञानी अज्ञानि पाहती समकीं
परि त्यांच्या अवलोकनिं भेद असे सूक्ष्म तूंहि अवलोकीं ॥२०॥
ज्ञान प्रमाच म्हणवी ज्ञान्याचें, भ्रम असेच अन्याचें
व्यवहार ज्ञान्याचे असती कीं ज्ञानमयचि ते साचे ॥२१॥
जैसी आदर्शांत प्रतिबिंब व्यवहारपरी होई
ज्ञान्याची म्हणुनी त्या भ्रांति पुन्हा कैसि होय कीं पाहीं ॥२२॥
केवल अज्ञानज तें ज्ञानें निवृत्त होतसे जाण
दोषापासुन झालें तन्नाश कसा करूं शके ज्ञान ॥२३॥
तिमिर गदानें नेत्रां दोन दिसे वस्तु एक जाणुनही
वा ! जगदाभासाला हेतु असे कर्म दोष कीं पाही ॥२४॥
कर्माचा नाश नसे तंवर व्यवहार लोप होत नसे
जें कर्मलया पावे अद्वय चैतन्य शेष राहतसे ॥२५॥
यास्तव रामा ! ज्ञान्या व्यवहारें भ्रांति संभव न राही
ब्राम्हण यावर पुनरपि अन्य पुसे प्रश्न नृप सुतापाही ॥२६॥

राजकुमार कसें हें ? ज्ञान्याचें कर्म संभवे कैसें
ज्ञानाग्नीचा होतां स्पर्श कसा कर्म मूळ राहतसे ॥२७॥
हेमांगद वदे विप्र ! ऐक तुला कर्मवर्म सांगतसे
सर्वांचें ज्ञान्यांचें कर्म पहा त्रिविध भेद रूप असे ॥२८॥
पक्वापक्व हतोदित असतें हें कर्म तीन भेदानें
पक्वाशिवाय दुसरे पावति विनाश ज्ञान योगानें ॥२९॥
कर्मपरिपाक काला निश्चित करणारि नियति ईशाची
कर्म फलोद्यत केलें कालें त्या पदवि होय पक्वाची ॥३०॥
परिपाक नसे केला कर्मा कालें अपक्व त्या म्हणती
ज्ञानोत्पती नंतर होई कर्मा हतोदितीं गणती ॥३१॥
त्यांत पक्वकर्मा तें म्हणती प्रारब्ध कर्म जाण असे
धनुमुक्त शरापरि तें फल देण्या सिद्ध जाहलें तैसें ॥३२॥
जगदाभास तयास्तव भासे भ्रांतिरूप परि नोहे
अधिक उण्या ज्ञानानें सुख व दुःख भिन्न फलचि देता हे ॥३३॥
मंद ज्ञान्या लागीं स्पष्ट फलानुभव शीघ्रची येई
ज्ञानी मध्यम त्याला फलावभास अस्पष्टची होई ॥३४॥
फलभास उत्तमातें स्पष्ट व तत्काल शशक श्रृंगपरी
असत्यचि असल्यानें सुखदुःखानुभव म्हणूं नयेच तरी ॥३५॥
अज्ञान्याचें फल तें अनुसंधानें सुपुष्टची असतें
पूर्वानुचिंतनानें पोसुनियां पुष्टदृष्टितें गमतें ॥३६॥
ज्ञान्या फल संधान न आत्म चिंतनांत मग्न तो राही
मंद ज्ञान्यांचेंही कर्मफळ न पुष्ट अनुभवा येई ॥३७॥
मध्यज्ञान्याचें फल प्रारब्ध जनित सुषुप्त सम भासे
डांसांच्या दंशाना न गणी तो तेंवि सूक्ष्म गमत असे ॥३८॥
ज्ञानी उत्तम पूर्वीपरि राही निर्विकार फल कालीं
आत्मज्ञान वैभवें दग्ध रज्जूपरिच फोलता आली ॥३९॥
नट जैसा वेषांतर करुनी आनंद दुःख दावितसे
रंगभूमीवर परी अंतरि तो किमपि विकृत होत नसे ॥४०॥

त्याच परी ज्ञानी हा विकृत नव्हे असुनि पूर्ण फलसंग
फल न तयाला स्पर्शी फल होई व्यर्थ जेविशशशृंग ।।४१।।
अज्ञान्या ज्ञात नसे शुद्धात्मारूप ते स्वदेहाला
म्हणती आत्मा तेणें देती सत्यत्व दृश्य भासाला ।।४२।।
मंदज्ञान्याला तरि विदित असे आत्मरूप चिन्मय तें
तेणें जग मिथ्यत्वें पाही परि न अभ्यास पूर्ती ते ।।४३।।
झाली तेणें होई ज्ञानास विरोध वासना योगें
देहात्म बुद्धि येई मधिमधि जगसत्य त्या दिसू लागे ।।४४।।
ज्ञानविचारानें तो भ्रामक दृष्टीस दूरची करितो
यापरिसत्य व मिथ्या भावना धरून जेधवां असतो ।।४५।।
भिन्न भिन्न फलानुभव घेई स्पष्ट फल मधी जरी भासे
त्या भावना द्वय तरी खमशक्तिक नसति जाण तूं ऐसें ।।४६।।
सत्यज्ञान वासना करित असत् जगत भाव बाधीत
परि त्या असत् भावनायोगें तो आत्मभाव नच मिटत ।।४७।।
परभावनेस विसरे जरि मिथ्या भावना प्रभावानें
जागृत होई मानास कीं मिथ्या व्यर्थही अशा ज्ञानें ।।४८।।
निश्चय मिथ्यत्वाचा करुनी तो आत्मभावना घेई
हे विप्रोत्तम त्याच्या सत्य भावनेस बाध नच होई ।।४९।।
मध्य ज्ञान्या नाहीं केव्हांही विस्मृती व जगभास
देहव्यवहारास्तव स्वेच्छें तो घे असत्य भावास ।।५०।।
सिद्धावस्था त्याची निरूपिली साधक स्थितिस ऐके
समाध्यभ्यास तयाचा वाढे तसि विस्मृती कमी देखे ।।५१।।
झाल्या पूर्ण पहा तो मिथ्या ज्ञाना न घेच यत्नें ही
ज्ञानी उत्तम जो कां तद्व्यवहारीं समाधिमधि पाही ।।५२।।
नसतो भेद लेशभर सदासमाहित स्थितिच असल्यानें
सतत समाधिपर असा मध्यम राही सदा अविस्मरणें ।।५३।।
मिथ्याज्ञान भूमिसी अविस्मृतिहि मलिन हो तसे त्याची
उत्तम तो स्वच्छंदें प्रारब्धें सोडुनी समाधीची ।।५४।।

कास, व्यवहारीं जरि वागे तरिहि अविस्मृती त्याची
होत नसे मलिन पहा स्थिति परिसमध्योत्तम ज्ञान्याची ॥५५॥
नसते कर्मालंबी कारण ते असति पूर्ण झालेले
संविद्रूपा वाचुन देखति नच चिद्रुपांत मुरलेले ॥५६॥
कर्म कसें त्या राही ज्ञानाग्नी माजि सर्वही जळतें
म्हणुनी कर्महि त्याचें शेष कुठेही पहा उरत नसतें ॥५७॥
ऐंद्रजालिक कर्मसम तत्कृतिचा भास होइ इतरांना
याचें रहस्य तुज मी कथीतसे सर्व परिस वसुमाना ॥५८॥
दृष्टि शिवाची जैसी ज्ञान्यांचीही तशीच जाण असे
लेशमात्र भेद नसे संशय तिळमात्र विप्रायांत नसे ॥५९॥
यास्तव त्यांच्या ठायीं किमपिही कर्म भास नच होई
यापरि हेमांगद जे सांगे वसुमान ऐकुनी घेई ॥६०॥
तेणें नि:संदेहचि पावे विज्ञान शुद्ध चित्ताला
नृपसत्कार घेउन निजसदना वसुमान् सुखें गेला ॥६१॥
नंतर राज कुमारहि निज नगराप्रती पावते झाले
ऐकून बोध भार्गव दत्तात्रेयास यापरी बोले ॥६२॥
श्रीगुरुभवत्मुखांतुनि ऐके विज्ञान सर्व मज कळलें
संदेह नष्ट झाला तें परमपदहि अलभ्य ओळखिलें ॥६३॥
सर्वानुस्युत आत्मा माळेमधि सूत्र तेवि भासतसे
विज्ञान विरूपण तें पुनरपि ऐकावयास इच्छितसे ॥६४॥
संक्षेपें कथि मजला विज्ञान पुन्हा सकृप गुरूराया
ऐशापरि कीं मतिमम सहज होइ पात्र धारण कराया ॥६५॥
यापरि राम विनंती श्रवण करून गुरु तया म्हणती
भार्गव आतां ऐके कथितों मी सार घेइ तू चित्तीं ॥६६॥
चिति जी परमेशानी पूर्णाहंता मयी परा होय
निज स्वातंत्र्यनामक मायाशक्ति प्रभाव साहाय ॥६७॥
दुर्घटहि घडविण्याचें घेउन ती भासवी जगाकार
स्वात्मीं, आदर्श जसा नगर ती घटना कथी क्रमवार ॥६८॥

आदीं पूर्ण परम चिति पूर्णाहंता विशालची असून
स्वतंत्रता माहात्म्यें निजरूपा भासवी द्विधा करुन ॥६९॥
एकांशीं मग त्यांतिल अपूर्णाहंता भास जें झाला
अन्य भाग तें राही अहंभावरहित बाह्यची त्याला ॥७०॥
प्रथमांश दृष्टीनें तद्बाह्य व अव्यक्त होउनी राही
अपूर्णाहं भावयुत अंशा म्हणती सदाशिवचि पाही ॥७१॥
सदव्यक्तच तत्वतें स्वतांहून भिन्न पाहुनी 'मी ते'
चिति सदाशीव असें ऐक्यत्वें ध्यास धरितसे चित्तें ॥७२॥
विविध जगतोत्पत्तिते, इच्छी स्वातंत्र्य शक्तिनें अपल्या
अव्यक्त देह त्याचा त्यातें मी म्हणुनि चिंतना केल्या ॥७३॥
ऐसा अनु चिंतनपर सदाशीव जाण ईश्वरच होई
अव्यक्त मी अशाधरि भावा त्यांत प्रवेशुनी राही ॥७४॥
ईश्वर ती रूपानें ब्रम्हा विष्णू महेश तो झाला
त्यांनी दृश्यद्रष्टा समुदायचि महाराशि भासविला ॥७५॥
विधिते पुष्कळ झाले ब्रम्हांडें अमित करिति निर्माण
त्यांच्या स्थितिला विष्णू–बहुत रुद्रामित करिति संहरण ॥७६॥
यापरि परशूरामा ! अमित ब्रम्हांड रूप जग झालें
जग हें आदर्शावरि नाना प्रतिबिंबरूप भासविलें ॥७७॥
जगभासतेंच केवल झालें नच तत्वता असे कांहीं
एकचिति असे निर्मळ पूर्णाहं भावरूपची पाही ॥७८॥
चितिही अनेक रूपें अपूर्णाहंकारशी तसी विलसे
जैसा देह व्यापुन अहंभाव तव समग्र राहतसे ॥७९॥
पृथक् नेत्रादिंद्रियीं धरुनि अहंभाव कर्म पर होसी
त्यापरि पर संवित्ही आश्रयूनि पूर्णाहं भावासी ॥८०॥
सदाशिव स्तंबांत व्यापूनि अपूर्णाहं रूपानें
वस्तुतः एकच अशी राही सर्वस्थित स्वतेजानें ॥८१॥
देहोहं भावरूप असुन तू रूप रसादिक ग्रहण
इंद्रिय तादात्म्यानें होत असे जेवि शक्य तुज जाण ॥८२॥

त्यापरि सदाशिव पहा स्वतां सर्व भेददरहित असुनीही
ब्रम्हादि स्तंबवरी असती जे क्षुद्र जंतु अति कांहीं ।।८३।।
पावुन त्या सर्वांसी तादात्मचि जाण तो करी पाही
रामा स्वरूपतव जें सर्वाश्रय निर्विकल्पची राही ।।८४।।
जाणे न तें किमपिही देहीं न करीच भार्गवा कांहीं
त्याच परी संवित्‌ही सर्व जनाश्रय असूनिया पाही ।।८५।।
जाणेन भेदलेशां करित नसे भार्गवा स्वतां कांहीं
यापरि जगहें सारें भासे तद्रूप अन्यथा नाहीं ।।८६।।
प्रतिबिंब जसें दर्पणि तैसें जग सर्व चितीवरी विलसे
स्वातंत्र्यबळें तीच्या होउन तद्रूप राहि अन्य नसे ।।८७।।
प्रतिबिंबाचें भासन जैसें आदर्श भासची आहे
तूं मी इतर द्रष्टे केवळ दृङ्मात्रची असूं पाहे ।।८८।।
दृश्यसंबंध नच तरि चिति असते शुद्ध अन्य नाहि परी
घट प्रतिबिंबयुक्तचि दर्पण जैसे घटादिरहित तरी ।।८९।।
विशुद्ध दर्पण मात्रचि भेदोदय प्रतिबिंब संयोगें
विकल्प संभूत तसा जो होई दृश्य भासतत्त्यागें ।।९०।।
उरते शेष चितिपरा जी अद्वय एकिएकची भासे
महानंद घनरूपाती गयीं दुःख लेशमात्र नसे ।।९१।।
सर्वां अभिलषित चितीयास्तव आनंदघन तिचें रूप
सुख सर्वांसह हवेंसें म्हणुन सुखमय आत्माचि अपरूप ।।९२।।
त्या आत्मरूप सौख्यास्तव धरिति सर्व देह लोभास
सर्वांस हवें तें, सुख विषयांचें समन आत्मसुख लेश ।।९३।।
संकट निरासि सुख तें किंवा निद्रेंत अनुभवा येतें
चित् हें अभीष्ट सर्वां यास्तव आनंद होय चिद्रुप तें ।।९४।।
हें स्वरूप भूत महा सुख नेणति मूढ जे असति जन ते
विषयाच्या भेदानें आत्मभूत असुन वेगळें गमतें ।।९५।।
कारणवशें दर्पणीं प्रतिबिंबें पडलि दर्पणाज्ञान
तों ती वस्तू गमतीं भिन्न अशा जेवि दर्पणाहून ।।९६।।

प्रतिबिंबत्वें कळल्या दर्पणाभिन्न गमति असुनीही
पूर्वी परि भिन्न अशा आरसाचि होति शुद्ध त्या पाही ।।९७।।
त्यापरि आत्मतत्व जो जाणे त्याजगत भास होइ जरी
स्वरूप भूतच वाटे आत्म्याहुन भिन्न कांहि नाहि तरी ।।९८।।
घटिमृत्तिका जसी कीं सुवर्ण भूषणि दिसेच ती प्रतिमा
शैलांतरि त्याचपरी स्वात्मीं जग शोभते अशी उपमा ।।९९।।
म्हणुनी जगत नसे हा ग्रह भार्गव ! चित्ति मुळि न तूं घेई
ही भावना अपूर्णच विपरीत असेच सिद्ध ते होई ।।१००।।
केल्या निरास जगता दृग्रूपें उरत तें असे पाही
जग साधक आत्मा तरि 'नास्ती' शापें जगलय नच होई ।।१०१।।
आदर्श नगर जैसें असतें आदर्शरूप सर्वहि तें
जगत चिदैकरूपचि तेवि असे उघड अन्य तें नसतें ।।१०२।।
विज्ञान हेंच सर्वहि चिन्मय संकोच नच जगाभावी
स्वस्वातंत्र्य वैभवें दृश्यत्वा येतसे चितिच अघवी ।।१०३।।
स्वतां आदर्श जसा पावे नरत्व शास्त्र सारच हें
बंध नसे मोक्ष नसे नाहीं साधक तसेंच साधन हें ।।१०४।।
चिच्छक्ति अखंडाद्वय एक त्रिपुराच सर्व भासविते
विद्याविद्याच असे बंधहि ते मोक्ष तीच साधन ते ।।१०५।।
रामा ! ज्ञेय असे तें इतुकें नच कांहि जाण अन्य असे
ऐसा विज्ञानाचा क्रम तुजला मी समूळ कथिलासे ।।१०६।।
हें सम्यक जाणे नर तरि होई सर्व शोक संहरण
ज्ञानखंड हा नारद ! सयुक्ति सानुभव जो करी श्रवण ।।१०७।।
अज्ञानजन्य त्याचा निःसंशय मोह नाश पावतसे
हें ऐकूनहि ज्याचा मोह जरी पूर्वि साच राहतसे ।।१०८।।
तरि तो केवळ मूर्तिच शैलाची ज्ञान त्यास होय कसें
हें एकवार करि जो श्रवण तया ज्ञान लभ्य होत असे ।।१०९।।
मंदहि दोन तीनदां श्रवण करि ज्ञान त्यास लाभतसे
म्हणुनी श्रवणच याचें निरसि अघाज्ञान लाभ देत असे ।।११०।।

दृष्टि दोष यल्लेखन यत्पूजन चित्त दोषहरण करी
यत्परि शीलन करितां नुर तें कीं बुद्धि मांद्य अल्पतरी ।।१११।।
उपजे विचार अंतरिं सर्वांतर्यामि ओळखी त्रिपुरा
होई बंधमुक्त तो मोह न राही समीप धन्य पुरा ।।११२।।

इति श्री त्रिपुरारहस्ये ज्ञानखंडे द्वाविंशोध्यायः ।

---

# आरती त्रिपुरा रहस्याची

## (आरति ज्ञानराजा या चालीवर)

आरति त्रिपुरा रहस्या । ज्ञान खंडा अविनाशा
ओवाळितों प्रेम भावें । ज्ञान स्वरूपा निर्विशेषा ।।धृ०।।

त्रिपुरा चिन्मयी देवी । जगच्चित्रा भासवी
स्वात्म रूपीं स्वातंत्र्यानें । आदर्श नगराजेवी ।।१।।

दत्तगुरू अत्रीसूत । परशुरामा बोधीत
दुष्टांत इतिहास रूपें । सुलभ रितीं वेदांत ।।२।।

सकृत श्रवण मात्रें । ज्ञान होतसें प्राप्त
मंद असो मोहन राही । पठणीं सदोदीत ।।३।।

---